

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# ब्लॅक इज ब्युटिफुल

सुधा गोखले

REFBK-0024093

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६४१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

4 MAR 1984
21 MAR 1984
18 APR 1984
29 APR 1984
10 JUN 1984
1 JUL 1984
4 JUL 1984
18 JUL 1984
29 JUL 1984
8 AUG 1984
16 SEP 1984
26 SEP 1984
28 OCT 1984
9 DEC 1984
30 APR 1985
27 APR 1986
4 MAR 1987
3 SEP 1989
(क्र. मा. प.)
19 MAR. 1996-८२

संदर्भ भू प्रवास
६४१ [आफ्रिका]
२४०९३
३१११२८३

# ब्लॅक इज ब्यूटिफुल

सुधा गोखले

REFBK-0024093

श्रीविद्या प्रकाशन,
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशिका
सौ. माधुरी अविनाश परांजपे
' विसावा ', दिक्षीत रोड
पार्ले महाविद्यालयासमोर, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०००५७

© श्यामकांत शरश्चंद्र गोखले

मुखपृष्ठ : अशोक गोखले
प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
१७ एप्रिल १९८२

मुद्रक
चिं स लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव पार्वती '
टिळक रोड, पुणे ४११०३०

किंमत १५ रुपये

एकमेव विक्रेते
दा. दि. कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ४११०३०

प्रियतम चि. रोहित ऊर्फ पिट्टू

आणि

डॉ अरुण लिमये —

तुम्ही दोघांनी निर्मळ आनंद
आणि निरपेक्ष प्रेम दिलेत

दोघांची आठवण
एकाच वेळी येते

म्हणूनच —
तुम्हा दोघांना
हे पहिले पुस्तक
सप्रेम भेट

ललिता

# मनोगत

हे सर्व लिखाण लिहिताना भीतीच वाटत होती ज्या समाजात, परिवारात, नातेवाइकात मी वावरते त्याना हे खरं सांगणं रुचेल का? की माणूस शिवलेल्या पाखराप्रमाणे वाळीत टाकल जाईल? कारण अजूनही मनुस्मृती प्रमाण मानणाऱ्यानी स्त्रीने काय करावे, काय बोलावे, कसे वागावे याचे ठोकताळे घालून दिलेत आणि त्या चौकटीच्या आतबाहेरच आतापर्यंत राहिलेली मी परतु कधीतरी या चौकटी मोडून गेल्या आणि वाटले सर्व लिहावे. मुख्यत. यजमानानी हरकत घेतली नाही तेव्हा इतर विरोधाची पर्वा न करण्याचे धाडस जमेलस वाटलं लेख छापल्यानतर काही मडळींनी वाद घातला, तर हे म्हणाले, " हा तिला आलेला अनुभव आहे तिने तो लिहिलाय सर्वांनाच असे अनुभव येतील असे नाही लिखाण हे तिचे व्यक्तिस्वातंत्र्य आहे आणि ते मी मानतो मुलेही वडिलासारखीच धीट आहेस आई तू, म्हणून मोकळी झाली खरा धीर त्याचाच आणखी डॉ अरुण लिमये याचा. सांगणेही मला जड जात होते वारवार रडायलाच यायचे अनामिक भीती वाटायची नर्व्हस व्हायची पण त्यानी धीर देत लिहवून घेतले. एका होडीतल्या सहप्रवाशाचे नाते मृत्यूला स्पर्शून आल्यावर मैत्रीच्या पलीकडचे असते तोच आधार घेऊन सांगत गेले आणि स्वतः त्यानी लिहून घेतले पहिले लेखनिक ते त्याचे ऋण न फिटणारे

लिखाणात मदत वीणा पटवर्धन व सुचित्रा राजुरकरची वयापेक्षा सूर जमल्याने दोघींपाशी मोकळेपणाने सांगत गेले वीणामुळे शशाकचीही मदत गृहीतच पुण्याला राहून लिखाण पुरे करायचे ठरल्यावर त्याच्या आईवडिलानी ज्या अगत्याने घरी राहायला बोलावले त्याबद्दल आभार मानणे औपचारिक ठरेल हाताच्या दुर्बलतेमुळे मी जास्तवेळ लिहू शकत नाही पण स्वतः लेखन करणाऱ्या सुचित्रा व वीणाने माझी लेखनिक व्हावे याचे कौतुक कौतुक कारण वयाने मी मोठी आहे म्हणून. शेवटची सुवाच्य अक्षरातली प्रत तयार केली विद्यार्थी सहाय्यक समितीच्या

शुभदा गोडबोलेंनी तिचेही कौतुकच आणि मग सर्वांचे आभार परंतु आभार, ऋण यापलीकडेही ज्याची मदत झाली ते स्नेही म्हणजे श्री मुकुंदराव किर्लोस्कर. स्त्रीसारख्या दर्जेदार मासिकाने ही लेखमाला प्रथम छापली लोकांच्या प्रतिक्रियेला मी घाबरत होते, तर धीर दिला आणि पुस्तक पूर्ण करण्यास प्रोत्साहन दिले

श्री व पु काळे प्रथितयश लेखक पण आमच्या कुटुंबाचे स्नेही त्यांच स्नेहभावाने पुस्तक पुरं कधी करता हा धोशा लावलेला नाहीतर आळस माझा परम मित्र

लिखाण पूर्ण तर झाले वाचून पाहण्याचे कंटाळवाणे काम शशी मेहता, उषा मेहता, रामदास भटकळ यांनी पुरे केले मित्रत्वाने सुधारणा मागितल्या असे कितीजणांचे आभार मानू? पार्ल्यांतील आमचा एफ-बी आय ग्रुप ( फ्रेंडस, बुक्स, इंटिमसी ) त्यातलाच आणि मुख्यत लेख प्रसिद्ध झाल्यावर अभिनंदनाची पत्रे लिहिणारे वाचक यांचे प्रोत्साहन खरे

शेवटी राहतात राजाभाऊ माटे जेव्हा काही लिहिले नव्हते, लेखनाचा अनुभव नव्हता, फक्त घडलेला प्रसंग त्रोटक ऐकून राजाभाऊ म्हणाले लिहून काढा आपण त्याचे पुस्तक काढू. आभार किती मानायचे?

माझ्या काही वैयक्तीक अडचणींमुळे पुस्तक लवकर काढणे क्रमप्राप्त होते विश्वकर्माच्या राजाभाऊंना ते सोयीचे नव्हते केवळ म्हणूनच त्यांच्या विश्वकर्मा प्रकाशनातर्फे हे पुस्तक प्रसिद्ध न होता माझी मुलगी माधुरी प्रकाशित करीत आहे राजाभाऊ माटेंना झालेल्या त्रासाबद्दल मी दिलगीर आहे हे पुस्तक शुद्धपातळीवरील घाईगर्दीने व चांगल्या स्वरूपात येत आहे याचे सारे श्रेय कल्पना मुद्रणालयाचे श्री नि. स लाटकर यांचे त्यांची व वितरक श्री मधुकाका कुलकर्णी ( श्री विद्या ) यांची मी ऋणी आहे

अनेक अडचणी—माझा दुसरा सुखद परदेश प्रवास, नातवाचे आगमन, आजारपण यात पुस्तक प्रसिद्ध होण्यास बराच उशीर होत आहे पहिलेच पुस्तक आज वाचकाच्या हाती देताना होणारा आनंद मी स्त्री असल्याने थोड्याफार फरकाने अनुभवलाय, माझ्या माधुरीच्या जन्माच्या वेळी आज परत तोच अनुभवतेय

१७ एप्रिल १९८२

सुधा गोखले

ब्लॅक इज ब्यूटिफुल

भू-प्रवास 28063
3।12।83

परदेशी जायचं म्हणजे बऱ्याच लोकाची केवढीतरी तयारी चालते मलाही तयारी करायची होती मोडक्या जहाजासारख्या असलेल्या माझ्या प्रकृतीची डागडुजी करणे ही माझी मुख्य तयारी तसं माझं दुखणं चमत्कारिकच सहसा न होणारा दुर्मिळ रोग मला झाला त्याचं नाव पॉली रेडिक्यूलॉपॅथी ( Pollyradiculapathy ) इन्फेक्टिव्ह मायलोन्यूरायटीस

बरोबर पाच वर्षांपूर्वी होळीच्या दिवशी याची सुरुवात झाली अगदी होळीच्या बोंबा-बोंब फिकी पडावी अशीच मी ठणाणा ओरडत होते त्या दिवशी सकाळी आंघोळ करताना कमरेतून एकाएकी सणकन् चमकून कळ आली, मरणप्राय म्हणतात तशी कशीबशी जीवाच्या करारानं बाथरूमबाहेर आले वाटले, ही स्लिपडिस्क किंवा तत्सम काही प्रकरण असावे शेजारणीने कमरेला वेदनाशामक औषध चोळून दिले. वेदनाशामक गोळीही घेतली तरीही वेदना वाढत्याच प्रमाणात त्यातच भर म्हणून उजवा पायही बधिर होऊ लागला ह्यांना फोन केला हे ऑफिसच्या कामासाठी कुठेतरी बाहेर गेले होते. कधी परतणार ते माहीत नव्हते स्वतःहून डॉक्टराना किंवा हॉस्पिटलला फोन करावा हे सुचलेच नाही. त्यामुळे दुपारभर सर्व शेजारी जमून हळहळणे, वेदनाशामक गोळ्या घेणे, शेकणे व विव्हळणे यात दुपार सरली या दरम्यान तापही आला तो वाढूही लागला कमरेचा ठणका वेदनेच्या शेवटच्या बिंदूपर्यंत जाऊन थांबला होता त्यामुळे सोसणे, फार तर कण्हणे, विव्हळणे एवढेच माझ्या हाती होते तेवढेच मी करत होते मुलं हवालीशी तोंड करून पाहात होती जोरात श्वास घेतला तरी माकडहाडा-पासून कळ उठे कसबसं घोटघोट करत दूध घेतलं तर उलटी झाली म्हणजे आणखीनच त्रास मग मात्र पाण्याचा थेंबही नाही दुपार उलटली सध्याकाळ संपली अजून ह्यांचा पत्ता नव्हता बाहेर अंगणात होळीची तयारी धडाक्यात चालू होती मेळ्याचा प्रोग्रॅम होता शेजाऱ्याच्या झाडावरच्या चोरलेल्या कैऱ्याची आणि काद्याची कापा-कापी चालू होती. मी एकटीच पडून होते उद्या सुट्टीच आहे, या विचाराने हे पण

क्लबमध्ये ब्रीज खेळायला कामावरून परस्पर गले असावेत त्याना घरची हालहवाल काहीच माहीत नव्हती रात्री अकरानतर घरी आले तर मी आडवी फणफणून चढलेला ताप, ठणठणणारी असह्य कबरदुखी, मला शब्दही बोलवत नव्हता तापाच्या ग्लानीत कस हलक हलक वाटत होतं सर्वांगाला बधिरपणा आलेला होता. रात्र आम्ही वरीच काढली होळीची वाव फिकी पडावी असा शख करावासा वाटत होते. मनातल्या मनात करतही होते सहन करण्यालाही मर्यादा असते.

सकाळी हे डॉक्टरकडे गेले ते ॲम्ब्युलन्स घेऊनच आले सगळ्यानी मिळून माझ बोचक उचलून आतमध्ये टेवल काय सोप्प काम आहे ते! एवढा हत्तीसारखा देह चौथ्या मजल्यावरून सदुसष्ठ पायऱ्या उतरवून खाली आणणे पण कुठली तरी मानसिक शक्ती अशा विकट परिस्थितीत सहाय्याला येतेच निदान माझ्या तरी. पुढेही कितीतरी वेळा हाच अनुभव आलाय पायसुद्धा हलवता न येणारी मी त्याच शक्तीच्या बळावर आमचा गड–किल्ले मधुसूदन–मधुसूदन सोसायटी– उतरले कधी एकदा हॉस्पिटल गाठू असे झाले होते

हॉस्पिटलमध्ये येताच हॉस्पिटलचे चक्र चालू झाले तपासण्या लगेच सुरू एक्स रे झाला आणि मला बेड नवर पाचवर ॲडमिट केल देवनारच्या ॲटॉमिक रिसर्च सेंटरच्या हॉस्पिटलमध्ये लावडतोब दोन रगीबेरगी गोळ्या गिळायला हजर निर्विकारपणे टोचलेले एक इजेक्शन नतर मात्र शात शात झोप! कालपासूनच्या वेदना विसरायला लावणारी, आई नतर कुशीत घेते ती झोप लागली किती वेळ कुणास ठाऊक हे रात्री कधीतरी घरी गेले

जाग आली दुखण्याचा आजचा तिसरा दिवस प्रमुख डॉक्टराकडून तपासण्या होऊन उपचार चालू व्हायचे होते कबरेखालचा भाग बधिर, जड वाटत होता. माकड हाडापासून तीव्र वेदना होत होत्या. नैसर्गिक देहविधींनी असहकार पुकारला होता मला कुशीवरही वळायला येत नव्हते. परवानगीही नव्हती माझी केस सर्जिकलच्या बाजूला होती तीन-चार दिवसानी कबरेचे दुखणे काटाभर कमी झाले पण इतर तक्रारी भरपूर होत्या मला उजवा पाय हलवता येत नव्हता, आणि लघवी होणे कठीण झाले होते प्रथम वाटले अथरुणावर बेडपॅन घेणे जड जात असावे नतर लक्षात आले या क्रियेसाठी आपल्याला फार जोर करावा लागत आहे, व मधले अतर वीस-पचवीस तासाचे पडत आहे अतर जास्त तितका त्रास जास्त वाढत्या प्रमाणात पाणी पी पिऊन तडस लागे, पोट दुखे– पण लघवी होत नसे त्यावर नवीन उपचार चालू दहा बारा दिवस या प्रकारात उलटले पण अजून निदान होत नव्हते म्हणजे स्लिपडिस्क वगैरे एक्स रे सर्व नॉर्मल ब्लड युरीन टेस्टही नॉर्मल ताप तर पहिल्या दिवसानतर गायबच झाला होता हॉस्पिटलचे डॉक्टरही बुचकळ्यात पडले त्यात भर सर्वांगाला लागलेला ठणका हातपाय, खांदे, कबर सर्वच ठणकु लागले

जमेची बाजूही मोठी होती. मी उभी राहू शकत होते. धरून लगडत चालू शकत होते दुखण्याची तीव्रता थोडी कमी झाली होती सहनशक्ती वाढलेली होती आठ-दहा तासाच्या प्रयत्नानंतर लघवी होत होती म्हणजे सुधारणा होती हॉस्पिटलमध्ये राहणे किती कंटाळवाणे असते, हे तिथे राहिल्याशिवाय कळत नाही घरचे वेध लागलेले होते धाकट्याची दहावी एस् एस् सी ची वार्षिक परीक्षा दोन दिवसावर आली होती आमचे शेडेफळ तस थोड धादरटच. वाटले त्याच्या परीक्षेच्या वेळी मी घरी जायलाच हवे आणि हट्ट करून मी डिस्चार्ज घेतला दोन दिवसानी श्यामची परीक्षा सुरू झाली आपण घरी आलो ते बरे झाले, याच उमेदीत त्याची परीक्षा पार पडली आणि माझे बरे वाटणे किती पोकळ होत ते कळलं. मनाच्या कुठल्यातरी चिवट तंतूने आपली शक्ती तोललेली असते त्याच्या परीक्षेची माझ्यावर असलेली मानसिक जबाबदारी सपलाच तो चिवट ततू तुटला आणि माझे दुखणे दुप्पट वेगाने उसळी मारून वर आले पुनश्च हॉस्पिटल तेच डॉक्टर्स, त्याच सिस्टर्स पण बदललेले पेशंट. परत त्याच तपासण्या– आणि वेगवेगळ्या तऱ्हेचे एक्स रे चालूच होते उजवा पाय जणू लोखडाचा झाला होता कुशीवर वळायलाही कुणाची तरी मदत लागे. नाड्या आखडतात म्हणे तसेच झाले होते जणू. ठणका असा की रडणं अपरिहार्य. दुसरं मी काय करणार ? डॉक्टर उपचार करत होते पण गुण शून्य परत नवीन उपचार पण गुण शून्यच असं सारख होत होत रोगनिदानच निश्चित होत नव्हत त्यामुळे कोणत्याही औषधाचा उपयोग नव्हता माझ्या प्रकृतीची गाडी हळूहळू घसरू लागली. जून सपत आला माझी मानसिक, शारीरिक शक्ती सपत आली आणि जाणीव झाली आपली देहविषीची संवेदनाच कमजोर झालीय यावर माझा ताबा उरला नव्हता.

आय व्ही पी नावाची टेस्ट झाली रिपोर्ट नॉर्मल मग हा लघवीचा त्रास का होतो ? युरॉलॉजिस्ट डॉ टिळक यानी सिस्टॉस्कोपी केली तरी पहिले पाढे पचावन मात्र त्यानी एक महत्त्वाचे निदान केले. तिकडे हॉस्पिटलच्या डॉक्टरानी लक्ष दिले. डॉ टिळक म्हणाले, मूत्राशयाच्या मज्जाततूत काहीतरी बिघाड वाटतोय माझ्या ऑर्थपिडिक उपचारात मज्जातंतूचा प्रथमच शिरकाव झाला. या आधी ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. वावडेकर याच्या सल्ल्याने उपचार चालू होते डॉ वावडेकर यानीही मला पहिल्या दिवशी आलेल्या तापाबद्दल शका व्यक्त केली होती कारण १०५° पर्यंत ताप का आला होता याचे निदान झालेच नव्हते. आता मायलोग्राम काढायचे ठरले मायलोग्राम याचा अर्थ पाठीच्या मणक्यात औषध भरून खास एक्स रे काढणे या अर्थामागे बराच त्रास सहन करण्याची सूचना दडलेली असते दोन गोष्टी अजूनही प्रकर्षाने आठवतात मणक्यातून होणाऱ्या असह्य वेदना आणि डोके फुटेल अशी डोकेदुखी

एक्स रे काढण्याआधी डॉक्टर म्हणाल्या, सुधा बस, एक छोटेसे इजेक्शन मी

मणक्यात देणार नंतर एक्स रे काढायचे थोडसं दुखेल, परंतु तू सहकार्य दिलेस तर फारसा त्रास होणार नाही ' ' सहकार्य ' न देऊन सांगते कुणाला ? टेबलावर मला घेतल आणि डॉक्टर म्हणाल्या, आता वाका ! ' आधी माझं कंबरड मोडलेल जीव जाईल तर बरे अशा वेदना कंबर हालवतासुद्धा येत नव्हती आणि म्हणे वाका ! म्हणजे लगड्याने मॅरॅथॉन शर्यतीत धावणे होते मी आपली उगीमुगी थोडसं थोडस वाकले आणि वरीचशी विव्हळलेच पण असं आधुनिक ओटा फॅशनच वाकण नको होत जुन्या काळच्या सासुरवाशिणीप्रमाणे कंबर वाकवायला हवी होती वॉर्डबॉय हजर होताच सर्वांनी मला ताब्यात घेतल आणि माझ्या देहाच धनुष्य केल म्हटले आता माझे नक्कीच दोन तुकडे झाले

जवळजवळ अडीच तासानंतर माझी यातून सुटका झाली गलितप्राण झालेले माझे दुखरे शरीर कॉटवर आणून ठेवले खाली डोके वर पाय करून ही एक तऱ्हा- यामुळे डोक दुखत नाही म्हणे माझे मात्र दुखायचे तेवढेच दुखत होते थोडेसे दूध घेतले, उलटून पडले थोडं पाणी पिऊन स्वस्थ पडून राहिले संध्याकाळ गेली रात्री झोपेच्या गोळ्यामुळे झोप मात्र आली सकाळनंतर मायलोग्रामचा त्रास कमी होत गेला अर्थात बेडरेस्ट होतीच पण ठणकून फुट्ट पाहणार डोक काबूत आल होत कंबरेचे धनुष्य सरळ केल्यानंतर होणाऱ्या वेदना मायलोग्रामच्या आधीच्या स्थितीवर येऊन थांबल्या हेही नसे थोडके वेदना वाढल्या असत्या तर ? मायलोग्रामचा रिपोर्ट आला नॉर्मल ! डॉक्टर चक्रावून गेले. म्हणजे मला झालय तरी काय ?

ऑर्थोपेडिक दुखण नाही हे मायलोग्राममुळे ठरल म्हणजे हाड शाबूत होती आता दुसरे कारण शोधायचे डॉक्टर टिळक यानी मज्जाततूसबधी उल्लेख केला होता शिवाय डॉ बावडेकर यानीही मला आलेल्या एक दिवसाच्या तापासबधी शका प्रदर्शित केली होती. मात्र तो ताप एक दिवस तोंड दाखवून गेला तो गेलाच त्यामुळे माझ्या आजाराचा ताप डॉक्टरानाच झाला होता अजूनही मी सर्जनच्याच देखरेखीखाली होते त्यानी न्यूरोसर्जन डॉ गजेंद्रसिंग याना बोलावले. त्यानी सर्व एक्स रे, युरीन, ब्लड वगैरेचे रिपोर्ट, मायलोग्राम, सिस्टॉस्कोपी, आय व्ही पी याचे रिपोर्ट पाहिले हातोडी, टाचण्या इत्यादी आयुधानी कसून तपासणी केली प्रयोगादाखलचा ससा काय बोलणार ? माझे मणक्याचे ऑपरेशन करायचे ठरले ओपन करून आत पाहायचे म्हणे अरे हे काय कपाट आहे ? दार उघडून शोधाशोध करायला ? पण काहीतरी रोग आहे तो मणक्यातच आहे हे निश्चित फक्त तो कोणता ? किती ? कुठे ? हे कळत नव्हत त्यासाठी हे ऑपरेशन माझ मन नाही म्हटल तरी गागरलच आधीच मी उजव्या पायाने अधू झाले होते कंबरेच्या दुखण्याने उठण बसण सोडाच पण कुशीवरही वळता येत नव्हते शिंक आली, खोकला आला की देवच आठवायचा. हसण तर वर्ज्यच झाल होत जोराचा श्वासोच्छ्वासही दुखण वाढवायचा इतका मणक्याचा भाग हळुवार

वनला होता आशा वाटली ऑपरेशननंतर बरे होऊ. तरीही स्पायनल कॉर्डचे ऑपरेशन जरा काळजीचेच वाटत होते. डॉक्टर उत्तम होते हे खर पण माझीच प्रकृती बेभरवशाची होती त्याच काय ? आणि भीती त्याचीच वाटत होती.

आता ऑपरेशनच्या दृष्टीने तयारी सुरू झाली ऑपरेशनचा दिवसही ठरला व अचानक माझ्या उजव्या हातातली ताकद गेली खांद्यापासून तो अक्षरशः लुळा पडला तो सोमवार होता मला दुपारी बेडवरून उचलल आणि ॲम्ब्युलन्समध्ये ठेवल बॉम्बे हॉस्पिटलला आलो न्यूरोफिजीशियन डॉ सिंघाल यानी अथपासून तपासणी केली ह्याना बाहेर बोलावून डॉक्टर म्हणाले, जरा अवघडच केस आहे. अन्कॉमन, अगदी रेअर असा हा रोग आहे ऑपरेशनची जरूर नाही, असं मला वाटतय. या रोगावर निश्चित अशी ट्रीटमेंट नसल्यामुळे ऑब्झर्वेशनसाठी इथे बॉम्बे हॉस्पिटलमधेच राहाव लागेल मी नकार दिला माझ्या अपगावस्थेत मला आमचे हॉस्पिटल सोडून कुठेच जायचे नव्हते अगदी जसलोक किंवा बीचकॅण्डी हॉस्पिटलमध्येही आम्ही परत आमच्या बी ए आर सी च्या हॉस्पिटलमध्ये आलो डॉ सिंघाल यानी न्यूरोफिजीशियन डॉ एन एच वाडिया यानाही दाखवावे असा सल्ला दिला होता ही गोष्ट सोमवारची मगळवार-बुधवार दोन दिवस आमच्या हॉस्पिटलच्या डॉक्टरनी ह्याच्याशी चर्चा केली व ऑपरेशनच्या आधी डॉ वाडियाना दाखवायचे ठरले गुरुवारचा दिवस मी व हे ॲम्ब्युलन्समधून जे जे हॉस्पिटलमध्ये गेलो एका रिकाम्या खोलीत मला ठेवून दिल माझ्याबरोबर माझी भलीमोठी जाडजूड फाईल, ढीगभर एक्स रे, तऱ्हतऱ्हेचे रिपोर्ट, डॉ बावडेकर, डॉ टिळक, डॉ गजेंद्रसिंग, डॉ सिंघाल, हॉस्पिटलचे डॉक्टर गरुड, डॉ गोयल याची मते आणि पत्रे होती न्यूरॉलॉजी वॉर्डच्या आर एम ओ ने तपासणीला सुरुवात केली परत तेच तेच सागायचा मला कंटाळा आला होता न्यूरॉलॉजीमधे केसहिस्ट्रीला फार महत्त्व असते ते पेशटच्या सहकार्यावर अवलबून असते न्यूरॉलॉजीचे दुखणे म्हणजे वेडेपणाच्या सीमारेषेवर थाबलेले एक पाऊल चुकले की शहाणपणाच्या जगाशी सबध तुटलाच भरीला शारीरिक अपगत्व असते ते वेगळंच त्यामुळे चिडकेपणा, रागीटपणा वाढतो मनाचा तोल जातो आणि कुठेही तोल जाणे, ताल बिघडणे म्हणजे .

आपलें शरीर मुख्यत मज्जाततूवरच अवलबून असते त्यामुळे मज्जाततूचे दुखणे थोडे नाजूकच. आता थोड्याच वेळात या नाजूकपणाचा निकाल लागणार होता प्रतीक्षा फक्त प्रेमातच चागली वाटते एरवी जीवघेणीच असते आर एम् ओ ची तपासणी झाल्यावर वाडिया आले परत तीच रेकॉर्ड चालू तपासण्या मात्र थोड्या कमी मोजक्या नि महत्त्वाच्या तपासून झाल्यावर माझ्याकडे टक लावून पाहात डॉ वाडिया म्हणाले, तुम्हाला इथे जे जे हॉस्पिटलमध्ये माझ्या ऑब्झर्वेशनखाली राहावे लागेल.' मी झटकन म्हणाले, ' छे, छे, मी इथे राहणार नाही कधीच नाही मला

आमच्याच हॉस्पिटलमध्ये परत जायचे आहे ' डॉ वाडिया मिस्किलपणे हसले आणि गंभीरपणे म्हणाले, ' ठीक आहे, ठीक आहे हे लेटर तुमच्या डॉक्टराना द्या तुम्हाला जर जगायचं असेल तर इथच याव लागेल मला खात्री आहे तुम्ही विचार करून योग्य निर्णय घ्याल आणि इथे यालच बी अ गुड पेशंट ! '

ऑपरेशन रहित झाले डॉ वाडियाचा निर्णय पण थोडी कापाकापी होतीच उजव्या पायाच्या पोटरीवर कापून ' सूरल ' नर्व्हचा टिश्यू घेतला बॉयॉप्सीसाठी दोन दिवस सर्वजण माझं तोंड चुकवीत होते याचे वागणे मुळातच अलिप्त, स्थित-प्रज्ञासारखे वयपरत्वे ते अधिकच वाढलेल त्याच म्हणण, आपण काय करणार ? डॉक्टराना कळत. थोडेफार मनातून नाराजही असावेत संसाररथाचे एक चाक गळ घातले होते मुलगी तरुण होती तिचा तिने प्रेमविवाह ठरवला होता मुलगा अर्ध्या वयात होता माझ्या वृद्ध वडिलाची जबाबदारी होती. सर्वच अवघड, अर्धवट होत ते पेलायला स्थितप्रज्ञता हवीच तरीही कधीकधी वाटायचे ह्यानी थोडासा भावनेचा ओलावा दाखवावा नि मी मनमोकळ रडून घ्याव पण अश्रूही कधी कधी गोठवावे लागतात

आई वारली तेव्हाही असेच गोठवले होते पहाटे पाचला आई गेली हॉस्पिटलमध्ये मी एकटीच जवळ होते ' She has expired ' थंड शब्द ! बाहेर धो धो पाऊस कोसळत होता असा जुलैचाच महिना बेड खाली करून देण्यासाठी बॉडी मॉर्च्युरी-मध्ये नेली. कॉट रिकामी करून दिल्यावर वॉर्डमधले बसायचे स्टूलही गेले वॉर्डबाहेर भर पावसात मी झाडाखाली बसून होते वॉर्डमध्ये जावही वाटत नव्हत कोसळत्या पावसात मी बसून होते अश्रू गोठवून. भावाला आणि ह्याना घरी फोन करून कळवले होते. त्याची वाट पाहात होते. मनात कढ येऊनही मी रडे आवरले, अश्रू मुकेच राह्यले मला गुदमरवून टाकत कारण आईच्या शोकातिकेमुळे तिचा मृत्यू तिला जास्त सुखाचा होता कोणाचे काय हरपले मला माहीत नाही पण माझे माहेर मात्र संपले उरली फक्त कोरडी ठक्क नाती नात्याची बंधन ती पेलायला मलाही असंच अलिप्त, स्थितप्रज्ञ व्हायला हवे.

तरीही डॉ गजेंद्रसिंग यानी ऑपरेशन ठरविले तेव्हा मी मुकुंदाला पत्र लिहिले होते. बाबाची जबाबदारी होती समजा या ऑपरेशनमध्ये माझे काही कमीजास्त झाले तर ? ही पुढची कलाटणी तेव्हा कुठे माहीत होती ! सर्वसामान्य माणसाना ऑपरे-शनची भीती वाटतेच आणि मुकुंदा आला भावजयीसहित आला जिव्हाळा आटला तरी ओलावा राहिला होताच मतभेद होते तरी तो आला यातच सर्व भरून पावल. मी बाबाबाबत निश्चिंत झाले बाबा आईच्या मृत्यूनतर आमच्याकडे राहात असले तरीही या आजारपणात वाटायचे काही दिवस तरी मुकुदाने त्याना न्यावे मी ही अशी आजारी, अपग या हॉस्पिटलमधून त्या हॉस्पिटलमध्ये नेली जाणारी सध्या

मुक्काम जे. जे. हॉस्पिटल चौथा मजला न्यूरॉलॉजी वॉर्ड कॉट न २० डॉ वाडिया याची पेशंट–सुधा गोखले रोगनिदान–पॉली रेडिक्युलॅपथी–इन्फेक्टिव्ह मायलो-न्यूरायटीस–एका दुर्मिळ रोगाची वळी

मला ॲडमिट केल त्या दिवशी भेटायला कोणीच आले नाही. पाच वाजता हे घरी गेल्यावर मी एकटीच राहिले आजारपणाचा विचार करीत. मला हे कोणते दुखणे झाले आहे? दुर्मिळ म्हणजे काय? निश्चित औषधोपचार का नाहीत? विज्ञान इतके प्रगत असताना? मी यातून कधी बरी होणार? स्वत:च्या पायाने कधी चालणार? माझा हात पहिल्यासारखा होईल का? दोन दिवस वेणी घातली नव्हती. हातात कागदाच धरता येत नव्हता सडास-लघवीला होत नव्हते. झाले तरी समजत नव्हते दोन घोट पाण्यासाठीही दुसऱ्यावर अवलबून राहावे लागत होते हॉस्पिटलचे अन्न जात नव्हते घरचे खावे वाटे पण घर—घर राहिलेच नव्हते मग मला घासभर मऊभात मेतकूट कोण देणार? कोणाला सागायचे नाही हे याचे धोरण आणि म्हणून मुबईतच राहणाऱ्या नातेवाइकानी मला जे जे हॉस्पिटलमध्ये का नेल याची चौकशीही केली नाही माझे दुखणे, माझे अपगत्व ते निमूटपणे सोसत होते मग मी कशी तक्रार करावी? मी उभी राहू शकेन, चालू शकेन की नाही याची शाश्वती नव्हती. आयुष्याचीच नव्हती तिथे या गोष्टी काय महत्त्वाच्या? मनात इतर विचाराना थारा न देता आपल्याला बर व्हायच आहे एवढच घोकायच डॉक्टराना सागायला सोप असत पण काही अनुभव भोगल्याशिवाय समजतच नाहीत मात्र तेवढ्यासाठी कोणाला भोगायला मात्र लागू नयेत एवढ वाटत मृत्यूला स्पर्शून आल्यावर किंवा स्वत: भोगल्यावर. हे असे भयानक अनुभव येऊन गेल्यावर आज वाटतय मित्र आहेत तसे शत्रूही आहेत पण असे अनुभव, असे हाल शत्रूलाही भोगायला लागू नयेत

एकेक दिवस उलटत होता ज्या वाटेने मी चालले होते तो रस्ता एकटीनेच काटायचा होता. स्वत:चा क्रूस स्वत:च्या खाद्यावरून वाहून नेत रात्री फार एकाकी वाटे पळून जावे वाटे मरून जावे असेही वाटे हळवे मन, अधू शरीर याच्या साथीने दिवस उलटत होते वेळ डोंगरासारखा उरावर यायचा कधी पार होणार हा डोंगर? कशी पार करणार अधू शरीराने? हे शातपणे म्हणायचे, 'होईल हळूहळू डॉक्टर उपचार करत आहेतच डॉक्टरावर विश्वास ठेवावा थोडस आणखी सोसायच

अस सोसत असतानाच पायाचे दोन टाके काढले दुसरे दिवशी सकाळी बँडेज खराब झाल होत बायोप्सीची जखम सेप्टीक झाली होती नवीन त्रासाची सुरुवात! पायाचा ठणका. मन कुठेच लागत नव्हत अपगत्वामुळे, दुखण्यामुळे सोशिकपणा संपला कशालाही घाबरत नाही म्हणणारी मी ह्या आलेल्या अपंगत्वाला मात्र घाबरले

वॉर्डमध्ये एकही सुशिक्षित, बऱ्या राहणीचा पेशंट नव्हता सर्व खालच्या वर्गातले. झोपडपट्टीत राहणारे त्यामुळे मला हेही माणसाचेच जग असते हे कळल आपण

किती आयव्हरी टॉवरमध्ये राहतो समजल मला हवी असलेली चकाचक स्वच्छता घोटभर पाणी मिळविण्यासाठी डबकी उपसणाऱ्याना कशी कळणार ? गलिच्छ म्हणून सार्वजनिक मोफत हॉस्पिटल नको म्हणणाऱ्या माझी नाराजी किडामुंगीप्रमाणे झोपडपट्टीत राहणाऱ्याना कशी समजणार ? इथल्या भटारखान्यातले अन्न नको म्हणून चार पैसे खर्चून चमचमीत पदार्थ आणणे हे घासभर अन्नाची भ्रांत असणाऱ्याना कसे उमगणार ? मला हे सर्व इथे समजले. जगणे म्हणजे अन्न–वस्त्र–निवारा एवढीच परिमाणे ती इथे मिळत होती म्हणून हॉस्पिटलमध्ये राहणे रुचत होते

अजून माझ्या दुखण्यानच पाय मागे घेतला नव्हता पायाचे सेप्टीक वाढलेलच होत पोटरीला चागला चार-पाच इच खोल असा घाव घातला गेला. कार्टाझोन औषधाचा हा परिणाम म्हणे नि कार्टाझोनशिवाय मला औषध नव्हते रोज १२० मिलिग्रॅम प्रेडनिसूलॉन घ्यावे लागे. आणि त्याचे साईड इफेक्ट्स भोगावे लागत असेच आणखी दिवस गेले एक दिवस डॉ वाडियानी तपासून झाल्यावर हात धरून उभे केले आधाराने लटपटत उभी राहू शकले. मला उभ राहता येऊ लागल ही प्रगती अजून इथे किती दिवस राहावं लागणार ठाऊक नव्हत. एकटीनं अथरुणावर उठून बसता येत नव्हतं जेमतेम कुशीवर वळता येत होत देहविधीवरचा ताबाही गेला त्या धसक्याने माझे अन्नपाणी बद झाले साहजिकच सर्व औषधाचे साईड इफेक्ट्स तीव्रतेने दिसू लागले ॲसिडिटी वाढली शुगर वाढली मूळव्याध झाली शौचातून रक्त जाऊ लागले उलटया होऊ लागल्या सारखी चक्कर यायची डोके भयकर दुखायचे अगावर मुका मार बसल्याप्रमाणे काळे निळे डाग उमटायचे साधे ठणकू लागले पायाचा घोटा, मनगट, गुडघे अशी सूज आली. शरीरातले हाड न् हाड दुखू लागले केस एकदम पिकून गळू लागले वाचायला पाहायला त्रास होऊन डोळे दुखायचे. दात अधू होऊन हिरड्यातून रक्त यायचे पोटात प्रचड आग पेटलीय वाटे सर्वच अंग सतत गरम होई गार बर्फाच्या लादीवर झोपावे वाटे प्रचड आग जणू साऱ्या आयुष्याला लागली होती. डॉ वाडिया म्हणाले तुमची विल पॉवर असेल तरच तुम्ही यातून बऱ्या व्हाल.

अशी हताश होऊन मी मरायच का ? मी झुजायच ठरवलं. दिवस उलटत होते औषधाचा गुण येऊ लागला मी उठून बसू लागले धरून उभी राहू लागले उजव्या हाताने पाण्याचा ग्लास धरू लागले एक दिवस डॉक्टर म्हणाले, कुबड्याच्या सहाय्याने तू चालून बघ पहिल्यादा कुबड्या हातात घेतल्या आणि पाय मोकळून रडले पण त्याच कुबड्या धरून खोलीबाहेर पडले कुबड्या गेल्या काठीही गेली भिंतीच्या आधाराने चालू लागले दोन दिवसानतर डॉक्टर म्हणाले, आता तुला इथून डिस्चार्ज देऊ B P. R C हॉस्पिटलमध्ये जा तिथे काही दिवस राहावे लागेल आता तू बरी होऊ शकशील. पूर्ण नाही पण खूपच जे जे हॉस्पिटलमधून

डिस्चार्ज मिळाला आनद अर्थातच झाला पण थोडंस वाईटही वाटल इथले डॉक्टर्स आणि सिस्टर माझ्याशी फार चागले वागत होते त्याच्यामुळेच इथले राहणे सुसह्य झाले होते माजरासारख्या मुक्या जनावरालाही जागेच प्रेम वाटत मला इथ जीवनदान मिळालं होत

आमच्या हॉस्पिटलचा दिनक्रम सुरू झाला उठून बसता येत होत स्वतःच्या हातान खाता येत होत पण बोट बधिर झाली होती लिहिता येत नव्हत आणि त्याच वेळी वाटू लागल हे सगळ लिहून काढाव हॉस्पिटलमध्ये एकटीने राहण्यावर, दुखण सहन करण्यावर हा एक उपाय आहे

एका शनिवारी संध्याकाळी कोणीही भेटायला आले नव्हते निवातपणे एक पुस्तक वाचून झाले अगदी मजेत होते जेवणही छान झाले अळणीच आहे, मीठच नाही, चव नाही इत्यादी तक्रार करणे कधीच सोडले होते मीठ, तेल, तूप, तिखट, मसाला-विरहित भाजी, एक फुलका व दही एवढेच अन्न परब्रह्म होते माझ्या जिभेची चवच गेली होती. थोडीफार संवेदनाही खारट, तिखट, गोड याबरोबरच गार किंवा गरम काहीच कळत नव्हते सगळा आनदी आनंद

तर शनिवारी रात्री अस जेवण झाल रात्री आठ-साडेआठला वाटल डोकं थोड जड झालय डोक्याला मुग्या येताहेत मळमळायलाही लागल. वाचन झाल म्हणून होत असेलसं वाटल आघोळ केल्यासारखा घाम येत होता खर म्हणजे गेले आठ दिवस हा एक नवीनच ताप झाला होता एकाएकी चिक्कार घाम यायचा सगळे कपडे भिजायचे, बिछान्यावरच्या चादरीसकट मारुतीला पाझर फुटल्याची एक गोष्ट वाचली होती तसाच मलाही घाम फुटायचा मला तर गमतच वाटायची कारण त्रास काहीच होत नव्हता परंतु डॉक्टराना त्रास होत असावा. प्रत्येक E C G नॉर्मल यायचा तरी घाम यायचा कधीतरी उलटीही व्हायची त्या रात्रीही असेच झाले बस्स ! एवढच आठवतय नतरचे सिस्टरने सागितले

रात्री नऊ वाजता वॉर्डबाय दूध घेऊन आला मी झोपलेली पाहून दूध झाकून ठेवल नि सिस्टरला सागितले कधी नव्हे ते विनाऔषध मला डुलकी लागलेली पाहून सिस्टर म्हणाली, झोपू दे थोडा वेळ तरी अर्ध्या तासाने तिने आयाला खोलीत डोक-वायला सागितले मी झोपलेलीच होते दहा वाजता सिस्टर औषध घेऊन आली मला उठवू लागली आणि भयकर दचकली सगळ्याची धावाधाव माझ्या तोंडातून फेस येत होता. घामाने भिजून गेले होते शुद्धीवर तर नव्हतेच चक्क बेशुद्ध झाले होते म्हणे डॉक्टर आले ग्लुकोज, सलायन, सक्शन चालू E C. G साठी मॉनिटर चालू ऑक्सिजनसाठी नाकात नळ्या खुपसल्या सर्व उपचार चालू रात्र संपत आली मी तशीच डॉक्टर, सिस्टर हवालदील झालेले उजाडलेला दिवस पुढे सरकू लागला. रविवार असल्याने त्यानीही हॉस्पिटल व्हिजिटला सुट्टी दिली होती पावसामुळे शेजार-

पाजारचे फोन बंद सकाळ गेली दुपारही जाऊ लागली संध्याकाळ येऊ लागली नि मी थोडी शुद्धीवर आले प्रथम दिला E C G चा मॉनिटर ऐकू आला पिक् पिक् आवाज डोकं विलक्षण जड झाल होत सगळी माणस दिसत ती हालताना काही स्थिर वाटत नव्हत कुठे आहे याची थोडी जाण होती- बोलण समजत होत पण सुसंगत सागता येत नव्हत डोळे मिटून पडून राहाव वाटत होत संध्याकाळी पाल्र्यातली खूप मडळी भेटायला आली आणि माझी जखडबद्द अवस्था पाहून चकितच झाली हातात नळी, नाकात नळी, छातीला मॉनिटरच्या नळ्या, उशागती ऑक्सिजन सिलेंडर, सक्शन मशिन सगळंच मोठ देखण होत आजारपणाच गाभीर्य वाढवणारं होत. हा थाट पाहून आलेली मंडळीही गभीर झाली मला मात्र उगा खुदूखुदू हसू फुटत होत पण हसता येत नव्हत साधा जोरात श्वास घेतला तरी मणक्यातून सणक यायची मित्रमडळींना डॉक्टरानी सागितले, मि गोखल्याना कळवा आत्ता ती ठीक आहे पण काल काही खरं नव्हत तिला फक्त फळाचा रस नि नारळपाणी द्यायचे आहे तेव्हा फळे आणायला सागा अस्सा राजेशाही थाट होता ऐकून बरे वाटले तोडाला पाणीही सुटले मडळी तशाच गभीरपणे परत गेली आणि मी झकास ताणून दिली कस कालच्यासारख हल्कं वाटत होत हवेत तरगत असल्याप्रमाणे असेच तरगत तरंगत हवेनून खूप दूर जावे वाटत होते. दूरदूर एकटीच

सकाळ उजाडताच हे हजर गभीर चेहरा करून सोबत फळाच्या रसाचे डबे, मोसबी, शहाळी, मासिके वगैरे डॉक्टरानी ह्याना बाहेर बोलावून काय सागितले माहीत नाही पण ह्याचा चेहरा आणखीनच गभीर झाला मी मात्र नवीने चाखतमाखत ऑरेंजज्यूस पीत होते असे चार दिवस काढले एकेक अलकार कमी होत गेले कस मोकळ मोकळ वाटल. एक आठवडा या धावपळीत गेला पायाची जखम तशीच सकाळ सध्याकाळ ड्रेसिंग व्हायचे मधून मधून पस् कलचर व्हायचा नवीन औषधे यायची पण गुण नव्हता जखम चिरत चिघळतच होती तुफान ठणकायची सोसण्याशिवाय काही उपायच नव्हता वाटायच गुडघ्याखाली पायच कापून टाकावा. अखेर औषधाचे डोस पुरे होत आले डॉक्टरानी जखम शिवून टाकली. आता आठ दिवस पाय अजियात हालवायचा नव्हता म्हणजे कुशीवरही वळायच नव्हत पाच दिवस झाले आणि एक दिवस सकाळी बॅण्डेज रक्ताने भरले शिवलेली जखम परत उसवली होती आता मात्र हॉस्पिटलचा कटाळा आला होता सर्व पेशट घरी जाऊन जुने झाले होते मी आपली इथच पुन्हा जखम शिवली पायाची बोटही न हालवता आठ दिवस गेले जखम पूर्ण सुकली. टाकेही काढले. एकदाची या जजाळातून सुटले मार्चमध्ये होळीच्या दिवशी दुखणे चालू झाले आता सप्टेंबर संपत होता वाटले आज उद्या घरी जाऊ पण छे[1] फिजिओथेरेपी सुरू झाली मला पाय नीट उचलता येत नव्हता फरफटत चालायची खाली बसता येत नव्हतं हाताला ग्रीप

नव्हती दोन्ही हात कापायचे चालताना झोक जायचा रंग काळा पडला मानेवर कपाळावर काळे डाग उमटले. केस कापावे लागले तेही पांढरे होऊन गळू लागले. मुख्य म्हणजे संडासाची व लघवीची संवेदनाच नाहीशी झाली चाळिशी येण्याआधीच ' वय ' कितीतरी झाले होते पण मी या जीवघेण्या दुखण्यातून बाहेर पडले होते

आता मात्र मी घरी जाण्याचा हट्ट धरला होळीपासून हॉस्पिटलमध्ये होते दसरा आला होता डोळ्यासमोर फक्त घर दिसत होतं अखेर डॉक्टरांनी सांगितल पुढल्या आठवड्यात तुला घरी पाठवू माझं घर–आमचं घर हाच खरा निवारा आणि आधार माझे घरकुल, माझी पिलं यापुढे मला काही नको मी स्त्री आहे. त्यासाठी माझे घर आहे कितीदा माझे त्याचे वाद झाले भांडणे झाली स्वभाव, आवडी-निवडी एकदम भिन्न तरीही तडजोड करून दोघेही जुळवून घेत होतो नाहीतरी संसार म्हणजे दुसरं काय असतं ? या आजारपणाने मन शरीराइतकेच नाजूक झाले होते वाटायचं यांनी फक्त हळुवार फुंकर घालावी पण स्वभाव कुणालाच बदलता येत नाहीत मला तर नाहीच याच मनःस्थितीत घरी आले दिवस जात होते किडुकमिडुक सोशलवर्कचे उद्योग मी करत होते त्यातच माधुरीचे लग्नही झाले मधून मधून आजारपणाचे झटके येत. आता माहेरी गेल्यासारखी मी हॉस्पिटलमध्ये जाई. बरे वाटताच परत येई.

अचानक ह्यांना परदेशी जाण्याची संधी मिळाली प्रकृती आणखी सुधारेल अशी आशा मला नव्हती मग त्याच्या उत्कर्षाआड का यायचे ? उसनं बळ आपोआप येत. सर्वांनाच काय, मलाही वाटू लागलं, माझी प्रकृती सुधारू लागलीय म्हणून त्यांनी परदेशी जाण्याची संधी स्वीकारण्याचे ठरवले मार्च ७८ ला हे परदेशी गलेही वाटलं आता आपल्यावर दुप्पट जबाबदारी आली आजारी पडून चालणार नाही मी ठरवलं खूप पण प्रकृतीने सहकार्य नाकारलं होत. तरीही त्यांना जायला प्रोत्साहन दिले या आजारपणात पैशाचे महत्त्व फार चांगले समजले होते कर्जाचा डोंगर उतरवण्यासाठी परदेशाचीच मदत घ्यायला हवी होती पराभूत योद्धा पुन्हा पुन्हा लढायला सिद्ध होतो त्या तयारीनेच मी आजारपणाशी झुंजू लागले बरी झालेय असं वाटतंय तोच आजारीपणाला परत सुरुवात व्हायची. मग सर्वांना--नातेवाईक, मित्र मंडळी, शेजारी–वाटायचे ह्यांना बोलावून घ्यावे. फक्त मी ठाम नकार द्यायची. मला श्यामचा पाठिंबा होता पिछाडीला माधुरी–अविनाशचा रिझर्व फोर्स तयार होताच मला काय होतंय हे मला समजत नव्हतं. डॉक्टर एक लांबलचक नाव सांगत त्यावरूनही काही समजत नसे बरी होशील असं मोघम म्हणत पण कधी ?

आणि अशाच परिस्थितीत मी परदेशी जायचं ठरविलं मोडक्या जहाजाची डागडुजी करून सातासमुद्रापार जाण्यासाठी डॉक्टरांची फारशी मान्यता नव्हती. पण माझा परदेश पाहण्याचा हट्ट होता विमानात बसण्याचं औत्सुक्य होतं एकटीनं प्रवासाला जाण्याचं थ्रिल वाटत होतंच पंगु लंघयते गिरिम् । पुढे काय होणार आहे ?

कसे प्रसंग येणार ? आजारपणाला कसा बाध घालणार ? काही अचानक अपघाती प्रसंग आला तर अधू हातापायाने कशी निभावून नेणार ? काहीच माहीत नव्हत आता डोळ्यासमोर होता घरातून दिसणारा एअरपोर्ट अगदी परसात आल्यासारखा आणि उडणारी विमान मला खुणावत होती.

दहा वर्षांपूर्वी पार्ल्यात राहायला आलो परसात भाजी लावावी, वाफे करावेत तसे पार्ल्याच्या परसात रनवेचे पट्टे आणि विमाने उभी पण त्यात बसण्याचा योग येईल, असे मात्र वाटले नव्हते सुरुवातीला बालसदृश उत्सुकतेने विमान आल गेल की मी धावायची खालच्या मजल्यावरच्या रहिवाश्याची दयामाया न करता मग कधीतरी कळल की खालचा मजला, त्याच्या खालचा मजला आणि खालचा मजला असेच धावताहेत सगळ्यानाच विमानाची उत्सुकता अडसराला सेंटार हॉटेलची बिल्डिंग तोवर आली नव्हती पोराच्या शाळा सकाळी सहा वाजता सकाळची साखरझोप त्यामुळे वर्ज्य भल्या पहाटे साधारण सव्वापाच साडेपाचच्या सुमारास आठवड्यातून तीन दिवस जपान एअर लाईन्सची अनाउन्समेंट कानावर स्पष्टपणे यायची. मुले शाळेला निघाली की JAL उडायचे कल्पनेने मी दोन मिनिटात जपानला पोहोचायची मध्य-रात्री बाराएकच्या दरम्यान PANAM जायचे की मी पोचलेच अमेरिकेला मात्र हा योग कमी असायचा कारण त्यासाठी एवढं जागायला हव मिडल ईस्टचं प्रकरण त्या वेळी इतक बोकाळल नव्हत BOAC म्हणजे अगदी रॉयल काम अलितालिया जायचच पण रोमन हॉलिडेची नजाकत त्यात नसायची एअर इंडियाच्या जम्बोचा डौल नवा असला तरी घरचाच त्यामुळे कौतुक आपला तो बाब्या म्हणूनच या सर्व पसाऱ्यात आफ्रिका नावाच खंड कधी ध्यानात आल नव्हत मला आपल वाटायच आफ्रिकेचा प्रवास माकडाप्रमाणे झाडावरूनच करायचा पण आता मात्र मी आफ्रि-केला निघाले होते ती चक्क विमानातून त्याची बदली झाली ती आफ्रिकेत नायजेरिया देशात एका आफ्रिका खंडात इतके छोटे छोटे देश, राज्ये आहेत हे भूगोलात वाचावेसे तेव्हा वाटले. तोपर्यंत एक ठोक आफ्रिका म्हणायची तर अशा एका देशात नोकरीला हे गेले गोष्टी इतक्या भराभरा घडल्या की हे B A R C तून तात्पुरते उडाले ते थेट नायजेरियन आर्मी सर्व्हिसमध्ये उतरले मला लग्नापूर्वी वाटायचे आपला नवरा मिलिटरीतला असावा त्या वेळी जरा जवानाचे फॅड तरुण मुलींना होतच पचवीस वर्षां नतर ह्यानी ही इच्छा पुरी केली आणि मी दुधाची तहान ताकावर भागवली मिलि-टरीचे आकर्षण म्हणजे कडक युनिफॉर्म आणि शिस्त यापैकी या नोकरीत युनिफॉर्म नव्हताच व शिस्त याना या जन्मी जमणं शक्य नव्हतं म्हणून तीही नव्हतीच हे लेगॉसला गेले तेव्हा माझं जाण्याच काहीच ठरल नव्हत कारण फॅमिलीला नेण्याची परवानगी नव्हती नव्हत्याच होतं करण हे तर आपल्या भारतीयाच वैशिष्ट्य ! नायजेरियन आर्मीत गेलेल्या भारतीय लोकाचे पोटाचे हाल होताच त्याना आपल्या

बायकाची क्षणोक्षणी याद येऊ लागली आणि एक एक जणी नायजेरियास जाऊ लागल्या मिस्टरानी यायचं, दहा दिवसाच्या रजेवर भारतात राहून परत जाताना बायकोला बरोबर घेऊन जायचं हा सर्वांचा शिरस्ता. पण आमच्या ह्याचा सगळाच त्यांच्या निराळा माझा आगाऊ उत्साह + याचा आळशीपणा तात्पर्य मी एकटीनेच जायचे ठरवले म्हणजे दहा दिवसाची रजा परदेशात भटकायला मिळेल हे त्यांच सोयीस्कर आमिष प्रवासाचा याना मनापासून कटाळा तरीही माझ्याबरोबर युरोप बघायला येईन म्हणाले सोबतीचा प्रश्न मिटला म्हणून मी खूष माझा हा पहिला परदेशचा प्रवास! विमानाची अपूर्वाई होतीच रोज मी विमानतळाकडे पाहायची लौकरच इथून मी आकाशात उडणार म्हणून! आता काय! आपल्या अगणातूनच उडायचे पोटात गुदगुल्या होत होत्या

आमच्या डिस्कशन ग्रुपने झकास सेंडऑफ दिला माझ्या आजारपणात ओळखीची काही तरुण मुले-मुली भेटायला यायची गप्पा वेगवेगळ्या विषयाबर रंगायच्या या गप्पाना काही अर्थ असावा, दिशा असावी म्हणून जमणाऱ्याना थोडे बाधीव स्वरूप दिले विषय ठरवून बोलू लागलो आवर्जून चागले पुस्तक वाचू लागलो नाटक सिनेमा पाहून त्याच रसग्रहण करू लागलो तोच हा डिस्कशन ग्रूप! पार्टीच्या वेळी पोरानी प्रामाणिक शका काढली सुधाताई, तुमची निघायची जी तारीख ठरेल त्याच्या आदल्या दिवशीच तुम्ही एअरपोर्टवर जाऊन राहा कारण रात्री बारा वाजून एक मिनिटाने दुसरा दिवस सुरू होतो त्या दिवसाला विमान सुटणार असलं तरी रात्री अकराच्या आधी जायला हव व तो आधीचा दिवस असता म्हटल हे लक्षात ठेवायला हव तर हा लक्षात ठेवण्याचा त्रास घेण्याऐवजी तुम्ही आपल्या एक दिवस आधीच जाण चागल नाही का? इतकी माझ्या परदेश प्रवासाची इतराना काळजी! नाहीतर चुकून मी इथेच राहीन ही खात्री आमच्या चिरंजीवाचे वक्तव्य, आई विमान उडताच आपले घर बघायला वाकू नकोस ह. पाल्यातल्या लोकाना वाटेल विमान कोसळल स्कायलॅबसारख आम्हीही सावधगिरी म्हणून विमानतळावरच थाबणार आहोत अशा रिमार्कसहित सेंडऑफ पार पडला

आता माझ जाण बाकी होत. जो तो विचारत हाता कधी जाणार आहात? ऑगस्टमध्ये मी जाणार म्हणता म्हणता सप्टेंबर उजाडला नायजेरियन वकिलाती-कडून पत्राचा काही जबाब नाही. मी एक दिल्लीची वारी करून आले वकिलातीतील अधिकाऱ्याना भेटून आले नायजेरियातून माझ्या येण्यासबधीचे आलेले कागदपत्रच हरवले होते म्हणे. आता जाणे अगदीच अनिश्चित होऊन बसले दिल्लीवारीची फलश्रुती एवढीच की इडियन एअरलाईन्समुळे विमान म्हणजे काय ते बघायला मिळाले खर म्हणजे विमानाने जाताना कोणती साडी नेसावी, काय नट्टापट्टा करावा याची रिहर्सल केल्यासारखीच मी गेले. वृद्ध वडिलाना भावाकड पोचवायला जायचे म्हणून मी

विमानाने गेले आणि दिल्लीलाच जात असले तरी विमान प्रवास असल्याने विमानतळावर पोचवायला कौतुकाने लेक–जावई, मुलगा आणि डॉ. अरुण लिमयेही आले सूचनावर सूचना सगळ्यानी दिल्या होत्या मी गेले तशीच परत आले आणि वाट पाहात बसले अखेर तो सुदिन आला दिल्लीहून आमत्रण आले आनद कसा साजरा करावा समजत नव्हते आणि एकदम दडपणही आले आपल्याला हे सगळ जमेल ना ? परदेशाचा प्रवास सुखरूप पार पडेल ना ?

परदेश म्हणजे इंग्रजी उत्कृष्ट यायला पाहिजे ही कल्पना म्हणजे मी संभाषण कशी करणार ? स्मार्टनेसने 'पॉश' वागल पाहिजे हे शिकायला वेळच नव्हता अवघ्या चार दिवसात मला दिल्लीला जाऊन व्हिसा घेऊन मुबईला यायच होत मग दिवस निश्चित करून सगळ्या गोतावळ्याला पोचवायला घेऊन भारत सोडायचा होता तो हार, ते फोटो, कुणीतरी डोळ्यात पाणी आणणे, सुखरूप जा म्हणणे, प्रत्येकाने वेगळ्या सूचना डोक्यात कोंबणे, निरनिराळ्या आठवणी सागणे असा हा सगळा सोहळा व्हायचा होता याशिवाय परदेशी गेल्यासारखे कसे वाटणार ? माझ असं जाणं म्हणजे सगळ्याचे एअरपोर्टवर फिरायला जाणे आणि कोल्डिंकवाल्याचा खिसा भरणे

पण मुबईहून निघायचाच योग नव्हता नाहीतर मुंबईच्या एअरपोर्टला आग कशाला लागली ? माझ्या जाण्याचा धसका एअरपोर्टनेही घ्यावा ना ? एअर इडियानेच जायची माझी इच्छा आणि त्याप्रमाणे घडणे याच्यात तफावत असते जळलेल्या एअरपोर्टवरून एवढ्यात आफ्रिकेला विमाने जाणार नव्हती नि मला तर कधी एकदा जाते अस झाल होत. म्हणून दिल्लीच्या नायजेरियन हायकमिशनच्या ऑफिसात फोन केला मला दिल्लीहूनही जाता येईल का ? फाड फाड इंग्लिशमधून बोललेल्या शब्दाचा बऱ्याच वेळाने बोध झाला की मला दिल्लीहून जाता येईल तिकीट त्याच्याकडूनच व्हिसाबरोबर मिळणार होते

आता दिल्लीला जाणे, तिकीट व्हिसा घेणे व परदेशी निघणे असे अगदी साधे गणित होते पण माझ गणितच कच्चं दिल्लीला एकटीने जायच भावाशी जिव्हाळ्याचे सबध नाहीत त्यामुळे त्याच्याकडे न उतरता या राजधानीत हॉटेलमध्ये एकटीने उतरणे, एकटीने हायकमिशनच्या ऑफिसात जाणे आणि अगदी एकटीने एअरपोर्टवर जायच हे नकोस वाटत होत माझ हे 'नकोसं' वाटण न सागता उमजून डॉक्टरानी माझ्याबरोबर दिल्लीला यायचे ठरवले. त्याच्या वहिणीकडे–माईकडे उतरलो दिल्लीची ही दुसरी ट्रीप महिन्यापूर्वी वडिलाना दिल्लीत राहणाऱ्या भावाकडे पोचवायला आले होते.

खरं म्हणजे नायजेरियाला जायच ठरले आणि मनात पहिला विचार आला वडिलाचे कसे काय करावे ? एकट्या श्यामच्या भरवशावर सोडून जाणे योग्य नव्हते त्याची प्रकृती उत्तम असली तरी चौऱ्याऐंशी वय दृष्टीआड करता येत नव्हते मामे भाऊ सुहासने म्हटले माझ्याकडे ठेव त्याचा मोठेपणा. वृद्धाश्रम इथे थोडेच उपलब्ध

आहेत? मग चार-पाच महिने काय करावे? भाऊ आहे पण काही समज-गैरसमज दोन्ही बाजूंनी तरीही त्याने कर्तव्य म्हणून वडिलाना त्याच्याकडे ठेवावे असे सांगितले. वडीलही अतिशय दुराग्रही, हट्टी आधी तयार होईनात माझे जाणे रहित होईल इतका मनस्ताप बाबानी दिला शेवटी माझ्याही बाबतीत कर्तव्यच उरले. मुलगी म्हणून म्हातारपणी त्याना सांभाळणे. एकदाचे बाबा दिल्लीला भावाकडे राहायला तयार झाले. भावाकडे त्याना पोचवून मी निश्चित झाले त्यानेही व्यवस्थित स्वागत केले भावजयीने गृहिणीधर्माला साजेल्या तऱ्हेने पाहुणचार केला माझी दोन्ही भाचरं अतिशय गोड, लाघवी मला तर लहान मुलाची खूप आवड मदार कृपालीचे बंध मला अजूनही सोडवत नाहीत हे लिहिताना त्या गोड पिल्लाच्या आठवणीने डोळे भरून येत आहेत. वृंदा स्वभावाने थोडी कडक व संसाराला नेटकी सुगरण, पण आई-बाबांचे त्याच्याशी जमू शकले नाही एकेकाचे योग पटले नाही म्हणून मुलाच्या घरातून बाहेर पडावे लागलेले. स्वत चे घरदार विकून टाकलेले. मुलीकडे राहणे म्हणजे जावयाची मेहरबानगी अशा विचाराच्या आईला भावाचे घर सोडताच निर्वासित झाल्यासारखे वाटले. आई लगेचच गेली राहिलेल्या बाबाची ही परवड. भारतीय कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, मुलाकडेच म्हातारपणी राहणे कारण तो वंशाचा दिवा या परंपरेत वाढलेल्या बाबाना केवळ जावयाच्या चांगुलपणामुळे आराम, सुखसोयी मिळत होत्या

अखेर दिल्लीहून पत्र आले तिकीट–व्हिसासाठी पुढे बरेच महाभारत घडायचे होते. त्याची नांदी म्हणून एअरपोर्ट जळला मी व डॉक्टर दिल्लीला गेलो माझे व भावाचे संबंध त्याना माहीत होते. म्हणून माझे महाराष्ट्र मंडळात उतरायचे त्याना पसंत नव्हते जग व अनेक माणसे पाहिलेल्या त्यांच्या मनाला हे रुचले नाही अखेर तेच माझ्याबरोबर आले आणि मी मुकाट्याने संकोच सोडून त्यांच्या बहिणीकडे उतरल गावातच सख्खा भाऊ असूनही नाती सापेक्ष असतात हेच खरे जन्माने ती चिकटतात पण मनाने जोडली जातातच असे नाही दिल्लीला पोहोचताच दुसरे दिवशी मुकुंदाचा फोन आला कधी जाणार तू? माझ्या हातात तिकीट नव्हते काय उत्तर देणार? कधी जाणार हे मलाही माहीत नव्हते.

व्हिसा तिकीट माझ्या हातात आले दिल्ली-लॅगॉस व्हाया रोम दुपारचा दीड वाजला होता त्याच रात्री बारा-दहाला फ्लाईट होती परतीचे तिकीट नसल्याने पाचशे डॉलर्सचे परदेशी चलन मिळणार नाही हे समजताच धक्का बसला आता फक्त चोवीस डॉलर घेऊन प्रवास करायचा? या दरम्यान मी आज रात्री जात असल्याचे व सध्याकाळी बाबाना भेटून येत असल्याचे मुकुंदाला फोन करून कळवले त्याच वेळी वाटले जास्त डॉलर मिळवण्यासाठी त्याची मदत घ्यावी तो बँकेतच नोकरी करतो भाऊ बहीण हे नात्याचे संबध दुरावल्यावर त्याच नात्याने त्याची मदत मागायला नको होती अडचणीमुळे मनाविरुद्ध का होईना मागण्याची चूक केली त्यानेही बरीच

खटपट केली फोनवरच आमचे बोलण होत होते दिल्लीत येऊनही त्याला भेटायला जमले नव्हते आणि आता तर मी निघालेही सहजच तो म्हणून गेला जमले तर रात्री एअरपोर्टवर येईन. नात्याचे बंध खरच चिवट असतात का? असले तरी का तुटतात?

आता फक्त चोवीस डॉलरच मिळणार तेव्हा जास्त खटपट न करता वेळ वाया न घालवता पुढची कामे उरकणे आवश्यक होते. महत्त्वाचे वडिलाना भेटणे कॅनॉट प्लेस ते करोलबाग रिक्षा धावत होती डॉक्टर परदेश-प्रवासाच्या दृष्टीने सूचनावर सूचना देत होते व्यावहारिक, सावधगिरीच्या काळजीपोटी, मायेपोटी बरोबरच होते ते पण माझ मन मात्र त्यात नव्हत बाबाचा विचार करत होते. मी परदेशी जात होते. माझे मज्जाततूंचे दुखणे. त्यामुळे असलेले सततचे दुखणे त्याचा मला आलेला कटाळा झालेला मनस्ताप नातेवाइकाचे दुरावणे या कटू आठवणी ह्या प्रवासात विसरणार होते का? पुन्हा भारतात परत येऊही नये वाटत होते न परतण्याने मनाच्या उलघालीतून सुटका होणार होती का? श्यामलाही तिकडेच बोलावून आम्ही तिघेही राहू शकलो असतो दोन अडीच वर्षांने लेकीला भेटायला आलो असतो पण बाबाची लेक म्हणून आले असते का? भावाचे भावजयीचे त्याच्याशी पटत नाही हे सत्य माहीत असतानाही मी जबरदस्तीने त्याना तिथे ठेवून सातासमुद्रापार चालले होते. माझ्या आजारपणाने परदेशात अथवा प्रवासातच उचल खाल्ली असती तर! क्वचित होणाऱ्या व झाल्या-वर सहसा ओळखता न येणाऱ्या रोगाची मी पेशट होते बोलून चालून मज्जाततूचे दुखणे रस्ता क्रॉस करताना चक्कर येऊन मोटारीखाली येण्यापासून परत पॅरालिसिस-सारखे होण्यापर्यंत काहीही घडू शकते. मग बाबाचे काय? माझ्यामागे त्याना काही वर्षे काढावी लागली तर कशी काढतील? आणि त्या क्षणी प्रथमच मला वाटले बाबा ह्यात असेपर्यंत मला जगायलाच हवे. आजारी न पडता. मुलगी म्हणून त्याना साभाळण्या-साठी जशी मुले तरुण होईपर्यंत साभाळली तसे त्याच्यासाठी माझे अस्तित्व आवश्यक आहे नाहीतर घर हे, मुले आणि बाबा याच्यातील दुवाच निखळला जाईल. सदर्भहीन होऊन

यापुढे यानी कायम परदेशी राहायचे ठरवले तरी मी जाऊ शकणार नव्हते किलीही मोठ आजारपण आल तरी ह्याच्या अनुपस्थितीत हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होऊन चालणार नाही. बाबाकडे कोण बघणार? फक्त प्रश्न! उत्तर काय? मुलगी म्हणून आतल्या आत रडणारे माझे मन तान्ह्या लेकराच्या आईसारखे कारण कुठलेच बंध मला तोडता येत नाहीत मनातल्या या उलटसुलट विचारात अरुणच्या सागण्याकडे, बोलण्याकडे माझे बिलकुल लक्ष नव्हते व सागूनही या भावना त्याना समजल्या नसत्या त्या फक्त कोणाही वडिलाच्या लेकीलाच समजतील अशा होत्या

हेच जर आज आई असती तर? एखादी बहीण अथवा आणखी एखादा भाऊ

असता तर ? नसलेल्या गोष्टींचा हल्ली मी फारच विचार करायची आई असून काय फरक पडला असता ? कदाचित एकाऐवजी दोघाची काळजी मला वाटली असती पण एकास दोघाचा आधार आहे हा दिलासाही वाटला असता मुख्यतः एक कप चहासाठीही त्याना अवलबून राहावे लागले नसते जोडीदार गेल्यानंतर पुरुष पोरका होतो की स्त्री पोरकी होते ?

आज दिवसभर ते घरात अबोलपणे बसून असतात परत परत गीता वाचतात. कधी त्याच्याशी वादविवाद झाला तर मी त्या गीतेचा उद्धार करते तेही वाद घालतात. वेडवाकडं बोलतात आरोप करतात अर्ध्या तासाने मी माझ्या उद्योगाला लागते. ते पुनश्च गीता वाचण्यात बुडून जातात. काय मिळत मला भाडून ? आणि त्यानाही ? काहीच नाही माझ्या मनातला राग बाहेर पडतो. त्याचा परिस्थितीवरचा सताप एक टी व्ही सोडला तर त्याना मुबईत दृश्य करमणूक नाही आणि दिल्लीला तीही नाही कर्नाटकातला त्याचा जन्म आयुष्य गेल महाराष्ट्रात भाषा येते कानडी, मराठी, इंग्रजी आणि आता दिल्लीच हिंदी कस जमणार ? पुन्हा भावाचा टी व्ही हॉलमधे त्याच्याकडे आलेगेले मित्रमंडळी सर्वांनाच अवघड वाटायचे परत बाबाची रोखून चौकसपणे न्याहाळण्याची वृत्ती जरूर नसतानाही कोणी पाहुणे आले की मुद्दाम हॉलच्या दारातून पाहात उभे राहात कोणालाच आवडत नसे असे वागणे पण आमच्या कुटुंबाने ते सोसले भावानेही का सोसावे ? केवळ मुलगा म्हणून ?

हे परदेशात असतानाच मी तीन साडेतीन महिने आजारी होते हॉस्पिटलात होते माधुरी सासरी होती घरी फक्त श्याम व बाबा कोणी परिचितानी श्यामला घरची हालहवाल विचारली श्याम म्हणाला होता 'झकास आहे आई हॉस्पिटलमध्ये आहे बाबा परदेशी आहेत बहीण सासरी आहे घरी आजोबा आणि मी घर हॉस्पिटल कॉलेज अशा वाटेवर आहे' तर त्या आधी माधुरी शिकायला पुण्याला होती मी सहा महिने हॉस्पिटलमध्ये घरी बाबा, हे व श्याम तीन पिढ्याचे पुरुष ! पण ह्या सर्वांत एकच कॉमन होते आमचे घर ! त्याच्या चार भिंती व छप्पर मुलगी, जावई, नातवडे यापेक्षा बाबाना या छपरातच ओलावा जास्त होता म्हणूनच त्याना स्वतःच्या मालकीचे घर विकल्यानतर हे मुंबईचे घर हक्काचे वाटत होते ही स्वामित्वाची बोचही असावी अशा बाबाना, भावाकडे ठेवून मी परदेशी निघाले होते परप्रातात जात होते. सर्वच अनोळखी म्हणून मी सुखात आणि बाबा आपल्या म्हणणाऱ्या लोकामध्ये राहूनही परदेशात राहिल्यासारखे एकटे दुःखी

आज आई असती तर यात काय फरक पडला असता ? कदाचित आई, बाबा, श्याम मिळून राहिले असते श्याम व बाबाना एकटेपणा वाटला नसता दोघाना साधणारा दुवा आई आज मी काय करते आहे ? दुवाच नाही का ? शवटी वाटत स्त्री व तिचे मातृत्वच सगळा एकसंध ठेवते मग ती माझी आई असो वा मी श्यामची

आई असो मी परदेशी, हे परदेशी, मुलगी सासरी, मुलगा ब्लॉकमध्ये एकटा त्याला काय वाटेल ? संध्याकाळ त्याची भटकण्यात जाईल दिवस कॉलेजात पण रात्री झोपायला घरी यायलाच हवे चार खोल्याचा ब्लॉक एरवी सर्वजण असताना लहान वाटणारा. आता त्याला कसा वाटेल ? रिकामा ! रिकामा ! मी लहानपणी एक जप्ती आलेलं घर पाहिल होत रिकाम रिकाम झालेल सामान काढून नेल्यावर ओकबोक दिसणार. श्यामच्या एकट्याने घरात राहण्याने मला जप्ती आलेल्या घराची आठवण आली. आमच्या छोट्याशा घरातील माणसावर तर ही जप्ती आली नव्हती ? सर्वांना चार दिशेला पांगवणारी.

मुंबईचा ब्लॉक तसा मोठा असूनही एक खोली बाबानी अडवल्यामुळे अडचणच होई नायजेरियात मला मोठा नऊ खोल्याचा बंगला आहे. तिथे आम्ही दोघेच राहणार जागा--पावा अडचण सर्व गुंतागुंतीचे प्रश्न मग फक्त दोन खोल्यात त्याही चाळीतील--सासरे, नणद, दीर, जाऊ, भाऊ, बहीण, मुलगा, नवरा यासह माझ्या थोरल्या जावेने किती वर्षे काढली वहिनी द ग्रेट हेच खरे तिथे नवऱ्याचे वडील इथे माझे वडील नात्याचा फरक आणि त्या वडीलधाऱ्याच्या वागण्यातलाही आणि म्हणूनच खर सांगायचं तर आण्णा देवमाणूस व बाबा फक्त माणूसच त्यामुळे त्याचे इतरत्र कोठेही जमणे शक्य नव्हते परत परत मनात विचार तोच डोकावे आज आई असती तर ? कारण ती पण आण्णाच्याच जातीतली देवमाणूस परंतु तिच्या देवमाणूसपदाला बाबाचा पाठिंबा होता म्हणूनच ते देवमाणूसपण सर्वांना दिसले आणि बाबा फक्त माणूसच राहिले माझ्या सासरच्या मंडळींपासून आईच्या लोकापर्यंत आईने चुकतमाकत बोलत सर्वांना मदत केली थोडीफारच असेल पण जरूर केली म्हणूनच सागलीचे शेजारीपाजारी अजूनही नाव घेतात नातेवाईकही आठवण काढतात आज तीच आई गेल्यावर एकाकी बाबाना मात्र फक्त मीच होते काही नातेवाइकानी विचारले बाबानी त्याच्याकडे चार दिवस जाण्यासही नकार दिला आणि आजारपण, आत्ताचा प्रवास इत्यादींसह सर्वच अडचणींना तोंड देत मी व आमचे घर बाबाना सभाळत राहिलो अशा परिस्थितीत औपचारिकपणे बाबाना भावाच्या घरी भेटायला जाणारी मी डॉक्टराच्या बोलण्याकडे लक्ष न देता मनात म्हणत होते, आज आई असती तर भावाचे घर माझे माहेर वाटले असते. एक आधार वाटला असता

करोल बागेत भावाच्या घरी आलो बाबाना भेटून त्याना व वृंदाला माधुरीची गोड बातमी सांगितली एक बाबाना व एक भाच्याना मिठाईचा बॉक्स दिला व दहा मिनिटे थांबून आम्ही निघालो मी परदेशी किती राहणार ठरवले नव्हते. पण मार्च-पर्यंत राहण्याचा विचार होता. निदान १९८० साल उजाडेपर्यंत तर नक्कीच थकलेले वृद्ध बाबा तोपर्यंत असतील ? मनात विचार येऊन गेलाच एक दीड महिन्यात बाबा

खरावलेलेच दिसले भाऊ जेवणखाण व्यवस्थित करेल याची खात्री होती. पण शरीराला तेवढेच पुरेसे आहे ? त्याच्या मानसिक स्वास्थ्याचे काय ? त्यानी वाद घातला तर मुकुंदा, वृंदाही घालणार निष्कर्ष एकच. त्याचे पटणार नाही पटत नाही चूक एकट्या मुकुंदाचीही नाही बाबाही तितकेच जबाबदार आहेत तरीही त्याना ठेवून जायला हवे होते

मिना ' गावात असतानाच दिल्लीहून माईचे पत्र आले 'तुझ्या भावाचा फोन आला होता. तुला कळवायला सांगितले आहे बाबा बरेच आजारी आहेत म्हणून लवकर परत ये क्षणभरच मनात धडधडल आजारपणातून काय उद्‌भवेल ? बाबाचा मृत्यू ! जो त्याना हवा आहे हा विचार मनात येताच मी हादरले पण सत्य तेच होते ते जगण्याला कंटाळले होते व यातून त्याची सुटका मृत्यूच करणार होता मी परतीची घाई केल्यावरनाही म्हटले तरी हे थोडे नाराज झालेच हजारो रुपये खर्चून मी इकडे आले होते आणि बाबा आजारी म्हणून परत जाऊन काय मिळणार होते ! तेही भावाच्याच घरी होते कुठे अनाथ म्हणून ठेवले नव्हते काय ही त्याची परवड ' भारतातून मुलाचे काही पत्र नव्हते ज्यातून त्याची आणखी काही खबर समजेल पोस्टखात्याचा भयकर अनुभव घेऊनही मी रोज मुलाच्या पत्राची वाट पाहयची. पण नायजेरिया सोडेपर्यंत एकही पत्र आले नाहीच त्यामुळ बाबाचे काय झाले असेल या काळजीने मनाचा एक कोपरा कुरतडत आम्ही पूर्व आफ्रिका पाहून भारतात यायचे ठरवले मिनाला ' गेल्यावर भल्यामोठ्या बगल्यात मुंबईचा चार खोल्याचा ब्लॉक व त्यात दोन खोल्यात एकटे असलेले बाबा दिसायचे. चार माणसाच्या घरात लेक द्यावी अस पूर्वी म्हणत. आत्ता त्याचा अर्थ समजला चौघेजण चार दिशेलापागल्यावर ? माधुरी ठीक आहे हे डॉक्टराच्या पत्रावरून समजले होते आई म्हणून मी निश्चित झाले, पण माईच्या पत्राने मुलगी म्हणून आलेली अस्वस्थता आता भारतात गेल्यावरच दूर होणार होती मनाची उलघाल होत होती पण इलाज नव्हता ना माझा ना त्याचा

भारतात परतल्यावर मुले भेटताच माझा पहिला प्रश्न होता, आजोबा कसे आहेत ?' 'छान ! मुलाचे उत्तर सर्व दडपण दूर झाले. राहिली रुखरुख. ह्याना भारतात परतण्याची घाई केली म्हणून पाटीवरची अक्षरे पुसता येतात तशीच मनातून नातीही पुसता येतील का ? तरीही कधीकधी रेडिओवर गाणं लागतं -- रुणझुणत्या पाखरा जा माझ्या माहेरा-- कोणालाही न कळत मी पापण्यात अश्रू आडवते पाखरू उडून गेलय हिरवे रावे रानात उडाल्यावर रानपऱ्यानी किती झुरावे अशी कविता ऐकली होती माहेर सपल्यावर रुणझुणत्या पाखराला मी काय म्हणू ? श्रावण येतील जातील झोपाळे बाधले जातील शहरात त्याचे काय ? सर्व महिने सारखेच टीचभर जागेत कुठला झोपाळा ? छोटी जागा, छोटी नाती ! हम दो हमारे दो ! बस्स

दिल्लीला आल्यावर पहिले दिवशी व्हिसाच काम दहा मिनिटात झाल हाय-कमिशनरच्या ऑफिसमधील लोकाविषयी माझा आदर वाढला तिकीट तीन-चार दिवसानतर मिळणार होते. माईच्या घरचा फोन नबर देऊन मी माईच्या मुलींबरोबर मजा करायला मोकळी झाले जेलपत्राच्या कामामुळे डॉक्टराना मला दिल्ली दाखवायला वेळ नव्हता माझ रोचक वहिणीच्या हवाली करून ते मोकळे झाले वर पुन्हा मी किती मदत केली हा टेभा मिरवायचा आहेच खास पुणेरी! तीन दिवसानतर हायकमिशनरच्या ऑफिसातून फोन आला मला तिकीट मिळू शकत नाही काहीतरी गडबड आहे धावत वसत विहारमधील ऑफिस गाठले आधी मदतीला तत्पर असणारा अधिकारी आता वेगळाच वाटत होता तो म्हणाला, मला लेगॉसहून काहीतरी आण ' मी म्हटल, जरूर आणीन पण आधी जायला मिळू दे ' परतु त्याच ते पुराण चालू त्यातून बोध इतकाच झाला की त्याला काहीतरी लाच हवी आहे समाजवादी मित्राबरोबर येऊन हे पाप करायच का? मग जायच कस? मी तटस्थ राहाच ठरवल वाट पाहायची, नाहीतर चार दिवसानी मुंबई गाठायची उसन्या अवसानाने मी घरी आले

मनाच्या उदासीनतेत भर पडल्यासारखच घडल जे पीं चे निधन प्रत्येक भारतीयास दु:ख होतच होते त्याच सागरातील मी एक बिंदू

लोकाच्या घरी राहून रडता थोडच येत? तरीही मी एक दिवस चक्क भोकाड पसरले मला भयंकर एकाकी वाटत होते निर्वासितासारखे तावडतोब मुंबईस परतावे वाटत होते पण माईंचे प्रेमळ आतिथ्य, जिव्हाळा, त्याच्या मुलींची माया या आधारावर मी माझे एकाकीपण गिळून टाकले योगायोगाने दिलासा द्यायला मधूभाऊ गानूही दिल्लीत आले होते त म्हणाले, सुधाताई, तुमच्या कोणत्याही शब्दावर माझा विश्वास ' मुख्य म्हणजे हवा होता तो शाब्दिक दिलासाच दुसरे दिवशी सकाळी कॅनॉट प्लेसला एकत्र जमायच ठरवल मी आणि डॉ गेलो विषय अर्थातच माझे जाण सकाळपासून फोनाफोनी चालली होतीच परिस्थिती जैसे थी—आजचा दिवस वाट पाहून मी मुबईला परतायच ठरवले गप्पा मारता मारता मी मध्येच उठून हायकमिशनरच्या ऑफिसात फोन केला नायजेरियन अधिकारी म्हणाला, ' तातडतोब ऑफिसात या आम्ही निघालो तिथ पोचेपर्यंत डॉक्टर मला स्मार्टनेसचे धडे देत होते स्वत:च्या इंग्लिश ज्ञानाच्या प्रामाणिक खात्रीमुळे मी म्हणत होते तुम्हीही माझ्याबरोबर त्या ऑफिसरशी बोलायला या ते म्हणाले, बिलकूल नगाग नाही एकटीने प्रवास करायचाय धीटपणाची सवय हवी इग्रजी येत नसल्याचा न्यूनगड काढून टाक जस येईल तस बोलायच कारण तुझ्याइतकेच मलाही आफ्रिकन इंग्लिशचे उच्चार कळतात महत्त्वाच म्हणजे सर्व चौकशी नीट कर तिकीट व्यवस्थित बघून वेळा विचार वाटेत जाता जाता दुसरे देश बघता येतील का विचार सधी पुन्हा पुन्हा येत नसते जितके बघता येईल तितके बघ तुझ्यासाठी मी लायब्ररीत बसून माहिती

वाचतो काही महत्त्वाची माहिती गोळा करतो नकाशापत्रके घेतो ' मुख्य म्हणजे राजकीय परिस्थितीची माहिती हवी होती कारण मी चालले होते ती वेळच अशी होती की, मी उलट्या प्रवाहात जात होते सर्वांच्या बायका भारतात परतत होत्या पाच-सहा दिवसापूर्वीच लष्करी राजवट जाऊन लोकशाही पद्धतीने निवडणुका होऊन अध्यक्षाची निवड झाली होती जगाच्या इतिहासात क्वचित घडणारे हे अपूप होते लष्कराकडून विनभोवाट रक्तपात न होता शांततापूर्ण सत्तांतर लोकशाहीकडे झाले होते अशी राजकीय परिस्थिती व डॉक्टराची राजकारणाची आवड यामुळे लायब्ररीत याविषयी वाचण्याची संधी ते थोडीच सोडणार ?

मी एकटीच त्या अधिकाऱ्याच्या तिसऱ्या मजल्यावरील ऑफिसात गेले जाताना डॉक्टराना सांगितले, ' आर्ध्या-पाऊण तासात मी आले नाही तर तुम्ही वर या

' गुड मॉर्निंग ' मी खुर्चीवर दहा मिनिटे बसूनच तो अधिकारी कामात गर्क असल्याचे दाखवत होता थोड्या वेळाने मी विचारले,

Any good news ?

तो फक्त हसला आणि दहा मिनिटानतर त्याने तिकीट काढले तिकीट हातात ठेवून त्याने पुराण सुरू केले.

' मी माझ्या प्रेस्टिजमुळे तुला तिकीट मिळवून देतो आहे लेगॉसमध्ये आर्मीने तुझ्या तिकिटाचे पैसे भरलेले नाहीत मागच्या अशा तिकिटांचा रिफंड अजून आम्हाला मिळालेला नाही म्हणून इथल्या वकिलातीने तुझे तिकीट नाकारले पण मी माझ्या बॉसची समजूत घातली हा पाहा त्याचा पत्रव्यवहार ' त्याने गोपनीय फाईल माझ्यापुढे ठेवली त्याचं खरं होत माझे पत्र वाचून होताच तो म्हणाला, ' तिकिटाचे पैसे आर्मीकडून मिळाले नाहीत, तर माझ्या पगारातून कापले जातील पण मी तुझ्यासाठी म्हणून हे तिकीट मिळवले

पण त्याला नुसते आभार नको होते एवढ्यात अलितालियाचा एजंट आत आला माझे तिकीट, फ्लाईट नंबर, रोमच्या हॉटेलसाठी असलेले कुपन सर्व मला समजावून सांगितले मीही तीनतीनदा विचारून खात्री करून घेतली तिकीट माझ्या हातात होते. दोघांचे आभार मानायचे, राहिलेल्या एकदोन कागदावर सह्या करायच्या आणि खाली जायचे एवढ्यात तो अलितालियाचा भारतीय एजंट माझ्याजवळ आला. ' या अधि-काऱ्याने तुझ्यासाठी खूप खटपट केली आहे तूही त्याच्यासाठी काही केले पाहिजेस ' त्याने सुचवले मी म्हणाले, त्याच्यासाठी मी लेगॉसहून चांगली भेट जरूर आणेन ' एजंट आणि अधिकारी एकमेकाकडे पाहून हसले एजंट माझ्या पाठीशी येऊन उभा राहिला माझ्या खांद्यावर हात ठेवून दाबत तो म्हणाला, ' वो तोहफा अलाहिदा खूष रखनेके अलग अलग तरीके रहते हैं । यू आर लुकिंग ब्यूटिफुल ॲंड चार्मिंग

शिरशिरून मी सटकन उभी राहिले आणि त्याचा हात हिसडून टाकला

आपको शरम नहीं आती ? आप हिंदुस्थानी हैं। फिरभी आपका ये बर्ताव ? आपको हिंदुस्थानी कहनेमें मुझे शर्म आती है। आपको समझना चाहिए हिंदुस्थानी औरतें कैसी होती हैं। क्या आपको माँ बहनके लिए भी आपकी यही सलाह रहेगी ? यही ताल्लूक रहेगा ? '

चपापून तो मागे सरकला पण मला संताप इतका अनावर झाला होता की आणखी कोणत्याही शब्दापेक्षा मी त्याच्या खाड्कन थोबाडीत ठेवून दिली.

तो अधिकारीही दचकला एजंट घाईघाईने ऑफिसबाहेर गेला दोन-चार कागदा-वर माझ्या सह्या घ्यायच्या होत्या मला थांबणे भाग होते अर्धा तास होऊन गेला होता तेव्हा डॉक्टर आता वर येतील या खात्रीमुळे भीती वाटत नव्हती

नायजेरियाविषयी तो अधिकारी माहिती देत होता मला रोममार्गे जायचे होते रोमला पधरा तास थाबायचे होते तेव्हा तिथे स्वतःला कसे जपावे हे सागत होता

रोम इज नॉट गुड फॉर अलोन वुमन ! रोमन पीपल आर चीटिंग ' वगैरे बड-बडत होता. मी सर्व ऐकून घेतले सह्या केल्या व उठले परत एकदा आभार मानले दरवाज्यापाशी आल्यावर त्याने मला एक मिनिट थांबायला सांगितले दाराशी येऊन त्याने शेकहॅंडसाठी हात पुढे केला मॅनर्स म्हणून मी हात दिला माझा हात ओढून त्याने मला किंचित जवळ ओढले, ' I want your kiss ! '

क्षणाचाच अवधी होता यातून शिताफीने निसटायला हवे होते मनातला सर्व तिरस्कार, चीड, सताप गिळून मी हसून म्हटल, ' Just a minute '

दार अडवून तो उभा होता ऑफिस तिसऱ्या मजल्यावर एअरकंडिशन्ड खोलीतून आतला आवाज बाहेर जात नाही समोरची काचेची भिंत तोडून पळणं मला अशक्य होत सर्व उपजत शहाणपण गोळा करून मी त्याला म्हटल, ' You are a good friend You helped me lot. I am thankful for it You know we Indian ladies never give kiss to any other gents. In our country only father, brother, husband and son can touch us. No any other gentleman

माझ्या भडिमाराने तो तिथच थबकला पण माझा हात अद्याप त्याने सोडला नव्हता मी हलकेच हात काढून घ्यायला लागल्यावर तो म्हणाला, I want to kiss your silky hair for remembrance ' आणि मला काही कळायच्या आत त्या धिप्पाड सहा फुटी काळ्या माणसाने वाकून केसाचे चुबन घेतले. कितीही अदबीने त्याने हे केले तरी त्याची नजर मला सभ्य वाटली नाही कदाचित त्याला मी एज-टाच्या थोबाडीत दिलेली आठवत असावी आणखी एक महत्त्वाचं म्हणजे मी त्याला आधी बोलताना म्हटल होत आमचे फॅमिली फ्रेंड खाली लायब्ररीत आहेत. मला समजलं नाही तर ते येऊन सर्व माहिती तुमच्यापाशी विचारणार आहेत आत्ता

येतीलच ते इथे.

कारण काहीही असो तो दरवाज्यातून बाजूला झाला मी दार उघडून खाली आले. क्षणभर वाटले हे सर्व डॉक्टराना सागावे का ? सत्तेपुढे शहाणपण, धैर्य, चीड चालत नाही तरीही डॉक्टराना थोडक्यात सर्व सागितले व म्हटले, 'तुम्ही आता काही ॲक्शन घेऊ नका प्लीज मला भारत सुखरूप सोडू द्या. माझ्या शब्दाशिवाय माझ्याजवळ दुसरा कसलाही पुरावा नाही आणि पुराव्याशिवाय आपण काय करणार !

आता आम्हाला घाई करायला हवी होती दुपारचा एक वाजला होता फ्लाईट त्याच दिवशी रात्री बारा दहाला होती. फक्त अकरा तास उरले होते फॉरेन एक्सचेंज मिळवायचे होते लेगॉसला ह्याच्या मित्राला व लेगॉसच्या ऑफिसात केबल द्यायची होती भावाकडे जाऊन वृद्ध वडिलाचा निरोप घ्यायचा होता खाण्याच्या जिनसाची खरेदी करायची होती कामंच काम डॉक्टराना मदतीला घेऊन उरकायची होती वेळ फार थोडा होता घड्याळाचे काटे वेगाने धावतात की आम्ही दिल्ली सोडले नि—

—रोम आले. खास इटालियन स्टाईलीत अनाउन्समेंट झाली. 'आपण रोमला पोचत आहोत बाहेरचं तपमान अमुकतमुक आहे. सहकार्याबद्दल आभार ! तरी आम्ही आपले आकाशातच घिरट्या घालत होतो लहानपणी प्रवास करताना रेल्वेगाडी, एस टी लेट झाली की मला फार आनंद होई जास्त वेळ गाडीत बसायला मिळायच म्हणून. तेही तेवढ्याच तिकिटात तसा बालिश आनद आत्ताही थोडा झालाच. पण वाटलं लवकर खाली उतरण सेफ नाही का ? लहानपणचा निरागसपणा आत्ता कसा राहील ? खाली अजूनही दाट धुक होतं पहाट होत होती. दिवे लुकलुकताना दिसत होते माझी उत्सुकता पराकोटीला पोचली होती पाश्चिमात्य देशात मी प्रथमच पाऊल ठेवत होते तेही एकटीनेच पहिला विमानप्रवास करून मगाची हवामानाची सूचना कळलीच नव्हती त्यामुळे विमानातून उतरून बाहेर आल्यावर मला वाटले, रोममध्ये बर्फ पडते का काय ? इतकी कडाक्याची थडी भुरभुरणारा पाऊसही झोंबरं बोचर वारं आणि माझ्याकडे फक्त एक मुबई फॅशनचा स्वेटर विषुववृत्तावरच्या उष्ण देशात जाताना गरम कपडे कशाला ? वाटेतल रोम काही तासापुरतच होत उबदार बसमध्ये शिरल्यावर कडकडणारे दात, थरथरणारे हात, कापणारे पाय आपलेच आहेत हे कळल एअरपोर्टवर ट्रान्झिट व्हिसा, कस्टम याचा केवढा बाऊ वाटत होता पण केव्हा बाहेर आले कळलं नाही अर्थात सामानही काही नव्हतंच मोठी बॅग दिल्ली ते लेगॉस अशी बुक केली होती रोमपुरती एक छोटी एअरबॅग हातात होती बाहेर आल्यावर माझ्या हॉटेलच्या नावाच्या बस स्टॉपची पाटी शोधून काढली सर्वत्र योग्य पाट्यामुळे तस काहीच अडलं नाही आणि सरळ हॉटेलमध्ये आले

हॉटेलमध्ये एकटीने राहण्याचा माझ्या आयुष्यातला हा पहिलाच प्रसग आणि

पाहात असलेले चिक्कार हिंदी सिनेमे यामुळे आपल आता कस होणार ही उगीचच धडपड ! लाऊजमध्ये कोन्यात बसून होते आत्ता खोली मिळेल याची वाट बघत मिनिटामिनिटाच्या उपयोग करायचा म्हणून रोमला पोचल्याची चार पत्रे लिहिली तेवढ्यात नतर इकडे तिकडे पाहात असताना चारपाच भारतीय दिसले साहजिकच हिंदीतून तुम्ही कुठचे आम्ही कुठचे विचारणा झाली मडळी नायजेरियातून भारतात चालली होती रजेवर माझ आताच जाण विशेषत अशा राजकीय परिस्थितीत त्याच्या नजरेतच खटकलेल दिसल राहवेना म्हणून एकाने विचारले, आत्ता आणि एकट्या कशा जात आहात ? काही झाले तर ?' 'काय होणार आहे ?' माझा उलट सवाल ब्रेकफास्ट त्याच्या बरोबरच घेतला ती मडळी रोम पाहायला गेली मला अजूनही खोली मिळाली नव्हती रिसेप्शनिस्ट सागायची वाट पाहा रिकामी झाली की देऊ शेवटी मी सामानासकट कौंटरपाशी आले व त्या अगदी छुटक्या कौंटरवर उडी मारून बसले. क्षणभर रिसेप्शनिस्ट बघतच राहिली मी माझ इंग्लिश पाजळल

Half an hour I am waiting here. You are not looking me so I come to sit here You can see me all time and you remember I want a room

माझ्या बोलण्याचा अर्थ तिला पुरेपूर समजला दुर्लक्ष करण्यासारखी नजरेआड होईल अशी मी खासच नाही उलट नजरेतून उतू जाणारी माझा तिला अडथळाच झाला आणि तिने मला एका सिंगल रूमची किल्ली दिली

अहाहा ! उबदार खोली ! मऊमऊ बेड हातपाय ताणून झोपावस वाटत होत पण भीष्माच्या शरपजराप्रमाणे त्या गादीवर डॉक्टराचे शब्द पसरले होते सधी परत परत मिळत नाही मिळेल तेवढे पाहून घे' जग हिंडल्याने बघितल्याने फायदाच होतो मनातला न्यूनगड दूर होईल पधरा ताम वेळ होता अवघे चोवीस डॉलर्स होते आणि रोम बघण्याची अनिवार इच्छा प्रवासाचा शिणवटा गरम पाण्याने तोंड धुऊन दूर केला मी खाली आले काउटरवर डॉलर्स बदलून लिरा घ्यावयाच्या होत्या एक डॉलर = ७५० लिरा पाटी पाहिली एअरपोर्टवर एक डॉलरला = आठशे पन्नास लिरा पाटी पाहिली होती शभर लिराचे नुकसान तेही फक्त चोवीस डॉलर्स जवळ असताना मी आले ती बस हॉटेल–एअरपोर्ट फेऱ्या घालत होती मी चौकशी केली मला फुकट जाता येईल का ? परदेशाच्या पहिल्याच टप्प्यात महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली होती चकटफू की पैसे चकटफू नसेल तर तो रस्ता आपला नव्हे बरोबर २४ डॉलर्स त्यामुळे बसने फुकट एअरपोर्टवर गेले पासपोर्ट होताच दोन रुपयाचे तिकीट न काढावे लागता आता जाऊन एक डॉलरचे आठशे पन्नास लिरा-प्रमाणे पैसे मोजून घेतले. आता माझ्याकडे हजारो लिरा होत्या परत हॉटेल आधी पोटोबा व्हेजिटेरियन जेवणाला जास्त पैसे द्यावे लागतील पुन्हा चोवीस डॉलर्सचा!

हिशोब म्हटल चालेल पण तुमच नॉनव्हेज नॉन काढून व्हेज खाईन डाईनिंग रूममध्ये लोकाना गमत दिसली चकटफू मटन स्टयूमधून एकएक मॅकरोनी वेचून खाणारी मी एअरवेजच्या लोकाना ठरावीकच जेवण होतं पोट भरण एवढाच उद्देश पार पाडून मी रोमन हॉलिडे एन्जॉय करायला निघाले

रोम म्हटले की दोनच गोष्टी आठवतात एक पोप आणि दुसर रोमन हॉलिडे मला तो स्मार्ट प्रेमळ पत्रकार, पुरुष मंडळींना ऑड्री हेब्बर्न आठवणारच

कडाक्याची थडी सकाळी पडलेला पाऊस रस्त्याकाठचा चिखल मात्र अगदी आपल्यासारखाच सर्वजण उबदार कपड्यात बाहेर पडले होते आणि मी कुणीतरी फोटो काढायलाच हवा अशा अवतारात होते गुडघ्यापर्यंत मोजे, त्याच्यावर चपला सुरेख प्युअरसिल्क साडी त्यावर जरा जुनापुराणाच पण मगळी बटण लावलेला स्वेटर डोक्यावरच्या फडफडत्या पदराने थडी भागण शक्यच नव्हत त्यामुळे कोल्हापुरी फेटा नसला तरी एका सुती साडीचा उपयोग मुडासे—टापसे असे काहीही म्हणता येईल असं बाधून थडीपासून सरक्षण केल होत तरी हू हू हू चालत होत म्हणून एक साडी शालीसारखी अंगावर लपेटून घेतलेली पडदानशीन बायकाप्रमाणे नाकाला रुमाल तेवढा बाधायचा राहिला होता थोड चमत्कारिक दिसल होतं पण इथ कोण पाहणार होतं ? हा विचार मनात येताच मी खरीखुरी टुरिस्ट बनले आणि झपाझप चालू लागले कारण परदेशी टुरिस्ट असेच चालतात हे मुबईत पाहल होत कोपऱ्यावर पोहोचले आणि थेट ट्रॅफिक पोलिससमोर उभी राहिले माझ्याकडे तो बघत राहिला एकमेकाना समजेल अशी एक गोष्ट आम्ही केली, हसलो मी विचारले, व्हॅटिकन सिटीला कस जायच ? शुद्ध मराठीत ॲ ' काय म्हणालात याअर्थी त्यान इटालियन उद्गार काढला माझ्या प्रश्नातला व्हॅटिकन सिटी व चेहऱ्यावरचा भाव दोन्ही त्याला बरोबर कळल टुरिस्ट ? मी नंदीबैलासारखी मान हलवली हातानं—कुठले ? ही त्याची खूण 'इंदिया इंदिया माझे first class इंग्लिश उत्तर लगेच त्याचे डोळे मोठे झाले हू ⊂⊂ दोनचार इटालियन वाक्य बहुतेक आपल्या स्तुतिपर असावीत अशी माझी सोयीस्कर समजूत 'व्हॅटिकनला लोकलने कस काय जायच ?" माझ सभाषण मराठीतच 'इंग्लिश ' खादे उडवून डोळे भुवया याची हालचाल करून मी म्हटल, ' No English ' खी खी खी हसत त्याने मला थाबायची खूण केली आणि रस्त्यावर चालणाऱ्या माणसाना त्यानी हाक मारून काहीतरी विचारले शनिवार होता रोममधल्या उपनगरात त्यामुळे पादचारी रस्त्यावरून चालत होते नुसत्याच सुळसुळ मोटारी धावत नव्हत्या एक जण तुरूतुरू आला आपापसात बातचीत करून तो माझ्याशी इंग्लिशमध्ये बोलू लागला बिगरीतल्या विद्यार्थ्याला समजावतात तस मी लिडो नावाच्या उपनगरात आहे पाच मिनिटाच्या अतरावर ट्यूब रेल्वेचे स्टेशन आहे तिथून सहाशे पन्नास लिरा देऊन रोम टर्मिनसला जाता येत रिटर्न तिकीट काढल तर पन्नास लिरा कमी पडतात ही पण

चोवीस डॉलर्सच्या दृष्टीने मौलिक माहिती मिळाली टर्मिनसच्या बाहेर बस स्टॉप आहे तिथून व्हॅटिकनला जाता येते रिटर्न तिकीट काढल तर जाताना अथवा येताना एक हॉल्ट घेता येतो दर अर्ध्या तासाने ट्यूब रेल्वे आहे दहा मिनिटानी बस. माहिती सांगून तो हसला बहुतेक पोप तुझं भल करोत म्हणत दहा वेळा थँक्यू थँक्यू म्हणत दाखवलेल्या रस्त्याने मी चालू लागले

दुतर्फा दुकाने सामानाने खचाखच भरलेली एकदम माझे पाय थबकले एक बोळका एका मशीनपुढे उभा होता आत नाण टाकल की कोन बाहेर यायचा शेजारच्या नळाखाली धरला की भुस भुस मऊ लुबलुबीत आईस्क्रीमने भरून जायचा. जिभा चाटत खाणारा बाजूला होत होता मी फक्त दुरून जिभल्याच चाटल्या माझ्याकडं नाण असत तर मी कोनभर आईस्क्रीम अधिक ओंजळभरही घेतल असत पण ते येट यत्र कोन आईस्क्रीमने भरला की नळ बद आईस्क्रीम न खाताही थडी वाजत होती रस्त्यावर उभं राहण अशक्यच म्हणून मी शेजारच्या दुकानात शिरले अगदीच कुणी हटकलं तर शंभर लिराची खरेदी करायची मी ठरवल होतं दोन पिक्चर पोस्टकार्ड ही माझी रोमची खरेदी झाली असती थंडी जाईपर्यंत मी उबदार दुकानातून हिंडून घेतल. नि दुसऱ्या दरवाजातून बाहेर आले थडीपासून बचावाचा मार्ग सापडला मुंबईत काही बायकाच्या तोंडून मी विंडो शॉपिंग ऐकल होत ज्युवेलरी-किमती साड्याच्या दुकानातून ते करतात म्हणे खिशातल्या चार हजार लिरा खुळखुळवत मी पण विंडो शॉपिंग केल चॉकलेट, केक्स, पेस्टिंग्ज, पुडिंग्ज, कुकीज, काचेला नाक लावून वास आला नाही तरी नेत्रसुख भरपूर मिळालं इटालियन स्पॅगेटी आणि इटालियन पिझ्झा-पु.ल.च सुदर वर्णन पदार्थ मोठे देखणे दिसत होते किमती पाहून पोट भरल

रोम टर्मिनसला आले मधल्या मोठ्या लाऊंजमध्ये टुरिझमच ऑफिस होतं व्हॅटिकनची माहिती घेऊन मी चौसष्ट नबरची बसही घेतली कस आपल्या मुंबईत असल्याचा फील आला होता मला

दुतर्फा दुकानेच दुकाने जुगारापासून सर्वांची शनिवारची दुपार अजून फुललेली नव्हती तरीही मला गर्दीच वाटत होती मी एकटी असल्याने असेल व्हॅटिकन सिटी—पोपचे निवासस्थान—सेंट पीटर्सचे चर्च—रोमन पोषाखातले गार्ड—भव्य आवार, देखणं कारज आणि अति भव्य वास्तू काय पाहू नू काय नको झाले आधी पोपचा पॅलेस गाठला. पोपचे भाषण ऐकायचे तर पैसे पडतात समजल साहजिकच ते कटाप पण राजवाडा मात्र पाहताना पोपचा हेवा वाटला मला राष्ट्रपतिभवन पाहतानाही असंच वाटलं असत पॅलेस पाहून मायकेल एंजेलोचे म्यूझिअम पाहायला आले आणि खिळून उभी राहिले छत पाहायला वर केलेली मान खाली करवेना. शिल्पकला माझा विषय नव्हे पण जे दिसत होते ते पाहणे म्हणजे स्वर्गसुख वाटत होते मला समजून घ्यायचे

होते. खिशात पैसे नाहीत याची आता हळहळ वाटली गाईड परवडणारा नव्हता मग एक युक्ती सुचली रोम हे टुरिस्टांचे गाव कितीतरी ग्रुप आता म्यूझियम पाहात भटकत होते फ्रेंच, जर्मन, बेल्जिअम, नॉर्वेजियन, आफ्रिकन. मध्येच एखाद दुसरे भारतीयही एकटी अशी मी एकटीच स्त्री होते कोणाही भारतीयाने ढुंकून पाहिले नाही. पण एखादा परदेशी ग्रुप मात्र हायऽ करायचा. मी अशाच एका इंग्लिश बोलणाऱ्या ग्रुपच्या मागे मागे जायचे ठरवले गाईड मोठ्यामोठ्याने माहिती सांगायचा नजर दुसरीकडे ठेवून कान थोडे लांब करून त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिले की झाले मायकेल एंजेलोचे म्यूझिअम या पद्धतीने बघितले वाटले परत कधीतरी येऊन नीट पाहायला पाहिजे. समजलं नाही तरी माहिती घ्यायला हवीच वेळेकडे ध्यान ठेवून अतृप्त मनाने मी बाहेर आले सेंट पीटर्सचे चर्च कॅथॉलिक धर्माची काही भाविकता नसली तरी भव्यता पाहून, शांतता, गंभीरता पाहून मन भरून आले. ऐकले पण फार. फार वाटले मनातले सल विसरायला तर मी सातासमुद्रापल्याड निघाले होते. पण आठवत होते तेच, क्रूसावरच्या येशूपुढे मी गुडघे टेकून बसले वरचा लख-लखता घुमट सारे कस भव्य एवढेच समजत होते इथे मनाचा अहंपणा वितळायलाच हवा राग, लोभ, मत्सर सोडायला हवा चर्चच्या लांबरुंद संगमरवरी पायऱ्यावर थकून बसताना मला उषाची आठवण झाली मैत्रीला स्थळ–काळ–वेळेचे बंधन नसते हेच खरे. लिफ्टमधून चर्चच्या मनोऱ्यावर गेले हाऊ नाईस रोमचे सुंदर वर्णन सध्याकाळचे सोनेरी रंगात न्हालेले चर्चची घंटा वाजू लागली मला मुलाच्या आठवणीने कासावीस झाले टुरिस्टांचा घोळका किलबिलत उतरू लागला मी त्याच्यामागून निमूटपणे

अजून फारसा खर्च झाला नव्हता. ट्यूब रेल्वे व बसमुळे रात्रीच रोम सोडायचे होते. आठवणी घेऊन चर्चच्या आवारात टॅक्स कमी असल्याने वस्तू स्वस्त मिळतात हा शोध लागला होता चाळीस लिरास एक ग्रीटिंग कार्ड बाहेर पन्नास लिरास मी पधरा सोळा कार्डे घेतली जिथे तिथे मशिनमध्ये नाणी टाकणे. मला त्याचीच गमत वाटत होती. नाहीतर मुंबईला वजनाच्या काट्यावर दहा पैसे टाकायचे वजन कधीही बरोबर येत नाही आता मात्र व्हॅटिकन सिटी सोडायला हवी होती बसच्या ब्रेक जर्नी करून एंजल्स केसल्लो ला जायचे येतानाच ठरवले होते

भारत सोडताना सर्वांनी बजावून सांगितले होते. ‘रोममध्ये जपून हो फार चीटिंग असते चोऱ्याही पर्स सांभाळ’ अगदी नायजेरियन अधिकाऱ्यानेही ‘इटालियन पीपल्स आर नॉट गुड फॉर अलोन वुमन म्हटले होते, पण माणसानी गजबजलेल्या ह्या शहरात हिंडताना मला तर भीती वाटत नव्हती फक्त पर्स सांभाळणे महत्त्वाचे होते.

साधा पुण्याजवळ सिंहगड पाहणेही मला अजून जमले नव्हते आणि रोममधील किल्ला पाहात होते कोणतेही किल्ले खरे वीरश्रीचे स्थानच असतात; किल्ला आणि लढाई

याचे नातही अतूट ते भग्न अवशेष जतन करून ठेवलेले पाहताना पाश्चिमात्यात व्यापारी कला किती मुरलीय कळत होत. पर्यटकाना आकर्षित करेल ते सर्व जोपासणे किल्ल्याजवळच्या दोन म्यूझियम्स पाहायचा मोह टाळता आला नाही खरं म्हणजे आता संध्याकाळ झाली होती हॉटेलवर परतायला हवे होते परतु पुन्हा पाहायला मिळेल का ? अधाशासारखी अतर्मुख होऊन मी भटकत होते सधी परत मिळत नाही, असं बजावत थकलेल शरीर रेटत होते मिळणाऱ्या समाधानापुढे शरीराने थकणे काहीच वाटत नव्हते. परत चौसष्ठ नवर वस मधून मधून दोन-चार इटालियन लोकाशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला भाषा ! परदेश म्हणजे इंग्लिश हे माझे ज्ञान ! शेवटी मदतीला अभिनय धावून आला. थोड्याच वेळात रोम सोडायचे होते आणि मला रोम आवडले ते एकातरी रोमन व्यक्तीला सागायचे होते रोमन हॉलि-डेचा दिवस मावळला होता दुकाने फुलून गेली होती रस्ते गजबजले होते संगीत तरगत होते तालावर लोक नाचत होते स्त्री-पुरुष जोड्या गळ्यात गळे घालून सुटे कोणी चालतच नव्हते मुक्त जीवनानद लुटणे एवढेच त्याच्यात दिसत होते टुरिस्टच्या घोळकेही याला अपवाद नव्हते एखाद दुसरा प्रवासी दिसतच नव्हता मी चुपचाप एकटीच वसमधून ट्यूब स्टेशनवर आले

गाडीची वेळ झाली होती समोरच एक जोडपं बसल होत माझ्याबरोबर तेही लिडोला उतरले बाहेर दिवे, रहदारी असली तरी आता रात्री नऊनतर रस्त्याने एकटी चालत जाणे—मला थोडथोडस घाबरायला होऊ लागलं नकळत मी त्या जोडप्यावर पाळत ठेवली एकदोन टॅक्सीवाल्याशी त्याची हुज्जत झालेली दिसली सौदा जमत नसावा हजारो लिराचा हिशोब मला सोबत हवी होती गरजेतून धीटपणा येतो का ? मी पुढे होऊन त्याना विचारल, 'You want to go by taxi, you are staying in which hotel ? I am alone, I want company ' दोघानी साशकतेने पाहिले काही वेळा चेहऱ्यावरचे भाव बोलके असतात दोघाना एकमेकाची अडचण समजली त्याने सागितले ' Hotel Satelite हे तर माझ्याच हॉटेलशेजारचे मला रस्ता माहीत होता त्याना टॅक्सीचे पैसे खर्चायचे नव्हते आम्ही तिघ सोबतीनं निघालो

साडेनऊ वाजता डायनिंग हॉल भरलेला गच्च होता एकटीने थोडक्या पैशात रोम पाहिल्यामुळे माझे पोट आनदाने भरले होते एअरपोर्टवर मी थोडी लवकरच गेले काऊटरवर बोर्ड होता—फ्लाईट गोईंग टू लेगॉस कॅन्सल्ड—काय करायच ? अशा वेळी आधीच हॉटेलचे बुकिंग एअरकपनीकडून घ्यायचे असते, हे डॉक्टराकडून आधीच कळले होते वाटेत काय अडचणी येतील हे शुभ बोल नाऱ्या डॉक्टर बोललेच होते त्यातली ही पहिली हॉटेलबुकिंगसाठी माझा नबर होता एक एक पॅसेंजर येऊ लागले फ्लाईट आधी एक तास लोकाना बुकिंग देऊन झाल. बाकीच्याना सागितले हे पैसे तुम्ही व्यवस्था करा माझी व्यवस्था झाल्याने मला इतराची पर्वा नव्हती

अनाऊन्समेंट झाली रोम एअरपोर्टवरून दुसरी फ्लाईट दोन दिवसानंतर होती त्याच दिवशी मध्यरात्रीपासून विमानतळावरील कर्मचाऱ्यांचा संप सुरू होणार होता आमची फ्लाईट दोन दिवसांनी निघाली नाही, तर आम्हाला लंडनला जावं लागणार होतं लंडन—थोडेसेच डॉलर त्यात दोन दिवस रोमचा मुक्काम वाढलेला कसं जमणार?

हे हॉटेल नवीन होतं महाप्रचंड—दोन हजार लोकांची सोय असलेलं पाच मिनिटांत आत खोली मिळाली एका जिन्याने वर गेले दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्टला डायनिंग रूममध्ये गेले निघताना लिफ्ट विसरले तिसरा मजला बरोबर होता पण खोलीचा नंबर सापडेना भूलभुलैयात हरवल्यासारखी मी चकरा मारत होते दारावर टकटक करून विचारण्याची भीती वाटत होती आणि गोल चक्रव्यूहात जायला यायला लिफ्टचा दरवाजा दिसत नव्हता कर्मचारीही दिसत नव्हता पाऊण तास मी फिरत होते एक लिफ्ट दिसली मी घुसले आत आत शिरताच ती आपोआप सुरू झाली ती थेट बेसमेंटमध्ये पोचली ती लिफ्ट कर्मचाऱ्यांसाठी होती बेसमेंटमध्ये कुणीच आत आले नाही नंतर एकदम पाचव्या मजल्यावर थांबली मला बटनेच दिसत नव्हती आणि एकदम दार उघडल्यावर कपड्यांची बोचकीच्या बोचकी आत येऊ लागली डंपर ती आत ढकलत होता मी रडायला सुरुवात केली मग त्या ढिगातून एका बाईचा चेहरा दिसला, Help Help तिने बोचकी बाहेर काढून मला काढलन, मला काही बोलता येत नव्हतं थर्ड फ्लोअर ' एवढंच मी बोलत राहिले तिने मला लिफ्टमधून तिसऱ्या मजल्यावर सोडलं लिफ्ट निघून गेली मी परत उभी माझी खोली कुठाय ? एका दरवाज्यातून एक फॅमिली बाहेर आली दोन छोटी मुले होती ती जात होती, त्यांच्यामागे मी गेले समोर डायनिंग हॉल पोराच्या हातातल्या रिकाम्या बाटली-वरून मला समजलं होतं डायनिंग हॉलपासून ओळखीची लिफ्ट सापडली पुढे त्या लिफ्टला गर्दी असली तरी मी थांबायची, पण दुसऱ्या लिफ्टने जाण्याचा प्रयत्न केला नाही ब्रेकफास्ट जिरून आता जेवायची वेळ झाली होती खोलीला भोज्या करून मी पुन्हा डायनिंग रूममध्ये आले आज जेवण्याचा प्रॉब्लेम सुटला होता सकाळी ब्रेकफास्ट स्वहस्ते व हवा तेवढा मिळायचा अर्थात ब्रेड, टोस्ट, बटर, जाम, चहा—कॉफी एवढेच पदार्थ पिझ्झा, स्पॅनिश आम्लेट हे सर्व पैसे देऊन येणारांसाठी आम्ही एअरवेजचे फुकटे तर मी ब्रेकफास्टला दहा-बारा टोस्ट, चार-पाच बटर, जामच्या बाटल्या घेतल्या होत्या भल्यामोठ्या पर्समध्ये पेपर नॅपकीनमध्ये घालून माझं जेवण तयार होतं आज एअरवेजच्या लोकांना रोस्टेड चिकन होतं एक भाजीचा लगदा सूप माझ्या टेबलासमोरच्या टेबलावरच्या गिऱ्हाइकाने चार-पाच खमंग पदार्थ माग-विले होते शाकाहारी असून माझं तिकडे लक्ष जात होतं माझंच नाही माझ्या समो-रच्या चार-पाच युरोपियनांचेही तीही मंडळी एअरवेजचीच पाहुणी असावीत एका वेळी दीड हजार लोक बसतील एवढा मोठा डायनिंग हॉल वेगवेगळ्या देशातील

प्रवाशानी भरून गेला होता काही भारतीय मडळीही होती पण त्यानी माझ्याकडे लक्ष दिले नाही मीही माझ्या साडीमुळे मी लगेच उठून दिसत होते जेवताना एका बागला देशच्या कुटुंबाशी ओळख झाली तेही माझ्याच फ्लाईटने लेगॉसला जाणार होते आधल्या दिवशीच्या भटकन्तीने खूप दमणूक झाली होती. दमा, ताप याने हैराण झाले होते पण दोन दिवस बसून करायचे काय? धीर करून उरलेल्या डॉलरमधून मी टुरिस्ट बसचे तिकीट घेतले मी न पाहिलेली सर्व ठिकाणे त्यात होती खाडकन दहा डॉलर गेले. आता पाच–सहा डॉलरसह लडन–लेगॉस अथवा लेगॉस. अजून एक दिवस काढायचा पैशाची तगी फार दिवसाने जाणवत होती माझ्याजवळ आणखी डॉलर असते तर? जेवण होताच बस निघाली हजारो वर्षापूर्वीचे ' कलोसिअम 'सेंट पॉलचे चर्च लोक भराभर फोटो काढत होते ते बागला देशवासी मी आणि एक थायी टुरिस्ट सोडला तर ग्रुप फ्रेंच होता वुअी वुअी करत त्याचे मनापासून रोम पाहणे चालू होते अलर्ट गार्डची माहिती ऐकल्यावर माझ्या मनातली नेहमीची ऊर्मी उफाळून आली हे गार्ड रोमनकालीन पोशाख घालून अज्ञातवीराच्या पुतळ्याजवळ उभे होते अगदी पुतळ्यासारखे गाईडने माहिती सागितली मी कोणाचे लक्ष नाही असे समजत त्या गार्डना हात लावला क्लिक कोणीतरी फोटो काढला मी हात लावून खराखुरा माणूस पुतळ्यासारखा उभा आहे, ही खात्री करून घेताच आणखीही चार-पाच जणानी तेच केले एका मोठ्या कारज्याजवळ आलो इथे मागे वळून न पाहता तीन नाणी त्या कारंजात टाकायची त्या वेळी मनात धरलेली इच्छा पुरी होते म्हणे फ्रेंच मडळींनी फटाफट इच्छा पुऱ्या करण्याचा सपाटा लावला बागला देशीयानी बारा-पधरा नाणी उडवली अस वर्षानुवर्षे चालू आहे नाणी कोणी पाण्याबाहेर काढत नाहीत किती साठली असतील? माझ्या मनात आता इच्छा होती. ती सर्व नाणी मला मिळावीत पण ही इच्छा व्यक्त करायला, पुरी करायला लागणारी तीन नाणी फेकायला हवीत ती कुठे माझ्याजवळ होती? चोवीस डॉलरचा हिशेब पिच्छा पुरवत होताच बाहेर खाद्यपदार्थांची रेलचेल दिसत होती फिरती हॉटेल खुणावत होती नॉन-व्हेजने न भरलेले पोट तक्रार करत होते डोक्यातला पैशाचा हिशेब पाय रोकत होता खाणे की भटकणे या टू बी ऑर नॉट टू बी प्रश्नातून मी भटकणे निवडले होते. मी परत रोमला येऊन पिझ्झा खाईन, आईस्क्रीम खाईन, फळे खाईन, केक खाईन मनाची समजूत घातली बसमधून भटकून हॉटेलमध्ये आल जेवण होताच त्याच लिफ्टने खोली गाठली कधी झोप लागली कळलेच नाही ताप, दम्याचा त्रास असूनही रोम पाहिल्याचे समाधान जास्त चार-पाच वेळा व्हाया रोम असे भारतात येऊनही ह्यानी रोम पाहिले नव्हते याचाही ग आनद होताच

आज फ्लाईट निघेल का? सकाळी उठताच विचार आला रोमला घेतलेल्या कार्डावर सर्वाना पत्रे लिहिली पैसे नसल्याने साईट सीईंग प्रकरण नव्हतेच पायी

हिंडणे. मुख्य म्हणजे मला पोस्टेज हवे होते इथली तिकिटे लावून पत्र पाठवायची मजा होती एवढे मोठे हॉटेल पण पोस्टाची तिकिटे नाहीत काऊंटरवर पन्नास वेळा विचारल्यावर बोध झाला की तिकिटे ' तोबॅको शॉप 'मध्ये मिळतील आता पान-विडीचे दुकान कस शोधायच ? भरपूर वेळ होता माझी मोहीम सरळ रस्त्याने चालू झाली दुकान मिळाले सहा कार्ड लिहिलेली होती त्याच्यावर तिकिटे घेऊन तिथेच चिकटवली एक कोरे होते तिकिटे लावून घेऊ मग हॉटेलमध्ये जाऊन पत्र लिहू मी त्याच्यावरही दोन तिकिटे लावली आणि त्या क्षणी त्या दुकानदाराने झटकन माझ्याजवळून कार्ड ओढून घेतले ' माईन माईन ' चार पाच इटालियन वाक्य फेकत तो बडबडला दोन मिनिटे काय झाले हेच मला समजेना चाळीस लिराचे कार्ड दोनशे लिराची तिकिटे चोवीस डॉलरच्या हिशोबातली रक्कम ' आजपर्यंत मी रोममध्ये केलेली काटकसर भूक मारून केलेली भटकती त्यामुळे दोनशे चाळीस लिरा याला हापू देऊ ? शक्यच नाही कोरे तिकीट लावलेले कार्ड माझे होते मी त्याला मिळू देणार नाही. मीही म्हटले, This is mine

' No, No पुन्हा इटालियन वाक्ये इंग्रजीचा शब्द नाही हे माझ कार्ड आहे तू ते फसवून घेत आहेस माझे मराठी उत्तर तू फसवणारा आहेस लुच्चा दुकानदार आहेस परदेशी प्रवाशाना फसवता ? म्हणूनच सर्व जग म्हणत रोममध्ये साभाळून इथे लुच्चेगिरी जास्त असते तू कार्ड दिले नाहीस तर मी इथून हलणार नाही सत्याग्रह करेन माझी बाजू सत्याची आहे कार्ड माझ आहे एकही इंग्रजी शब्द न वापरता माझे तणतणणे चालू होते त्याला उत्तर तो इटालियनमध्ये देत होता घड्याळाकडे पाहिले भरपूर वेळ होता सत्याग्रह करायला मी दुकानातले एक स्टूल उचलून त्यावर ठिय्या दिला गिऱ्हाइके येत जात होती तो माझ्याविषयी तक्रार करीत होता भाषा समजली नाही, तरी हावभाव व उच्चाराच्या पद्धतीवरून हे समजत होते लगेच मी त्या मडळींना माझी बाजू मराठीत समजावत असे भाषा समजली नाही तरीही अर्धा तास जुगलबंदी चालली. मध्येच कोणी म्हणायचे जाऊ द्या हो मी जाई-नच पण माझे तिकीट लावलेले कार्ड घेऊनच जाईन. शेवटी तो हरला गिऱ्हाइकाची गर्दीही वाढत होती दुकानाबाहेर गमत बघायला आपल्यासारखेच बघे जमलेले होते आता मी त्या सर्व लोकाना समजावू लागले बंधुभगिनींनो स्टाईलीत. आणि खाड्कन ते कार्ड येऊन माझ्यापुढ आदळल शिव्याच असाव्यात त्या. अरे चोरा, लुच्चा, फसव्या दुकानदारा ! तुझी हरामखोरी मी अशी थोडीच पचू देईन अस्सल ' मराठी' आहे मी तत्त्व म्हणजे तत्त्व भीक मागून माझे कार्ड घेतले तर मी देईन पण फसवून नाही. मी कार्ड उचलले त्याच्याच पुढ्यातला डस्टर घेऊन पुसले रुबाबात थॅक्यू म्हणाले. बाहेरच्या, आतल्या गिऱ्हाइकाना चारचारदा थॅक्स दिले तत्त्वाची लढाई जिंकलेल्या रोमन सम्राज्ञीच्या रुबाबात दुकानाबाहेर आले माझे कार्ड—दोनशेचाळीस

लिरा मी परत मिळवलं होते जय मराठी!

अजून एअरपोर्टला जायला वेळ होता जवळच एक मोठे चर्च होते तिकडे वळले आत शिरताना रखवालदार टाईप माणसाने विचारले, 'ख्रिश्चन?' मी म्हटल, 'हो' देन गो त्याने आत सोडले येशू फक्त ख्रिश्चनाचाच का? आपला विठोबा असेच कोणाला अडवेल? मग सानेगुरुजींचे उपोषण फोल जातीयवाद भारतात ऐकतो, पाहतो इथे धर्मभेदवाद मला येशू, अल्ला, विठोबा सारखेच हो, म्हणून आत गेले रोममधील सर्वच चर्चेस मला अतिशय आवडली भव्य, स्वच्छ, गंभीर, शांत मन प्रसन्न व्हायचे आणि उदासही व्हॅटिकन सिटीत चर्चची घंटा ऐकून मुलाच्या आठवणीने व्याकूळ झाले होते चर्चमध्ये एकटी जावू नये वाटे जावेही वाटे त्या दिवशी अशाच विचारात मी चर्चमध्ये गेले प्रार्थना चालू होती. काही कळले नाही श्रद्धा, विश्वास नसला तरी बरे वाटले धीरही वाटला हा येशू पुढचा सर्व प्रवास सुखरूप करेल ना?

हॉटेल गाठले जेवण करून थोडी विश्रांती घेऊन एअरपोर्ट गाठायला हवा आज रोम सोडायचे तीन दिवस रोममध्ये गेले मन हुरहुरत होत प्रियजनाच्या आठवणींनं आपल्याला काही पाहायला मिळालं--ज्याच मोल पृथ्वीमोलाचे म्हणून आनंदही वाटत होता एकटीने धीटपणे भटकले म्हणून आत्मविश्वास वाढला होता इंग्लिश बोलायला येत नाही हा न्यूनगंड भांडणाने थोडा कमी झाला होता रोमच्या ट्रीपने खूप खूप शिकवले होते पाश्चात्त्य देशातले एक शहर मी पाहिले टुरिस्टप्रमाणे? हो ट्यूब रेल्वे बसने गरीब टुरिस्टला परवडणाऱ्या पद्धतीने पण सर्व बघितले रोम सोडताना मी खुषीत होते एअरपोर्टवर आले आता लेगॉसला जायला मिळणार की लंडनला? मनातून मला लंडन हव होते खिशात चार डॉलर घऊन मनात आत्मविश्वास, धिटाई घेऊन उपजतची धिटाई आता वाढली होती कोणत्याही प्रसंगातून मी पार पडेन खात्री वाटत होती आणि मी रोम सोडले एअरपोर्ट, विमान पकडणे ह्या गोष्टी उरकून मी रोमला बाय बाय केले कोणास ठाऊक पुन्हा येईन की नाही? संध्याकाळच्या सोनेरी सूर्यकिरणांना सोबतीला घेऊन आमचे विमान उडाले लेगॉसला जाण्यासाठी

दिवस मावळत आला होता विमानाचा घरघराट सुरू झाला हलकेच धक्का देऊन ते आकाशात झेपावले मावळत्या सूर्याकडे केशरी रंगाच्या गालिच्यातले फूल झाले उंच उंच आणखी उंच गेले स्थिरावले आता होता फक्त विमानाचा संथ लयीचा वेग आणि निळा केशरी प्रकाश बाहेर काहीच दिसत नव्हते तरीही मी खिडकीतून बाहेर पाहात होते खिडकी मिळाल्याचा अजूनही पोटात आनंद होता कोणाला सांगणार पण? आजुबाजूला पाहिले छे! सर्व तर अनोळखी पण आता ओळखीचे व्हायला हवेत त्याच्याच देशात मी चालले होते माझा देश सोडून, माझी माणसे सोडून का? कशासाठी? काही प्रश्नाची उत्तरे अनुत्तरितच ठेवणे चागले असते सोयीस्कर असत सुरक्षितही असते पण ह्या सर्व अडचणींवर मात करून मी चालले होते सत्य हेच

एकमेव असते मला जायचे होतं पुन्हा परत कधीही न येण्यासाठी सारं सारं विसरायला आणि सोसायलाही नवी विटी, नवे राज्य, भिडू जुनेच. नवा डाव मांडायचा होता रंगेल का? रंगवायला हवाच म्हणूनच निघाले होते सर्व डॉक्टरी सल्ला धुडकावून निघाले होते रोमला प्रकृती पार ढासळली होती क्षणभरच वाटले होते इथूनच परत फिरावे ही थ्रिलची हौस पुरे झाली पण मागचा रस्ता बंद होता खिशात पाच डॉलर होते परतीचे तिकीट मिळाले नव्हते आता फक्त परदेशाचा रस्ता होता पुढे तोच मी विमानातून काटत होते एकटीने

विमान तशाच संथ लयीत चालले होते सर्व काही ठीक होते रोम मागे गेले होते मावळता सूर्य मावळला होता. आकाशातला अंधार आकाशातूनच जाताना पाहणे मजेचे असते खालून दिसतो तसा वर अंधार नसतोच मुळी एक अधुक निळसर प्रकाश भरून राहिला सारखा वाटतो आतल्या सर्व सूचना वगैरे देऊन झाल्या. माझे लक्ष बाहेरच होते गरज काय या सूचनांची त्यापेक्षा खिडकीतून पाहणे किती गमतीचे होते म्हणे अपघात झाला तर काय करावे? तंत्रविज्ञान इतकं आधुनिक झालंय विमान स्वयंचलित झालीत अपघात होतीलच कशाला? आणि झाला तर झाला. तोही एक अनुभव. माझी थ्रिलची विलक्षण हौस मनात कुजबुजली विमान आपले चाललेच होते एका सरळ रेषेत पोटातले पाणीसुद्धा हलत नव्हते किती हुशार असतात हे वैमानिक त्यांच्यावर सोपवून आपण किती निश्चिंत प्रवास करतो. असा माझाही प्रवास चालू होता फक्त चार-पाच तासांचा तर प्रवास, परंतु आता भूक लागली होती. दुपारी जेवले नव्हते हॉटेलातले नॉन्व्हेज घशाखाली उतरले नव्हते तापही होता उलट्या झाल्या होत्या इटालियन दुकानदाराशी भांडण सोडले तर दिवस सुनाच गेला होता पण विमान मिळाले सुटले हे नशीबच नाहीतर लंडनला जावे लागले असते त्याचे काय? ही संधी हुकली म्हणून तसं वाटत होतं. लंडनला अनपेक्षितपणे मराठी मंडळाच्या मधू अभ्यंकराकडे जावे लागले असते डॉ. अरुण लिमये यांचे नाव सांगून कारण मी त्यांना व ते मला परिचित नव्हतोच पण डॉक्टरांच्या जिवावर जायचे ठरवले होते आता मात्र सरळ लेगॉसला निघाले होते भूक इतकी लागली होती, की पोटातल्या कावळ्यांच्या पिल्लांना पिल्ले होऊन ती पंख फुटून उडून सुद्धा गेली खरं म्हणजे पाच-दहा मिनिटात जेवण येणारच होते. विमानातच बसून खिडकीचा काहीही उपयोग न करता खायला मजा वाटली होती. विमान-प्रवास एकट्याने मात्र करू नये. निदान पहिला तरी मी मात्र जोडीदारासाठी हा हजारो मैलांचा प्रवास करून निघाले होते आता थोडा वेळ गेला होता. थोडा उरला होता संथ लयीत विमान जात होते एवढ्यात मागे जेवणाची गाडी आली खमंग वास दरवळला. जेवणाच्या वेळी येणारा वास खमंगच वाटतो मी मागे वळून पाहिले. उडून गेलेले कावळे पोटात दूर दूर कोकलू लागले पण हे असे का होतंय?

जेवणाची गाडी उलटली. आम्हीही उलटलो खाली डोक वर पाय करून आणि हलकल्लोळ म्हणजे काय ते समजले बदुकीची गोळी लागून मेलेला पक्षी खाली यावा तसे विमान खाली येऊ लागले आणखी खाली आले एका मिनिटात हजारो फूट खाली आले खालचा समुद्र दिसण्याइतके मगाशीच सागितले होत आम्ही 'मेडिट-रानियन सी पार करणार होतो पार करणार होतो ? आता तर बुडणार होतो वरून ऑक्सिजन मास्क लोंबकळत होता पण लावायचा कसा ? सूचना कोणी त्रचितल्या होत्या ? त्या वेळी मी तर आकाशाचा निळा केशरी रग नव्हते का पाहात ? निळ्या रगात, केशरी रगात, लाल रगात, सोनेरी रगात—अशा नाना रगात बुडून गेले होते दिसला नव्हता फक्त काळा रग एअर-होस्टेसचाही रग काळा म्हणून तर सगळ लक्ष बाहेर होत. खर म्हणजे मला मनापासून काळ्या रगाची ओढ माझा श्यामही नाही का सावळा ? या निळ्या केशरी रगाचा पण आता हे रग असे का पालटले ? विमान उलटले म्हणून ? होय, आमचे विमान चक्क उलटले होते जेवणाची गाडी केव्हाच उलटली होती आणि कावळ्याची पिल्लेच काय आता आम्हीच उडून चाललो होतो एकशेऐंशी प्रवासी पोटात घेऊन विमान उडण्याऐवजी बुडत होते मेडिटरेनियन समुद्रात. कुशल तत्रविज्ञान आणि विज्ञानावरची मानवाची निष्ठा याच्या परीक्षेचा क्षण होता भक्ति—भाव—निष्ठा याची परिमाण नसतात त्याचप्रमाणे अपघाताचेही अपवात हा निव्वळ अपघातच असतो. मग तो विमान उलटे होऊन समुद्रात बुडत असो अथवा पेट्रून. उलटे विमान सुलटे झालं वैमानिकाचा तत्रज्ञानावर असलेला अधिकार हा अधिकारच आम्हा सर्व प्रवाशाना दिलासा देत होता प्रत्येकाच्या दिलाशाची स्थाने वेगळी असतील सोबतचे प्रवासी आपापल्या देवाची करुणा भाकू लागले होते मी गुदमरत , भयचकित होत, शून्यपणे पाहात होते काय करावे, काही समजत नव्हत लांबकळणारा ऑक्सिजन मास्क नाकावर कसा लावायचा ? ऑक्सिजन कमी पडल्यामुळे उसळलेला दमा आटोक्यात कसा आणायचा ? मला श्वास घ्यायलाच हवा. जिवत राहण्यासाठी हेलकावणाऱ्या विमानाबरोबर मनातले विचार हेलकावत होते कृती काहीच घडत नव्हती एवढ्यात मागून एक हात आला त्यान माझे मनगट पकडले दुसराही एक हात आला. त्याने समोरचा लोंबकळणारा मास्क पकडला आणि दोन्हींची सागड घालून मागचा माणूस म्हणाला, 'ब्रीद-ब्रीद ' लोटपोट हसता हसता लोळण्याची मला सवय. एकदा या कुशीवर, एकदा त्या कुशीवर निसर्गाच्या विक्राळ हसण्यात आमच विमान एकदा या कुशीवर होई, एकदा त्या कुशीवर होई श्वासोच्छ्वास चागला सुरू झाल्यावर डोक्यातल विचारही सुरू झाले भणभणणारे डोके स्थिरावले

पहिला विचार मनात सुरू झाला होणारा हा अपघात आपण निरखून पाहायला पाहिजे चुकूनमाकून वाचलेच तर चक्षुर्वै सत्यम् पण वाचणार होतो का ? एकदा डावी-

कडे, एकदा उजवीकडे, कधी पुढे सूर मारल्याप्रमाणे, कधी शेपटीवर विमान हेलकावत होते. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे घरातले लोंबकळणारे दिवे हालतात, वाटते आता विझतात मग विझतात तसे विमानातले दिवे का दिसताहेत? 'या अल्ला', 'Oh God आपआपल्या भाषेत प्रत्येकजण असणाऱ्या नसणाऱ्या देवाला साकडे घालत होता जीव वाचविण्यासाठी सीटला सूचनेप्रमाणे प्रत्येकाने बेल्टने जखडून घेतले होतेच तरीही आग लागलेल्या घरातून जीव वाचवण्यासाठी सैरावैरा धावावेसे वाटते, तसे सर्वजण धावायचा प्रयत्न करीत होते. जखडून बांधले होते तरीही खरे म्हणजे उठण, धावण हे धोकादायक होतं पण सारासार विचार कुणाला सुचत नव्हता कसं वागाव, कसं काय करावं, कुणाला काही समजत नव्हत हेच खर होत

अनाउन्समेंट झाली 'Due to some mechanical fault we are in danger We are sending S O S message to nearest airport God will save us Passengers are requested to co-operate the crew'

एकामागून एक सूचना येऊ लागल्या, infant baby विषयी लाईफ जॅकेट सीट काढून घालण्यासंबधी

सर्वांनी लाईफ जॅकेट चढवले माझ्या सीटखाली मात्र ते नव्हतेच डेमॉन्स्ट्रेशन-साठी तर त्याची निवड झाली नव्हती? मी तर तेही पाहिले नव्हते मी ओरडले, 'There is no life jacket! I want it—I want it'

धडपडत, अक्षरशः रांगत, कारण विमान इतके हेलकावे घेत होते की सरळ चालण अशक्यच होत लाईफ जॅकेट आणून घोड्यावर खोगीर घालतात तस चढवलं. आणखी काही सूचना कानावर आदळत होत्या, आणि गपकन् सगळा आवाजच बंद झाला कम्युनिकेशन यंत्रणा बंद आता सहा रांगामध्ये एक एक क्रयू उभा राहिला आणि तोंडी सूचना देऊ लागला—ज्या मला काहीही कळत नव्हत्या—इंग्रजीमुळे आणि उच्चारामुळे. खर म्हणजे आम्ही सगळेच मरू घातलो होतो. तोही नि आम्हीही पण कर्तव्य म्हणजे कर्तव्य. आमचे कर्तव्य होते त्याला सहकार्य देण्याचे त्यान सांगितलं पायातल्या चपला काढा पायातले जोडे-बूट निघाले. कशासाठी, ते आम्हाला अजूनही कळलेले नाही दोघ जण Emergency door पाशी खरी गादी घेऊन उभे राहिले विमानाचे बंपिंग चालूच होते आणि प्रवाशाचे प्रार्थना करणे मृत्यू इतका नकोसा असतो? इतका भयकारक असतो? त्या वेळीही माझ्या मनात हेच विचार आले माझ्या आजारपणातला प्रसग आठवला. बेशुद्धावस्थेत जाताना मी हवेत तरंगत तरंगत जात होते फुग्यासारखी वरून माझी मलाच बघत होते नतर शुद्धीवर आल्यावर डॉक्टर म्हणाले, 'तू मरता मरता वाचली आहेस' आताही मी तरंगतच होते आकाशात त्या वेळी एकटी आता एकशेऐशी प्रवाशाबरोबर! खिडकीतून बाहेर पाहिलं खालचा अंधुक दिसणारा समुद्र यातच आम्ही बुडणार आहोत मग कुणाला

मागमूसही कळायचा नाही  असं बुडून मरायचं  अंथरुणावर पडून मला मरायचं नव्हतं. मग असं एकाएकी का मरायचं ? आणि एक क्षणभर सर्वांची आठवण आली मी मरताना माझ्याजवळ यातलं कुणीही नाही आहे  या अंतिम प्रवासात सोबतीला कुणी कुणी नसतं पण सग्यासोयऱ्यांच्या अश्रूंची शिदोरी असते ती पुरवत अनंतापर्यंतचा माहीत नसलेला प्रवास करायचा असतो एकाकीपणे मृत्यू मिठीत येत असताना माझ्या मनात हे विचार होते  भय वाटत नव्हते  रडायला येत नव्हते  माझ्या शेजारचा प्रवासी मात्र धाय मोकलून रडत होता  पुरुषासारखे पुरुष ढसढसा रडत होते  इनमिन चार बायका आम्ही विमानात होतो मी सोडून त्याही या सामुदायिक रडण्यात सामील होत्या  आणि आईबाप रडताहेत म्हणून लहानगी मुलेही रडत होती  त्याना अपघाताची भयानकता समजलच नव्हती  रडण, प्रार्थना, कच्च्या चिरका रडका पण कर्तव्यान बांधलेला आवाज याचा संमिश्र कोलाहल. त्यातच विमानाचे हेलकावणे, सर्वांच विचित्र मिश्रण झाल होत  मनातले विचारही असेच गोंधळलेले  डोळ्यापुढे खालचा समुद्र बघता बघता दिसेनासा झाला सारखं बाहेर टक लावून पाहात होते  म्हणून का हा काळोख वाटतोय ? का या आवाजाच्या कल्लोळाने माझे कान बधिर होण्याऐवजी डोळ्यानाच अंधारी आली ? की माझ डोक गरगरतय ? क्षणभर समजलच  नाही आणि  जाणवल तेव्हा मात्र भीती वाटली विमानातले दिवेही आता बंद पडले होते  अंधार, आवाज, गोंगाट  नुसता अंधार, आवाज, गोंगाट

सारे रस्ते बंद होऊन आमच्यासाठी फक्त मृत्यूचा रस्ता आता उघडा होता

मृत्यू बुडून यणार नव्हता मात्र, कारण समुद्र विमानाने पार केला होता 'We are saved from coach landing  over  the sea  We have passed over it.' कर्मचारी सागत होते

पण या सहारा वाळवंटाचं काय ?

जगातलं सर्वांत मोठं वाळवंट या मोडक्या विमानानिशी आम्ही कसं पार करणार होतो ?

आणि आग लागली तर ? वाळवंटातला वडवानल होणार का ?

मैलोगणती पसरलेलं वाळवंट  कशी असेल तिथली वाळू ? रात्रीच्या गारव्यान निवलेली. Forced landing करताना ठिणगी उडाली तर ही वाळू तापून निवेल नाही आणि उरतील आमचे भस्मसात अवशेष  मदतीला कुणी आलच तर सुदैवाने वाचलेले जीव वाचतील ? ती एक सुदैवी मी असेन का ? मला जगायचं  आहे  पण कशासाठी ? जगून करायचय काय ? भारतात परत जायचं ? भारतात माझं कोण आहे ? कुणी राम माझी वाट पाहात नाही आहे  मी नाही परतले तर कृष्ण कन्हैयाच्या मुरलीचा एखादा सूर वर्ज्य करून मुरली वाजतच राहील  पण मला माझ्या मुक्कामाच्या

ठिकाणी जायलाच पाहिजे त्याना काय वाटेल ? कुणासाठी आपण जगल पाहिजे ही इच्छाच जगण्याची शक्ती देते मी याच्यामुळे परदेशी निघाले होते अन् मला पोचायला हवच होतं तेव्हा अपघातातून वाचणारी असूही शकेन.

दिवे बंद, अनाउन्समेंट बद SOS message नतरही मदत नाही हेलकावे खात विमान जातच होते Forced landingच्या तयारीने मिनिटे उलटत होती अगदी पधरा-वीस मिनिटे झाली असतील, पण वाटत होतं आपण वर्षानुवर्षे या अपघातात सापडलो आहोत सहारा वाळवंटही पार होत आलं मध्येच केव्हातरी वैमानिकाने विमानावर ताबा मिळवला होता प्रवासी म्हणत होते देवाची कृपा माझ्या मनात आलं—प्रगत विज्ञान आणि वैमानिकाचा आत्मविश्वास

योगायोगाने आलेला अपघाती मृत्यूचा क्षण थोडाफार टळला होता. आम्ही मनुष्यवस्तीच्या जवळ जवळ येत होतो रेडिओ सपर्क तुटला असला तरी लुकलुकणारे दिवे जवळपासच्या एअरपोर्टचा दिलासा देत होते आम्ही समुद्रात कोसळलो नाही. सहारात पेटून पडलो नाही पण या विमानतळावर निश्चितच उतरणार होतो बेली लँडिंग करून—कारण विमानाची चाके बाहेर येऊ शकत नव्हती म्हणून

सूचना मिळाल्या सीट घट्ट पकडून पुढे वाकून बसा डोके पुढच्या सीटवर आपटणार नाही त्याची काळजी घ्या पासपोर्ट व मौल्यवान चिजा पर्समध्ये घ्या उरलेले सामान कुठल्या कुठे वर्पिंगमध्ये गेले होते अगदी मी काढून ठेवलेल्या चपलासुद्धा

आणि तो क्षण आला विमान उलटं झाल तेव्हा डोकं शेकलेलं होतं, कारण तेव्हा काहीच कळल नव्हतं आडव्या उभ्या बंपिंगमध्ये सगळे अंग ठेचकाळून निघाले होते डावा पाय दुखावला होता पण मृत्यूच्या भीतीपुढे या माराची जाणीव होत नव्हती आता मात्र आम्ही सावध होतो 'ग्वो' देऊन मृत्यू पळाला होता त्याने गाठायच्या आत आम्हाला लँड व्हायचं होत.

बंऽऽप—बऽऽप आवाज आले आणि वाटलं आपण एका पोत्यात बंद आहोत आणि ते राक्षस ढकलत आहेत, लाथा घालताहेत हादरे, हिसके विमानात बसत होते फुटाफुटागणिक, पण जमिनीला आम्ही टेकलो होतो आता फ्युएलची टाकी फुटता कामा नये व विमान कट्रोल सुटून कुठेतरी आदळता कामा नये की आम्ही सुखरूप

मग माझ्या डोक्याला मार बसलेला असो, पाय दुखावलेला असो की आपटल्या-मुळे दुसरा खादा मोडलेला निघो

एवढ्या सूचना देऊनही माझं थोबाड एकदा पुढच्या सीटवर आदळलच एकदम उजवा डोळा सुजला तरीही एका डोळ्याने बेली लँडिग कस होत हे बघण्याची उत्सु-कता सपत नव्हती पाल्याला घराजवळ एअरपोर्ट गच्चीतून खिडकीतून अगदी घरबसल्या विमान उतरताना दिसत तेव्हा मुलं ओरडायची, 'आई, चाक बाहेर

आली, विमान उतरतय बघ '– तेव्हा विमान उतरण म्हणजे चाक बाहेर येण हे डोक्यात फिट्ट बसलेल होत पण आता चाकाशिवाय विमान उतरत होतं आणि मी आतच असल्याने पाहू मात्र शकत नव्हते फक्त बसणाऱ्या हादऱ्यामुळे जाणवत मात्र होते

फुस्स आवाज झाला गुर्र गुर्र गप्प आवाज झाला एकदाचे विमान थांबले

सगळ्याच्या रडण्याचे हसणे केव्हा झाले कुणालाच कळलेच नाही बेल्ट बांधलेल्या, दुखावलेल्या हातानी शेजाऱ्याना शेकहॅंड केले छोट्या मुलाच्या पाप्या आयानी घेतल्या

प्रथम पायलट बाहेर आला त्याने छातीवर क्रॉसची खूण केली ' We are safe Thank God. Thank you all for best co-operation '

क्रयू पायलटकडे धावला त्याने पायलट–को–पायलटच्या गालाची चुंबने घेतली आणि दरवाजे उघडले एकच क्षण सर्वांची गडबड उडाली बाहेर पडण्यासाठी. प्रत्येकाला वाटल आपण आधी बाहेर पडाव कुणी कुणाला बघत नव्हते प्रत्येकजण आपल्यातच गर्क होता आम्हाला फक्त हातातल्या पर्सनिशीच उतरायला सांगितले होते त्यामुळे बाहेर लगेच पडणं शक्य होत टोपी, बूट, चपला, ओव्हरकोट याच कुणाला भानच नव्हत त्या रेटारेटीत एका छोट्या मुलाच्या ओरडण्याचा आवाज आला कुणाचा तरी पाय त्याच्या पायावर पडला फटाफटा इग्रजीत त्याला बोलले मुलाना, बायकाना आधी बाहेर पडू द्या आणि मिलिटरीसारखी लोकानी शिस्तीत लाईन लावली आधी मुले आणि त्याच्या आया उतरल्या मग बाई म्हणून माझा नबर लागला. विमानाच्या दारात कॅप्टन उभा होता मी शेकहॅंड करून त्याच्या हाताचं चुंबन घेतल माझ्या आधी दोन युरोपियन बायका व फर्स्ट क्लासमधील दोघे उतरताना त्यानी असंच केलेल मी पाहिल होत

जमिनीवर पाय टेकले तेव्हा सरळ उभ राहता येईना, आणि आपण जमिनीवरच आहोत हे खरंही वाटेना मुका मार किती बसलाय ते समजलय आणि अपघाताची तीव्रताही जाणवली एका कर्मचाऱ्याने हात धरून बसपर्यंत मला नेल. त्याच्या देशात मी आले होते इथे काही दिवस राहणार होते त्यामुळे त्याची मदत खूप आपुलकीची वाटली किती चागले आहेत हे काळे लोक विमान खाली उतरताना पाहून विमानतळावरचे कर्मचारी सर्व मदतीनिशी धावले होते त्याना message मिळालाच नव्हता हे आम्हाला उशिरा कळले आम्ही बायका बसमधून बघत होतो उतरणारे पुरुष पायलटचे आभार मानून घाईघाईने उतरत होते एकामागून एक. अनपेक्षितपणे. एकाने जमिनीवर लोळण घेतली आनदाने रडत त्याने जमिनीचे चुंबन घेतले व गुडघे टेकून त्याने हात आकाशाकडे केले 'या अल्ला इन्शाल्ला' म्हणून प्रार्थना करायला सुरुवात केली त्याचे पाहून व उत्स्फूर्तपणे अनेकानी तेच केले भारावून सर्व पाहात होतो आम्ही 'कानो' ह्या नायजेरियाच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचू

शकलो होतो सुखरूप होतो आता सर्व मदत मिळणार होती. मुख्य म्हणजे पाणी मिळणार होत

बसमधून विमानतळावर आलो फर्स्टेड व कोकाकोला तयार होता, मला एक पेनकिलरची गोळी डॉक्टरानी दिली आयोडेक्ससारखे औषध चोळले. थंडगार कोकाकोला पिताना पुढे काय हा विचार मनाला सतावू लागला रोम सोडताना विमान पकडायला लागलं ते मुबईला अक्षरशः बस किंवा लोकल पकडतो त्या चपळाईने कारण बोर्डिंग पासवर हमखास विमानात जागा मिळेल असा नायजेरियन एअरवेजचा भरवसा नाही तसा लौकिकही नाही विमानात चढल्यानतर भरलेल्या विमानातून विमान सुटतेवेळी सहा-सात पाकिस्तानी प्रवाशाना खाली उतरवून त्याच्या बदली नायजेरियन लोकाना घेतलेले मी पाहिले होतेच. विमानात माझ्याव्यतिरिक्त तीन बागलादेशीय कुटुबे, केरळातील तीन बायकामुलासह दोन दक्षिण भारतीय पुरुष व चार-पाच युरोपियन्स होते ती केरळी व दक्षिण भारतीय मडळी कानो एअरपोर्टवर त्याना कोणी ओळखीचे केरळीयन भेटताच तिथेच थाबली बागलादेशीयाच्या एका मुलीला बराच मार लागल्याने त्याही सर्व मडळींनी कानोलाच थाबण्याचा निर्णय घेतला मी एकटी कुठे जाऊ ? त्यामुळे ह्या आशियाई मडळींचा कानोलाच थाबण्याचा निर्णय, त्याचे मला काही न विचारणे या घडामोडीचा मला पत्ताच नव्हता मी भारत सोडतेवेळची परिस्थिती आठवत सुन्नपणे बसून होते

दिल्लीचा पालम एअरपोर्ट–खर म्हणजे माईची सगळी फॅमिली मला पोचवायला आली असती पण माझा योग ! माझे जाण्याचे काहीच निश्चित ठरत नव्हते सर्वांचे दिनक्रम चालू होते मी निघाले त्या रात्री माईकडे काही मडळींना पार्टी होती पाहुण्याच्या सरबराईत कोणीच येऊ शकले नाही. आले फक्त डॉक्टर त्याची मदत सर्वपरीने सर्वार्थाने. मी हक्काने घेतलेली चोवीस डॉलर घेणे, फॉर्म भरणे, एअरपोर्ट फी भरणे सर्व पार पडले. आणि मी आत जाण्यासाठी सिक्युरिटी चेकिंगच्या गेटपाशी आले इथून आत गेले की भारताशी सबध तुटणार होता. डॉक्टर दूरचे होणार होते. मी आत गेले आणि वळून पाहिले डॉक्टर गेटच्या अगदी दाराशी उभे होते मी पुन्हा बाहेर आले न बोलता दोन क्षण आम्ही एकमेकाकडे पाहात उभे राहिलो शेकहॅण्ड केला पुन्हा जरूर भेटू सागून मी आत आले. नतर मागे वळून पाहण्याचे धैर्य झाले नाही बघितलं असत तरी काही दिसल नसत. डोळे भरून आले होते आनंद वाटत होता तितकेच तीव्र दु खही होत होते मी परत जाईन तोपर्यंत डॉक्टर ब्लड कॅन्सरच्या जीवघेण्या दुखण्यातून बरे होतील ना ? अपघाती मृत्यूच्या अनुभवातून पार पडल्यावर मला प्रथम हीच आठवण आली आणि वाटले मला त्यानी परत भेटायलाच हवे.

अनाऊन्समेंट झाली एअरक्राफ्ट तयार होतं लाऊजमधून बाहेर आलो. बसमधून विमानापाशी गेलो काय करावे हे न सुचल्याने व एकटी कानोला कुठे जाऊ ? म्हणून

व हे लेगॉसला वाट पाहात थाबले असतील या विचाराने मी लेगॉसला जाण्याचा निर्णय घेतला होता विमानापाशी आलो हे अपघातात सापडलेले विमान नव्हते नवीन होते आत जाऊन जाग्यावर बसले विलक्षण थकवा आला होता झोपून जावे वाटत होते तरीही विमान सुटल्यावर संकटकाळासाठी दिल्या जाणाऱ्या सूचना मी लक्षपूर्वक बघितल्या ऑक्सिजन मास्क कसा घालायचा, लाईफ जॅकेट कस चढवायच, प्रॅक्टिकल अनुभवातून फर्स्ट क्लास पास झाल्यावर ही थिअरी डोक्यात भरून घेत होते आता अपघात झाला तर माझ्यापाशी माहिती जय्यत तयार होती विमान सथ लयीत चाललेले होते सहज आजूबाजूला पाह्यल कुणी नायका नव्हत्या की कोणी आशियाई चेहराही नव्हता ना पुरुषाचा ना स्त्रीचा सर्व आफ्रिकन्स ! त्याच्या देशात मी आता पाहुणी होते दीड तासानतर लेगॉस एअरपोर्टचे दिवे दिसू लागले मूरताला महमद एअरपोर्ट !

सुखरूप लॅड झालो परत सर्वांनी तोच हर्षोद्‌गार काढला बद तुटलेली एअरबॅग काखोटीला मारून पर्स व तुटकी चप्पल सावरत मी विमानाच्या दाराकडे सरकू लागले आता विमानाचा जिना उतरायचा, बसमधून एअरपोर्टच्या बिल्डिंगमध्ये जायचे की हे भेटतील. पण जिनाच दिसेना सर्व लोक चालले होते. त्याच्यामागे मी जात होते एका बोळकडीतून, आणि अशी थेट निघाले ती कस्टममध्येच थडकले तो जिना, बस इत्यादी रन वे, उभी विमाने, आमचे विमान काही दिसलेच नाही इतकी गमत वाटली एकदम आधुनिक पाश्चात्त्य जगात आल्यासारखे नतर कळल अशा मोठ्या आधुनिक विमानतळावर बस वगैरे जुनी पद्धत नाही आता विमानातून थेट बिल्डिगमध्ये येण्याच्या या मार्गाला नायजेरियात म्हणतात 'शूट ' मला शूट म्हणजे मारून टाकणे एवढच माहिती होत वाटलं सोन–पेट्रोल मिळालेला हा समृद्ध देश ! ही समृद्धी अशी सुरुवातीलाच दिसली अमेरिकेचे अनुकरण मागास देशात असतेच मुबईला नाही का नरिमन पॉईटला, कफ परेडला दिसत ? कस्टमची कामेही त्याच आधुनिकतेने फटाफट झाली भारतासारखा कुठेही किचकिचाट नव्हता विकसनशील भारत आणि नायजेरियाही पण आत्तापर्यंत तरी विकासच विकास दिसला होता

व्हिसा, हेल्थ सर्टिफिकेट ओ के झाले आता दिल्लीहून बुक केलेली माझी मोठी सुटकेस मिळायची होती ती घ्यायची आणि कस्टम क्लिअर करून बाहेर यायच एवढच राह्यल होत मग हे भेटल्यावर मी निश्चित होणार होते अपघाताचा थकवा दूर झाला असता मला चिक्कार भूक लागली होती खूप खूप तहान लागली होती मध्यरात्र होत असूनही मी टरवल होत—हे भेटताच आधी पोटोबा मग ख्यालीखुशालीची बात

सामान मिळण्याच्या हॉलकडे मी वळले रोमला मी एका हॅण्डबॅगवरच गेले होते फक्त चौदा-पंधरा तास तर राहायच होतं आता फ्लाईट कॅन्सल होईल हे मला थोडच स्वप्न पडलं होत ? त्या तुटपुज्या सामानावर अडीच दिवस राहावं लागल माहजिकच

सामान म्हणजे माझी एकुलती एक मोठी बॅग ताब्यात घेण्याचा हा पहिला प्रसंग लेगॉसलाच आला एस्कलेटर करून रुबाबात तर उतरले समोरच सामानाचा लंब-वर्तुळाकार पट्टा हळूहळू फिरत होता त्यावर बॅगा–सामान होते आपापले ओळखून प्रत्येकजण पुटकन उचलत असत मी पण तयारीत उभे राहिले- बराच वेळ बॅग येईचना हरवली तर नाही ना ? की अपघाताच्या वेळी सामान कमीबिमी करावे वाटून तिलाच गचाडी मिळाली ? हरवली तर सहाशे डॉलर मिळतात ही मौलिक माहिती डॉक्टरानी दिली होतीच आणि माझ्या बॅगेत सहाशे डॉलर किमतीचा काही माल नव्हता तेव्हा समजा हरवलीच तर वाईट वाटून न घेता मजेत सहाशे डॉलर घ्यावेत नवीन खरेदीला ! असेही सागून ठेवल होत एकदम बहुमोल सल्ला ! पण त्या डॉलर्स-पेक्षाही किंमती वस्तू माझ्या बॅगेत होत्या त्याच काय ? थालिपिठाची भाजणी, साबुदाणा, पोह्याचे पापड, कुटाच्या मिरच्या, गोडा मसाला, पावभाजी मसाला, कडवे वाल हे का मला सहाशे डॉलर देऊन लेगॉसला मिळणार होते ? छे ! बॅग हरवून उपयोगी नाहीच डॉक्टर परदेशची ट्रीटमेंट संपवून भारतात परतले तेव्हा चिक्कार फालतू सामा-नाने त्याच्या बॅगा भरलेल्या होत्या पण इच्छा करूनही त्याची एकसुद्धा बॅग हरवली नाहीच सहाशे डॉलर हुकले मला मात्र माझी बॅग हवी होती नणदेने दिलेल्या त्याच्या आवडत्या चकल्या, शकरपाळी, सौ मुळगुंद यानी दिलेली चटणीपुडी, भडग, लेकीने बाबासाठी आवर्जून दिलेला खाऊ सर्वांनी बॅग ठासून भरली होती अन्नपूर्णा, रुचिरा अशा पाकशास्त्राच्या पुस्तकासारखीच सामानाच्या पट्ट्यावर हा अन्नपूर्णा बराच वेळ न दिसल्यावर माझा जीव वरखाली होऊ लागला दिल्ली ते लेगॉस अशी डायरेक्ट बुक केलेली बॅग रोमला तर राहिली नसेल ना ? की दिल्लीलाच ? अर्धा तास होऊन गेला मी आपली उभीच माझ्या विमानातल्या बहुतेकाचे सामान मिळाले सर्वजण कस्टमकडे गेलेले काही बाहेरही गेले बरं दुसरी कोणत्या फ्लाईटचीही गर्दी नव्हती त्यामुळे एकच पट्टा तुरळक सामानासह फिरत होता आणि एवढ्यात ती दिसली

सथ पट्ट्यावरून बॅग हळूहळू येत होती माझ्याजवळ येताच ती झटकन उचलायची मी हुश्शार उभी होते बॅग आली आणि तशीच पुढे गेली मला उचलताच आली नाही आणि बघता बघता ती पट्ट्यावरून पुढे सरकत आतही गेली दिसेनाशी झाली गेली ! माझी अन्नपूर्णा गडप झाली आणि मी ओरडले, ' माझी बॅग चालली, गेली, कोणीतरी तिला धरा ! ' माझे मराठी कोणाला कळणार ? व त्याचे इंग्रजी भाषातर मी कसे करणार ? बॅग गॉन ! बॅग गॉन !' एवढच पुटपुटत मी उभी राहले माझ्याकडे आजूबाजूचे लोक अचब्याने बघत होते आणि एवढ्यात आतून सथपणे सरकत येणाऱ्या पट्ट्यावर ती दिसली आता मात्र मी ' माय बॅग म्हणून शेजारी उभ्या असलेल्या एका कर्मचाऱ्यास ती दाखवली बॅग मला झटकन उचलता येणार नाही हे त्याला बॅग पाहताच लक्षात आले बॅग येताच पटकन् उचलून माझ्यासमोर ठेवली

जीव भांड्यात पडला म्हणतात तसा बॅगेत पडला म्हणायला हरकत नाही सामानाचा फिरणारा पट्टा ही चीजच मला नवीन, कारण विमान-प्रवासच पहिला माझा मलाच खुदकन् हसू आलं ! आजूबाजूचे लोकही हसले थॅक्यू म्हणत हसत बॅग ढकलत मी कस्टमकडे गेले तोपर्यंत सर्व पॅसेंजर बाहेर गेलेही होते मी कस्टम ऑफिसरसमोर उभी राहिले

बॅग वरवर पाहात त्याने विचारले, Have you got any eatables ? इंग्रजीचं ज्ञान, Yes sir, No sir एवढच चटकन येणार त्यापैकी yes चटकन तोंडून गेलं माझी सुटकेस खाद्यपदार्थांनीच भरलेली होती. खोटं कसं सांगणार ? भाजणी ते मेतकूट सर्व काही होत त्यात दक्षिणेचा सांबर–मसाला होता तर दिल्लीची दालमोठ, सोहनहलवा होता नव्हत काय ? त्या अधिकाऱ्याने बॅग उघडून पाहिली आणि म्हणाला हे तुम्हाला नेता येणार नाही मनात झटकन विचार आला, त्यालाच विचारावे, ' या तुमच्या देशात माझ्या नवऱ्याला मग खायला काय घालू ? ' साक्षात अन्नपूर्णा अशा आवेशात मी त्याला समजावून सांगू लागले, ' हे पदार्थ आमच्या रोजच्या जेवणात आवश्यक आहेत यात अनारोग्यजनिक काही नाही ' पण त्याच्या डोक्यात ते शिरत नव्हते. त्याच आपल एकच हे नेता येणार नाही शेवटी चिडून म्हटले, मग तूच ठेवून घे ' आणि हातात लिज्जत पापड घेऊन त्याला म्हणाले, ' Fry it on oil and give it to your wife ' तोही बघतच राहिला चार-पाच पापडाची पाकिटे होती नायजेरियन पद्धतीमुळे प्रत्येकाला कमीत कमी दोन तरी बायका असतात इथे तर पाच पाकिटे होती मी काय म्हणतेय हे त्याच्या आधी डोक्यात शिरले नाही नंतर लक्षात आले मी सगळे सामान सोडून जाते म्हटल्यावर त्याने मला एक मार्ग सुचवला आधीचा अपघात, नंतरचा बॅगेचा प्रकार, नतरचा हा घोळ त्यामुळे माझ नेहमीच भडकू डोक चांगलंच भडकल होत. पदार्थ न्यायचे नाहीत ना ? नाही नेत ठेवून घे ते पण त्याला मान्य नव्हत त्याच म्हणण पटवून घ्यायला मला वेळ नव्हता बाहेर हे उभे असतील आणि वेळ लावल्यावर इकडे तिकडे कुठे गेले तर ?

अखेर तो मला स्पष्टच म्हणाला ' You can take it out but give me some money '

अरे चोरा तुम्हीही आमच्याचसारखे तर ! आता मात्र माझा मराठी बाणा आपो-आप बाहेर पडला पैसे मागतोस काय ? मी कधीकाळी केलेल नाटकातल काम आठवून चेहरा पाडला आणि म्हटलं—' I have no money Our flight was cancelled and we stayed in Rome for 3 days I have finished all my money You know we have just come out of danger. In accident we can't eat food Now I feel hungry Flight is delayed Perhaps my

husband not come I need some money please Give me 10 Nyara Keep this luggage with you and when my husband returns this money give me my luggage Keep it, keep it '

माझ्या वक्तव्याने, भडिमाराने तो चकितच झाला कस्टममधला माणूस ध्यायचीच सवय असणार द्यायची थोडीच असणार ? त्याच्याच देशात येऊन मी हे उलटच वागत होते बावचळून त्याने बॅग बंद केली व तो म्हणाला, 'You can go ' मी पुन्हा विचारले, 'What about this luggage ? ' काळा मसाला, मेतकूट, शेवया, सांडगे, पापड त्याला विचित्र वाटले असावे कारण बॅगेत हे कपडे, जिन्नस व दोन-पाच साड्या एवढंच होत माझ्या प्रश्नाला तो उत्तरला—'Oh, you can take it with you but don't do it again ' मी ऐटीत बॅग बंद केली. तुटलेली एअरबॅग खाकोटीला मारली पर्स, पासपोर्ट सर्व वस्तू चाचपून बघितल्या आणि उरलेले पाच डॉलर्सही दरवाज्यापाशी आले आपोआप तो उघडला बाहेर जायला गर्दी नव्हतीच काचेचे दार उघडल आणि मी बॅग ढकलत बाहेर आले

एका हाताने मोठी बॅग ढकलत, एका हातात तुटलेली एअरबॅग, गळ्यात पर्स लटकलेली, उजवा डोळा सुजलेला, पाय लगडत असलेला, केसाची पिन हरवलेली त्यामुळे केस म्हणजे चक्क झिंज्या अशा अवतारात मी कस्टममधून बाहेर पडले अपेक्षेने, उत्सुकतेने हे स्वागताला समोर हजर असणारच या खात्रीने सर्व भार, मानसिक ताण त्यांच्यावर सोपवून मी निश्चित झोपणार होते मला खूप खूप झोप आली होती बिलक्षण थकवा वाटत होता तहान लागली होती कडाडून भूकही आता अपघाताची भीती वाटत होती तेव्हा काहीच वाटले नव्हते ज्या मृत्यूची भीती मला कधीच वाटली नाही तो मृत्यू कुशीत घेत होता. पण नाही कसं ? थोडसं थोडस मन चरचरत होतं या नवख्या देशात मी अशी समुद्रात बुडून एकाकी मरणार पण माझ्या मृत्यूचे दुःख कोणाच्याही डोळ्यात तरळलेले दिसणार नाही दोन अश्रू ! स्वतःसाठी, स्वतःच्या मृत्यूच्या दुःखासाठी त्याचे मला कसले सुख ? हा अहंकार की सुख ? की आत्मलुब्धता ? स्वतःच्या मरणाचे दुःख दुसऱ्याच्या डोळ्यात दिसणे हे कसले सुख ? जेव्हा मृत्यू घोंघावत झेपावला होता, तेव्हा हाच विचार मनात येऊन गेला होता काही क्षणच पुनश्च मी आमचे विमान कसे बुडणार हे पाहण्यात रमून गेले रडू तर बिलकुल आले नाही वाईटही वाटले नाही भय तर नाहीच नाही होती फक्त उत्सुकता !

आणि आता उत्सुकता होती यांना भेटण्याची सहा महिन्यानंतर कुंकवाचा धनी भेटणार होता त्याच अपेक्षेने मी कस्टमबाहेर आले डोळे भिरभिरले गरगर फिरले अवघ त्रिखंड फिरल्याप्रमाणे नजर सर्वत्र फिरून आली. आणि भिरभिरणारी नजर व मी गारठले गोठून गेले, थिजून गेले. खिळून उभी राहिले समोर फक्त काळा

महासागर पसरला होता सगळे काळेकुट्ट लोक सर्व पुरुष आणि मी एकमेव स्त्री त्याच्या वर्णापेक्षा वेगळी त्याच्या वंशापेक्षा भिन्न ! काळे कुरळे केस नसलेली काजळी वर्ण नसलेली पण आलम दुनियेत चिरंतन स्त्रीत्व असलेली फक्त स्त्री धर्म, वंश, जात, वर्ण भेदून टाकणारी स्त्री एकाकी, एकटी, असहाय, कावरी-बावरी झालेली अवघे भय मनात दाटून आले हुंदका घशात कोंडला फुटणारा श्वास उरात घुसमटला शरीरात भीतीची लाट शिरशिरली एकटीने प्रवासाचे धाडस केले म्हणून हळहळले तरीही उसन्या धैर्याने, शोधक नजरेने ह्याचा वेध घेऊ लागले पसरला होता काळा समुद्र जवळ येत होता काळा समुद्र डावीकडून, उजवीकडून, समोरून, पाठीमागून काळा सागर पुढे सरकत होता

त्या माझ्या फ्लाईटला सर्व आफ्रिकनच होते काळे काळे कुरळ्या केसांचे, क्रूर वाटणारे एकही आशियाई माणूस नव्हता एकही गौरकाय व्यक्ती नव्हती आणि एकही स्त्री नव्हती मी अशियाई व थोडीफार सुस्वरूप असल्याने मनुष्य म्हणजे संपूर्ण स्त्री असल्याने, वर्णभेद नसावा म्हणणारी मी माझ्याच वर्णाचा आधार शोधू लागले कोणी स्त्री दिसते का पाहू लागले

टॅक्सीवाले जवळ आले पोर्टर (हमाल) सामान ओढू लागले. एअरपोर्टवरचे अधिकारी डोळ्यात भूक घेऊन पाहू लागले याना शोधण्याऐवजी मी त्याची वाट पाहू लागले आत्ता दिसतील इथेच कुठे गेले असतील कॉफी प्यायला येतीलच एवढ्यात जरा दूर कॉफी शॉप होते मी बॅग ढकलत तिकडे गेले हे सोडून सर्व लोक होते परत फिरले मागे काळा समुद्र पुढे वळले पुढे कॉफी शॉपचे लोक त्या काळ्या समुद्रासारखेच मी येण्याच्या वेळी हे थोडेच कॉफी पीत उभे राहणार ? कदाचित बाहेर उभे असतील मी गेटकडे चालू लागले ॲटोमॅटिकली दार उघडले बाहेर शुकशुकाट होऊ लागला होता नव्हे झालाच होता आता प्रवासी एकमेव मी होते परत आत आले दार बंद झाले बंद खोलीत कोंडलेल्या पक्ष्यासारखी घिरट्या घालत याना शोधू लागले येऊनही का मला भेटत नव्हते ? का आलेच नसतील ? सारासार विचार सुचत नव्हता हे आले नसतील येऊ शकले नसतील हे सत्य मन स्वीकारत नव्हते सारखे वाटत होते हे जवळच कुठेतरी असतील, आत्ता येतील थोडा वेळ थांबावे लागेल थोडं धैर्य धरावं लागेल आता सर्वत्र शांत झाले परक्या देशात मी परकी प्रवासी स्त्री उभी होते आजूबाजूचे लोक आणखी धीट बनले होते ट्रान्झिट लाऊंजला कोणी असतील म्हणून शोधत निघाले वरच्या मजल्यावर गेले बंद-उघडून घ्यायला आलेला ऑफिसर म्हणाला, ' यु रिलॅक्स बी फ्रेश आफ्टर हाफ ॲन अवर आय वुईल जॉईन यू वुई वुईल एन्जॉय तिथं एकटं थांबण्याचं धैर्य मला झालं नाही

मी डिपार्चरच्या बाजूला गेले अरायव्हल खाली होते भला मोठा हा नवा एअरपोर्ट

मूरताला महमद एअरपोर्ट अत्याधुनिक आणि प्रचंड पाश्चात्त्य पद्धतीचा मी प्रथमच परदेशी निघालेली पहिलाच विमान-प्रवास करणारी एकटीने डिपार्चरला कोणी जाणारे प्रवासी असतील त्याना पोचवायला कोणीतरी आलेले असेल मला नव्हते दिल्लीला डॉक्टर आले ? तसेच कोणी भारतीय भेटले तर ? नक्कीच एखादी फ्लाईट जाणारी असेल आशेने तरातरा तिकडे गेले कोणी भारतीय, आशियाई, गौरवर्णीय दिसतात का पाहू लागले त्या रात्री एकही फ्लाईट जाणारी नव्हती संध्याकाळनतर सर्वत्र शुकशुकाट होता कोणी जाणारे नव्हते कोणी पोचवायला आलेले नव्हते निराश होऊन मी परत खाली अरायव्हला आले एखादी फ्लाईट आली असेल, येणारी असेल, त्यातील प्रवाशाना आणायला कोणी भारतीय, आशियाई, युरोपियन आले असतील त्या रात्री एकही फ्लाईट येणारी नव्हती. एकदम सकाळी सातपर्यंत आत्ता वाजत होता रात्रीचा एक सर्वत्र शुकशुकाट होता याच्या येण्याची, याच्या मित्राच्या येण्याची आशा मावळली होती रात्र मला एकटीनेच इथे काढायला हवी आजूबाजूचा काळा समुद्र आणखी जवळ येत होता सर्वांना कळून चुकले होते मी एकटी आहे मी स्त्री आहे

एका कॉफी बारजवळ गेले फक्त नोकरवर्ग तोही काळाच निर्विकार, निर्जीव वाटणारा जीव. ना माझ्या साहाय्याला येणारा, ना मला छळणारा फक्त बघा प्रेक्षक असलेला लांबलचक पॅसेजमधून फिरून दुसरे कोणी दिसते का शोधू लागले फक्त काळे आणि काळेच लोक माझ्या मागे मागे येत होते एक दोन नव्हे, पाच दहा टॅक्सीवाले असतील तसेच हमाल व इतर कोणी वधे- काही एअरपोर्टवरचे कर्मचारीही गणवेषातले. तशीच पॅसेजमधून जाऊ लागले सगळीकडे फक्त माझ्या तुटलेल्या चपलेचा आणि ओढत येणाऱ्या बॅगेचा आवाज बाकी सर्व शातच. पण काळे वादळ घोंगावत येत होते जवळ जवळ येत होते कोणीतरी माझी बॅग ओढली कोणी माझ्या एअरबॅगला हात लावला कोणी माझ्या हाताला स्पर्श केला मी घाबरून धावत सुटले पण कुठे जाणार ? इकडून तिकडे मी भिरभिरत फिरत होते बद खोलीत सापडलेल्या इवल्याशा चिमणीसारखी सगळे कावळे मला टोचा मारायला टपले होते आणखी आणखी जवळ येत होत. त्याच्या शरीराचा उबट घामट दर्प जाणवत होता पाढरे दात विचकून हसत होते माझे हे कसे लचके तोडणार आता ?

वरच्या मजल्यावर अधिकारी लोकाची वर्दळ जास्त होती. वाटले, हे टॅक्सीवाले हमाल वर येणार नाहीत अधिकारी मला काही मदत करतील एक वर्कशॉपही वर उघडे होते तहानेने जीव व्याकुळला होता विलक्षण थकवा वाटत होता अनिवार झोप येत होती. मुका मार ठणकत होता भयाने जीव गुळूगुळू गोळा होत होता मी काय करू ? माझ्याजवळ फक्त पाच डॉलर होते खर्चावित का ? कॉफीने झगडण्याची ताकद येईल का ? धैर्य गोळा होईल का ? मी वर गेले कॉफी सपलेली होती कोकही

नव्हता. फक्त बिअर होती एवढ्यात एक अधिकारी जवळ आला काहीतरी पुट-पुटला लक्ष न देता मी जिन्याकडे वळून चालू लागले एक्सलेटर बंद झाला होता जिन्याकडे एकजण उभा होता वाट अडवून मागून आलेल्याने माझ्या साडीवरून हात फिरविला दुसऱ्याने मोकळ्या केसांवरून. तिसऱ्याने पाठीवरून समोरचा हसला हे हसणे फक्त पुरुषच हसू शकतो असे हसणे—एका नराचे—वासनेने वखवखलेल्या पुरुषाचे हसणे तो हसला दुसरा हसला, नवा आला तोही हसला सभोवार हसणे घुमू लागले गोलघुमटाप्रमाणे कानावर आदळू लागले एकदा नव्हे—सातदा सातीजण जवळ सरकले, हसत हसत अचकटविचकट हावभाव करत भाषा समजली नाही तरी ते हावभाव समजत होते, जे फक्त स्त्रीलाच समजतात मग ती सुशिक्षित असो वा अशिक्षित असो त्यांचे हसणे घोंगावू लागले वादळवाऱ्यासारखे काळा समुद्र पुढे झेपावू लागला मला वेढून कोणीतरी माझ्या केसांचे चुंबन घेतले कोणी माझ्या स्त्रीदेहावरून हात फिरवला आणि मी ओरडले जोरात किंचाळले माझ्या स्त्रीदेहाचा तिरस्कार करण्यासाठी आता भय लोपले होते भरला होता ओतप्रोत तिरस्कार ! अवघ्या पुरुषजातीबद्दल तिरस्काराने किंचाळत मी कठड्या-पाशी गेले आणि ओरडून बोलू लागले—

'खबरदार कोणी पुढे सरकला तर— खबरदार कोणी माझ्या अंगाला हात लावला तर खबरदार कोणी मला स्पर्श केला तर कोणीही एक पाऊल जरी पुढे टाकलेत तर मी या मजल्यावरून खाली उडी टाकेन मी तुमच्या देशात आलेय हे माझ्या भारतात माहीत आहे भारतीय हायकमिशनरला माहीत आहे मी इथे आलेय हे तुमच्या देशाच्या हायकमिशनरला माहीत आहे सर्वांना ठाऊक आहे भारतातले माझे लोक माझा शोध घेतल्याशिवाय राहणार नाहीत माझे नाहीसे होणे, माझा मृत्यू तुम्हाला पचवता येणार नाही माझा नवरा तुम्हाला शूट करेल. मी परदेशी आहे प्रवासी आहे तुमच्या देशात आलेय पण मी तुमचा तिरस्कार करते तुमच्या देशाचा तिरस्कार करते आय हेट यू तुम्हाला नीतिमत्ता नाही तुम्हाला स्त्रीचा आदर नाही. तुम्हाला संस्कृती नाही तुम्हाला इतिहास नाही तुम्ही रानटी आहात. तुम्ही पशू आहात आय हेट यू आय हेट युवर नेशन आय हेट यू ऑल मी स्वतःच्या स्त्री-देहावरचाही तिरस्कार करते मनुष्यत्व हरवलेल्या सर्व जगाचा तिरस्कार करते जिथे स्त्रीवर फक्त भोगवस्तू म्हणून बलात्कार होतो त्या सर्व जगाचा मी तिरस्कार करते मग तो देश कितीही समृद्ध असो, सुसंस्कृत, सुधारलेला म्हणो. आय हेट ऑल '

मी आणखी कठड्याजवळ सरकले अगदी झुकून रेलले सर्वजण हालचाल न करता स्तब्ध उभे होते मी संतापाने बडबडत होते. थरथरत होते भयाने नव्हे पण तिरस्काराने डोळे भरून आले होते. मनात विचार होता. कशी उडी मारल्यावर लगेच मृत्यू येईल ? हातपाय मोडून या लांडग्यांच्या हाती सापडायचे नव्हते. मग ? मला

अशी उडी टाकायला हवी पोहताना सूर मारतात तशी डोक्यावर ब्रेन इज्युअरी तात्काळ मृत्यू माझे डॉक्टरही मग मला वाचवू शकणार नाहीत

माझ्या पिल्लाची आठवण आली माधुरीला बाळ होणार मी आजी होणार मला दुधावरच्या साथीसारख्याच बाळाच्या मऊ मऊ गालाची पापी घ्यायचीय कोवळ कोवळ जावळ हुंगायचय. माधुरीचे बालपण पुन्हा अनुभवायचे आहे माझा श्याम त्याच्या केटरिंगसाठी कितीतरी खरेदी इथून करायची आहे तो माझी वाट पाहात असेल माझे नातेवाईक, माझा मोठा मित्रमैत्रिणींचा परिवार सर्वांना सर्वांना सोडून मी अशी जीव देऊन मरणार? मी सुखरूप परतेन अशा दिलेल्या प्रॉमिसचं काय? मग झुंज देऊ? कशी? एकटीने? ह्या काळ्या माणसाच्या समुद्रात बुडून मरण्यासाठीच का मेडिटरेनियन सीवरच्या अपघातातून वाचले? नाही. मी अशी सहजासहजी हार पत्करणारी नाही जहाज बुडेपर्यंत जहाज सोडायचं नसतं माझे जहाज या काळ्याच्या वेढ्यात सापडून बुडणार? मी झुंजणार पण शरण जाणार नाही मी मरेन पण माझ्या अंगाला कोणाला हात लावू देणार नाही मी जीव देईन पण बलात्काराची बळी होणार नाही लढाई हारणार नाही साऱ्या जगाला ओरडून सांगेन आय हेट यू! आय हेट यू! सर्व पुरुषजातीचा मी तिरस्कार करते मी मरेन पण या लोकांना मारूनच मरेन

आता ते थाबलेत. भयचकित झालेत. माझा आवेश त्याना नवखा आहे माझ्या ह्या प्रतिकाराने ते खिळून थाबलेत हे मला दिसतय तळमळून मी इंग्रजीत, मराठीत तडातड बोलत होते भापेपेक्षा माझ्या सहाय्याला येत होती माझी चीड! माझा सताप! माझा त्वेष! माझ्यावर तुटून पडणारे हात त्याने रोखले होते काळा समुद्र मागे हटत होता हे अगस्ती मला शक्ती दे मला धैर्य दे मी पुढे सरकले सर्वांनी मला वाट दिली. बॅग ओढत मी चालू लागले पुनश्च खालच्या मजल्यावर आले आता काय करू? इकडे तिकडे बघत असतानाच ते दोघे दिसले रोमला माझ्याच हॉटेलात होते माझ्याच विमानातून रोमहून निघाले होते माझ्यासारखाच त्यानीही जवळ आलेला अपघाती मृत्यू अनुभवला होता आता ते एका टेबलावर बिअर घेत होते त्याच्याच देशात मी आले होते त्याचेच भाईबद मला छळत होते काळे कुरळे केस असलेले, काळे काळेच पण थोडेसे ओळखीचे झालेले असे दोन तरुण मला दिसले

भारतात, मुंबईत, पार्ल्यात, आमच्या घरी जमणाऱ्या तरुण-तरुणींच्या डिस्कशन ग्रुपमधील तरुणाप्रमाणे असणारे हे माझे युवा मित्र गिरीश, राजू, अनिल नव्हेत का? मी त्याच्याकडे धाव घेतली आजूबाजूचे वादळ ओसरून गेले विरून गेले आणि उरलेली रात्र मी त्या तरुणाबरोबर गप्पा मारण्यात काढली

मला आधार मिळाला, चैतन्याचा, नव्या पिढीचा, वर्णभेद न मानणाऱ्या युवकाचा, सळसळत्या विचाराचा, स्फुलिंगाचा ही नवी पिढी जागृत आहे सुसस्कृत आहे

विचार करणारी आहे मी टेबलाजवळ बसताच त्यांनी विचारले, तुम्ही काही घ्याल का? पाणी नव्हतच. पर्यायी कॉफी, कोकाकोला संपला होता शारीरिक आणि मानसिक थकवा यामुळे मला काहीतरी पेय हवे होते नवी बिअरची बाटली उघडून एकाने बिअरने मग भरून माझ्यापुढे ठेवला आणि एका दमात घटाघटा पिऊन मी तो रिकामा केला दारू उत्तेजक असते की नसते मला माहीत नाही पण त्या वेळच्या बिअरने मला फार बरे वाटले एवढे खरे सुरुवातीला आमचे संभाषण पुढे सरकतच नव्हते माझ्यावर कोसळलेला प्रसंग त्यांच्या ध्यानात आला होता प्रत्यक्ष न पाहूनही कळवळून प्लीज हेल्प मी म्हटलेले शब्द त्यांना खूप काही सांगून गेले होते कदाचित त्यानाही चीड आली असावी कदाचित वाईटही वाटत असावे म्हणूनच कुणालाच काही बोलायला सुचत नव्हते पण मी आता सुरक्षित होते डोळ्यात झोप दाटून आली होती मनात आठवणी दाटत मुलांना — माधुरी श्यामला — पत्र लिहून कळवावे, पण ती घाबरतील मी परतेपर्यंत काळजीने हैराण होतील नकोच ते जिव्हाळ्याच्या निर्मलाताई एका स्त्रीची विटंबना त्या स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला सांगावी का? नकोच ते—आणि एका मागोमाग एक नावे आठवायला लागली कुणाला पत्र लिहिले म्हणजे धीर येईल? माझ्यावर गुदरलेला प्रसंग कोण समजून घेईल? मला मानसिक आधार हवा होता खूप खूप हवा होता हे भेटेपर्यंत सर्व धैर्यबळ टिकवायचे होते. मी पर्समधून इन्लँड काढले नायजेरियन एरोग्रॅम नव्हते भारतात जाणाऱ्या प्रवाशाबरोबर पत्र द्यायचे असल्याने जसं घडलं तसं लिहिणं शक्य नव्हतं या भयानक प्रसंगाने आधीचा अपघात मी विसरले होते तेव्हा मृत्यू अपघाताने येणार होता आत्ता मी जीव देऊन त्याला भेटणार होते पेन घेऊन पत्र लिहायला सुरुवात केली पत्र पूर्ण करून पाठवीन की नाही मला माहीत नव्हतं पण त्या क्षणी मला कुणीतरी आपल्या माणसाशी बोलायचं होतं वाटलेली भीती सांगायची होती झालेला अपमान सांगायचा होता हा. माझा वैयक्तिक अपमान नव्हता साऱ्या स्त्रीजातीचा होता मी पत्र लिहू लागले —

प्रिय डॉक्टर,

परदेशाची म्हणजे नायजेरियाची हौस पुरेपूर फिटली पधराला सध्याकाळी साडेपाचला रोम सोडले रात्री बाराला लेगॉसला आले. सर्व सोपस्कार पूर्ण करून बाहेर आले, आणि क्षणभर गरगरले मला न्यायला एअरपोर्टवर कोणीही आलेले नाही दीड तास झाला मी बाहेर बाकावर एकटी बसून आहे संपूर्ण एअरपोर्टवर एकटीच भारतीय स्त्री खरं म्हणजे मनातून खूप घाबरले आहे पण न दाखवता बेफिकीरपणे बसून आहे. एअरपोर्ट अगदी शांत आहे काही वर्दळ नाही जेमतेम शंभर दीडशे लोक असतील मन फारच अस्वस्थ होऊ लागलं म्हणून तुम्हाला पत्र लिहीत आहे बघितलं ना, माझी कोणतीही गोष्ट सरळ नसतेच आपली केबल पाटलांना पोचली नसणार शनिवारी फ्लाईट कॅन्सल झाल्याचे लेगॉस एअरपोर्टवर अनाउन्सच केले नाही

त्यामुळे पाटील येऊन परत गेले असावेत माझे येणे रहित झाले समजून पण शक्यता आहे केबल न पोचण्याचीच इथले पोस्टखाते भयानकच आहे माझ्याकडे दोन फोन नंबर आहेत त्यावर फोन केला तर दोन्ही out of order-शेवटी ठरवले सकाळपर्यंत इथे असंच बसून राहायचे व सात नंतर पुढचा विचार करायचा असा प्रसंग कोणा-वर येऊ नये.

अडीच दिवस रोममध्ये प्रचंड भटकती झाली थकलेय खूप वाटतय शांत झोपाव पण जागं राह्यला हव हो की नाही? पण थकण्यापायी वाटतय झोपूनच राहावे मला फक्त झोप हवीय आणि सोबतही दिल्लीच्या आठवणींनं जीव कासावीस होतोय एवढ्या सगळ्या माणसातून कुठे एकटी येऊन पडले तुमचे ऐकले असते तर? पण आता काय उपयोग?

बाकी रोमची सफरमात्र खरोखरच छान झाली ह पाहता येईल तेवढे पाहून घेतले अगदी तुम्ही म्हणता तसेच एकट्याने प्रवास करताना मन अंतर्मुख होते विशेषत. स्वतःच्या चुका, दोष समजून येतात आणि रोमची भव्य वस्तुशिल्पे बघताना प्रियजनांच्या आठवणी येतात व्हॅटिकन चर्चच्या भव्य आवारात चर्चच्या पायरीवर बसले असता मला उषाची आठवण झाली तीन वाजले अजून चार तास काढायचे आहेत मग सकाळ होईल मी अरुणोदयाची वाट पाहात आहे.

रोमच्या सौंदर्याऐवजी मला न पाहिलेल्या दिल्लीचीच आठवण येतेय खरच, मी दिल्ली बघायला हवी होती एकटीने तरी हरिद्वारला जायलाच हवे होते मला हरिद्वार फार आवडले होते हृषिकेशची शांतता आणि निसर्ग किती सुंदर आहे पण राहिले सर्व. आत्तापर्यंतच्या आयुष्यात खूपच गोष्टी अशाच राहून गेल्यात.

आजूबाजूने सर्व आफ्रिकन विरश्या चालत आहेत टॅक्सीवाले मागे लागलेत सारख नो थँक्यू ' म्हणून सांगत आहे कोणाचीही खात्री वाटत नाही डॉक्टर, माझा धीर सुटत चाललाय पण असं होता कामा नये ज्या धैर्याने एकटीने मी आजारपणाशी टक्कर दिली ते धैर्य असं सोडून कस चालेल? मनाला बजावते आहे

माझ्या श्यामची मला आठवण येतेय मुंबई-घर-आसरा आठवतोय तिथं आता सकाळ झाली असेल श्यामजी उठले असतील चहा करत असतील ( घसा सुकलाय थोडी कॉफी हवी आहे ) कॉलेजच्या तयारीत असतील आई लेगॉसला पोचली ह्या कल्पनेत असतील आणि माझी बेन काय करत असेल? कॉलेजच्या तयारीत? की आज काही करावं वाटत नाही म्हणून आराम करत असेल? शेजारणी म्हणत असतील मी लेगॉसला ह्यांच्याकडे असेन सर्वचजण असे समजत असतील हे मात्र नायजेरियात जिथं असतील तिथं झोपलेले असतील माझी केबल मिळालीच नसणार माझे येणे कळलेच नसणार त्याना त्यामुळे तेही निश्चितच असतील

मी एकटी इथे ह्या मोठ्या एअरपोर्टवर बसले आहे वाट पाहात उजाडण्याची

रहदारी, वर्दळ आणखी आणखी कमी होतेय आणि माझे थोडस धैर्यही कमी कमी होतय मी काय करू?

तीन वाजलेत वेळ खायला येतोय शातता आणखी वाढतेय तुम्हाला पत्र लिहून तुमच्याशी बोलते आहे. असंच वाटतय म्हणूनच असं भारूड लिहीत आहे वाचताच फाडून टाका हे पत्र फक्त तुमच्यापुरतच आहे माझ्या मनाची ही रडवी अवस्था कोणाला कळू नये प्लीज थडीरण वाढतेय. पायात दोनदा क्रॅम्प आला सर्व आफ्रिकन व मी एकटी निदान कोणती तरी फ्लाईट तरी येऊ दे मला माणसाची सोबत हवीय

पहाटेचे पाच वाजलेत आता फक्त दोन अडीच तास राहिलेत एअरपोर्ट अगदी शात आहे जेमतेम पन्नास माणसे असतील डिपार्चर वेगळीकडे असल्याने तिथली वर्दळ मला माहीत नाही मी मात्र हा वेळ दोन नायजेरियन्स तरुणाबरोबर बसून गप्पा मारत घालवला ते दोघे विद्यार्थी रोमहून आमच्याच विमानाने आलेत मी होते त्या हॉटेलात ते होते त्यामुळे चेहरा ओळखीचा होता. बुडत्याला काडीचा आधार म्हणतात तो असा आता मी ठीक आहे रात्र संपलीय उषःकाल होतोय पत्र माझ्या घाबरलेल्या व अस्वस्थ मनःस्थितीत लिहिले आहे माझे काय झाले कळावे म्हणून

ललिता

माझी भीती मी डॉक्टरांना कळवली पण निखळ सत्य सांगायचं धैर्य झाल नाही कितीही झाले तरी मी एक मध्यमवर्गीय गृहिणी फारशी न शिकलेली फारसे जग न पाहिलेली सर्व खपून जाते दोनच स्तरात उच्च आणि अगदी गरीब. एका ठिकाणी भय नसते व दुसऱ्या ठिकाणी पैशाच्या जोरावर विकृता येते हे सर्व उघडपणे सागण्याचे धैर्य मला मिळेल का? कशासाठी? आणखी कोणावर असा प्रसंग येऊ नये आला असेल तरी त्यानी माझ्याबरोबर पुढे यावे, जगातील सर्व सुशिक्षित समृद्ध देशात हे घडत फक्त उघडपणे काही सागण्याचे आपल्यात धैर्य नसते हे धैर्य डॉक्टर मला देऊ शकतील? सत्य सांगितलं नाही तरी काहीतरी भयकर घडलय हे त्याना जाणवेल. विमानतळावर मधून मधून त्या काळ्या नायजेरियन तरुणाशी कम्युनिझमवर, मार्क्सवर गप्पाही मारत होते त्याचे नवे विचार ऐकत होते परदेशावर अवलबून असल्याने शिक्षण कस हव? आर्थिक विषमता—सामाजिक तणाव—विषय काहीही होते जे आमच्या ग्रुपमध्ये चाले तेच

माझं अल्प इंग्रजी अडत नव्हत भाषेचे अडसर काही वेळा भावनेने दूर होतात आणि यातूनच मला नायजेरियातील तरुण पिढीच दर्शन घडत होत माझा तिरस्कार हळूहळू दूर होत होता.

नैतिकतेची कल्पना त्या देशात शिथिल आहे स्त्री-पुरुष संबंध खुला आहे बहुपत्नीकत्व आहे पाश्चात्यातील अशा लैंगिक स्वातंत्र्याला मान्यता आहे पण दोन्ही

बाजूच्या होकाराने बलात्कार. त्यानाही चीड आली

मला बोलता येत नव्हत त्याना स्पष्ट बोलता येत नव्हते, पण त्याची सहानुभूती मला समजत होती तीन-चार तास उलटून गेले सकाळचे सात वाजले आम्ही एअरपोर्ट सोडून शहरात जायचे ठरवले कारण रहदारी सुरू झाली होती पाश्चात्त्य लेगॉसमध्येही रात्री टॅक्सीने प्रवास करणे धोकादायक होते ही मुलेही लेगॉसचीच ही वाढली तिथेच शिक्षणही झाले परदेशी उच्च शिक्षण घेत होते पण रात्री साडेबारा-नंतर टॅक्सीने दोघाना शहरात जायचे धैर्य नव्हते हे त्यानी मला स्पष्ट सांगितले व मी एअरपोर्ट सोडला नाही, याबद्दल मी योग्यच निर्णय घेतल्याचे सांगितले. आम्ही एअरपोर्टच्या बाहेर आलो एकही टॅक्सीवाला आम्हाला घेऊन जाण्यास तयार होईना त्यातलेच काही टॅक्सीवाले रात्रीच्या अतिप्रसंगी हजर होते असे वाटले. नाहीतर काय करणार होते ? मी पैसे देणार होते त्यानी मला योग्य ठिकाणी पोचवायच होत त्या मुलानाही पेच्र पडला पोलिस तक्रारीला नायजेरियात अर्थ नाही हे मला रात्रीच त्या दोघानी सांगितल होतं त्याची नाव मी विचारली नाहीत त्यानी माझे नाव विचारले नाही दोन अनामिक तरुण माझ्यासाठी घरी जायचे खोळवले होते मला एकटीला एअरपोर्टवर सोडून जायला तयार नव्हते माझ्यापाशी लेगॉसमधला एकही पत्ता धड नव्हता ऑफिसचा होता पण ती सकाळी दहाला उघडतात आता तर सात वाजले होते थकवा आणि फक्त थकवा होता मला आसरा हवा होता

एक प्रायव्हेट टॅक्सीवाला यायला तयार झाला एन् पी इंडस्ट्री इलुपेज एवढाच पत्ता आम्ही शोधत निघालो इलुपेजले-गॉसचे उपनगर प्रामुख्याने भारतीय वस्ती असलेले कसे फिरलो ते आता आठवत नाही पण तासाभराने कंपनीसमोर येऊन उभे राहिलो आता त्या दोघानी सर्व जबाबदारी स्वीकारल्याने ‘ हसा ’ या त्यांच्या बोलीभाषेत त्यानी पूछताछ सुरू केली माझा तर त्याच्यावर पूर्ण भरवसा होता पण एक क्षण असा येऊन गेला होता, ‘ विश्वास कसा ठेवावा त्याच्यावर ’ या विचाराचा एअरपोर्टवर ते म्हणाले होते, ‘तुमचा पत्ता नाही सापडला तर आम्ही तुम्हाला इंडियन ॲम्बॅसीत पोचवू ’ माझ्याजवळचे पत्ते अपुरे होते मी त्याना भारतीय दूतावासाचा पत्ता विचारला एकाला माहीत होता कारण तो भारतात शिकायला येणार होता त्याने त्याच्या डायरीतून बघून सांगितला मी मनात नोंदवला थोड्या वेळाने टॉयलेटला जाण्याच्या बहाण्याने मी उठले आत गेले व पर्समधला भारतीय दूतावासाचा लेगॉसमधला पत्ता काढून वाचला दिल्ली सोडताना असू दे जवळ म्हणून डॉक्टरानी दिला होता. दोन्ही पत्ते एकच होते

रखवालदाराने सांगितले आम्हाला पाटील कोण म्हणता ते माहीत नाही पण याच कंपनीत काम करणाऱ्या एका भारतीयाकडे आम्ही तुम्हाला पोचवतो ते जवळ राहतात फॅक्टरीतला एक माणूस आमच्याबरोबर घेऊन आम्ही निघालो पुन्हा



६८१
मु-प्रवक २४०९३
३१/१२/०३

गल्ल्याबोळ पार करत आम्ही एका घरासमोर आलो आता मी पुढे होऊन दारा-वरची बेल वाजवली एका स्त्रीने दार उघडले जी माझ्या वर्णाची देशाची

मी भराभर राष्ट्रभाषा हिंदीत बोलले माझं पूर्ण ऐकून घेण्याआधीच ती म्हणाली, आओ बेन, अभी कुछ चिंता मत करो – सब बादमें सुनेंगे। पहले अंदर घरमें आ जाइए। ”

टॅक्सीवाल्याचे पैसे पाच नायराला भारतीय किंमतीत सुमारे पासष्ट रुपये होतात तेही तिनेच दिले त्या दोघानी सामान आत आणून ठेवलं आभार मानणं अतिशय औपचारिकपणाच होत पण दुसरे शब्द नव्हते मी त्याना सांगितलं, 'माझा मुलगा–मुलगी तुमच्याच वयाचे आहेत म्हणून.' 'I do not give you thanks–I bless you like your mother.' बायबाय करून ती मुले निघून गेली आणि मी घरात शिरले

पटेलाच्या–पाटलाच्या ऐवजी पटेल. पाटील अर्थ पाहता एकच फरक आपल्या देशात जाणवतो परदेशात नाही हे गुजराथी, मी मराठी हा भाव उरत नाही 'भारतीय' हे एकच भारतीय म्हणजे भारतीयच मिस्टर पटेलही उठले. ते पाटलाना ओळखत होते त्याच्या फॅक्टरीमध्ये ते काम करीत आणि पाटील–पटेलचा घोटाळा सर्वच परदेशी लोक करत. मला पाटलाइतकेच पटेल जवळचे वाटले मिसेस पटेलने गरम चहा दिला ब्रेकफास्ट केला कडाडलेली भूकतहान हरपली होती मी खाण सोडून रात्री एअरपोर्टवर अडकले होते, हे सांगत होते दोघेही भयचकित होऊन ऐकत होते तरी सर्व खरं काहीच सांगत नव्हते– पण रात्रभर एकटीने बसणे तर सोडूनच द्या मग त्यानी मला लेगॉसमध्ये होणाऱ्या रॉबरीचे किस्से सांगितले युद्धस्य वार्ता रम्या, सैनिकालाही वाटतात का? मला काय वाटावे? थोड्या वेळाने श्री. पटेल पाटलाना कळवायला गेले, आणि मी आंघोळीला रात्रीची सर्व घाण धुऊन काढण्यासाठी प्रत्यक्षात अत्याचार घडला नव्हताच. पण मनावर त्याचं जे प्रतिबिंब उमटल होत, ते घालवायचं होत मानसिक बलात्कार पुसून टाकायचा होता ते भुकलेल्या लांडग्याचे डोळे विसरायचे होते बोंगावणारं वार विसरायच होत. सगळच विसरायच होतं अंघोळीबरोबर मनातले विचार खूपच स्थिरावले खचून गेलेल्या मनाने मी आता याना भेटणार नव्हते तर धैर्याने प्रसंगातून पार पडल्याने तावून सुलाखून–सोन्याप्रमाणे आता विश्वासाने पाटील आले मला आणखी थोडे हायसे वाटले हे लेगॉसला येत तेव्हा नेहमी पाटलाकडेच उतरत नात्याचे बंध नात्यानेच चिकटतात, असे म्हणे म्हणून पाटलाची वहिनी ही एक मला खऱ्या दिराइतकच अगत्याच्या प्रेमाची वाटली जातपात यात येत नाहीत कदाचित ही संस्कृतता असावी काहीही असो पाटील यांचे लेगॉसमधले निकटचे स्नेही. आता मी निश्चिंत झाले फक्त याना आता कळवायचे होते मी आणि पाटील दोघेही निघालो– याच्या शोधावर

ज्या पत्त्यावर मी तीन आठवड्यापूर्वी साधारण या सुमारास येत असल्याचे तारेने कळवले होते लेगॉसपासून हे नऊशे किलोमीटर दूर राहात त्यामुळे या ऑफिसातून रेडिओ मेसेजने त्याना निरोप द्यायला सांगितला होता सर्व डीटेल्स कळवूनही हे का आले नाहीत ? आम्ही ऑफिसात गेलो एक भारतीय मॅनेजर होता मी समोर उभी राहून म्हटलं, मीनाला असलेल्या श्री गोखल्यांची मी मिसेस ' आणि तो चपापून खुर्चीतल्या खुर्चीत दोन फूट उडल्यासारखा झाला क्षणभर गोंधळलाच इतकं माझं येणं अनपेक्षित होतं ? म्हणजे मी पाठवलेल्या तारेचं काय ? तार पोचली नव्हती म्हणजे मी येणार हे याना कळलं नव्हतं आता आलेय हे तातडीने कळवणे आवश्यक होते मीनाला रेडिओ–मेसेज दिला

' Gokhale left from Meena to Legos on Saturday over. जबाब आला 'अरेच्या! गोखले लेगॉसला आलेत, मग उतरलेत कुठे? माझ्याशिवाय दुसरीकडे ते कुठे उतरत नाहीत पाटील उद्गारले आज मंगळवार उजाडला होता एवढ्या अवधीत हे पाटलाना भेटले नसणार हे कसं शक्य आहे ? परक्या देशात गेल्यानंतर पाटलाच्या मिसेसनीच त्याना दहीभात आग्रहाने खाऊ घातला होता त्याच्या राणीचे हे काका बनले होते त्याच्या राणीचे हे अंकल बनले होते त्याच्या मोठ्या ब्लॉकमधील एक खोली गेले दीड वर्षं गोखले अंकलसाठी राखून ठेवलेली होती दर तीन महिन्यानंतर भारतात येताना, भारतातून जाताना लेगॉसमध्ये कुठल्यातरी कामासाठी आल्यावर हे पाटलाकडे उतरत. माझा पत्रव्यवहारही c/o पाटील असा असे मग हे कुठे गेले ? तो भारतीय मॅनेजर म्हणाला, ' बारमधून येताना त्याना ॲक्सिडेंट तर झाला नसेल ? ' नुकताच असा एका भारतीयाला अपघात झाला होता नायजेरियात रोडवरचे ॲक्सिडेंट कॉमन आता आणखी काही ऐकून घेण्याची माझी ताकद नव्हती पाटील म्हणाले, 'आम्ही त्याना कुठं शोधावं?' त्यानी एक दोन ठिकाणे, हॉटेल्स याची नावे सांगितली आमच्याबरोबर तोही निघाला इकोई हॉटेल-गोखले नावाचे कोणी गृहस्थ आलेले नाहीत.. फेडरल पॅलेस–No any gentleman named Gokhale. बोनी कॅंप–मिलिटरी ऑफिस पत्ता नव्हता आता मी याना कुठे शोधू ?

कारमधून मी व पाटील परत येत होतो पाटील म्हणाले, ' मी रविवारी राणीला मुंबईला फोन केला होता तिचा बर्थडे म्हणून सरप्राईज. या नायजेरियात काही काही खरंच सरप्राईज वाटण्यासारखं लेगॉसमधून लेगॉसमध्ये फोन लागत नाही इतकं हे टेलिफोन खातं कार्यक्षम आहे पण सॅटलाईटवरनं नेटवरून भारतात अर्ध्या तासात फोन लागतो विषय म्हणून आम्ही काहीतरी बोलायचं म्हणून बोलत होतो हे नॅशनल थिएटर, हा अमूक भाग, मधून मधून पाटील लेगॉसची माहिती सांगत होते आणि हे नेट सर्व्हिस इथूनच मी राणीला फोन केला मी एकदम त्याना म्हटलं, पाटील, गाडी थांबवा आपण इथून फोन करूयात भारतात करू शकते मी ? ' हो, काहीच

गल्ल्याबोळ पार करत आम्ही एका घरासमोर आलो आता मी पुढे होऊन दारावरची बेल वाजवली एका स्त्रीने दार उघडले जी माझ्या वर्णाची देशाची

मी भराभर राष्ट्रभाषा हिंदीत बोलले माझं पूर्ण ऐकून घेण्याआधीच ती म्हणाली, आओ बेन, अभी कुछ चिंता मत करो – सब बादमे सुनेंगे । पहले अंदर घरमें आ जाइए । ”

टॅक्सीवाल्याचे पैसे पाच नायराला भारतीय किंमतीत सुमारे पासष्ट रुपये होतात तेही तिनेच दिले त्या दोघानी सामान आत आणून ठेवल आभार मानण अतिशय औपचारिकपणाच होत पण दुसरे शब्द नव्हते मी त्याना सागितल, ‘माझा मुलगा–मुलगी तुमच्याच वयाचे आहेत म्हणून ’ ‘ I do not give you thanks–I bless you like your mother ’ बायबाय करून ती मुले निघून गेली आणि मी घरात शिरले

पटेलाच्या–पाटलाच्या ऐवजी पटेल पाटील. अर्थ पाहता एकच फरक आपल्या देशात जाणवतो परदेशात नाही हे गुजराथी, मी मराठी हा भाव उरत नाही भारतीय ’ हे एकच भारतीय म्हणजे भारतीयच मिस्टर पटेलही उठले ते पाटलाना ओळखत होते त्याच्या फॅक्टरीमध्ये ते काम करीत आणि पाटील–पटेलचा घोटाळा सर्वच परदेशी लोक करत मला पाटलाइतकेच पटेल जवळचे वाटले मिसेस पटेलने गरम चहा दिला ब्रेकफास्ट केला कडाडलेली भूकतहान हरपली होती मी खाणं सोडून रात्री एअरपोर्टवर अडकले होते, हे सागत होते दोघेही भयचकित होऊन ऐकत होते तरी सर्व खर काहीच सागत नव्हते– पण रात्रभर एकटीने बसणे तर सोडूनच द्या मग त्यानी मला लेगॉसमध्ये होणाऱ्या रॉबरीचे किस्से सागितले युद्धस्य वार्ता रम्या, सैनिकालाही वाटतात का ? मला काय वाटावे ? थोड्या वेळाने श्री. पटेल पाटलाना कळवायला गेले, आणि मी आघोळीला रात्रीची सर्व घाण धुऊन काढण्यासाठी प्रत्यक्षात अत्याचार घडला नव्हताच पण मनावर त्याचं जे प्रतिबिंब उमटल होतं, ते घालवायच होत मानसिक बलात्कार पुसून टाकायचा होता ते भुकेलेल्या लाडग्याचे डोळे विसरायचे होते घोंगावणारं वार विसरायच होत सगळच विसरायच होत अघोळीबरोबर मनातले विचार खूपच स्थिरावले खचून गेलेल्या मनाने मी आता याना भेटणार नव्हते तर धैर्याने प्रसंगातून पार पडल्याने तावून सुलाखून–सोन्याप्रमाणे आता विश्वासाने पाटील आले मला आणखी थोडे हायसे वाटले हे लेगॉसला येत तेव्हा नेहमी पाटलाकडेच उतरत नात्याचे बंध नात्यानेच चिकटतात, असे म्हणे म्हणून पाटलाची वहिनी ही एक मला खऱ्या दिराइतकच अगत्याच्या प्रेमाची वाटली जातपात यात येत नाहीत कदाचित ही संस्कृतता असावी काहीही असो पाटील याचे लेगॉसमधले निकटचे स्नेही आता मी निश्चित झाले फक्त याना आता कळवायचे होते मी आणि पाटील दोघेही निघालो– याच्या शोधावर

ज्या पत्त्यावर मी तीन आठवड्यापूर्वी साधारण या सुमारास येत असल्याचे तारेने कळवले होते लेगॉसपासून हे नऊशे किलोमीटर दूर राहात त्यामुळे या ऑफिसातून रेडिओ मेसेजने त्याना निरोप द्यायला सांगितला होता सर्व डीटेल्स कळवूनही हे का आले नाहीत ? आम्ही ऑफिसात गेलो एक भारतीय मॅनेजर होता मी समोर उभी राहून म्हटल, 'मीनाला असलेल्या श्री गोखल्याची मी मिसेस' आणि तो चपापून खुर्चीतल्या खुर्चीत दोन फूट उडल्यासारखा झाला क्षणभर गोंधळलाच. इतकं माझ येणं अनपेक्षित होत ? म्हणजे मी पाठवलेल्या तारेच काय ? तार पोचली नव्हती म्हणजे मी येणार हे याना कळल नव्हतं आता आलेय हे तातडीने कळवणे आवश्यक होते मीनाला रेडिओ–मेसेज दिला

'Gokhale left from Meena to Legos on Saturday over. जबाव आला 'अरेच्या! गोखले लेगॉसला आलेत, मग उतरलेत कुठे? माझ्याशिवाय दुसरीकडे ते कुठे उतरत नाहीत ' पाटील उद्‌गारले आज मंगळवार उजाडला होता एवढ्या अवधीत हे पाटलाना भेटले नसणार हे कस शक्य आहे ? परक्या देशात गेल्यानंतर पाटलाच्या मिसेसनीच त्याना दहीभात आग्रहाने खाऊ घातला होता. त्याच्या राणीचे हे काका बनले होते त्याच्या राणीचे हे अकल बनले होते त्याच्या मोठ्या ब्लॉकमधील एक खोली गेले दीड वर्ष गोखले अकलसाठी राखून ठेवलेली होती दर तीन महिन्या-नतर भारतात येताना, भारतातून जाताना लेगॉसमध्ये कुठल्यातरी कामासाठी आल्यावर हे पाटलाकडे उतरत माझा पत्रव्यवहारही c/o पाटील असा असे मग हे कुठे गेले ! तो भारतीय मॅनेजर म्हणाला 'बारमधून येताना त्याना ॲक्सिडेंट तर झाला नसेल ?' नुकताच असा एका भारतीयाला अपघात झाला होता नायजेरियात रोडवरचे ॲक्सिडेंट कॉमन आता आणखी काही ऐकून घेण्याची माझी ताकद नव्हती पाटील म्हणाले, 'आम्ही त्याना कुठ शोधाव?' त्यानी एक दोन ठिकाणे, हॉटेल्स याची नावे सांगितली आमच्याबरोबर तोही निघाला इकोई हॉटेल-गोखले नावाचे कोणी गृहस्थ आलेले नाहीत. फेडरल पॅलेस–No any gentleman named Gokhale. बोनी कॅंप–मिलिटरी ऑफिस पत्ता नव्हता आता मी याना कुठे शोधू ?

कारमधून मी व पाटील परत येत होतो पाटील म्हणाले, 'मी रविवारी राणीला मुंबईला फोन केला होता तिचा बर्थडे म्हणून सरप्राईज या नायजेरियात काही काही खरंच सरप्राईज वाटण्यासारख लेगॉसमधून लेगॉसमध्ये फोन लागत नाही इतकं हे टेलिफोन खात कार्यक्षम आहे पण सॅटलाईटवरन नेटवरुन भारतात अर्ध्या तासात फोन लागतो विषय म्हणून आम्ही काहीतरी बोलायच म्हणून बोलत होतो हे नॅशनल थिएटर, हा अमूक भाग, मधून मधून पाटील लेगॉसची माहिती सांगत होते. आणि हे नेट सर्व्हिस इथूनच मी राणीला फोन केला मी एकदम त्याना म्हटलं, 'पाटील, गाडी थांबवा आपण इथून फोन करूयात भारतात करू शकते मी ?' 'हो, काहीच

हरकत नाही खर्च ते करणार वगैरे सवाल क्षुल्लक होते मला दिलासा मिळणं हे पटेलांना जास्त महत्त्वाचं वाटत होतं आम्ही कॉल बुक केला. दुपारी साडेअकरा वाजता भारतात चार वाजले असतील मुंबईच्या कॉलला वेळ लागणार होता आणि अविनाशलाही काळजीत पाडायचं नव्हतं जावई असला तरी पोरच नाही का ? बाबा अजून आईला भेटले नाहीत. आईच काय या काळजीत मुलं हैराण होतील एकच नाव आठवलं आणि मी दिल्लीला फोन जोडला पधरा मिनिटांत फोन लागला प्रथम माई बोलल्या मग डॉक्टर. 'मी सुखरूप आहे' सर्व प्रश्नांना माझं एकच उत्तर होतं आणि ते खरंच नव्हतं का ? आता फक्त यांची भेट व्हायची होती

फोन ठेवला आणि मला गरगरू लागले स्वत:च्या प्रकृतीचा भरवसा वाटेना. त्यांच्याविषयी वेडावाकडा विचार करवेना सर्व ताण असह्य झाला आता मला हेच धीर देऊ शकणार होते आणि त्यांची भेट नव्हती ते कुठे आहेत ? माहीत नव्हते दोघही लेगॉमध्येच होतो मला अनिवार रडू कोसळले ओक्साबोक्शी मी रडत होते किती वेळ रडणार ? रडून काय होणार ? सगळेजण टकमका बघत होते आता मात्र हवी होती झोप सर्व मानसिक ताण विसरायला प्रयासाने मन काबूत आणले अतर्मनाला खात्री होती हे सुखरूप आहेत अगदी पूर्ण सुखरूप आहेत विश्वास नसलेल्या देवाची मी प्रार्थना केली यांच्यासाठी आम्ही परत पटेलांच्याकडे आलो. मिसेस पाटील भारतात असल्यामुळे ते बॅचलर क्वार्टरमध्ये राहात होते मोठा ब्लॉक बंद होता मिसेस पटेलांनी जेवायला वाढल कुणीच यांचा विषय काढला नाही सर्वजण गृहीत धरून होते यांना निरोप पोहोचलाय आणि हे उद्या मला न्यायला येणार आहेत फक्त थोडा वेळ थांबायला हवे आणखी मी भरपेट जेवले, इतके कधीच जेवत नाही इतकी जेवले. मनाच्या सर्व संवेदना जणू बोथट झाल्या होत्या आणि उरली होती फक्त भूक किती वर्षांची उपाशी असल्यासारखी राक्षसी भूक सर्वजण अचंबा करत होते मी मन लावून जेवत होते अशी भूक का ? खरं म्हणजे काळजीने मला जेवण नकोसं व्हायला हवं होत माझ्या पोटात तर साऱ्या विश्वाला खाऊन टाकणारी भूक पेटली होती. फणफणून ताप भरला होता ठणका, वेदना जाणवत होत्या पोट असं गच्च भरल्या-वर आपसूक अंथरुणावर आडवी झाले मिसेस पटेलने मुकामार बसलेल्या जागी बाम लावला एअरकंडिशनर चालू केला गार हवा, अगदी गार गार हवा कधी झोप लागली समजलेच नाही आईनंतर कुशीत घेते ती झोपच सर्व दु:ख, वेदना, थकवा, मानसिक ताण विसरायला लावणारी झोप

कोणीतरी मला हलवून उठवत होते छे ! उठावे वाटतच नव्हते आणखी झोपा-यला हवे कित्येक वर्षांत मला झोप मिळाली नाही किती दिवसांनी झोपले होते मी मला आसरा मिळाला होता मी सुरक्षित होते सर्व प्रसंगातून पार पडले होते त्या श्रमाचा परिहार होणारी झोप ! मला अजूनही झोपायचे होते पण कानावर आवाज

ओळखीचा पडला ज्या आवाजाची मी जणू युगानुयुगे वाट पाहिली तो याचा आवाज ! सुखरूप असलेल्या याचा आवाज ! मला आधार वाटणारा आवाज ! हे मला हलवून उठवत होते दुसऱ्या क्षणी सारी झोप उडाली मी पाह्यले. हे उभे होते मी पाहात राह्यले दुसरं काहीच सुचेना मनात मात्र येऊन गेलं बेडवरून उठून त्याच्या कुशीत शिराव. पण कृती घडली नाही आम्ही दोघेही स्तंभित होऊन उभेच राहिलो. दोघानाही धक्का इतका बसला होता की काही सुचतच नव्हते आणि मी भानावर आले भरून येणारे डोळे पुसून म्हटले, तुम्ही कधी आलात ? तुम्हाला कसे कळले ? हे पण भानावर आले एकमेकाची चौकशी केली श्री. व सौ पटेलाचा निरोप घेऊन आम्ही निघालो माझ्या सामान-सुमानासह हे ज्या मित्राकडे उतरले होते तिथे ह्या वेळी प्रथमच हे पाटलाकडे उतरले नव्हते. पाटलानी पहिला मोठा ब्लॉक बदलला म्हणून सौ पाटील भारतात होत्या म्हणून च ह्याना तो मित्र ब्रिज खेळणारा निघाला म्हणून, ब्रिज खेळण्यासाठी कारण हे उत्कृष्ट ब्रिजपटू आहेत मी याना घडलेला प्रसग काहीच सागितला नाही सागितले फक्त मी एअरपोर्टवर एकटीच बसून होते थोडाफार त्रास झाला विमान अपघातात सापडले होते पेपरमध्ये न्यूज आली होतीच. आणखी काही सागण्याची ती वेळ नव्हतीच मला सागता येत नव्हते शब्द गोठून गेले होते. सर्व प्रसंग टळून गेल्यावर त्यातली भयानकता भेडसावत होती शब्दाला गिळत होती मूकपणे मनात घुसमटत मी सहन करत राह्यले. जर मी उडी टाकली असती तर माझा मागमूसही कोणाला लागला नसता. ना माझ्या सामानसुमानाचा, ना माझ्या शरीराच्या तुकड्याचा अपघातापेक्षाही हे मरण भयंकर होतं आठवणीनेही रात्रीची झोप उडत होती, दिवसाची भूक मरत होती दोन दिवस त्या मित्राकडे राहून आम्ही हॉटेलात राह्यला गेलो हॉटेल 'इकोई '

नतरचे आठ दिवस हिंडणे, खरेदी, इकडच्या हकीकती सागणे यातच गेले सर्वच लेगॉसच्या मडळींना माझे एकटीने येणे, रात्र काढले धक्कादायक व धाडसी वाटत होते विमान अपघातही. योगायोग म्हणजे ज्या नेटमधून दिल्लीला फोन केला तिथूनच त्या दिवशी मगळवारी सकाळी आठ वाजता हे मुबईला मुलाना फोन करायचा प्रयत्न करत होते दोन तास थाबूनही फोन लागला नाही, म्हणून हे परत फिरले होते याना विचारायचे होते मी येणार आहे की नाही ? केव्हा येणार आहे ? की यानीच भारतात यावे ? शुक्रवारी मी दिल्ली सोडली तेव्हाच डॉक्टरानी फोन करून माझ्या जावयाला कळवले होते मी निघालेय रविवारी सकाळी लेगॉसला पोचणार आहे अशी तार ह्याना व पाटील नावाच्या याच्या मित्रालापण केलीय मंगळवारी लेगॉसहून मी डॉक्टराना फोन केल्यावर त्यानी परत मुलाना मुंबईला कळवले होते अशात याचा फोन लागला असता तर ? मुलाचे काळजीने काय झाले असते ? त्यानी खरे काय समजायचे ? तिघेही जण किती गोंधळले असते. त्यातून माझी मुलगी नाजूक अवस्थेत आई होऊ

घातलेली ह्याचा मुंबईला फोन लागला नाही हे किती चागले झाले.

मी लेगॉसला पोचले आणि दोन दिवसानी दिवाळी सुरू झाली लेगॉसला असलेल्या भारतीयाचा दिवाळी मेळा असतो त्याला थाबून काही मडळींना भेटून मग लेगॉस सोडायचे ठरवले लेगॉसला आल्यानतर मला वाटले होते मी कुठे जगलात येऊन पडले मुबई--त्यातून विलेपार्ले म्हणजे महाराष्ट्रातील मुबईचे पुणे तिथून मी या सर्वस्वी परकी भाषा, परका देश, परका वर्ण, असलेल्या देशात आले पण जेव्हा दिवाळी मेळ्यासाठी गेलो त्या वेळी हे ओळख करून द्यायला लागले हे औधकर, हे आपटे, हे वर्वे बधू , हे वाटवे, हे कर्डिले इत्यादी इत्यादी बघता बघता भारतीयामध्ये मराठी भाषिकाचा एक वेगळा ग्रुप झाला श्रीमत सिंधी--ज्याच्या हातात बराचसा बिझिनेस आहे ते या गोष्टी-पासून दूर असत स्टेजवर जास्त संख्येने लेगॉसला असलेल्या दक्षिण भारतीयाचा कार्यक्रम चालू होता स्वतःच्या उपजत गुणाप्रमाणे एकमेकाला धरून राहण्याची, स्वभाषिकाना मदत करण्याची प्रवृत्ती कार्यक्रमामधून दिसून येत होती जल्लोषपूर्ण उत्साही भागडा त्या खालोखाल नंबर लावून होता आगळे वैशिष्ट्य म्हणजे गुर्जर-समाज इथे व्यापारी नसून उच्चपदस्थ नोकरीत स्थिरावलेला आहे एकेकाळी आफ्रिका म्हणजे गुजराती लोकाची व्यापारउदिमाची मोठी पेठ म्हटली जात असे नैरोबीसारखा व्यापार या लोकाच्या हाती दिसला नाही याला कदाचित सरकारी धोरणही कारणी-भूत असेल. गरबाही स्टेजवर दिमाखात पेश झाला मराठी भाषिक मडळी मात्र इथतिथं उभी राहून गप्पाचाच कार्यक्रम पार पाडत होती एकमेकाना भेटत होती स्टेजवर फुगडी, झिम्मा, कोळीगीत काहीच नव्हत. काय हरकत होती ? आणि या गप्पाच्या ग्रुपमधूनच कळल, खुद्द लेगॉस शहरात नव्वद एक मराठी कुटुबे आहेत. काही तर दहा वर्षाहून अधिक राहिलेले.

त्यापैकीच एक काका पराजपे दुसरे दिवशी त्याच्याकडचे जेवणाचे आमत्रण घेऊनच मेळ्यातून बाहेर पडलो पराजपे दापत्य लेगॉसमधील मंडळींचे सार्वजनिक काका-काकू आहेत प्रत्येक गुरुवारी काकाचे घर म्हणजे फोर्ड व खरेखुरे बॅचलर याचे एक दिवसाचे घर असते हा अलिखित नियम आहे सर्वजण तो पाळतात गुरुवारी संध्याकाळी साडेसातपर्यंत काकू स्वयपाक करत नाहीत मग वीज असो वा नसो या लेगॉसची एक गमत म्हणजे केव्हाही दिवे जातात आम्ही काकाकडे गेलो त्या दिवशीही गेले होतेच काका मग पेट्रोमॅक्स लावतात काकू मेणबत्तीच्या प्रकाशातही स्वयपाकाला लागतात गुरुवारी काकाकडे जी मडळी येतील त्यानी रात्री तिथेच जेवायचे. मग ती खिचडी असो वा पिठल भात सर्वांची एकच अंगतपंगत त्यात नवीन लग्न होऊन आलेली एखादी काकूकडे सासारिक अडचणी विचारते. पावडरच्या दुधाचे दही कसे विरजायचे तर पोळ्यासाठी कणिक कुठे मिळेल असही

लेगॉसमधील बऱ्याच मडळींना सगीताचा शौक आहे भारतातील प्रियजनाच्या

आठवणी संगीतामुळे कदाचित जास्त पालवत असतील मग ते मुकेशचं दिल जलता है असो अथवा परदेशात अरुण दाते यानी माडलेला भातुकलीचा डाव असो. त्या गुरुवारी सगळ्याना फक्त एकच कळल की मला एअरपोर्टवर रात्र एकटीने काढावी लागली जास्त काही सागण्याचा धीर होत नव्हता तेथील मराठी मडळी स्वभावाने कशी आहेत याची ओळख झाली नव्हती अजून मला तिथ राहायचं होत कमकुवत भित्रं मन म्हणूनही असेल कदाचित विषय निघाला की मी गप्प व्हायची

जमलेल्या मंडळींपैकी एकजण म्हणाले, तुम्ही एअर इडियाच्या फ्लाईटने का नाही आलात? ' फरक काय पडला असता? मी विचारले आणि कळले, दर रविवारी लेगॉसला एअर इडियाची फ्लाईट येते काका, वाटवे, आपटे, साठे, औधकर, कुणी ना कुणी तरी महाराष्ट्रीयन एअरपोर्टवर जातात फ्लाईट येते आलेल्याना न्यायला कुणीतरी असतच. शोधलीनेही कोणी येतात पण माझ्यासारखे क्वचित असतात. मग ती कधी लहान मुले असतात तर कधी कोणी स्त्री आपल्या मुलासह असते बाहेर आल्यावर ओळखीचा चेहरा न दिसल्यास तीही त्रावरून जातात पण सभोवार फक्त काळा समुद्र नसतो. असा चुकलेला प्रवासी दिसताच ही मडळी पुढे धावतात जसे काही त्याचेच पाहुणे आहेत त्याना सर्व मदत करतात. त्याच्या नातेवाइकाकडे पोचवतात एकदा दोन छोटी मुले सुट्टीसाठी भारतातून आली आई बाबा त्याना न्यायला आले नव्हते. एअर इडियाची होस्टेस त्याना घेऊन काळजी करीत उभी होती रिवाजाप्रमाणे श्री. वाटवे त्या दिवशी गेले होते त्यानी ती दोन्ही मुले ताब्यात घेतली. एका कुटुबात त्याना ठेवले. नायजेरियातील एका छोट्या खेड्यात त्याचे आईवडील राहात होते त्याच्याशी सपर्क साधून मुले आपल्या घरी जाईपर्यंत एका अनोळखी आटी अकलचा पाहुणचार घेत होती ही मदत फक्त मलाच मिळू शकली नाही परन्तु काही मडळी असे सेवाभावी मदतीचे काम करत आहेत, हा दिलासाच मोठा होता

भारतात राहून मी याच्या पत्राची वाट पाहायची पत्रे कधी अगदी वेळेवर यायची विशेषतः भारतीय पोस्टेज लावून कोणाला भारतात आल्यावर पोस्ट करायला सांगितलेली त्या दिवशी श्री साठे सगळ्याची पत्रे गोळा करीत होते अशी पत्रे गोळा करून एअर इडियाच्या मुबईला जाणाऱ्या फ्लाईटबरोबर भारतीय प्रवाशाकडे द्यायची अथवा ओळखीचे कोणी भारतात जाणारे असेल त्याच्याकडे द्यायची नाही कुणीच म्हणत नाही हे भारतात दर चार महिन्यानी येत तेव्हा पुष्कळ पत्रे घेऊन येत. आणि त्याम घरात ' मिनीपोस्ट उघडत असे पोस्टेज नसल्यास लावणे, कमी असल्यास लावणे इत्यादी करे याचे रहस्य मी जेव्हा श्री साठे याचेजवळ पाठवण्यासाठी भाराभर पत्रे लिहून दिली तेव्हा कळले

परदेशात एकमेकाना अशी मदत केली जातेच फक्त आपल्याला इथे राहून ठाऊक नसत

दिवाळी मेळा आला याच्या ओळखीच्या एका नायजेरियन गृहस्थाकडे ड्रिंक घ्यायला जाऊन आलो कितीतरी नायजेरियन भेटत होते अतिशय सभ्यतेने, नम्रतेने वागत होते रस्त्यात जाताना, डिपार्टमेंटल स्टोअरमधून हिंडताना कोणीही धक्के मारीत नसे जे इथे मुंबईत सतत बसतात कोणीही अचकटविचकट बोलत नसे, जे मुंबईस सर्रास चाले परदेशी स्त्री म्हणून कोणी वाकड्या नजरेने पाहत नाही आमचा ड्रायव्हर अब्दुल्ला इतका सभ्य सज्जन, वागण्याचे मॅनर्स, हसतमुख आणि आर्जवीही त्या रात्री एअरपोर्टवर घडेलेले जणू दुःस्वप्न होते काळे भयाण स्वप्न मी हळूहळू इथल्या लोकाकडे चागल्या मनाने पाहू लागले सर्वांचेच मन काही काळे नाही मनातला तिरस्कार वितळू लागला भीती मावळू लागली या सर्व परिवर्तनाची सुरुवात त्या दोन नायजेरियन तरुणानी केली होती

आता लेगॉस सोडायचे होते बरेचसे शहर पाहूनही झाले होते परतु लेगॉस शहरात तसे पाहण्यासारखे काहीच नाही विशेषत. रोम पाहल्यानतर तर नाहीच नाही ना ऐतिहासिक वास्तू ना मॉडर्न शिल्प, ना देखणा मनमोहक निसर्ग रूक्ष उन्हाळा. रखरखीत हवा पुन्हा एअरपोर्टवरच्या प्रसंगाने माझ्यावर आलेले दडपणही होतेच याचे एक मित्र नुकतेच मिसेससह लेगॉसला आले होते भारतातील सुट्टी सपवून एके दिवशी संध्याकाळी आम्ही गप्पा मारत असताना मी दिल्लीला हायकमिशनर ऑफिसमध्ये घडलेला प्रसंग सागितला त्याच्या मिसेसही व्हिसासाठी दिल्लीला एकट्याच गेलेल्या होत्या मला त्याचा अनुभव ऐकायचा होता, ज्या अर्थी मला असं सुचवल जात होत त्याअर्थी आधीही कोणाला हा अनुभव आलेला असणारच आणि कोणीतरी मान्यताही दिलेली असणारच म्हणूनच मी मिसेस ×××× ना घडलेला प्रसंग थोडक्यात सागितला प्रथम त्या फारसं बोलायला उत्सुक दिसेनात आणि तसं पाहता त्याचं बरोबर होत कोणती स्त्री स्वत हून सागेल की माझ्यावर अतिप्रसगाची वेळ आली होती अत्याचाराची वेळ आली होती उलट ह्या घटना दडपल्याच जातात. समाजाच्या भयाने लोक काय म्हणतील या भीतीने नातीगोती, शेजारीपाजारी, स्नेहीसोबती सर्वांचीच दृष्टी आपल्याकडे पाहताना बदलेल ह्या विचाराने गप्प बसले जाते कारण अशा स्त्रीला महारोग्यासारखे वागवले जाते तिचा दोष काहीच नसतो स्त्रीत्व हा का दोष मानायचा? पण केवळ तिच्या स्त्रीत्वापायी तिच्यावर बलात्कार होतो आणि माणसान शिवलेल्या पाखराला जस टोच्या मारल्या जातात तसेच तिला वागवले जाते तिचे भाडवल केले जाते समाजसेवकाकडून ते राजकारण्यापर्यंत सर्वांकडूनच मग ती स्त्री तोंड मिटून घेते शेवटपर्यंत माझ्या नातेवाइकानाही माझे हे आवडेल की नाही हे काळच ठरवेल.

मीही असेच करावे? स्पष्ट सागण्याचे धैर्य मला मिळेल का? आणि का सागायचे? असा प्रसग आल्यावर कोणी काही शिकवून सुटका होत नसते तिथे स्वत चे स्वतःच

निर्णय घ्यायचे असतात शारीरिक आणि आत्मिक बळावर प्रतिकार करायचा असतो हल्लीच्या जमान्यात शरीरसुख हे मनाच्या व देहाच्या पावित्र्यापेक्षा वरचढ झालेय. अशा परिस्थितीत काही स्पर्श हे कोणालाच खटकणार नाहीत भारतातही सहेतुक स्पर्श होत असतीलच. भारतीय पुरुषाकडूनच अशी मागणी होत असेल ती पुरव-लीही जात असेल तिथे माझा आक्रोश कोण ऐकणार ? पण तरीही मी जगाला सांगणार होते माझा मर्यादित समाज काय म्हणेल याची पर्वा न करता सांगणार होते. म्हणूनच मला खात्री करून घ्यायची होती मीच एकमेव बळी नाही याची पुढे कोणी सत्य नाकारले तरी माझे मन थोडेच नाकारणार होते ?

मिसेस ×××× फारसे सांगणार नाहीत ही खात्री असली तरी मी त्याना विचारले. अनपेक्षितपणे त्याचा होकार आला सावध होकार आला त्याना तिकीट देताना मला अधिकाऱ्याने थोडाफार तरी लघळपणा केला होताच जेवायला हॉटेलात बोलावले होते- चार–सहादा फोन करून जादा आपुलकी दाखवली होती बस्स् एवढेच त्यानी सांगितले मी समजायचे ते समजले

त्या जोडप्याबरोबरच दोन दिवस आम्ही लेगॉसमध्ये हिंडत होतो त्याच्याबरोबरच आम्ही लेगॉसचे सुप्रसिद्ध नॅशनल थिएटर पाहायला गेलो आशियातले हे सर्वांत मोठे थिएटर सहा हजार प्रेक्षक बसू शकणारे त्याचा आकार आहे नेव्हीच्या टोपीसारखा. अतिभव्य उत्तम उत्कृष्ट ध्वनियंत्रणा कोठेही बसले तरी ऐकायला, पाहायला सुख-कारक होईल असे आधुनिक तंत्रज्ञान आणि पैसा याची युती म्हणजे नॅशनल थिएटर. नायजेरियाचे वैभव म्हणता येईल असे प्रगत स्थापत्यशास्त्राचे स्वप्न साकार करणारे.

अपापा, इलुपेज, इकोई अशा लेगॉसच्या उपनगरातून जा ये करताना ते सतत दिसा-यचे आजूबाजूचे फ्लायओव्हर्स, हे थिएटर पाहताना प्रगत देशाचे चित्र मनावर उमटायचे. आपल्याकडेही नरिमन पॉईंटच्या इमारती पाहिल्या की धारावीची झोपडपट्टी दृष्टीआड होते तसेच इथेही व्हायचे म्हणूनच ह्यानी इंटरनॅशनल थिएटर पाहायचे का विचारताच मी लगेच होकार दिला नाहीतरी डिपार्टमेंटल स्टोअर, खरेदी यात मला फारसा रस नव्हताच संध्याकाळी सातच्या शोला आम्ही चौघे गेलो आधी थिएटर, त्याच्या भोवतालचे भव्य आवार भटकून आलो मेन हॉलमध्ये सिनेमा होता या अत्याधुनिक थिएटरमध्ये सिनेमा पाहायचा म्हणून मी अगदी खुषीत होते आम्ही चौघेही आत गेलो तसा सिनेमा हॉल मोकळाच होता रोज एवढे प्रेक्षक तरी येणार कुठून म्हणा लेगॉसमध्ये येताच पॉवरकटचा अनुभव आला होता. वीजकपात, तीही अशा विषुववृत्तावरच्या शहरात भयानक, महाभयंकर उन्हाळा जीव भाजून जाईल असा उकाडा याचा अनुभव घेतला होताच दिवसभर हिंडताना घेतच होतो सिनेमा पाहतानाचे दोन तासही थंडगार हवेत सुखात जाणार नव्हते कारण वीजकपातीमुळे थिएटरमध्ये एअरकंडिशनर चालू नव्हता. एअरकंडिशनरमुळे पडद्याची सोय

केलेली नव्हती पूर्वी या देशातले लोक पंखे, एअरकंडिशनर याशिवाय कसे राहात असतील ? अजूनही राहतातच लेगॉसमधे हिंडताना खास अशा झोपडपट्टीसारख्या वस्त्या दिसत होत्याच श्रीमंत व गरीब असे दोनच वर्ग प्रामुख्याने नोकरीवाल्यांना ऑफिसरच्या जागा सुसज्ज असायच्या पण आमच्या अब्दुल्ला ड्रायव्हरसारखे लोक कसे राहात असतील ? का जन्मच तिथला म्हणून आपापल्या देशाचे हवामान त्याना जड जात नसेल आम्ही मात्र हाशहुश करत सिनेमा पाहू लागलो

आधी नेहमीप्रमाणे जाहिराती सुरू झाल्या दोन-चार दिवसाच्या वास्तव्याने राष्ट्रीय पेयाची व त्याच्या जाहिरातीची टी व्ही वरून कल्पना आली होती तरीही थिएटरमध्ये बिअरची जाहिरात पाहताच माझ्या मनात भारतातली दारूबंदी आठवली बियर हे इथले राष्ट्रीय पेय दोन पाच वेगवेगळ्या कंपन्या बिअरची जाहिरात करत होत्या कुटुंबासमवेत घरचा पुरुष ऑफिसमधून आल्यावर बिअर घेत बसलाय. बायको ट्रे मधून फेसाळल्या बिअरचा मग हातात देत आहे हॅपी डेज आर म्हणत पिकनिकच्या बिअरची बाटली उघडली जातेय तरुण तरुणींचा ग्रुप 'सुझुकी' वरून जातोय तहान लागली की सर्व वाटेतल्या थांब्यावर थांबले थंडगार बिअर पिऊ लागलेत तहान शमवणारी बिअर उत्साहवर्धक बिअर मनात आले मोरारजींनी हे पाहिले तर काय वाटेल ?

कोकाकोला, स्प्राईट, गोल्डस्पॉट याच्याही जाहिराती होत्याच दिसली नाही चहाची जाहिरात इथे दोन-पाच दिवसातच दिसले, कोणाच्याही घरी गेले की पुरुषाना बिअर, स्त्रियाना स्वीट वाईन विचारतात कोकाकोला तर आहेच आहे अगदी भारतीयसुद्धा चार वाजता चहा विचारत नसत थंडगार कोक चांगला लागे मला. पण पट्टीच्या कॉफीबाज मला कॉफीची तलफ भागत नसे मग चहावाल्याची काय गत ? भारतात हे परवडणारे नाही कपभर चहाही इथे महागच पण पाहुणचारासाठी आवश्यक असतो तिथे दीड रुपयाचा कोका-कोला कसा परवडणार ? त्या मानान इथे कोकाकोला स्वस्त फक्त पधरा 'कोबो'स म्हणजे पधरा पैशाना एक कोकाकोला बाटली नायरा हे चलन शभर कोबो म्हणजे एक नायरा पाचशे नायरात थाटात राहता येते लेगॉस हे जगातले महाग शहर एक नायरा म्हणजे भारतातले तेरा रुपये सुरुवातीलाच ह्यानी सांगितले होते, एक नायरा म्हणजे तेरा रुपये हा हिशोब केलास तर सुखाने राहू शकणार नाहीस निमूटपणे ह्याचे ऐकले म्हणून पाच नायराचे तिकीट काढून सिनेमा पाहात होतो या पासष्ट रुपयात एक पोस्टमन तेलाचा चार किलोचा डबा येईल याचा विचार न करता

जाहिराती चालूच होत्या निडो दूध इथे पावडरचेच दूध ताजे नाहीच इथली कामधेनू किंवा मुंबईची आरे कॉलनी म्हणजे 'निडो' ही दुधाची पावडर बारीकशी अशी ही जाहिरात आली आणि गेली पुढे याच निडोवर माझी कॉफी बनणार होती

म्हणून लक्षपूर्वक पाहिली नंतर लेगॉसला वेगवेगळ्या मराठी लोकांकडे जेवायला गेलो तिथे ह्या पावडरीपासून बनवलेल्या गुलाबजामपासून कुल्फीपर्यंत सर्व खाल्ले. पण माझे मात्र निडोशी जमले नाही पहिले दिवशी पटेलाकडे खाल्लेले दही शेवटचे नंतर पावडरचा वास भरून राह्यला आणि नायजेरिया सोडेपर्यंत मी चहा, कॉफी, दूध, दही खाल्ले नाहीच आमच्या श्यामला लहानपणी ऑस्टरमिल्क देत असू दूध बनवताना एखादा चमचा पावडरचा बकाणा मारायला मला आवडे ती गुळचट खमंग चव आवडे आता वयाबरोबर सर्वच आवडीनिवडी बदलल्या आणि निडो पावडर किंवा त्याचे दूधही आवडले नाही

पडद्यावर रंगीबेरंगी साबणाच्या जाहिरातीत लक्स सुप्रीमची जाहिरात झळकली आपल्याकडे चित्रतारकांचा आवडता साबण लक्स सौंदर्यवतींचा साबण लक्स. मीनाकुमारी ते हेमामालिनी सर्वांनाच लक्स कसा आवडतो हे मला न उमगलेले कोडे आम्हा चौघाना चार तऱ्हेचे साबण आवडत असत मग आलटून पालटून ते आणायचे हा तह सर्वांनी मंजूर केलेला तरीही भारतात लक्सची जाहिरात पाहणे नेत्रसुखदायक असे ते कोरीव केलेले नक्षीदार सोनेरी मुठीचे भांडे, त्यात दुधापासून होणारे सर्व रंगीबेरंगी पण पाहतानाही मुलायम वाटणारे क्रीमचे मिश्रण रेशमी सळसळते कापड मग तो साबण वापरणारी सौंदर्यवती ! तिचा गोरागोरापान हात अथवा पाय दिसे देखणा चेहरा झळके इथेही सौंदर्यवती असणारच पहिले दोन दिवस मला जाहिरातीचे हसूच यायचे टी व्ही पाहताना या बायकाना कसले आलेय सौंदर्य वाटायचे गोरापान रंग, काळेभोर डोळे, लांबसडक केस, म्हणजे सौंदर्य आणि त्याचा तर इथे अभावच अभाव. परंतु नॅशनल थिएटरमध्ये भव्य पडद्यावर नायजेरियन सौंदर्यवतीची लक्स सुप्रीमची जाहिरात पाहिली आणि मी पाहातच राहिले ब्लॅक इज ब्यूटिफुलकडे अजिंक्यातले काळे कोरीव सौंदर्य काय असावे ? अतिशय सुडौल, रेखीव पण सेक्सी बांधा आव्हानात्मक वाटणारे जाडे ओठपडद्यावरसुद्धा ओलसर वाटत होते आणि आबोळ केलेली तकतकीत ओलीओली कांती लक्सचा मधुर वासच दरवळल्याप्रमाणे पाहात राह्यले ना गोरी कांती ना आनितंब केस ना सुनयना की ना नाजुक नजाकत पण काहीतरी वेगळ होतं, जबरदस्त होत साबणाच्या जाहिरातीस योग्य असे अंगोपांग तोकड्या कपड्यातून ओसंडत होत माझे हे विचार मग पुरुषवर्गाचे काय हा विचार मनात डोकावलाच मी हळूच त्यांच्याकडे आणि आजूबाजूला नजर फिरवली लक्सच्या जाहिरातीनंतर मला इतर जाहिरातींत रसच वाटेना

अर्ध्या तासाच्यावर जाहिरातीच जाहिराती मग एक इंटरव्हल नंतर सिनेमा पुन्हा मोठे मध्यंतर असा क्रम असतो त्याप्रमाणे पहिली सुट्टी संपली मुख्य सिनेमा सुरू झाला कथानक असे फारसे नव्हतेच. हाणामारीच जास्त होती. सिनेमा नायजेरिया

अथवा तत्सम आफ्रिकन देशात बनलेला होता हॉलिवूड वगैरेचा नव्हता खरं म्हणजे इथे नेहमी चागले पिक्चर लागत ह्यानी पाहिलेही होते पण त्या दिवशी मात्र नव्हता थिएटरसाठी जो असेल तो सिनेमा असे ठरवले होते उकाड्याने जीव हैराण होत होता तरी सिनेमा पाहात होतोच पाहता पाहता मी बXXXXअस्वस्थ होऊ लागलो हे दोघे पुरुष मात्र शातच आम्हाला नॅशनल थिएटर दाखवतोय याच विचारात दग.

नेहमीचेच कथानक. कोणीतरी सरदार त्याची बायको काही लुटारू पळवून नेतात. सरदार अर्थात दुष्टच, जुलमी, छळणारा वगैरे बायकोला पळवल्यावर साहजिकच सरदारावरचा राग तिच्यावर निघतो तिचे हाल हाल केले जातात शारीरिक तर होतातच पण मानसिकही मग एकेकाने छळून केलेला बलात्कार थिएटरातून जोरदार शिव्या घातल्या गेल्या इग्रजी व ' योरबा ' भाषेत काहीतरी बोलले जात होते शब्द समजत नव्हते; पण स्वर समजत होता अत्याचार करणाऱ्याना उत्तेजन दिल्यासारखा सरदारावर सूड उगवल्याचा आनंद पब्लिकला होता जेते गुडानी जिंकलेली जित स्त्री तिच्यावर अत्याचाराचा जेत्याना हक्कच एखादाच शिवाजी होऊन जातो

जित विरुद्ध जेते लढणारे पुरुष बळी स्त्रिया त्याचे स्त्रीत्व या स्त्रीत्वाचे काय ? याचा कोणीच कोठेच विचार करत नाही का ? सिनेमा पाहताना मनात हेच विचार चालले होते पुढे चाललेला सिनेमा पाहणे अशक्य झाले इतर प्रेक्षक चवीने पाहात होते जेत्या टोळीवाल्याना उत्तेजन देत होते आम्ही मात्र उठून चालू लागलो आम्ही दोघी स्त्रिया सिनेमातले अत्याचार पाहू शकत नव्हतो का ? माझे उत्तर लेगॉस एअरपोर्टवरची आठवण पण ह्याच्या मित्राची बायकोही म्हणाली, मला असले पाहायला आवडत नाही आपण जाऊ या म्हणून सिनेमा सोडून उठलो

सॉरी, एक्स्क्यूज मी, म्हणत वाट काढत जाऊ लागलो का उठता म्हणून विचारल्यावर मार्दवतेने उत्तर देऊ लागलो इट इज मच हॉट वुई काट सी इट इत्यादी हॉलबाहेर येताच आम्ही दोघींनीही नि श्वास टाकला जसा काही आम्हीच संकटातून सुटलो होतो भारतात काय असे हाणामारीचे व अत्याचाराचे सिनेमा नसतात ? इथे फरक एकच होता जुल्मी सरदार गोरा माणूस होता त्याची पळवलेली बायकोही गोरीच होती आणि जेते, टोळीवाले होते-निग्रो काळेकाळे सूड प्रखर होता पाहताना प्रेक्षक चवताळत होते याचे उत्तर मुंबईत दी रूट्स' कादंबरी वाचून समजले होतेच पण पुढे कैरोत 'द रुट्स' सिनेमा पाहून जास्तच जाणवले बोचले माझ्या मनातल्या दलित समस्या अत्याचाराना माझ्याजवळ उत्तर नव्हते वेळची असो नाहीतर दुसरे यावर असा सिनेमा निघाला तर ?

थिएटर बघण्यातला आनद या मनातल्या उलटसुलट विचाराने मावळला बाहेरच्या गार गार हवेत आल्यावर बरे वाटले अर्धा सिनेमा सोडून भीतीने आम्ही दोघींनी

जाण्याचा हट्ट धरला. आता हॉटेलवरही लौकर परत जायला हवे होते लेगॉस शहरात उशिरापर्यंत रात्री फिरणे धोक्याचेच अगदी स्वत च्या मोटारीतूनही कारण रॉबरी शस्त्र सहज सुलभ मिळतात मशीनगन कोणीही घेते आणि कष्ट न करता झटपट श्रीमत होता येत या रॉबरीतून

' मरीना ' हा भाग आपल्या फोर्ट एरियासारखा संध्याकाळी त्या रस्त्याने जाणे धोक्याचेच आमच्या इकोई हॉटेलात या भागातून जावे लागे तरी हल्ली रॉबरी बरीच कमी झाली होती म्हणे तरीही अगदी जवळच्याच गृहस्थाची हकीकत गेल्या-गेल्या ऐकायला मिळाली श्रीकृष्ण माझा मानलेला भाऊ बरीच वर्षे लेगॉसला राहात होता त्याच्या पहिल्या नोकरीचे कॉन्ट्रॅक्ट संपत आले होते ही कंपनी सोडून तो दुसऱ्या कंपनीत नव्या कॉन्ट्रॅक्टवर जाणार होता त्याआधी दोन महिने भारतात येणार होता म्हणून सर्वांच्या भेटीगाठी चालू होत्या असाच तो ' सुरुलेले ' या भागातून इलुपेज या भागात येत होता तो स्वत च त्याची पिझो गाडी चालवत होता त्याचा छोटा मुलगा मागच्या सीटवर झोपला होता स्वयपाक, घरकाम करून रेखा त्या दिवशी त्याच्याबरोबर गेली नव्हती वेळ होती रात्री आठ-साडेआठची अँथनी हिल गेली आणि श्रीकृष्णाला खाडकन गाडी थांबवावी लागली वाटेत कोणी उभे होते मशीनगन रोखून तीन-चारजण उभे होते गाडी थांबली श्रीकृष्ण बाहेर आला. त्याने गाडीच्या किल्ल्या काढून त्या लोकांच्या हातात दिल्या. आणि विनंती केली मागे झोपलेल्या मुलास घेतो म्हणून होकार नकार यायच्या आत त्याने धनजयला उचलले पुढचे कठीण होते योगायोगाने पाठीमागून येणाऱ्या वाहनाचा लाईट पडला चट-कन ते लोक श्रीकृष्णाच्या गाडीत शिरले आणि गाडी घेऊन निघून गेले पाठीमागून येणारी मेटॅडोर पद्धतीची बस थांबली या बसला म्हणतात कॅ कॅ कॅ कॅ मधून तो इलुपेजला परतला सुखरूप जीव वाचवून जर त्या रात्री रेखाही बरोबर असती तर? किल्ल्या देण्यास श्रीकृष्णाने नकार दिला असता अथवा उशीर लावला असता तर! आणि किल्ल्या घेऊनही त्या लोकांनी काही केले असते तर? विचारही भयकर होता श्रीकृष्ण सुखरूप आला त्याने गाडीची तर आशाच सोडली होती पण एक कंपनी सोडून दुसऱ्या कंपनीत जाताना पहिल्या कंपनीची गाडी हरवणे, चोरीला जाणे फारसे सुखद नव्हते नाइलाजच होता शिरसलामत म्हणून त्याने सोडून दिले पण कंपनीची गाडी म्हणून—फारशा अस्तित्वात नसलेल्या पोलिस खात्यात तक्रार द्यावी लागली

आठ-पंधरा दिवसानंतर पोलिसाचा फोन आला अमुक अमुक ठिकाणी गाडी सापडलीय. तुमचीच असल्याची खातरजमा करून घेऊन जा, इत्यादी गाडी घ्यायला श्रीकृष्ण गेला गाडी त्याचीच होती लेगॉसपासून जवळच्या एका गावी सापडली होती तो तिथं गेला. कागदपत्राचे सोपस्कार तिथेही आहेतच. ते झाले व गाडी ताब्यात आली काहीही मोडतोड व हानी झालेली नव्हती श्रीकृष्णाने व त्याच्या

बरोबरच्या भारतीय मित्राने गाडीत बसण्यासाठी गाडीचे दार उघडले आणि दोघेही दचकून मागे सरले आजूबाजूच्या नायजेरियनाना मात्र फारसे आश्चर्य वाटले नाही. घाबरण्यासारखेच दृश्य होते ते नंतर दीड महिन्याने मला ही हकीकत लेगॉसला एकाने सांगितली पण सांगतानाही त्याना अस्वस्थ वाटत होते मग प्रत्यक्ष पाहणाऱ्या श्रीकृष्णाला काय वाटले असेल? गाडी आतून रक्ताने माखली होती कोयती, तलवार सारखी दोन-चार शस्त्रे आतच पडलेली होती मागच्या सीटवर रक्ताच्या जोडीला केस व चामडीचे, मांसाचे तुकडेही होते मनुष्यदेहाच्या खाडोळीचे दृश्य ऐकतानाही माझ्या डोळ्यासमोर आले गाडी अशाच कृत्यासाठी वापरली जाते हत्यारे तिथलेच होते पण हत्या झाली ते कोण असावेत केस कसे होते हे श्रीकृष्णाला विचारायचे राहून गेले काळे कुरळे की कोणीही असो कितीही असोत ते सर्व जगातून गेले होते श्रीकृष्णाने गाडी कंपनीला परत केली व तो रजेवर भारतात आला पधराच दिवसानी मी लेगॉसला गेले माझी त्याची भेट झाली नाही पण आपला मानलेला भाऊ बचावला म्हणून मी निःश्वास टाकला लेगॉस एअरपोर्टवर मी बचावले म्हणून श्री पाटील यानीही असाच निःश्वास टाकला असणार.

अशा या शहरात काहीही न घाबरता हे बरेच वेळा रात्री ये-जा करीत अब्दुल्ला फारच उत्तम ड्रायव्हर आहे. भारतात परतल्यानतर याच्या काळजीच्या भार मी त्याच्यावरच सोपवला अजूनपर्यंत याच्या गाडीला एकदाही अपघात झाला नव्हता याची दक्षता, जागरुकता याविषयी खात्री असली तरी क्रूर मनाच्या माणसाची खात्री मी हजारो मैलावरून कशी देणार? फक्त काळजी, चिंता करणे एवढेच तरीही हे तिथे मजेत राहात होते आर्थिक स्थैर्य होते सुखसोयी होत्या सत्ता होती. सुखासीनता होती चार पैसे शिल्लक राहिले असते भविष्यासाठी वर्तमानकाळ मात्र धोक्यात असे एक छोटीशी दोन खोल्याची जागा मुंबईत घेण्यासाठी पैसे साठवायचे होते तिथे असलेल्या जवळ जवळ प्रत्येक मराठी माणसाचा हाच विचार होता दिवसेंदिवस मुंबईतल्या जागेच्या किंमती वाढत तसे तिथे राहण्याचे दिवसही मग हळूहळू गाडी, मोठा ब्लॉक, पैशाने विकत घेता येणाऱ्या सर्व सुखसोयी, याच जोडीला उच्च शिक्षण, बुद्धिमत्ता याची कदर इथे जास्त केली जाते, असा विचार मन व्यापून टाके आपल्या भारतात युरोपियनाना जो मान तितका नसला तरी जवळपास पोचणारा मान या आफ्रिकन, मध्यपूर्व वगैरे विकसनशील देशात आपल्याला मिळतो मग अरब आखात व आफ्रिकेत किती सुखसोयी, समृद्धी याचे वर्णन परतल्यावर होऊ लागते परदेशी, म्हणजे जर्मनी, जपान इथे बनवलेल्या वस्तू आणल्या जातात कौतुकाने दाखवल्या जातात आमच्यासारख्या मध्यमवर्गीयाना कौतुक वाटू लागते वाहत्या सोन्याने श्रीमंत झालेल्या या देशातील संपत्ती आपण उपभोगू लागतो मी पण हेच करत नव्हते का? प्रत्यक्ष इथे येताच मात्र धोके जाणवले, दिसले, अनुभवले तरीही यानी आत्ताच्या

आत्ता नोकरी सोडून भारतात परतावे असे वाटले नाही धोका नसतो कुठे? प्रमाण कमी अधिक एवढेच फक्त आपल्या देशात आपल्याच वर्णाच्या समाजामुळे आपली सुरक्षितपणाची भावना जास्त मजबूत असते.

याच विचारात आम्ही रात्री 'इकोई' हॉटेलात परतलो रात्रीच्या झगमगाटात हॉटेल फुलून गेले होते डायनिंग हॉलमधे संगीताचे मंद सूर घुमत होते. डान्सरूममधे जल्लोश उडाला होता मला जेवणाची इच्छा नव्हती तरी दोन घास पोटात गेले पाहिजेत म्हणून गेले. तोच फ्राईड राईस, तेच टोमॅटो सूप, तेच ग्रीन सॅलड हॉटेलात मला एवढेच पदार्थ शाकाहारी मिळत आठ दिवस तेच खाऊन मी राहिले कोणा मराठी कुटुंबाने जेवायला बोलावले की सर्वजण आग्रह करून न घेता चटकन होकार का देत याचे मर्मही समजले आणि सौ. पाटील, सौ आपटे यानी मिस्टराना खाऊ घातलेल्या दहीभाताचे कौतुकही समजले त्यासाठी आधी अशी उपासमार मात्र करून घ्यावी लागली नायजेरिया हा खाण्याच्या दृष्टीने एकदम बेकार देश आईस्क्रीम सोडले तर डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये चटकन घेऊन खावे वाटणारे काही मिळत नसे बिस्किटे, केक, पेस्ट्रिझ, पिझ्झा, पॅटीस, कटलेट्स काहीच नाही. फक्त कॅडबरी, केक, कोक यावर भटकताना भूक भागवावी लागे नॉन्व्हेज काही पदार्थ असत पण ते कोणीच मराठी मंडळी घेताना दिसली नाहीत अर्धे कच्चे मासच असे. जे आपल्या जिभेला रुचत नसे नॉन्व्हेज खावे हे मी नेहमी मुलाना सांगे त्याचे कुठे अडू नये म्हणून पण हे सर्व लोका सांगे ब्रह्मज्ञान-झाले. मला मात्र प्रयत्न करूनही जमले नाहीच– शेवटपर्यंत

वरणभात, लिंबाची फोड, चिंचगूळ–काळा मसाला घातलेली आमटी हेच माझे अन्न. अन्न हे परब्रह्म म्हटले जाते पण कोणतेही चालेल ही स्थितप्रज्ञता थोडीफार यानीच साध्य केली होती तोंडी लावायला काय हा लहानपणी पानावर बसताच प्रश्न असे. आता ह्याना विचारले असते, तर ह्यानी सांगितले असते रोजच्या तुझ्या रडक्या तक्रारी खाण्यासारखे चार जिन्नस मला मिळूनही माझी तक्रार का? भारतातले माझ्या दृष्टीने सुग्रास असलेले अन्न आठवायचे. केवळ जिव्हालौल्य पोट भरणे ह्याच उद्देशाने माझे जेवण नसे कोणत्यातरी ध्येयाने झपाटले की ह्या ऐहिक सुखाच्या गोष्टीकडे लक्ष कमी जाते नाहीतर रिकाम्या मनात भडुरे, इडली, डोसे, भेळपुरी, खमग ढोकळा, रसगुल्ले, संदेश, रसमलई याच्या जोडीला पुरणपोळीपासून सर्व पक्वान्ने हजेरी लावतात वेगवेगळ्या प्रांताच्या लोकात राहिल्यामुळे व घर, संसार, मुले, स्वयपाक, पाहुणचार ह्यातच इतिकर्तव्यता समजण्यामुळे, एका मर्यादित जगातच वावरल्यामुळे, स्वयंपाक करणे, दुसऱ्याना खायला घालणे, स्वत.ही चवीने खाणे हा छंद किती जोपासला गेला, याची प्रचिती भारत सोडताच येत होती रोमला मोजक्या वेळात भरपूर पाहायचे हा ध्यास होता म्हणून या जिव्हालौल्याकडे लक्ष नव्हते. पण लेगॉसमध्ये मात्र लक्ष इथे

केंद्रित झाले सांगली-साताराकडची मी भरली वांगी, भाकरी म्हणजे पचपक्वान्न मानणारी गुरगुट्या मऊ भात, साजूक तूप, लिंबाच्या लोणच्याची फोड, निखाऱ्यावर भाजलेला पापड आठवायचा- फ्राईड राईस, ग्रीन सॅलड खाताना वयाबरोबर आवडी-निवडी पक्क्या होत गेल्या बदलतही गेल्या पण मूळ पाया शाकाहारीच राहला शिवसेनेचा दादर स्टेशनवरचा वडा-पाव रात्री बारानंतर चवीने खाल्ला तितक्याच उत्साहाने व्ही टी समोरची पावभाजी पण चोखंदळपणा असेच त्यातही म्हणून देश बदलताच माझी गाडी जेवणावर अडली नायजेरियात पचतारांकित हॉटेलात राहलो, जेवलो उत्कृष्ट आणि भयंकर महाग चायनीज फूड खाल्ले आणि पुढे नैरोबीला घरी आणून गुजराती जेवण स्नेह्याने खिलवले कैरोत ओबेरॉयमध्ये खल्लिली ते मुगल या दालनातून वेगवेगळ्या जेवणाची चव घेतली पण घरी परतल्यावर दोन दिवसानी केलेल्या मऊसूत घडीच्या पोळीची लज्जत काही वेगळीच होती जेवणाचा हा चोखदळपणा माझा हॉस्पिटलमध्ये मात्र एकदम कमी झाला होता जीव वचावण्यासाठी सर्व पथ्ये निमूटपणे पाळत असे मीठ नको-डोळ्यातल्या खारट पाण्याबरोबर गुपचूप जेवणे साखर वर्ज्य--गोड गोड बोलत खाणे तिखट नको-याच्याशी वाद घालत उकडलेल्या भाज्या पोटात ढकलणे हवे नको खाण्याचे दिवस थोडेच होते ? तरी सुगरण जावेने केलेला चविष्ट स्वयपाक आठवायचाच.

त्याचबरोबर याद यायची ज्यानी जन्मजात सुखासीनता बाजूला सारून तुरुंगातले कदान्न पत्करले अशाची त्याना कधी अस वाटत असेल का ? ध्येय स्वातंत्र्याचे, त्यापुढे सर्वसुखाचा त्याग करणाऱ्याना सुग्रास अन्नाची काय पर्वा ? कौतुक वाटले. आपणही असेच वागले पाहिजे, असेही वाटले, तरी जमत नसे अन्न हे परब्रह्म मानले अशाच लोकानी मग ते पडित नेहरू असोत की वास्को-डी-गामा निराळ्या जेवणाचे, सवयीचे आम्ही सामान्य लोकच गुलाम तुरुगात नेहरूना, गाधींना काय मिळत असेल ? आपल्या देशातून आलेल्या वास्को-डी-गामास इथे जेवताना काय वाटले असेल पण हे चक्र सतत चालत आले आहे थोडा ज्यूस, एखादे अडे यावर जयप्रकाश कसे राहात असतील ? असे विचार करायला त्याचे मन थोडेच रिकामटेकडे होते आम्ही सामान्य म्हणूनच सवयीचे गुलाम परदेशात जेवताना नेहमी असे विचार यायचे व कोणाच्या घरी अगदी भारतासारखा बनवलेला पदार्थ खाल्ला की जास्त पक्का व्हायचा मग ते अंकल बीन राईसपासून बनवलेले चुरमुरे आणि त्याची भेळ असो की निडो पावडरच्या दुधाचा पनीर करून केलेली पनीरमटार भाजी असो हेच चागले लागायचे पार्टीत सर्व भारतीय झकास जेवण करायचे फक्त माझे गरम स्ट्रॉग कॉफीचे व्यसन मात्र तिकडे जाऊन कमी झाले ताजे दूध न मिळाल्याने सवयीच्या गुलामगिरीतला एक आयटेम कमी निराळ्या जेवणाने येणारी अस्वस्थताही हळूहळू कमी होत राहली फक्त देश सोडताना एक दखरुख मनात घेऊन भारतात परतले खास

नायजेरियन जेवण खाल्ले नाही याम, गारी, कसावा ही तर शुद्ध कदमुळेच. घरी याम उकडून काप करून खाल्ला, पण खास नायजेरियन पद्धतीने बनवलेले जेवण जेवायला मिळाले नाही एक दोन घरी गेलो त्यानी शेपेन, शेरी, खारे काजू, पिस्तेच दिले. जेवण घ्यायचे तर हॉटेलात कॉंटिनेंटल अथवा चायनीज त्यामुळे पुढे नायजेरियन ड्रेस घातला तरी नायजेरियन जेवणखाण नाही ही रुखरुख राहलीच पोटातून जिव्हाळ्याचे संबध जोडले जातात मी मात्र पुढे आमच्या गावात या लोकाना भारतीय पदार्थ करून घातले साबुदाणावडा तर एकदम लोकप्रिय झाला

अशा तऱ्हेने लेगॉसचे आठ दिवस कधीच सपत आले आता ' मिना ' लाजायचे होते. मग मात्र मराठी मायबोली फक्त ह्याच्याशीच बोलता येणार आता मला ' मिना 'चे वेध लागले होते एअरपोर्टवरच्या कटू आठवणी किंचित मागे पडल्या होत्या विसरल्या जाणे कधीच शक्य नव्हते फक्त बोथट झाल्या असल्या. तरीही मनाच्या कोपऱ्यात विमान अपघात, एअरपोर्टवरचा प्रसग, नॅशनल थिएटरचा सिनेमा आणि श्रीकृष्णाची मशीनगन रोखून पळवलेली गाडी, डॉ शहाचा ' तिनुबू ' चौका-तला खून मधूनमधून बोचत होताच पण मला हे विसरायला हवे

परतीची तिकिटे बुक करून आम्ही लेगॉस सोडायचे ठरवले आता हॉटेलच्या दारात माझ्यासाठी परदेशी बनावटीची एअरकंडिशनर कार होती दिमतीला चोवीस तास ड्रायव्हर होता खिशात भरपूर पैसे होते खरेदीसाठी मोठीमोठी दुकाने होती त्यात तऱ्हेतऱ्हेच्या मोहविणाऱ्या वस्तू होत्या. हॉटेलात राहण्याने कामाची तक्तक नव्हती लेगॉसची मराठी मडळी आवर्जून प्रेमाने बोलावत होती मजेत जेवणे, पुख्ले झोडत होतो व पु च्या टेप्स ऐकून सर्वजण खूष होत होते मराठी गाणी ऐकून आनद होत होता उषा शशीभाऊची गाणी, कवितावाचन ऐकून भारतात घरी मैफिल जमलीय वाटत होते. सर्वांना खुशालीची पत्रे लिहिली मुकुदराव किर्लोस्कराना पुढे कोणते देश पहात येणार वगैरे प्रोग्रॅम कळवला खरेदी यानी मी जाण्याआधीच करून ठेवली होती पण माधुरीच्या होणाऱ्या बाळासाठी कपडे, खेळणी मी घेतली मला हवे होते ते सर्व होत होते आणि तरीही माझे मन फुलतच नव्हते उदासीनता जात नव्हती मनाच्या धक्क्याने शरीर आजारी पडले होते सारखा ताप, दमा, डोकेदुखी, कंबरदुखी वाटायचे अथरुणावर पडूनच राहावे पण असे होऊन उपयोगी नाही एवढ्यासाठी मी इतका त्रास घेऊन परदेशी आले होते का ? मी अशी वागले तर ह्याना काय वाटेल ? प्रथम, सर्वप्रथम याचा विचार केला पाहिजे मला उमेदीने उठल पाहिजे मी भारतात सुखरूप परतेन हे दिलेले वचन पाळण्यासाठी माझ्या मुलासाठी, माझ्या मित्रमैत्रिणींसाठी मला उभारी धरायलाच हवी दुःस्वप्ने विसरून

' मिनाला जाण्याचा दिवस आला. रात्री उशिरा हॉटेलात परतलो आता परत

लेगॉसला जायचे होते ते नायजेरिया सोडून भारतात परतण्यासाठीच इथून मी काय नेणार ? कोणत्या स्मृती नेणार ? रात्र सपली सकाळी लवकर उठून सामान बांधून, भरपूर ब्रेकफास्ट करून बरोबर आठ वाजता निघालो. आता 'मिना'ला घरी पोचेपर्यंत वाटेत काही खायला मिळणार नव्हते नॅशनल हायवेला लागलो गाडीचा वेग होता १२० कि मी; ९०० कि मी अतरावरचे लेगॉस ते मिना अंतर एका दिवसात तेही अंधार पडण्यापूर्वी गाठायचे होते हे आजूबाजूची माहिती सागत होते लेगॉस मागे पडत होते अब्दुल्ला शातपणे मोटार चालवत होता. पोटातले पाणीही हलत नव्हते एअर-कंडिशनचा गार वारा गाडीत वाहात होता निळसर काचेतून आफ्रिकेचे हिरवे गर्द जगल मला खुणावत होते सर्व आठवणी विसरून आठवत होते–लहानपणी वाचलेले टारझनचे पुस्तक. त्यातील आफ्रिकेच्या घनदाट जगलाचे वर्णन रानटी लोकाचे वर्णन वन्य पशू आणि वन्य माणसे त्यात वाढलेला गौरकाय टारझन. लहान कोवळ्या वयात या पुस्तकाने मला भुरळ घातली होती नतर वाचले होते जादुगार रघुवीराचे 'प्रवासी' हे त्याचे आफ्रिकेचे प्रवासवर्णन रानटी चालीरिती पण टारझन तो टारझनच तेव्हाच मी आणि माझा बालमित्र मनोहरने ठरवले होते की एकदा तरी आफ्रिकेत प्रवास करायचा जगलात भटकायचे. वाढत्या वयाबरोबर ही पुस्तके, त्याची आवड कधीच विस्मृतीत गेली पण आफ्रिका मनात राहिली मात्र त्या आफ्रिकेत मी आले होते

प्रशस्त रस्त्यावरून आमची कार धावत होती आजूबाजूला गर्द झाडी होती लोक काळे काळेच होते पण पाश्चात्य पेहरावात होते झाडावरून उड्या मारत नव्हते परदेशी मोटारींमधून फिरत होते तीर कमान-भाले घेऊन नव्हते परंतु मशिनगन घेऊन रॉबरी होत होती रानटीपणा दिसला नाही तरी माणसाचा सुप्त रानटीपणा मी पाहिला होता डोळ्यासमोर तरळू लागले भीतिदायक स्वप्न ! मोठा विस्तव पेटवून शेकोटी धगधगतेय मला झाडाला बांधून ठेवलंय आजूबाजूने काळे काळे लोक माझ्याभोवती फेर धरून नाचताहेत हुऽबाला हुऽऽबाला करत ड्रमचा गूढ आवाज घुमतोय. साऱ्या जगलाला सागतोय एक शिकार सापडलीय सर्व रानटी, पशू प्रवृत्तींनो इथे या शिकारीला या सावज गवसलय मी थकून डोळे मिटून घेतले बालपणीची आफ्रिकेच्या सफरीची हौस पुरी झाली होती पण बालपणीचा सवगडी मनोहर बरोबर नव्हता मनोहरच्या परदेशातील अपघाती मृत्यूनतर आज त्याची आठवण मला तीव्रतेने झाली वाटले मनोहरने माझ्यात लेखनवाचनाची आवड निर्माण केली त्याच्यासाठी मला हा प्रवास कसा झाला हे लिहायला हवे

आता लेगॉसपासून दूर–दूर आलो होतो विषुववृत्ताचा हा देश भर मध्यान्हीचा सूर्य तळपत होता गाडी त्याच वेगात जात होती अब्दुल्ला त्याच एकाग्रतेने ड्रायव्हिंग करीत होता ह्याना आता शात झोप लागली होती. त्याना या प्रवासाचे, या देशाचे आता नावीन्य उरले नव्हते मी मात्र उत्सुकतेने पाहात होते. छोटी–छोटी तुरळक

दिसणारी गावे मागे पडत होती रस्त्याच्या दोन्ही बाजूला अपघातात सापडलेली वाहने होती मिनिटागणिक दिसत होती हा प्रवास किती धोक्याचा आहे हे उमजत होते तो मॅनेजर; गोखल्याना अपघात झाल्याच्या शकेने अस का बोलला हे समजले होतेच सर्वांकडून आता चक्षुर्वै सत्यम् पाहात होते नुकतेच एका भारतीय इजिनि-अरचे अशाच अपघातात निधन झाले होते सुट्टीवर भारतात जायला तो येत होता अगावर विचारानेच शहारे आले

दोन्ही बाजूंची गर्द हिरवी झाडे मागे मागे जात होती. मिना गाव जवळ येत होते दुपारी दहा मिनिटे थाबून ड्रायव्हरने जेवण घेतले आम्ही फक्त कोकाकोला पुन्हा प्रवास चालू वेग तोच रस्ते खराब झाले असले तरी वेग कमी केल्यास इतर वेगाने जाणारी वाहने ठोकरून निघून जातात पुढे आपणही त्याच वेगात धावल्यास धोका किंचित कमी एवढंच- मागे पडत होती जगले, तशीच खेडीही आता चौफेर असलेला आफ्रिकन लोकाचा रग डोळ्याना खुपत नव्हता त्याची चागली वागणूक गेले आठ दिवस पाहली होती आणि मी एकटी, एकाकी नव्हते सोबतीला सतत हे बरोबर होते मी माणसात वावरत होते मनात अतर्मुख होऊन विचार करत होते आता पुढचे दिवस कसे जातील ? प्रकृती साथ देईल का ? मन उमेदीन उभारी धरेल का ? झाडाना वसतात नवे धुमारे फुटतात तसे उत्साहाचे धुमारे मला फुटतील का ? जरूर फुटतील का नाही फुटणार ? झाडे वठतात माणसे नाही असे अनुभव म्हणजेच आयुष्य ! Life is beautiful मला आयुष्य जगायचं आहे मग असे अनुभव का नकोत ? ते येणारच आणखीही येतील त्याला तोड द्यायलाच हवे पाठ फिरवायची नाही मनाला थोडी तरतरी आली मी इथे हिंडेन फिरेन देश पाहीन नवनवीन पाहीन मला प्रवासाची अनिवार हौस आहे मग अशा जीवनप्रवासाला थोडेच विन्मुख होता येते ? मी इथल्या लोकाशी मैत्री करेन आमच्या ‘ मिना ’ गावात मी नक्कीच रमून जाईन. ‘ मिना ’ गाव जवळ आले संध्याकाळ होत आली होती सूर्यास्तही होत होता केशरी तेजस्वी सूर्य आकाशातून झरझर सरकत होता धरित्रीच्या कुशीत शिरायला सपाट मोकळे माळरान पसरले होते डोंगर नव्हते. झाडीही नव्हती एकाएकी आभाळ भरून आले काळ्याभोर ढगाने धुळीचे लोटच्या लोट उडाले आणि टपोरे पावसाचे थेंब गळू लागले आफ्रिकेचा निसर्ग ! दिवसभराचा उन्हाचा रखरखीतपणा या पाव-साने नाहीसा होऊ लागला दूरचे लुकलुकणारे दिवे बघता बघता जवळ येऊ लागले. जवळ आले. अब्दुल्ला म्हणाला, ‘ मॅडम, वेलकम टु अवर मिना ! ’ एक नायजेरियन-काळ्या समुद्रातील एक बिंदू--माझे त्याच्या गावात, त्याच्या देशात स्वागत करत होता वेलकम--

त्या काळोखात बुडालेल्या घरासमोर आम्ही येऊन उभे राहलो सपूर्ण काच असलेला दरवाजा उघडून हे म्हणाले, ‘ हे आपले घर ! आणि हे आपल्या बगल्याचे

वॉचमन याना मगाडी म्हणतात ' भुतासारख्या दिसणाऱ्या दोन माणसाकडे यानी बोट दाखविले काळा अंधार, त्याचा काळा रंग, त्यात उठून दिसणारे लख्ख पांढरे-शुभ्र दात! टॉर्चच्या साहाय्याने काचेचा दरवाजा उघडला ' ही सिटिंग रूम तू येथेच उभी राहा मी व अब्दुल्ला जनरेटर चालू करतो वीज गेलेली आहे. आल्यावर पाच मिनिटातच जनरेटर, त्यात फ्युएल भरणे, तो चालू करणे, नेपा म्हणजे नायजेरियन इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनीचे कनेक्शन बदलून ते जनरेटरला लावणे ही माहिती प्रथम समजून घ्यावी लागली यापुढे आठवड्यातून तीन दिवस वीज गेल्यावर मलाच हे काम करायचे होते जनरेटरचा धडधड आवाज सुरू झाल्यावर लख्खकन् दिवे लागले गाडीतले सर्व सामान काढून घरात आणले घरातले दिवे लावत मी आत गेले त्याबरोबर उंदीर–घुशी याची पळापळ सुरू झाली घाबरून ओरडण्याचेही मला त्राण नव्हते प्रथम मी स्वयपाकघरात गेले आणि तितक्याच वेगाने बाहेर आले इतस्तत. पळणाऱ्या झुरळापेक्षा माझा वेग जास्त होता एकदोन सरडे, बेडूक, उंदीर, घुशी, झुरळे, टोळ, पाली ह्या सर्व रहिवाशी मंडळींची आमच्या आगमनाने पळापळ चालली होती ' झकासपैकी पिठलं भात कर बुवा ! ' याचे उद्‌गार कानावर आले त्या सर्व प्राण्याना बरोबर घेऊनच राहायचे होते त्यामुळे मी चुपचाप स्वयपाकाला लागायचे ठरवले स्वयपाकघराची खिडकी उघडल्याबरोबर चित्रविचित्र किड्यानी आत येण्यास गर्दी केली. ड्रायव्हर निघून गेला होता आजूबाजूला कसल्याही मनुष्य-वस्तीची जाग नव्हती कसला आवाज नव्हता. नाही कसा ? जनरेटरचा धडधडाट होता ना उंदीर, पाली याचेही आवाज होतेच सोबतीला

भारतीय–विशेषतः ब्राह्मणी सवयीप्रमाणे मी हातपाय धुऊन कामाला लागायचे ठरवले बाथरूममध्ये गेले इथेही तसेच लॅगॉससारखेच भला मोठा टब, कमोड आणि वॉशबेसीन जमिनीवरून पाणी जायला वावच नाही रोम पासूनच माझी ही अडचण निर्माण झाली होती फजितीही झाली होती इथेही तेच, म्हणजे तीच फजिती कोणाला सागावे बरे ही गमत ? या विचारात मी वॉशबेसीनवर हात व तोंड धुतले मोटारीतूनच आलोत पाय कुठे मळलेत असे मनाशी सोयीस्कर उत्तर दिले

घर म्हटले की घर या शब्दाशी आपल्या काही कल्पना निगडित झालेल्या असतात गुंतलेल्या असतात त्यातलीच एक घरात आल्यावर हातपाय धुऊन कामाला लागणे तिन्हीसाज झाल्यावर देवापुढे हात जोडणे शेवटी मोठ्या टबमध्ये उतरण्याची कसरत पार पाडली आणि पायावर गार गार पाणी ओतले. स्वयंपाकाला लागायचे होते उकड्या तादळाचा भात आणि व्हेजिटेबल फॅटमध्ये केलेल ' पी फ्लोअर ' डाळीच्या पिठासारखे वाटणे वगैरे कसल्यातरी धान्याच्या पिठाच ' पिठल ' पिठल याना गोड लागलं, पण माझ्या घशाखाली घास उतरेना भलीमोठी डबलबेड, खाली स्प्रिंग, वरती फोमची गुबगुबीत गादी ! अगदी सिनेमातल्याप्रमाणे. परंतु मला तशी सुखात झोप येणार

नव्हती माझे मणक्यातील मज्जातंतूचे दुखणे या गादीवर सुख लागू देणार नव्हते ह्याचे ' घोरासुराचे ' आख्यान कधीच सुरूही झाले. माझी झोप भारतातच राहली होती कॉटवर पोटाशी पाय घेऊन मी बसून राहले होते पळणारे उंदीर, झुरळे खाली पाहात बाहेरची किर्र्र्ऽऽ शांतता ऐकत ह्या दूर असलेल्या बेडरूममध्ये जनरेटरचाही आवाज ऐकू येत नव्हता पुन्हा मला फार एकाकी वाटत होते. मुलांच्या आठवणी येऊ लागल्या कशाला आले मी या जगलात? कधीही उत्तर न मिळणाऱ्या प्रश्नासाठी तर मी इकडे आले होते हे माझेच घर असूनसुद्धा Home-sick झाले होते. ' हे ' जवळ असूनही एकटे वाटत होते. भीतीही वाटत होती. एअरपोर्टवरच्या प्रसंगाची आठवण होत होती उद्यापासून हे कामाला जाणार ह्या प्रचंड नऊ खोल्या असलेल्या बंगल्यात मी दिवसभर एकटी वावरणार सोबतीला असणार काळा मिट्ट ' जोन ' नावाचा नोकर. अब्दुल्लाची ओळख झाली होती जोन ' कसा असेल ? आजूबाजूला चार-पाच भारतीय राहात होते म्हणे. कसे असतील ते ? माझे त्यांच्याशी जमेल का ? आणि नायजेरियन शेजारी ?

वेळ जाता जाईना म्हणून मी पत्र लिहायला घेतले माझी अस्वस्थ मनःस्थिती, परकेपणाचा फील, अनोळखी म्हणून बावरलेपणा कोण समजून घेऊ शकेल ?

" श्री ब. पु. सप्रेम नमस्कार.

संध्याकाळी 'मिना' त तर येऊन पोहोचले. संध्याकाळची वेळच कातरवेळ, मनाची उलघाल वाढवणारी, कासावीस करणारी.

भरती-ओहोटी समुद्राला काही ठराविक तासानंतर येते म्हणतात पण मनात उफाळणाऱ्या आठवणींची भरतीमात्र संध्याकाळच्या कातरवेळी किंवा अशा मध्यरात्री नीरव शांततेत येते. आणि या साऱ्या आठवणी हुरहूर लावणाऱ्याच असतात. मला हसायला खूप आवडते. खो खो हसतेही मी पण या मुखाआड दडलेला कल्लोळ ? बस्स एवढच

आठवणींच्या या समुद्राच्या भरतीत जीव गुदमरतो कारण या तिन्हीसांजेला येणाऱ्या आठवणी पुढच्या रात्रीच्या द्योतकच असतात

अशा हरवून गेलेल्या संध्याकाळसाठी मी नायजेरियाला आले काहीतरी शोधायला. मिनात शिरत होतो डोळे भरून यावे तसे आभाळ भरून आले मुक्तपणे पाऊस कोसळू लागला आभाळालाच मुक्तपणे रडता येत का ? काचेवरचं पाणी मी पुसून टाकल मिना गाव कसं दिसत ते बघायसाठी खाचखळगे, छोटासा रस्ता पार करून घरासमोर येऊन उभे राहिले. अंधार घेरून आला होता आमच्या घरच्या भागातले दिवे गेलेले होते नवी नवरी थोडीच होते ? की तान्ह्या लेकराची आई नव्हते कोणी भाकरतुकडा ओवाळून घरात घ्यायला घरात शिरताना ' या ' हे स्वागत आपण नेहमीच करतो मीही करत आलेय पण परक्या देशात असे स्वागत थोडेच होणार !

जनरेटरच्या आवाजात दिवे लागले बाकी सारं शांत ! घटप्रभेला आपण कातर-वेळीच पारावर बोलत बसलो होतो उदास वाटत होतं थोडंसं थोडसं खिन्नही त्यात तुम्ही ' घर हरवलेल्या माणसा 'ची प्रस्तावना वाचून दाखवली होतीत

आज मात्र मला काय वाटतय मलाच कळत नाही सगळे संदर्भ हरवल्यासारखे वाटतय मला हरवून कसं चालेल ? शोधून सापडणार नाही या ध्यासात खरंच हरवून चालायच नाही

भात पिठलं छानच लागत मोठ्या पगतीत आणि दोघाच्या अंगती-पगतीतही दोघाचे चौघे झालोत. माधुरी सासरी श्याम एकटाच पाल्यांत आम्ही येथे. पगतीतली रागोळी विस्कटल्यासारखेच वाटतय. घास कसा उतरणार ? जेवायचही नाटक ह्याना बरं वाटाव म्हणून शेवटी आलेय यासाठीच

झोप तशी मला प्रियच दिवसभर प्रवास करून दमले पण झोप येत नाहीय आई म्हणायची तुम्हा हल्लीच्या मुलाना सुखसुद्धा खुपेल कधी कधी. फोमची गादी म्हणजे सुख का ! ह्याना गाढ झोप लागलीय सुखी आहेत असेच राहावेत मी मात्र टक्क जागी पत्र लिहायला घेतलंय. किती वेळ लिहिणार ? अजून रात्र संपायला खूपच अवकाश आहे. खरं म्हणजे आता कसलीही भीती वाटायला नको वाटली तर या भल्यामोठ्या घराचीच वाटेल नऊ खोल्या. त्याही प्रशस्त सहजच पाचसात कुटुंबे सुखनैव संसार करतील एका अरबाचा हा बगला त्याच्या सहा-सात बिबींना एवढी जागा हवीच

इथे आल्यापासून तशी कसलीच टचाई जाणवत नाहीय तरीही झोप येत नाही असली तर आता या झोपेची टचाई आहे राजाला म्हणे सात गाद्याच्या खाली असलेला केस खुपला म्हणून झोप आली नाही मला सात सागरापलीकडच्या मुला-बाळाच्या, स्नेहीसोबत्याच्या, नात्या-गोत्याच्या आठवणी खुपताहेत. रात्री आठवणी जास्त तीव्र वाटतात म्हणून वाट पाहतेय उजाडण्याची कशी असेल इथली सकाळ ? बाहेरचा परिसर कसा असेल ? आजूबाजूचे लोक कसे असतील ? नोकर कसा असेल ? कित्ती प्रश्न माझ्या मनात कळल नाही ते कळल्याशिवाय चैन पडत नाही म्हणून बेचैन आहे कधीतरी डोळा लागेल मग पक्ष्याच्या किलबिलाटाने जाग येईल. पास्यां-मारखीच पण पहाट व्हायला पुष्कळ अवकाश आहे "

त्या रात्री पत्रलेखन इथेच थाबलं होतं कधीतरी झोप लागली दुसरा दिवस उजाडला जरा निवातपणा मिळताच रात्रीचे पत्र पुरे करायला घेतले

" जोनला क्रोकरी धुवायला सांगितलीय एकदम खळकन आवाज झाला कशाचा तरी निकाल लावला असणार मला पत्र लिहायच म्हणून दुर्लक्ष केलं ऑफिसची क्रोकरी आपल्या बापाचं काय जातय हाही विचार आहेच. ब्रेकफास्ट झालाय. एक-दम सध्याकाळी हे घरी येणार रात्रीचा मेनू परत भात पिठलच आहे तशी कामे खूप पडलीत परतु पत्र आधी एक गमत सांगायला. रात्रीचा हळवेपणा पूर ओसरून

गेल्यागत ओसरून गेलाय

खरं म्हणजे सकाळसाठी गजर लावून ठेवला होता पण तरीही नेहमीप्रमाणेच साडेपाचला जाग आली काहीतरी अस्वस्थ वाटत होत थोड्या वेळाने लक्षात येऊन मी खोलीच्या खिडक्या उघडल्या तरीही तसंच वाटत होतं. नेहमीसारखीच जाग येऊन नेहमीसारखं वाटत नव्हत पाल्र्याला आमच्या घराच्या बेडरूमशेजारच्या झाडावर वस्तीला असलेल्या पक्ष्याच्या आवाजाची, चिमण्याच्या कलकलाटाची सवय झालेली. महिनोन् महिने हॉस्पिटलमध्ये राहिले काम्पोझच्या गोळीची झोप बहुधा उशिराच लागायची सिस्टर किंवा आया जागवायची पण जागी झाल्यावर पक्ष्याचा आवाज यायचा इथे मी नुसतीच जागी झाले आवाज कसलाच नाही झुजूमुजू दिसायला लागल होत उठायला हव होत पण उठवत नव्हत उठताक्षणी ह्यांना चहा लागतो त्याशिवाय तरतरी येत नाही अस याच मत मी कायम या 'तरतरी'ची चेष्टा करते. आता नाही करणार कधी मलाही तरतरी आली नाही पक्ष्याचे आवाज न ऐकल्यामुळे मनात आले. एवढे ढिगभर खाण्याचे सामान आणले दोन पक्षीही आणले असते तर काही जड नव्हत लेगॉस शहरातसुद्धा मला कधी पक्षी दिसले नाहीत काहीच प्राणी दिसले नाहीत एवढा प्रवास करतानाही काही ठिकाणी दिसली पाळीव कुत्री आणि माजरे झाडावर किलबिलणारे पक्षी नाहीत नी कावकाव करणारे कावळेही नाहीत इथे कोणत्याच पक्ष्याचे आवाज नसल्याने मी मनातून थोडीफार खिन्नही झाले परका देश फारच परका वाटू लागला

भारताची सय मनात भरभरून आली डोळे डबडबले आणि अचानक तो आवाज कानावर आला चपळतेने मी खिडकीकडे धावले अंधारकोठडीतल्या कैद्याने भरभरून शुद्ध हवा घ्यावी तसा तो आवाज कानात साठवून घेऊ लागले परिचित आवाज कानावर आला. माझ्या देशात कुठल्याही गावी येतो तसा आवाज आला

अरुणोदय झाला होता चागले उजाडू लागले होते मला एकदम तरतरी आली पहिला दिवस उजाडला होता पुढचे दिवस चागले जाणार याची ग्वाही देत होता तो आवाज ओळखा पाहू ?

उद्या सकाळी, आज दुपारीही मी तो ऐकेन सासुरवाशिणीचे सासरचे परकेपण असेच जात असेल का ? मला आता फार फार दिलासा वाटतोय. ह्याच्या व्यतिरिक्त माझे परिचित इथे आणखी कोणी आहे म्हणून म्हणूनच उत्साहाने पत्र पुरे करतेय ओळखल ? नाही ना ? पहाट झाली होती पक्ष्याचा किलबिलाट नव्हता पण उजाडले म्हणून शेजारच्या कुठल्या घरातला कोंबडा आरवून सागत होता. अगदी मुबईसारखा कुकुचकूऽ करत तस्साच अगदी तस्साच बाकी पुढील पत्री घरी सर्वाना याद.

सुधा गोखले ”

कुकुचकूऽ कोंबडा आरवला अगदी भारतासारखे उजाडले निशाचर सोबती

पळालेले होते खोल्यामागून खोल्या ओलाडत मी बाहेरच्या सिटिंगरूममध्ये आले काचेची भित, काचेचा दरवाजा असलेली सिटिंगरूम पडद्याने झाकलेली होती हळूच बाहेर डोकावले. तर भुतासारखा दिसणारा वॉचमन पहाटेच्या साखरझोपेत डाराढूर होता

इथे पहाटे दूधवाला भय्या वा दुधाच्या बाटल्या येणे प्रकार नाहीच. दारात बाधलेल्या कामधेनूप्रमाणे स्टोअररूममधील निडो (NIDO) दुधाची पावडर वापरायची. गरम कॉफीचा मग हातात घेऊन मी धीटपणे व्हराड्यात आले उजाडल होत पण पक्ष्याचा आवाज नव्हता पाळलेल्या कोंबड्याव्यतिरिक्त कोणत्याच प्राण्याची चाहूल नव्हती अगणात असलेल्या आब्याच्या मोहराचा मद वास मात्र येत होता सन्नू ! सन्नू ! मी दचकले मगाडी गुडघे वाकवून, कमरेत लवून तीनतीनदा नमस्कार करत होता आठ दिवसातल्या लेगॉसच्या वास्तव्यात अब्दुल्लाने 'हसा' भाषेतील चारपाच शब्द शिकवले होते सन्ना– How are you ? सन्नूदा I am well इत्यादी सन्नू ! सन्ना ! माझे मगाडीला उत्तर दहा मिनिटे सन्नू सन्नूदाचा घोळ आम्ही घातला अभिवादन हा प्रकार कमीत कमी दहा–पधरा मिनिटे नाही चालला तर समोरच्या थोर व्यक्तींचा अपमान होतो ही इथली समजूत. आमचे 'गुड मॉर्निंग' अभिवादन चालू असतानाच हेही उठून बाहेर आले पुन्हा पधरा मिनिटाचा घोळ ! मगाडी लोकाना फक्त फ्रेंच आणि हसा ही स्थानिक बोली भाषाच येते. नायजेरियाच्या उत्तरेस लागूनच असलेल्या 'नायजर' देशातील ही भटकी जमात अत्यत दरिद्री. साहजिकच शेजारच्या देशात जाऊन चार पैसे कमवायचे एक 'टू इन् वन' विकत घ्यायचा व देशाला परतायचे एवढेच याचे माफक ध्येय.

दिवसभर रेडिओवरच्या सगीताच्या तालावर या लोकाची हालचाल, टेपरेकॉर्डचा उपयोग कधीच नाही. कारण कॅसेट्स परवडत नाहीत पण घ्यायचा 'टू इन वन्च' स्टेटस् वाढत म्हणून सुशिक्षित जमातींपासून आदिवासी लोकापर्यंत हे लोण पोचलेल माझ्याजवळ 'हसा' भाषेचे आणखी ज्ञान नसल्याने मगाडीशी सवाद तिथेच थाबला

चहा होईपर्यंत जोन ऊर्फ 'रामा गडी' हजर झाला. इकडे याला म्हणतात स्टुअर्ट. अदबीने 'Good morning Madam Welcome to Minna How are you ?' इत्यादी अभिवादन झाले. पहिले घर स्वच्छ करून मग स्वयपाक करू हे वाक्य इग्रजीत समजावून सागण्यास मला हाताची पंधरा वेळा मदत घ्यावी लागली परभाषा इग्रजी म्हणून तेवढ जड जाणार नव्हत पण सिटिंगरूममधील इग्रजी बोलण वेगळ आणि स्वयपाकघरातील वेगळ माझ्या इथल्या वास्तव्यात ह्या नोकराला स्वयपाक शिकवायचा होता इथे पालेभाजी मिळते तिला म्हणतात टॅटॅ आपल्या पालकचवळी ह्या जातीतली तिला वरून लसणीची चरचरीत फोडणी दे. हे फक्त कृतीनेच दाखवणे शक्य होते हे ऑफिसला गेल्यावर मी आणि जोन कामाला लागलो. अगदी

झुरळे मारण्यापासून उदीर हाकलण्यापर्यंत नुसती स्वच्छता आणि स्वच्छता

भारतात कधीही हाताळायला मिळाली नव्हती अशी उत्कृष्ट चायना क्रोकरी' घरात भरलेली होती सहा फूट उंचीचा रेफ्रिजरेटर. दहा माणसे बसतील असे लंबगोल आकाराचे डायनिंग टेबल. २०'X२०'ची डायनिंग रूम त्याला लागून 'स्टोअर रूम' किचनमध्ये अद्यायावत कुकिंगरेंज गॅस व विजेवर चालणारी शेगडी स्वयंपाकासाठी वेगळा, पिण्याच्या पाण्यासाठी वेगळा फिल्टर चोवीस तास पाणी एअरकन्डिशन्ड बेडरूम्स. तीन टॉयलेटस हाताशी नोकर दाराशी AC कार शोफरसहित डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर हुद्दा असलेली मिलिटरीतील सन्माननीय नोकरी त्याचा रुबाब, त्या अनुषंगाने मिळणारा मान सर्व काही हात जोडून उभे होते. एखाद्या मध्यमवर्गीय मुलीच्या स्वप्नात तरी हे ऐश्वर्य असेल का ? कल्याणला चाळीत एका खोलीत आमचे पहिले बिऱ्हाड थाटले होते छोट्या माधुरीसह नंतर इतक्या जागा बदलल्या आता इथे होते सुखसोयींसह ' छकुली छान गडे ' असं गाणं होतं त्यात गाडीघोडा असणारा आय सी एस शिकलेला नवरा हवा होता मलाही कधी असे वाटले होते पण जग अनुभवल्यावर जगण्याची परिमाणे बदलल्यावर; आता फारसे कौतुक उरले नव्हते. कारण कसे जगावे याची कल्पना आलेली होती

आजूबाजूच्या बंगल्यात कसलीच कुणाचीच वस्ती नव्हती. सगळी ऑफिस ! कधीतरीच उघडणारी. त्यामुळे शांतताच शांतता स्वच्छतेचे काम उरकताना कधी चार वाजले कळले नाही हे घरी आले अजून माझा एकटी असल्याचा फील गेला नव्हता. म्हणून आम्ही एका भारतीय फॅमिलीकडे संध्याकाळी जाण्याचे ठरवले. मि सिंग यांच्याकडे अगदी प्रथम ' मिना गावात आल्यानंतर ह्यांना सिंग मंडळींनी जेवू-खाऊ घातले होते परदेशात सर्वच भारतीय मंडळी प्रांतभेद विसरून एकोप्याने वागत असावेत निदान मला तरी इकडे असे दिसले प्रथमदर्शनीच सिंगमंडळी मला अतिशय आवडली छोट्या पिंटूशी तर गट्टीच जमली कोणाच्या घरी गेल्यावर इकडे चहा, कॉफी विचारायची पद्धत नाही तुमच्या पुढ्यात बिअर अथवा व्हिस्कीच आणून ठेवली जाते बायकांसाठी सॉफ्ट ड्रिंक अथवा कोक. सिंग यांच्या घरीच प्रथम डॉ अरोराशी ओळख झाली. एकूण डॉक्टर लोकांशी माझे अतूट नाते आहे हेच खरे ! मला डॉक्टर सर्वत्र चांगलेच भेटले अगदी मिनात सुद्धा पुढच्या वास्तव्यात डॉक्टर अरोरा यांचा फार मोठा आधार मिळायचा होता म्हणूनच पहिल्या भेटीतच आमची मैत्री झाली. या सर्व लोकांच्याभेटीगाठीमुळे मनाला थोडासा दिलासा मिळाला

आम्ही घरी परतलो आज लाईट होते त्यामुळे गॅसऐवजी 'हॉट प्लेट 'वर स्वयंपाक केला. मला सगळ्याचेच नावीन्य वाटे तरीही मल्यामोठ्या डायनिंगरूममध्ये मोठ्या टेबलावर दोघेच दोघांनी बसून जेवणे नको वाटे शेवटी काही वयानंतर मुलेबाळे, नातेवाईक, मित्रमैत्रिणी, शेजारीपाजारी हाच खरा संसार राहतो. स्वयंपाकघरातील

यंत्रसामग्री, कटलरी हाताळताना केटरिंगला गेलेल्या माझ्या श्यामची आठवण यायची कॅडबरीचा तुकडा माधुरीच्या आठवणीने घशात अडकायचा तीच तऱ्हा आईस्क्रीमची रोमला आईस्क्रीम खायला मिळाले नव्हते तर हवे वाटले होते आता मिळत होते तर आठवण सोसायटीतील छोट्या पोराची आशीश, आरती, सोनलची प्राची, अमितची भारत नायजेरिया घड्याळात ५ तासाचे अंतर आम्ही जेवत असू रात्री तेव्हा मुले संध्याकाळचा चहा घेत असतील वाटे प्रत्येक वेळी मला तुलनेने आठवण यायचीच असे सुरुवातीचे चार दिवस फारच जड गेले. दुसरे दिवशी रात्री पाच सहा भारतीय मंडळी भेटायला आली एवढ्याशा छोट्या गावात २०-२२ भारतीय कुटुंबे राहात होती संपूर्ण नायजेरियात अठरा हजार भारतीय आहेत या अठरा हजारांपैकी खुद्द लेगॉसमध्ये नव्वद मराठी कुटुंबे आहेत आणि त्यातील पाच आमच्या पाल्याची। जग किती मोठे ! नि जग किती छोटेही आहे !

मिनातला एक दिवस पार पडला. आणि मी थोडीफार रुळले दुसरे दिवशीची सकाळ उजाडली उठताक्षणीच परत माझा प्रॉब्लेम. कालच एक पत्र व पु ना लिहिले होते तावडतोब आजच्या प्रॉब्लेमचे पत्र कुणाला लिहायचे ? पण लिहायला तर हवेच होते सकाळचे कामधाम आटोपताच मी पत्रलेखन करायचे ठरवले

भारत सोडल्यापासून माझ्या आंघोळीची पंचाईतच झाली होती मुंबईच्या चिकचिकी उन्हाळ्याने दोन वेळा आंघोळ करावीच लागे लेगॉसलाही कमी उन्हाळा नव्हता पण-- मान सांगावा जगात, अपमान सांगावा मनात म्हणतात मग निव्वळ फजिती त्यातला आनंद, विनोद कुणाला सांगावा ? मित्रमंडळींनाच परदेशी निघताना ठरवले होते यव करायचे त्यव करायचे मुख्य म्हणजे राहिलेले लेखन पुरे करायचे झाले काहीच नाही लिहीत सुटले नुसती पत्रेच पत्रे लाडकी लेक, युवराज भारतात श्यामबरोबर आई तसेच मैत्रीण या नात्याने वागायला आता थोडं थोडं जमू लागलं होत पण पत्र लिहिताना मात्र काळजीन मी फक्त आईच माझं हे आडनिड्या वयाच लेकरू एकटं कसं राहात असेल ? माधुरी सासरी हव-नको वाटू लागलेली आणि मी हजारो मैल दूर पुन्हा मी आईच भाचे कंपनी रंगीबेरंगी पोस्टकार्डासाठी राखीव निर्मलाताई उषा इत्यादी मैत्रीणी काय लिहू अन् काय नको वाटायचे कारण खूप सांगायचे असे शेवटी काहीच लिहिले गेले नाही टिळकमंदिरातील सरोजताई गानू स्नेहीच पण त्यांना फजिती कशी सांगू ? आधीच मला चिडवण्यात त्यांचा नंबर पहिला, त्यात ही भर ! जवळच नातेवाईक पत्रलेखनास फारसे नाहीतच. काय करू ? आम्ही ठीक इतपत खुशालीच सांगणं जिवलग सखी दुरावलेली परमस्नेही रुसलेले तरीही सर्वांवर माझा पत्रांचा सतत पाऊस हे नवीन पॅडस आणून देत होते हो, आणखी पोस्टेजही भारतातली एक प्युअर सिल्क साडी नक्कीच आली असती पण अजूनही होणारी रोजची फजिती कुणाला सांगू ? आणि सांगितल्याशिवाय तर राहवत नव्हते

एकदम आठवले दादा! म्हटले तर लेखनाचे गुरू, म्हटले तर मार्गदर्शक, हितचिंतक. थोर मनाने आपल्या मित्रमंडळींच्या ग्रुपमध्ये सामावून घेणारे ज्येष्ठ स्नेही चांगले पाहणे, चांगले वाचणे, चांगली माणसे पारखणे मी त्यांच्याकडून शिकले प्रायोगिक नाटके पाहण्याची गोडी त्यांनीच लावली आणि विश्रब्ध शारदा ते चक्रवाक देशी पर्यंतची पुस्तके वाचणेही लहानपणापासून मला वाचनाची आवड- मनोहरने आणि मी कितीतरी पुस्तके—किशोरकथा, मासिके वाचली. पण मोठेपणी त्याला फारशी दिशा राहिली नव्हती ती दादांनी लावली रसग्रहणाचे नाटक, सिनेमा पाहणे, पुस्तके वाचणे त्यांनी शिकवले माझ्या फजितीचे रसग्रहण तेच करू शकतील

ती दादा

सा न

आफ्रिकन पोस्टकार्ड पोचले असेलच कोणी लेगॉसला जाणारे भेटल्यास बरे होईल. पत्र लवकरच पोहोचेल नाहीतर मीच यायची आधी, पत्र नंतर, असं व्हायचं इतकं इथलं पोस्टखाते नामांकित! दिल्लीवारी श्यामने सांगितलीच असेल आणि रोमन हॉलिडेही इंग्रजी शिका गोखलेबाई ' हा तुमचा सल्ला गंभीरपणे आता मात्र मनावर घ्यायला हवा माझ्या तुटपुंज्या इंग्रजी ज्ञानावर जगात थोडेबहुत वावरता येते पण चांगले वाचता येत नाही म्हणून आणि इथल्या टी व्ही वरचे कार्यक्रम समजत नाहीत म्हणून इंग्रजी शिकायलाच हवे. लिहायला आणि वाचायला कदाचित कायम-चीच इथे राहिले तर ?

अपघातातून तर बचावले लेगॉसची सैर झाली आणि मिना या आमच्या गावात आलो प्रवास छान! पाहिले म्हणाल तर खूप पण जगप्रसिद्ध असे इथे काहीच नाही मात्र आशियातले सर्वांत मोठे नॅशनल थिएटर आहे ते पाहिले अप्रतिम आहे आमचं मिना गाव छोटंसंच आहे एका राज्याची राजधानी आहे पण वळण रूप खेड्याचं आमचं घर मात्र मोठं आहे फिरून पाय दुखायचे अद्ययावत सुखसोयींनी समृद्ध आहे पण त्या सगळ्याच सुखसोयी उपभोगता थोड्याच येतात? एकतर मी एकदम कटाप केलीय सिनेमात पाहायलाच ती छान असं ठरवून टाकलं खरं म्हणजे माझी ही अडचण ( फजिती ) रोमपासूनच सुरू झाली रोमचे हॉटेल मोठे झकास! श्यामच्या केटरिंगच्या भाषेत—फाइव्ह स्टारचे. मला पाठदुखीमुळे डनलॉपची गादी वर्ज्य! रोमला भरपूर भटकल्यावर तीनच गोष्टी हव्या होत्या झकास झोप मग चविष्ट जेवण. आणि ताजेतवानं होण्यासाठी गरम गरम कढत पाण्याची आंघोळ! सगळं होतं पण—

मोठाच पण होताना. नॉन्‌व्हेज मी खात नाही सुका ब्रेड व बेचव सूप चविष्ट मानले थकल्यामुळे झोपही आली परंतु फोमची गादी व त्याखालची स्प्रिंग सुखावह वाटत नव्हती मुंबईला चटईवर पसरलेली गादीच योग्य आता राहिली आंघोळ—

गरम पाणी, साबण, स्वतंत्र बाथरूम सबकुछ होते आणि होता चकचकीत पांढरा-शुभ्र टबही. त्याला असलेला एक नळ फिरवला तर गारगार शॉवर ? मरणाची थंडी, मोजकेच कपडे त्यात हा मृच्छकटिकातला पाऊस दुसरा नळ फिरवला तर गरम पाणी असेल असे वाटले पण त्यातून निघाला सुवासिक शापूचा फेसाळ फवारा म्हणजे मला घसरण्याचा धोका सर्व नळ बंद करून उघडून कोमट पाण्याने टब तर भरला/ ताब्या ही चीज नव्हतीच तेव्हा ह्याच तलावात बुडी घ्यायची हरहर गंगे म्हणत खरं म्हणजे मी नदीकाठी राहणारी, विहीर तळ्याकाठी वाढलेली छान पोहायला येणारी तेव्हा या हॉटेलमधल्या एवढ्याशा टबात बुडण्याचा धोका नव्हता आत उतरण्यासाठी पाऊल उचलले आणि चकाचक टाईल्सवरून दुसरे पाऊल घसरले कशीबशी तोल सावरून उभी राहिले असाच पाय टबमध्ये घसरला तर ! रोममध्ये भटकताना मधल्या आजाराने आलेले अधूपण विसरायला झाले होते. आता आठवले आणि भरवसाच वाटेना टबमध्ये उतरण्याचा

खोलीत मस्त पॉप म्युझिक लागले होते स्वयपाक घरकाम याची कसलीच घाई नव्हती नळ जाण्याची धास्ती नव्हती. पार्ल्याला घरी वेळी अवेळी कोणीही टपकते, इथे कोण येणार आहे बेल वाजवायला ? भरपूर वेळच वेळ होता. थकले होते सर्वांगाला गरम पाण्याचा सुखद वाटणारा स्पर्श हवा होता सुंदर सुवासाचा शापू होता व पु नी सप्रेम भेट दिलेले पुस्तक वाचायला होते सगळं करून पहावस वाटणारं होत. बरस टबात पहुडून पुस्तक वाचायचे, म्युझिक ऐकत थकवा घालवायचा, चार-पाच डॉलर्स शिल्लक होते 'कोक' पिता आला असता माधुरी असती तर "ऊठ आता बयो पाण्यातून" म्हणावे लागले असते माझ्या एका मैत्रिणीला या टबचे अतिशय आकर्षण तिने कित्ती कित्ती टिप्स दिल्या होत्या. पाय घसरल्यावर भीती वाटली तर काय करावे याची टिप दिली नव्हती आणि दादा, मी चक्क घाबरले हो त्या घसरगुंडीला घसरून पडले तर ? हाडबीड मोडले तर ? माझ्या बाबतीत अशक्य ते सर्व घडतच होते टबमध्ये बुडून मेले तरी नवल वाटायला नको शॅम्पूच्या ॲलर्जीने फटाफट शिंका आल्या तर दमा उद्भवणार. अधू हाताने तोल तरी कसा सावरणार ? समोरचा टब म्हणजे खवळलेला समुद्र वाटला खरोखरच इतक्या चकचकीतपणाची, गुळगुळीतपणाची सवय नाही

सांगलीतले मोठ्या घरातले जुने न्हाणीघर आणि गिरगावातल्या चाळीतील खोलीतली एवढीशी मोरी व आत्ताच्या ब्लॉकसिस्टिमची तीन बाय चारची बाथरूमच ठीक गिझरच्या पाण्याने भरलेली बादलीच बरी स्वीमिंग टँक, नदी, विहीर, पोहायला ठीक आता कुठे ते राहिलय ? जीवघेण्या आजाराने अजगरासारखे सर्वच गिळून टाकलय मग राहिली फक्त भीतीच ! अगदी एवढ्याशा टबातही घसरण्याची, बुडण्याची. स्थूल देह सावरता येणार नाहीच आणि कंबरेचे हाडमात्र मोडणार छे

नकोच ते रणांगण टाकून पळणाऱ्या पळपुट्या योद्ध्याप्रमाणे मी केलं चक्क ड्राय क्लीनिंग !

सांगलीची कृष्णानदी, पंढरपूरची भीमानदी, विजापूरच्या विहिरी मला क्षमा करोत अशी झाली गंमत रोमला आता वाईट वाटतंय कारण इथेही तेच आहे टेप-रेकॉर्डर आहे वेगवेगळ्या वासाचे शॅंपू आहेत एकाच घरात तीन टॉयलेट, तीन टब्स आहेत आणि रोमला मनात बसलेली भीतीही आहे मग मी चक्क चाळकऱ्यांच्या मोरीप्रमाणे टबचा उपयोग केला टबमध्ये बादली ठेवून अंघोळ वर स्पष्टीकरण–असं अंगावर पाणी घेतल्याशिवाय स्वच्छ आंघोळ झालीशी वाटतच नाही ! त्या टबच्या पाण्यात काय भाजी शिसळल्यासारखी आंघोळ! जमिनीवरून पाणी वाहून जायला मार्गच नाही ( फ्लोअर ड्रेनेज ), त्यामुळे रोजच टबमध्ये उतरून ( तोल सावरत ) बादली नळाखाली ठेवून सासुरवाशिणीप्रमाणे अंग चोरून बसत माझी आंघोळ उरकली जाते तीही दिवसातून एकदाच. कितीही उकडले तरी यापुढे एकाही सिनेमातला हिंदी, इंग्रजी, मराठी टब-बाथचा सीन मला मोहवू शकणार नाही कारण कधीकधी सत्य वेगळेच असते दुरून पाहायला आपले सर्व ठीक तर अशी आहे माझ्या अँग्लो-इंडियन टब-बाथची गंमत तुमच्या एखाद्या कथेत उपयोगी पडेल अशी

आपली एफ. बी आय मंडळी काय म्हणतात ? या सर्व शब्दाचा अनुभव इथे येत आहे 'फ्रेन्डस बुक्स अँड इंटिमसी' याची अन्न-वस्त्र निवारा इतकीच परदेशात जरूर वाटते मला म्हणूनच तुमच्यासारख्या स्नेह्यांच्या स्नेहाचे मोल अमोल ! इथेच थांबते,

मित्रमंडळींना नमस्कार

तुमची नम्र
सुधा गोखले

मिनातील दोन दिवस संपले होते. तिसऱ्या दिवशी उजाडता उजाडता अगदी जवळच राहणाऱ्या भारतीय शेजारीणबाई गरम गरम इडली-सांबार घेऊन आल्या या पॉंडेचरीच्या ख्रिश्चन नको धर्माच्या मिनामधील वास्तव्यात धर्म-जातिभेद मला फारसा आढळला नाही मग आपण भारतातच असेच का भांडतो ? पुढे माझी परिमला राजीशी चांगलीच गट्टी जमली नवीन मोठा मुलगा डिक्टो रागिणी–चांदणी जुळ्या मुली अगदी, डिक्टो सारख्या परिमला त्या दोघींना कपडेही सारखेच घालायची मग माझी नेहमीच फजिती व्हायची रागिणी कोण ? चांदणी कोण ? मोठ्या गोड पोरी त्यांच्या मदतीनेच मी आजूबाजूच्या नायजेरियन बच्चेकंपनीशी मैत्री जमवली सगळ्यांनाच इंग्लिशचे ज्ञान नामांकित त्यामुळे नो प्रॉब्लेम ! एकमेकांना आमचे समजायचे हे काय कमी होते ? नायजेरियात दोन शब्द महत्त्वाचे. कोणतीही गोष्ट अडली की प्रॉब्लेम, समजली की नो प्रॉब्लेम त्यामुळे स्वयंपाक शिकवताना गड्याला

आणि मला नेहमीच प्रॉब्लेम असे. या मुलामुळे मात्र पार्टीमध्ये वावरताना माझा प्रॉब्लेम कमी होत गेला सर्व भारतीय जमून नेहमीच गेट टुगेदर व्हायचे कधी पिक-निकही असायची. त्यातही समान आवडीच्या लोकांचे ग्रुप व्हायचे विशेषतः दक्षिण भारतीय एकत्र जमून मातृभाषेत बोलायचे अगदी पुरुषसुद्धा लेगॉसची आठवण झाली पाच-सहा मराठी मंडळी आम्ही एकत्र जमायचो बायका मराठीत बोलत असू, कारण विषय मुख्यतः स्वयंपाकाचा. खमंग-टमंग, चटक-मटक अशा शब्दांना पर्यायी इंग्रजी शब्द नव्हते. पुरुष मात्र एकमेकांशी राजकारणापासून स्वयंपाकापर्यंत इंग्लिश-मध्येच बोलत मिनातही आम्ही जमत असू तेव्हा बहुतेक संभाषण इंग्रजीतूनच भारतीय असलो तरी परदेशात राहिल्यामुळे हिंदी येत नाही हे दाक्षिणात्यांचे म्हणणे बायकांचा प्रश्नच नव्हता बायकांची मुख्यतः चर्चा नवीन साडी, नवीन खरेदी, नवऱ्याची परदेशातल्या नोकरीची कॉन्ट्रॅक्टस व्हाया कुवेत येताना केलेली सोनेखरेदी आणि भारतात परतताना नेलेले टू-इन-वन, थ्री-इन-वन तऱ्हेतऱ्हेचे कॅल्क्युलेटर वगैरेंच्या जोडीला युरोपची सैर. भरपूर पैशात युरोप पाहिला या अहंभावात मला फारसा रस नव्हता ना खरेदीत, ना वेगवेगळ्या सोन्याच्या दागिन्यात, की सिफॉन वगैरे साड्यांत. साहजिकच या गप्पांत मी बोअर व्हायची मग मी नेहमीचा उपाय शोधून काढला कारण भारतातही असे प्रसंग येतच कधीकधी

अमेरिकेसारखं पार्टीला जाताना मुलांना खेळण्याच्या खोलीत सोडून द्यायची पद्धत नव्हती मुलं, मम्मी-डॅडीबरोबरच येत. मला गप्पांत रस नव्हता. तसंच फाडफाड इंग्लिशही बोलता येत नव्हतं कोणी हसेल ही भीती विशेषतः ह्यांची म्हणून सोपा मार्ग म्हणजे आलेल्या बच्चे कंपनीत मिसळून जाणे. हिंदी-इंग्रजीच्या भेसळीत गोष्टी सांगणं जमून जायचं पर्समधली कॅडबरी मदतीला सदैव तत्पर असे. या गप्पांतूनच कळलं. इथली मुलंसुद्धा बरोबरच्या मित्रांचा दर्जा, त्यांच्या वडिलांची परदेशात नोकरी किती वर्षे झाली यावर ठरवीत उदा डॅडींची दोन कॉन्ट्रॅक्टस झाली तिसरं चालू आहे ' ' आमची झांबियात दोन कॉन्ट्रॅक्टस झाली आता नायजेरियात टू ' कारण जितका परदेशवास जास्त तितका भारतात साठणारा पैसा जास्त हे समी-करण लहान मुलांनाही उमजलेलं होतं. तरीही या छोट्यांच्या कंपनीतच मला जवळपास राहणाऱ्या नायजेरियन लोकांची माहिती समजत होती आठ-दहा दिवसांनंतर जास्त ओळख झाल्यावर अब्दुल्लाने मला एक प्रश्न विचारला आणि मी हादरले!

' मॅडम, यू आर ओनली वन वाईफ टू मास्टर? व्हेन यू वुईल गो बॅक! वॉट्स अबाऊट न्यू मॅडम? '

इथे मुसलमान समाज जास्त आणि बहुपत्नीत्व असलेला आमच्या ड्रायव्हरलाच तीन बायका. कमीत कमी तीन बायका नसतील तर समाजात त्या माणसाला स्टेटस नाहीच मोठा देश, कमी लोकसंख्या या कारणामुळेही कदाचित असे असेल.

दारिद्र्याचे दुःखही नाहीच श्रीमंत होण्यासाठी कष्ट करण्याची मानसिक तयारीही नाहीच साहजिकच झटपट श्रीमंतीसाठी 'रॉबरी आलीच' मग त्यात डॉ शहा-सारख्या निरपराध माणसाचा खून झाला, तरी कुणाला काही वाटत नाही एकूण सर्व जीवनच जंगलातील वन्य पशूच्या कायदेकानूवर आधारलेले गेला दिवस मजेचा उद्याची फिकीर नाही भारतातील आदिवासी संस्कृतीही अशीच ढोलकीच्या तालावर घुंगरू बांधलेले पाय नाचतात इथे वेस्टर्न म्युझिकच्या तालावर शनिवारच्या रात्री आजूबाजूची शांत असलेली ऑफिसेस गजबजून उठली. आत्रा सॅटरडे नाईट फीचर टीना चार्लस यांचे वेगवान रिदमयुक्त म्युझिक त्यावर रात्र रात्र नाचणारे आफ्रिकन तरुण-तरुणी नुसता जल्लोष 'डिस्को' म्हणजे काय ते आताच कळले सर्वच आफ्रिकन देशात पाश्चिमात्य सुरांचे वेड वेगाचे वेड! म्युझिकही तसेच वाहनाचा वेगही तसाच बाकी आयुष्य मात्र सुस्त आळशी

एक–एक दिवस जायचा तसा तसा नवीन अनुभव यायचा मिनात यऊन चारच दिवस झाले होते मी शाकाहारी आणि भाजी नसेल तर काय? प्रकृतीमुळे बटाटा वर्ज्य दोन दिवसानतर डोळ्यासमोर पाल्यातले भाजीने भरलेले मार्केट येऊ लागले चवळी, पालक, समुद्रमेथी, साधी मेथी, लाल माट, शेपू चाकवत, चुका, मुळा, मायाळू ह्या नाहीतर लालभोपळा, दुधी, कोबी, फ्लॉवर, गाजर, मटार, वांगी, वालपापडी, गवार, फरसबी घ्या सर्व सीझनला सर्व भाज्या इथे फक्त कांदा, बटाटा, टोमॅटो, टॅट नावाचा पाला, जाडजूड बुटकी भेंडी, तिला म्हणतात ओक्रो इंग्रजीत लेडीज फिंगर कुठे नाजूक रमणीची नाजूक सुकुमार बोटे, कुठे ही जाडजूड भेंडी चार दिवसानतर माझी उपासमार ह्यांना बघवेना उकड्या तांदूळ मला खाववेना एकूण स्वयपाका साठी खरेदी करणे आवश्यक होते सिंग फॅमिलीसह आम्ही 'कडूना' या मोठ्या गावी जायचे ठरवले भाजी आणायला पाल्याहून भायखळ्यालाच जाण्यासारखे फक्त अंतर जाऊन येऊन ८०० कि मी पाण्यासारखे पेट्रोल तेही ऑफिसचे ड्रायव्हर ऑफिसचा, गाडी ऑफिसचीच ह्याची नोकरी ऑफिससाठी मग इतक्या दूर भाजी आणायला जाणे म्हणजे नो प्रॉब्लेम! भल्या पहाटे निघून तीन तासाचा प्रवास करून 'कडूना' ला येऊन पोहोचलो मोजसन लेव्हेंटिस, युटिसी, किंग्जवे सारख्या मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समधून खरेदी करतानासारखे भारतीय दिसत होते तूर डाळ, पांढरा अमेरिकन तांदूळ, पापड, फ्रोजन मीट, फिश फटाफट पदार्थ संपत होते मग खास नायजेरियन मार्केटात गेलो आम्ही भारतीय दिसताच भाज्यांचे भाव भराभर वाढले रणरणत्या उन्हात १३ रु ( १ नायरा ) पौंड कोबी, २६ रु पौंड फरसबी अशी महागडी खरेदी केल्यावर भारतातली महागाई विसरायला झाली

हिंडता-हिंडता मी अचानक थांबले सामानासाठी आम्ही एक पाटीवाला मुलगा केला होता आपल्याच नादात शीळ घालत तो चालला होता गाणे होते हिंदी

फूलोंका तारोंका सबका कहना है एक हजारोंमे मेरी बहेना है। शब्द त्याला येत नव्हते पण चाल जमली होती इथे हिंदी सिनेमा फार पॉप्युलर आहेत लेगॉसमध्य तर तीन थिएटराना हिंदी सिनेमे सतत असतात धर्मेंद्र सर्वांचा आवडता हीरो हिरॉईन हेमामालिनी 'शोले' इथे दोन महिने चाललेला पिक्चर, मला तर ऐकून मजाच वाटली मी त्या मुलाला डॅश देऊन ते गाणे ऐकले तो खूष मी खूप! डॅश हा इथला खास प्रकार म्हणजे आपला स्पीड मनी ऊर्फ बक्षिस मला डॅश शब्द आवडला गिव्ह मी डॅश फॉर चॉप हे कॉमन मागणे चॉप म्हणजे पुरत्वा जेवण, चहापाणी एक शेर टोमॅटो घेतल्यावर भाजीवाला चार-पाच टोमॅटो टाकतो त्यालाही म्हणायचे डॅश. पुन्हा हा नाकारला की अपमान देणाऱ्या घेणाऱ्याचाही म्हणून डॅशची देवाण-घेवाण दोन्ही बाजूनी होत असते

मी लेगॉसला ह्यांच्या ऑफिसात गेले होते माझे परतीच तिकीट मिळवण्यासाठी तिथे कळले माझी फाईलच हरवली आहे साहजिकच प्रॉब्लेम ' अर्थात मला, पण ह्यानी चटकन् थाच नायरा त्या क्लार्कला दिल्यावर नो प्रॉब्लेम ' नवीन फाईल उघडून मला तिकीट देण्यात आले असा हा डॅश भारतात परतल्यावर आमच एक मित्र बोलताना म्हणाले तो डॅशिंग नेचरचा माणूस आहे मी आणि हे खो-खो हसू लागलो कारण आता आम्हाला डॅशिंग नेचरचा वेगळा अर्थ समजला होता हा किस्सा कळल्यावर त्या स्नेह्याचा चेहरा पाहण्यासारखा झाला नायजेरियात भटकताना क्षणोक्षणी भारतातील परिवाराची आठवण यायची मुलाची आठवण येण नैसर्गिक होत पण नायजेरियन लोकांचीच मैत्री हवी होती नाहीतर या लोकांविषयी कटुताच ठेवून मी हा देश सोडला असता कडूना हून परतताना आजूबाजूची खेडी दिसत होती आफ्रिकन आदिवासी दिसत होते आम्ही त्यांच्यापासून फार वेगळे आहोत हे जाणवत होते त्यानाही, आम्हालाही मला हे जाणवण पुसायच होत या लोकाच्यात मिसळायच होत– पण कसं ?

मिनात रोज सध्याकाळी कुठेतरी जात असूच आधी माझा मुक्काम फक्त एक महिन्याचा त्यामुळे भारतीय मडळींना आम्ही जेवायला बोलावणे व त्यानी आम्हाला यातच निम्म दिवस गेले त्यातच नायजेरियन मेजर फाकुरोडे, श्री उशीशी ( आता ते मत्री झालेत ), आमचा ड्रायव्हर अब्दुल्ला, अलाटापी बाकु ही मडळी होतीच श्री उशीशी हे नेहमी लेगॉसला राहात आम्ही लेगॉसला त्यांच्या घरी गेलो होतोच या एकदा चहाला म्हटल्याप्रमाणे त्यानी बोलावले उद्या संध्याकाळी या, लेटस हॅव सम ड्रिंक्स टुगदर इथे ड्रिंक्स म्हणजे फक्त ड्रिंक्स घेण्याची पद्धत मला माहीत नाहीच कारण मी राहते त्या समाजात असे काहीच नाही ह्यांचे मित्रमडळ फार मोट नाहीच. जे चारपाच जण येतील ते बरोब्यानेच तमा पसारा माझाच मोटा चहा, कॉफी, सरबत, बस्स एवढेच इतर देशातीलही मला माहीत नाही पण इथ मात्र

ड्रिंक्स म्हणजे फक्त ड्रिंक्स त्या दिवशी सध्याकाळी श्री उशीशी याच्याकडे ड्रिंक्स घ्यायला गेलो आम्ही आल्याचे कळताच स्वतः उशीशीच बाहेर आले नायजेरियातील प्रचड श्रीमत लोकापैकी हे एक साहजिकच त्याचे घर पाहण्याची मला जास्त उत्सुकता आणि हॉल होताही तसाच फक्त हॉलच पाहिला तुमच घर दाखवा म्हणणे अप्रस्तुतच पण हॉल मात्र अतिशय देखणा सजवलेला होता उच्च अभिरुची म्हणजे अर्थ न कळतील अशी मॉडर्न आर्टची दोन-तीन चित्रे भिंतीला लावणे, घरात कॅकटस वगैरे ठेवणे अशी माझी काहीतरी समजूत होती जोडीला अँटिक्स वगैरे हवीतच उशीशींच्या हॉलमध्ये उत्तम रेशमी इराणी गालिचा घातलेला होता कोच वगैरे सामान लाकडाचे कोरीव काम केलेले होते भिंतीला दोनच चित्रे होती. एक जगलाच दुसरे हसऱ्या किशोरीचे गोल आकाराचा टेबल-लॅम्प, झुंबर, साईड-टेबल, जवळच बार इत्यादी मोजकच सर्व होत पण उत्तम प्रतीचे होते. अशा वस्तू हाताळायची मला सवय नसूनही हातातील 'शेरी'चा काचेचा ग्लास फार मौल्यवान, किंमती आहे हे कळले नाजूक सोनेरी पक्षी, पातळ, पारदर्शक काच आणि त्यातील चमकदार आमसुली रगाची शेरी पाहायलाही मला बरे वाटल होते शेरीची चवही तितकीच अप्रतिम ! दारू म्हटल्यावर ठरावीक दृश्य डोळ्यासमोर उभे राहते पण शेरी दारू वाटलीच नाही

सध्याकाळी सहा वाजता उशीशींकडे ड्रिक्ससाठी जायचं होत साडेचार वाजताच आमची खरेदी व इतर कामे सपली होती. मरीनाहून इलुपेजला जायचे आणि परत यायचे हा मायलजच्या फेन्यापेक्षा त्याला लागणाऱ्या वेळेचा प्रश्न महत्त्वाचा होता लेगॉसमध्ये सर्वत्र फ्लाय ओव्हर्स आहेत. मोटारी वेगाने धावतात आणि एकदम थाबतात, की सुरू झाला गो स्लो म्हणजे आपला 'ट्रॅफिक जॅम कुठतरी एखादा अपघात होतो एखादी गाडी बद पडते असा रस्त्यावर काही अडथळा निर्माण झाला की तो दूर करीपर्यंत गो स्लो चालतो कधी कधी तो तीन-चार तासाचाही असतो. शिव्या घालण्याशिवाय आपल्या हातात काही नसत म्हणून त्या दिवशी मरीनामधल्याच एका हॉटेलात दोन तास वेळ घालवायचे आम्ही ठरवल फेडरल पॅलेस लेगॉसमधील ताजमहलच्या तोडीचे हॉटेल प्रशस्त हॉलमध्ये मद सगीताचे सूर घुमत होते

आम्हीही एक कोच गाठला समोरच्याच कोचात एक नायजेरियन बसला होता "'हॅलो करून स्मितहास्याची देवाणघेवाण झाली त्याच बिअर पिण चालल होत आम्ही थडगार चॅपमनचा आस्वाद घेत होतो आठ दिवसाची धावपळ आणि वर हे आईसकोल्डड्रिंक ! मला सणसणून शिक आली सॉरी समोरचा नायजेरियन पुटपुटला 'ओकशी दुसरी शिक पुन्हा 'सॉरी मला शिकावर शिका त्याच सॉरीवर सॉरी मध्ये एक क्षण मी थाबताच त्यान मोठ सॉरी म्हटल आणि बिअर मग सह दुसऱ्या कोचावर पलायन केल माझ्या शिका चालूच होत्या शिकाचा कोटा पूर्ण

झाला जरा उसंत मिळताच ह्याना विचारले, 'माझी शिंक आणि त्याचे सॉरी का ?' ही इथली मॅनर्सची पद्धत ! आमच्या देशात तुम्ही आलात नि तुम्हाला सर्दी झाली त्याचा तुम्हाला त्रास होतोय याबद्दल आम्ही दिलगीर आहोत, म्हणून सॉरी ! गो स्लोमुळे ऑफिसला यायला उशीर झाला तरी सॉरीच घरात काम करणारा नोकर आला नाही म्हणून तुम्हाला घरकाम करावे लागले तर त्या दिवशी भेटणारा प्रत्येक नायजेरियन म्हणे 'सॉरी ! कामाला मदत करायला कोणी येत नसे पण सॉरीची सहानुभूती सर्वांकडून

माझ्या एकटीने येण्याचे श्री उशीशींनाही आश्चर्य वाटले विशेषत त्यांच्याच ऑफिसच्या पत्त्यावर मी येत असल्याची तार पाठवली होती ती न मिळाल्याने त्याना अतिशय खेद होत होता तो ते सारखे व्यक्त करीत होते मला नायजेरिया पाहायचा आहे म्हटल्यावर त्यानी सर्व मदत करण्याची तयारी दाखवली नायजेरिया-हून भारतात परतण्याची व्यवस्था आत्ताच करून आम्हाला लेगॉस सोडायचे होते त्यासाठीही त्यानी मदत केली थंडीमुळे युरोप ट्रिप रहितच केली पण तसेच तर परतायचे नव्हते म्हणून केनिया, इथियोपिया, ईजिप्त असे फिरायचे ठरवले आमचा हा बेत उशीशींनाही आवडला पण आम्ही लडन पाहात नाही याचे फार वाइट वाटले. लडनवर त्याची फार भक्ती सर्वच नायजेरियनाना एकदा तरी लडनला जाऊन यावे वाटतेच लडन पाहून आला तो खास प्रवासी ! उशीशींच्या इग्रजीशी माझी गाडी मारखीच अडायची अतिशय सॉफ्ट आणि भराभर बोलणे मला जमतच नसे आणि मी काय बोलणार हा प्रश्न होताच तासभर आम्ही तिथे होतो घरच्यापैकी कोणी फिरकल नाही. अगदी मुलेबाळेसुद्धा निघताना मात्र उशीशी म्हणाले, माझी बायको बाहेर गेलीय तुम्ही परत एकदा या. तेव्हा भेट होईल उशीशींना दोन-तीन बायका आहेत त्यामुळे कोणत्या बायकोला भेटायला परत यायचे हे न समजून आम्ही गलोच नाही एअरपोर्ट प्रसगाच्या पार्श्वभूमीवर उशीशींचे अगत्य, मार्दवशील बोलणे, वागणे, सजवलेले घर आणि उत्कृष्ट 'शेरी ' माझ्या आठवणीत राहिली

हेच श्री उशीशी कामानिमित्त मिनास आले तव्हा आवर्जून आमच्या घरी चहा-फराळाला आले होते साबुदाणा खिचडीवर खूष झाले होते मेजर फाकुरोडेंनाही आपल बटाटेवडे आवडले त्याच्या बायकोला कैरीचे लोणचे आणि लसूण चटणी वगळे म्हणजे मेजरनी आवडीने चहा करायला सागितला पुन्हा मागूनही घेतला ते फारस ड्रिंक घेत नाहीत (मिलिटरीचा माणूस आणि चहा ' मला हसूच आल मी पुन्हा जाईन का नाही माहीत नाही हे लोक ओळखतील की नाही माहीत नाही, पण याच्या पत्रातून येते, दोघेही माझी आठवण काढतात मेजरला तर माझे खेडी, बाजार बघणे, आदिवासी बाळाला कडेवर घेऊन फोटो काढणे या उत्साहाचे कौतुक वाटले त्या आदिवासींबरोबर फोटो काढून घ्यायचा एवढाच माझे मत होते सहज

एक छोटे बाळ कडेवर घेतले आणि मेजरने तो क्षण टिपला 'भटुरे' लोकांनी आपले मुलाला हातात घेतले याचेच त्या आदिवासी बाईला अप्रूप त्यातून गौरवर्णीयाची फोटोची हौस वेगळी मी तर 'इंडियन भटुरे' त्याना थोडी नवलाईची होते आज मनात विचार येतोय इथे काहीही कारण नसताना एखाद्या झोपडपट्टीतील मुलाला मी कडेवर घेईन का? सगळी मुले सारखीच मग माझ्या नातवाइतकेच मोलकर-णीच्या नातीचेही गोंडस, देखणे म्हणून कौतुक करेन का? की काजळाने बरबटलेले डोळे, तिटीने माखलेले कपाळ, तेलाने थबथबलेले जावळ म्हणून नावे ठेवेन? 'शोमन-शिप' सर्वत्रच असते फोटोसाठी असे देखावेही केले जातात पण त्या छोट्या बाळाला कडेवर घेताना मात्र मेजरने घेतले म्हणून मी घेतले कारण लहान मूल म्हणून मी सहज हात पुढे करताच हसून त्यानेही हात पुढे पसरले हेच हसणे आज माझ्या लाडक्या नातवाचेही असते

मेजरमुळे मला बाजारात हिंडता आले उशीशींमुळे उच्चभ्रू नायजेरियन पाहिले. शोमनशिप असली तरी जिव्हाळाही तितकाच खरा होता जो मला अजूनही वाटतो मला खरेखुरे मनापासून नायजेरियन लोकात मिसळायचे होते त्याच्यासाठी काळे (ब्लॅक) हा सर्व मराठी भाषिकांचा शब्द मुले एकत्र खेळत पण पालकांचे संबंध जुजबी ऑफिशियलच राहात

'जादूगोडा' ह्या बिहारमधल्या प्रॉजेक्टच्या ठिकाणी आम्ही राहात होतो सर्व-प्रांतीय लोकांची कॉलनी होती आवडीनिवडीप्रमाणे घरोबा कमी अधिक जमत होता 'जैतका' हा आमचा पाच-सहा फॅमिलींचा खास दोस्त दिल्लीला निरर्थक आठ-दहा दिवस राहताना रोज मला वाटे जैतका इथे भतिंड्यास तर आहे जाऊन भेटून यावे निदान त्याला कळवायला तरी हवे होते 'मोठी भाभी' म्हणत धावत आला असता मित्रा, बॅनर्जी, चट्टोपाध्याय, शर्मा, भटनागर, स्वामी, चल्लाप्पा, राव, कानडे, पटेल, मुळगुद सर्व प्रांताचे लोक होते सतत कोणाकडेतरी गप्पा, जेवण जमत असू पण शेवटी सर्व भारतीयच होतो व त्यातही आम्ही मराठी, बिहारी, तेलगू असे ग्रुप होतच होते इथे नायजेरियात—मिनात—मात्र सर्व भारतीयच आम्ही एकमेव मराठी सीमेवरचे उत्तरेच्या आणि दक्षिणेच्याही

मिनात मी मेजर फाकुरोडेंच्या घरी जास्त गेले तसेच समोर एक सेक्रेटरी राहात त्याच्याकडे कधीतरी पाणी आणायलाही गेले बाकी नेहमी ऑफिसकामासाठी घरी येणारे लोक, नोकर-चाकर, ड्रायव्हर एवढेच भेटत माञ पुन्हा नायजेरियाला जाण्याची संधी मिळाली तर मात्र नक्कीच जास्त नायजेरियनांना भेटेन संधी परत मिळेल का? आणि भारतात उशीशी आले तर आम्ही त्याना भेटू का? उशीशींना भारत फार आवडला विशेषतः 'ताजमहाल', हॉटेल, तिथले जेवण आणि चहा कदाचित ते भार-तात येतीलही पण चाकरीसाठी, पोटासाठी गेलेल्या परक्या देशातील लोकांशी कितपत

मैत्रीचे संबंध राहतील मला माहीत नाही त्यातून सर्वच आफ्रिकन देशावर रानटी, क्रूर, मागासलेले असा शिक्का बसलेला ओळखीच्या कितीतरी भारतीयांचे परदेशी मित्र आहेत पण ते गौरवर्णी ! रशियन, जपानी, थाईपासून सर्व आहेत अफगाणी, इराणीही आहेत पण शोधूनही मला कोणी भेटले नाही की ज्याची पत्रमैत्री एखाद्या आफ्रिकनाशी आहे होऊच शकत नाही का ? लिहिण्याचा त्या लोकांचा आळस आणि आपले गोऱ्या कातडीचे आकर्षण आज इथे फोटो पाहताना मला 'मिना' गाव दिसते मेजरची 'पुसी' मांजरी, त्याने उत्साहाने दाखवलेली तिची पिल्ले आठवतात सध्याकाळ होताच लहान बाळ घरी आहे, त्याच्या दुधाची वेळ झाली म्हणून घरी जाऊ या म्हणणारी आणि लगबगीने जाणारी मिसेस फाकुरोडे आठवते अल्हाजी बाकुचा तरुण मुलगा मोटार बेदरकारपणे भरधाव न्यायचा एकदा मी सिंग याच्या घरून चालत येत होते पाठून त्याची गाडी आली लगेच थांबून त्याने अदबीने विचारले, "लिफ्ट देऊ का ?" घर फक्त वीस पावलावर होते पण अशीच मान देण्याची पद्धत 'युनाना' सिंग याचा नोकर जॉन आजारी पडला मला सर्व काम करावं लागतय हे कळताच 'युनाना' आपणहून मदतीला आला पुन्हा पैसे देऊ केले तर, 'छे ! मी माझ्या मित्रापायी तुम्हाला होणारा त्रास दूर करायला मदत केली पैसे नाही घेणार' म्हणाला मगाडी मुसा आता घर खरोखरच राखत होता मिनात मी चांगली रमू लागले होते आणि मिना सोडण्याचे दिवस जवळ जवळ येत होते

एका रविवारी मेजरबरोबर एका खेडेगावातील आठवड्याच्या बाजाराची ट्रिप मी ठरवली सहा फूट तीन इंच उंचीचा हा मेजरच्या हुद्द्यावर असलेला माणूस नोकर लोकावर वाघाच्या डरकाळीसारखा गुरगुरायचा मी इथल्या समाजाविषयी, आदिवासींविषयी रस दाखवताच म्हणाला, 'ओगुशे ओगुशे (वेल डन)' मेजर, हे, मी व त्याची आठ-नऊ वर्षाची छोकरी झिनॉझ बाजारला निघालो कुटा या गावाच्या नगर जिल्ह्यातल्या शिक्रापूर, लोणीकदसारखं हे एक खेडेगाव धुळीन भरलेलं, गरिबीन ग्रासलेल बाजारात आठवड्याची मीठ-मिरची खरीदायला आलेले खेडूत लोक सगळं तसंच फरक फक्त लोकाच्या रंगरूपात, वर्णात नि विक्रीच्या पदार्थांत नऊवारी लुगडं नेसलेल्या मगुणाऐवजी नायजेरियन ड्रेस घातलेली डॅजी दिसे मक्याचा ढीग, मिरच्यांचे वाटे, कोला नावाचे फळ, केळी, मोसंबी आणि पाण्याचे माठही मातीचेच. मीठही होत आणि तऱ्हेतऱ्हेचे भाजलेले, कच्चे मास, मासे, उदीर, रानउदीर असे चविष्ट पदार्थ माणसाचे अन्न म्हणून होते मधून-मधून टें टें ची भाजी, ओक्रो होतीच चिकट पिवळं, उग्र दर्पाचं खास स्वयंपाकाचं तेल, घोंगावणारी चिलट आणि माश्याही तशाच खरेदी-विक्रीची तीच कचाकच भांडण फक्त हुसा या लोकल भाषेत लाऊडस्पीकरवर गाणं गर्जत होत डफलीवाले डफली वजा ऐवजी जाझच आणि त्या तालावर नाचणारी पोरं-पोरी. मध्याकाळ होत आल्यावर बाजार उठला, सोही रेठरे-

बुद्बुकसारखा आम्हीही निघालो रस्त्यातून दोघीदोघींच्या लाइनीत फुलानी बायका ( म्हणजे गवळणी ) चालल्या होत्या डोक्यावर बाजारहाटाने भरलेल्या टोपल्या पदार्थं मात्र भाजलेले मास, खारवलेले उदीर, शिजवलेली बदक, जिवत कोंबड्या इ तोंडात आऽऊ करत एका तालासुरात चाललेलं गाणं

गाण्याचे असे काहीतरी वेगळे सूर कधीतरी मी हे ऐकले होते का? पाहिल होत का?

बिहारमधल एक छोटसं खेड जादूगोडा आमची कॉलनी चार-पाच मैल दूर असलेली रविवारी आठवड्याच्या बाजाराला जात असू परतताना दिसत बाजाराहून घराकडे परतणाऱ्या बिहारी आदिवासी स्त्रिया त्याही अशाच जायच्या. डोक्यावर टोपल्या बाजारहाटाने भरलेल्या चावल, गोड जिलेबी, भाजी आणि पोरासाठी काही सटरफटर वस्तू दोघीदोघींच्या लायनीत हात हलवत घरच्या ओढीने झपाझपा चालायच्या ओठावर गाणं असायच लालन मैके जाये, फुलवन सेज सजाए तेच का हे सूर आज मी ऐकते आहे?

वाटेत एका ठिकाणी एका झोपडीपाशी थावलो. मोठी दुमदार नि गोल झोपडी मध्ये होती. आजूबाजूने तशाच पण छोट्याछोट्या झोपड्या मधली झोपडी म्हणजे अल्टाजींची 'मास्टर्स बेडरूम ' आजूबाजूच्या त्याच्या बायकाच्या आम्ही ज्याची झोपडी पाहिली त्या डाजूमास नऊ बायका होत्या सगळ्या कशा गुणागोविंदाने नादत होत्या, कारण ज्याप्रमाणे अल्टाजीस अनेक बायका तसेच त्या बाईसही अनेक नवरे डॅशमारखीच देवाणघेवाण अल्टाजी म्हणजे आदरणीय मुसलमान आपल्याकडे मुसलमान समाजात तलाकपीडित स्त्रिया, त्याचे तलाकचे प्रश्न, सैय्यदभाईंची त्यासाठी चालणारी धडपड यांविषयी मी वाचत असे हा देश साठ टक्के मुसलमान असलेला इथंही तलाकपीडित स्त्रिया दिसतील असं वाटल होत पण इथ तलाक दोन्ही बाजूनी दिला जातो. नवऱ्याकडून आणि बायकोकडूनही! मॅरेज फिनिश म्हटल की लग्नसबध सपले प्रत्येक बाई स्वतत्र व्यवसाय करत असल्याने पोटासाठी नवऱ्यावर अवलबून नसते कदाचित हेही कारण असेल आपल्याकडील मोठ्या गॅझेटेड ऑफिसरची बायको पानबिडी–सिगारेट विकते हे ऐकलं तर कस वाटेल? पण तिथ काहीच वाटत नाही ऑफिसरला, बायकोला आणि पान विकत घेणाऱ्या गिऱ्हाइकालाही स्वतःचे स्वतः कमवून खाणे, कुणातही फारशी मानसिक गुतवणूक नसणे हेच इथल्या आयुष्याचे सूत्र विरहाने, आठवणीने झुरण नाहीच बिरबलाच्या माकडिणीचा न्याय 'सबसे जान प्यारी,' त्यापुढे इतर बाबी गौण आठवड्याचा बाजार करून मनातल्या या विचारावरोबर मी परतले बाजारात घडलेला किस्सा माधुरीला पत्राने लिहायचा ठरवले आणि मी तावडतोब पत्र लिहायला बसले खरोखरच अशी गंमत झाली होती की, माधुरी–श्यामला कळल्यावर मजा वाटेल

प्रिय चि. माधुरी,

काल खेडेगावचा बाजार बघायला गेलो होतो आणि मजाच झाली तुम्ही कोणाची फजिती झाली की काय म्हणता ? त्याचा बड्डा झाला किंवा पचका ना ? माझाही झाला कारण मी आधी बाबाचा कोंबडा केला म्हणून तुला आपला सांगलीचा शनिवारचा बाजार आठवत असेलच शनिवार सकाळपासून दूधवाली काशीबाई, समोरच्या इंदूची आई, सुमनच्या आईची बाई असायची दुपारच्या बाजाराला जायचे म्हणून धोतराच्या गाठोड्यात डोक्यावरून आणलेली खरेदी अगदी रोजच्या मीठ–मिरचीच–पाहायला तुम्हाला आवडायचे तुझ्या आजीच्या आजारपणामुळे कधीकधी आपल्यासाठीही काशीबाई भाजी वगैरे घेऊन यायची बोरे, करवंदे, पेरू, बाळक ( आठवतात का त्या बारीक काकड्या ? ) असल्या गोष्टींवर तुझा, श्यामचा डोळा बाजार म्हणून तुमची शाळाही सकाळी असे इथेही असाच आठवड्याच्या बाजारचा दिवस असतो आणि तोच पाहायला आज मी व बाबा गेलो होतो शेजारच्या नायजेरियन मेजर फाकुरोटे बरोबर. आणले मात्र काहीही नाही त्याचीच गमत सांगायला हे पत्र लिहीत आहे खर म्हणजे मार्केट म्हटलं की चार-पाच पिशव्या घ्यायला हात सरसावतात पण इथे मात्र पिशव्या वगैरे नाही न्यायच्या–म्हणजे सुती, वेताच्या वगैरे काही घेतले, अगदी कांदे बटाटेसुद्धा तरी दुकानदार प्लॅस्टिकची बॅग देतो बाबाच्या सामानातून लॅव्हेंटीस यू टी सी या मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या येतात तशा फक्त पर्स मात्र पैशासह हवी पाश्चात्त्यासारखे क्रेडिटकार्ड अजून मला तरी दिसले नाही तर आम्ही दुपारी बाजाराला निघालो आमच्याच मोटारीतून घरात तसे सर्व सामान भरलेले होते कालच 'कडूना' या मोठ्या शहरी गेलो होतो आज अगदी दुसरे टोक एका छोट्याशा खेड्यात गेलो खेडेगावचा बाजार बघायला कडूनाहून खूप भाजी, तांदूळ, डाळ, मसाले इ. आणले होतेच त्यामुळे खरेदी अशी काहीच करायची नव्हती आणि येन बाजारात हिंडता-हिंडता मी एकदम थक्क होऊन थांबलेच. ही वस्तू घेतल्याशिवाय जाणे म्हणजे मी सांगलीची म्हणण्याचा अपमान होता काय असेल ओळख! चक्क जोंधळ्याचा ढीग होता होय जोंधळेच आपण भाकरी करतो तीच ज्वारी–जोंधळे छोटासा ढीग घेऊन एक नायजेरियन विकायला बसला होता

तुझ्या बाबाना गरम भाकरी खूप आवडते पूर्वीसारखे माझे टिळक मंदिरचे इतरही कार्य नव्हते घर आणि मी साहजिकच रात्री गरम भाकरी करायची आठवते का ? नंतरच्या आजारीपणाने हात अधू झाला आणि माझा स्वयंपाकाचा उत्साहच गेला इतर उद्योगही वाढले. गरम भाकरी कधीतरीची खास डिश झाली इथे मला स्वयंपाकाशिवाय काहीच उद्योग नाही टॅ टॅ ची ( चवळीसारखी एक तऱ्हेची पालेभाजी ) लसणीची फोडणी घातलेली चमचमीत भाजी आणि भाकरी कल्पनेनेच मी खूष होऊन जोंधळे घ्यायला पुढे सरसावले माझं इंग्रजी, त्या माणसाचं 'हसा' या बोलीभाषेत बोलणे ते

मला नायजेरियन इंग्रजीत मेजरने समजावून सांगणे, सगळाच गोंधळ होता तुझाही गोंधळ होऊ नये म्हणून स्वच्छ मराठीत सर्व लिहीत आहे

"काय भाऊ, जोंधळे काय भावाने दिले?" (तू इंग्रजीत भाषांतर करून घे ह.)

"किती कोंबड्या आहेत तुमच्या?"

"दोन किलो जोंधळे कसे देणार?"

"हे सर्व जोंधळे एक डझन कोंबड्याना पुरतील"

"हे जोंधळे खाता येतील ना?"

"माझे जोंधळे खाल्ल्यावर पाहा तुमच्या कोंबड्या जास्त अंडी देऊ लागतील"

"माझ्याकडे कोंबड्या नाहीत पण मला जोंधळे हवेत"

"तुम्ही पैदाशीसाठी कोंबडे पाळलेत का? हरकत नाही किती कोंबडे आहेत?"

यावर मात्र मी काही उत्तर दिले नाही जोंधळेही घेतले नाहीत. विकणाऱ्याचे आभार मानले मेजरला म्हटले, मला नको हे धान्य पाच मिनिटात सर्व संभाषण संपले तुझे बाबा असेच इकडे तिकडे होते त्याना शोधू लागले ते दिसताच पाहिलं त्यांच्या डोक्यावर तुरा-बिरा तर नाही ना? मला जोंधळे हवे होते बाबासाठी. एकदा खट्याळ उत्तर आले एका कोंबड्यासाठी हवेत म्हणून सांगावे पण मग वाटी दोन वाटीच जोंधळे मिळाले असते तर असा झाला माझ्या भाकरी करण्याच्या उत्साहाचा पचका! जोंधळे हे धान्य माणसानी खाण्यासाठी नाहीय मग खातात तरी काय? आम्ही काय खातो? प्रश्नच पडला ना? त्याची उत्तरे पुढील पत्री कलेकलेने चंद्र वाढतो तसे इकडे आलेले भारतीय किलोकिलोने वाढतात उदाहरण तुझ्या बाबाचे आहेच

तुम्ही सर्वजण कसे आहात? तुझी सासर कंपनी? श्यामजी? दिवाळी मजेत झाली? पुढच्या दिवाळीला एक पिटुकला पिटुकला नवा पाहुणा येणार मी आत्तापासूनच दिवाळीची वाट पाहू लागलेय सर्वांना नमस्कार

तुझी आई

दुपारची ट्रिप, माधुरीचे पत्रलेखन यानतर त्याच दिवशी रात्री मिस्टर राजी याचेकडे जेवायला जायच होत. पोलोरॉड कॅमेऱ्याने काढलेले फोटो आणि बाजारातील जोंधळ्याचा किस्सा घेऊन मी जेवायला गेले. गप्पा सुरू झाल्या फोटो बघू लागलो माझ्या कडेवर काळ कुळकुळीत बाळ हसत होत चिकटून चिकटून आदिवासी बाया नि पुरुष हसत उभे होते एरवीच्या भारतातल्या बाजारात ओळखूही आलो नसतो पण इथे मात्र उठून वेगळे दिसत होतो आमच्या गप्पा चालू असताना मेजर बोलवायला आले Excuse me for five minutes My wife is waiting for you मी व हे घरी आलो मेजरची बायको व दुकानदार हॉलमध्ये बसले होते मी गेल्याबरोबर माझ्यापुढे तिने नायजेरियन ड्रेस उघडून ठेवला 'With best wishes from us आतल्या खोलीत नेऊन तिने मला तो ड्रेस घालायला

ठिकवर . हॉलमध्ये आल्यावर मेजरचा नि त्याच्या बायकोचा चेहरा आनंदानं फुलून गेला. देशाचे, राष्ट्राचे नि वर्णभेदाचे अडसर दूर झाले माझ्या मनावरचा एअरपोर्टवरचा प्रसंग पुसला गेला. नायजेरियन ड्रेस घालून मी उभी होते. अगा-वरच्या कमीजवर लिहिलं होतं, 'Black is beautiful ' तो ड्रेस घालूनच मी राजीकडे पार्टीला गेले. कितीतरी दिवस 'मिना' मध्ये राहिलेल्या भारतीयांना हा धक्का होता. आठ दिवसापूर्वीच आलेल्या माझ्याकडून.

भारतीय मित्रमंडळींनी नि नायजेरियन मित्रमंडळींनी उठून माझे टाळ्या वाजवून स्वागत केले. त्या टाळ्यांच्या आवाजात माझ्या हसण्याचा आवाज मिसळून गेला. नायजेरियात आल्यावर मी मनापासून प्रथमच हसले.

Black is beautiful

दोन दिवस मी याच विचारात तरंगत होते. आफ्रिका, भारत, आशिया खंड इ. विचाराची झेप माझी नाही. तुलना करायला मी फारसं पाहिलेलं नाही. तुलना करणं फारसं योग्यही नव्हे. तरीही वाटलं, अगदी तेवढ्या वेळेपुरतं वाटलं, इथे आलेले भारतीय इथल्या समाजात मिसळू का शकत नाहीत? मिनामध्ये येऊन मला फक्त दहा दिवस झाले होते व मी नायजेरियन लेडे, आठवड्याचा बाजार बघायला गेले. केवळ उत्सुकता आणि हौस हेच कारण. नायजेरियन पोषाखही मी हौसेने आणि कौतुकाने घातला. त्यामागे हेच कारण होते. पण त्या छोट्याशा कृतीने बऱ्याच गोष्टी साध्य झाल्या. माझ्या मनातली काळ्या आफ्रिकेबद्दलची भीती दूर झाली. नायजेरियन लोकांना माझ्याबद्दल आपुलकी वाटली. तिथे असलेल्या भारतीयांना आश्चर्यमिश्रित आनंद झाला. कदाचित यातूनच पुढे या मंडळींची मैत्री वाढेल. मनातले गैरसमज दूर होतील.

नायजेरियन सरकारचे आम्ही नोकर! पण आम्ही श्रेष्ठ बुद्धिमान. ते आम्हाला पगार देतात. आम्ही आमची बुद्धी विकतो. त्यांची कामे करतो! हा एकमेकातला भाव दूर व्हावा यासाठी असं काही घडावं. खोटी स्तुती कोणालाही कळते. आणि खऱ्या प्रेमाची आपुलकीची कृतीही कळते.

नेहमी साडी नेसणारी मी. ठराविक साच्यात आयुष्य गेलेलं. पोषाखातील बदल हा आपल्याला न शोभणारा हा एक संकोच. त्यामुळे सोयीचे असूनही प्रवासात जीन खमीस घालायची मानसिक तयारी नव्हती. चाळिशीकडे झुकलेल्या बाईने स्वतः सुंदर दिसण्याचा प्रयत्न करणं हेही माझ्या मध्यमवर्गीय चाकोरीत न बसणारं! एअरपोर्ट-वरच्या प्रसंगानं स्वतःच्या नीटनेटक्या नाकडोळ्याविषयी भीती बसली होती. ब्लॅक इज ब्यूटिफुल ने मला जागं केलं.

दुसऱ्या दिवशी उगवलेली नायजेरियातील पहाट जास्त सुखद होती. जोन आणि अब्दुल्ला बरोबर मगाडी मुमा यांच्या बरोबरही गप्पा होऊ लागल्या. पहिले चार-आठ

दिवस या काळ्या माणसाला मी किती घाबरलेली होते आमच मिना हे गाव नायजेरियातील उत्तरेकडच, ' साकोटे या राज्यापलीकडे नायजर देश ' निजर नदी या दोन्ही देशामधून वाहते म्हणून ' नायजेरिया आणि नायजर या देशात आपली बायकापोरं ठेवून मुसा मिनाला आला होता सगळ्या मगाडीसारखाच पैसे कमवायला जेवणे आणि झोपणे हे दोनच उद्योग तो करायचा आयुष्याबद्दल दुसऱ्या आकाक्षा नाहीत दोन वेळेला आज जेवण मिळाले की उद्याची फिकीर नाही अशा मुसाकडे एकदा सकाळी-सकाळी एक बाई आली दोन मुलासह तिथेच राहिली एक म्हातारा आला तोही राहिला. मुसा म्हणाला, माय फॅमिली, वाईफ, चिल्ड्रेन, फादर समोरच्या बिल्डिंगमधला मगाडी म्हणाला, ' ही माझी पण फॅमिली आहे वाईफ, फादर, नो चिड्रेन ' हे ऐकून मी जरा चक्रावलेच अबदुल्ला म्हणाला, 'ही मुसाची बायको, समोरच्या मगाडीची बायको आणि त्या पलीकडच्या मगाडीची बायकोच पाचजणाची द्रौपदी शरीराच्या गरजेतून निर्माण झालेली ! बायकोला हुडा (देज) द्यावा लागतो सर्वांनाच परवडत नाही पाचसहा मिळून पैसे गोळा करतात एकीला देतात ती त्या सान्याची त्या त्या गावात असेपर्यंत बायको गाव सोडल, बायको बदलली ! सगळाच खुलमखुल्ला कारभार माझ्या पुरातन सस्कृती जोपासणाऱ्या मनाला धक्का देणारा हा इथ दोन शरीराचा व्यवहारच मानतात देवाण-घेवाणीचा ! नाही पटल मॅरेज फिनिश्ड ! साहजिकच बायकाची व नवऱ्याची संख्या लक्षात कोण घेत ?

नवीन निवडून आलेल्या अध्यक्षाची टी व्ही वर एक दिवस मुलाखत होती पत्रकाराने प्रश्न विचारला तुम्हाला मुल किती ? आणि ती काय शिकत आहेत ? मुल किती ? याच उत्तर देणच अध्यक्षानी टाळलं आणि ते म्हणाले, काही मेडिकलला आहेत तर काही इजिनिअरिंगला तर काही आर्ट्सला ! काही हे शिकत आहेत तर काही ते ! ' निश्चित मुलाचा आकडा काही त्याना सागता आला नाही. कदाचित तो त्याना माहीतच नसावा पण त्या मुलाखतीत त्याचे उत्तराला बगल देणे मला मजेशीर वाटले. चौकशीअती मला समजले की त्याला सत्तेचाळीस मुले होती फारस जग न पाहिलेल्या मला काहीच माहीत नव्हत आता समजू लागल नायजेरियातील आयुष्य नायजेरियन समाज ! आवर्जून मी टी व्ही बघायची कधी कधी अशी एखादी मुलाखतीची गमत मिळायची तर कधी कधी सिनेमाची धमाल

टी व्ही. वर एक दिवस जाहीर केल हिंदी पिक्चर 'प्रिन्स परदेशात राष्ट्रभाषेची किती ओढ वाटायची आपुलकी वाटायची आम्ही सारे टी व्ही बघत होतो अरे हा हा तर दिलीपकुमार ही नरगीस ! मी पक्की सिनेमाशौकीन ! अहाहा ! आज दिलीपकुमार, राजकपूर, नर्गिसचा 'अदाज' ! मी जाम खुश ! ' फिल्म तुटत सिनेमा चालू होता इंटर्व्हलनतर सिनेमाला सुरुवात झाली हुईऽऽ करून शम्मीकपूरच्या धागडधिंग्याला ! १५ मिनिटे समजेनाच काय प्रकार आहे. हाही 'अदाज'च. सिनेमा

होता पण शम्मीकपूर हेमामालिनीचा ' नवा अंदाज ' आमचे म्हणून आम्ही बघत होतो येवढच्च सिनेमा सपल्यावर अनाउन्सरने सांगितले, I hope you must have enjoyed the film ! खरोखरच्च आम्ही खूप एन्जॉय केली होती ती फिल्म पण खरा एन्जॉय केला नायजेरियन लोकानी जुन्या अंदाजमध्येही भरपूर गाणी, 'झुमझुमके नाचो आज गावो खुशीके गीत ' तर नव्या अंदाजामध्ये 'जिंदगी एक सफर है सुहाना !'

या सान्यातील भावनिकता त्यांच्या दृष्टीने एकच ' आम्ही आठवली दिलीपकुमारची ट्रॅजिडी ! शेवट झाला शम्मीकपूरच्या कॉमेडीने ! सारीच मजा ! मिनात आमच्या घरी टी व्ही नसल्याने बहुतेक वेळा आम्ही श्री शेट्टी याच्या घरी जाऊन पाहात असू विशेषतः सॅटरडे न्यूज जास्त महत्त्वाच्या आठवड्याच्या घडामोडींचा आढावा घेतला जाई

बॉक्सिंग कुस्ती हे विषय आपल्याकडे स्त्रियाच्या चर्चेतून वर्ज्य समजले जातात पौरुषाची पूजा केली जाते गौरवही होतो कुस्ती जिंकणाऱ्याचे स्वागत पंचारतीने बहीण, आई, भावजय करते. हल्ली सिनेमातून प्रेयसीही करताना दिसते पण स्त्रिया कुस्ती पाहायला तिकीट काढून जातात हे माझ्या दृष्टीने नवलाचेच विशेषत कोण जिंकणार यावर स्त्रिया बेटिंगही करतात हे सर्व मी नायजेरियात पाहिले बॉक्सिंग, फ्री स्टाइल कुस्ती नायजेरियात फार लोकप्रिय आपल्याकडे क्रिकेटवीरावर मुली फिदा होतात तशा तिथे बॉक्सरवर आठवड्यातून एक तास कुस्ती दाखवत आणि कधी कधी स्त्रियाची कुस्तीही दाखवत कारण स्त्री–पुरुष समानता ' असा हा नायजेरियाचा टी व्ही

ह्याना बातम्या ऐकायची अतिशय आवड मलाही त्यांच्यामुळेच तिथल्या बातम्यात रस निर्माण झाला अशाच एक दिवस टी व्ही वर बातम्या ऐकल्या कुठेतरी झालेल्या विमान अपघाताची ओझरती एक ओळ येऊन गेली गप्पात कुणाच्या लक्षात आली नाही माझ्याही नाही पण मनात कुठेतरी सलली असावी म्हणूनच त्या रात्री झोप येईना वेगवेगळे विमान अपघात आठवू लागले मध्यरात्री आगीचा लोळ आकाशातून उतरला स्फोटाचा धाड्धाड् आवाजही झाला आणि दहा मिनिटात आगीचे बंब खणखणत एअरपोर्टकडे धावू लागले नव्याण्णव प्रवाशासह इंडियन एअर लाइन्सचे विमान जळून भस्मसात झाले अगदी नवीन पार्ल्याला राहायला आले तेव्हा एअर इडियाचे जेट जळालेले पाहिले होते अगदी अलीकडे जालचे विमान जुहू ग्लायडरच्या रनवेवर चुकून उतरले, पण मोठा अपघात वैमानिकाच्या कौशल्याने टळला मुलाच्या हौशीखातर कुंपणाला धडक मारलेले विमान फिरत फिरत जाऊन पाहिलेले आणि एक दिवस ' अशोका ' समुद्रात बुडाले तर पुणे–मुंबईच्या छोट्या प्रवासातही अपघात होतात हे कोसळलेल्या विमानाने दाखविले म्हणून विमानप्रवास असुरक्षित थोडाच समजायचा ? अपघात काय कुठेही होतात

माटुंग्याला रेल्वे क्रॉसिंगला किंवा नाल्यावरून एस. टी. घसरूनही होतात. अपघात हा निव्वळ अपघात असतो. त्यात तरतम काय करायचे? तरीही त्या रात्री माझ्या मनात अपघाती मृत्यूचे तरतमभाव उठत होते. शेवटी राहवेना. म्हणून पत्र लिहायला घेतले.

प्रिय सौ. माईना —

अपघातातून वाचावले सर्वच. आतामात्र कधीकधी भीती वाटते. समुद्रात बुडून मृत्यू नव्हता की सहारात पेटूनही नव्हता. पण जे अशा विमान अपघातात गेले त्याना त्या क्षणी काय वाटत असेल? घरी माधुरी श्यामला कळवलेच नाही. काळजी नको म्हणून. पण अपघात झालाच असता तर त्याना काय वाटले असते? खरच माई, अपघातातील मृत्यू हा काही वेगळा असेल का? कितीतरी रेल्वेचे, एस. टी. चे अपघात होतात. मृताची, जखमींची यादी प्रसिद्ध होते. श्रद्धाजली वाहिली जाते. विसरले जाते. पण काही काही लक्षातही राहते. डॉ. भाभाचा मृत्यू आल्प्स पर्वतातला. पर्वत आणि सागर दोन टोके. पण समान विमान अपघात. डॉ. भाभा जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ, पण अपघाती मृत्यू सर्वांना सारखाच. मी एक सामान्य बाई. समुद्रात अथवा सहारात पण साधर्म्य मात्र विमान अपघाताचे. विशाल सागर आणि उत्तुंग पर्वताचे आणि येणाऱ्या मृत्यूचे किती उलटसुलट विचार येताहेत. म्हणून हे पत्र धाडणार होते ते धाडले नाही. माझ्या बाबतीत वेगळेच घडले. घडायला नको ते घडले. डॉ. भाभाच्या बाबतीत समुद्र, पर्वत याच्या फरकाइतकाच हा फरक. उलटे झाले असते तर?

टेचकाळलेल अग आता बरंय. पाय थोडा दुखतोय मात्र. इतरही प्रकृती आटोक्यात आहे. म्हणजे दमा, ताप याच्यासह. हेही नसे थोडके. माझ्या आजारपणामुळ इथे त्याच अवस्थेत परदेशी येण्यामुळे हे मात्र सतत मनावर दडपण ठेवून असतात. मला काही झाले तर? उपचारच नाहीत. साहजिकच ह्याची काळजी वाढतेय. पण माझी इथेही एका भारतीय डॉक्टरशी छान दोस्ती जमलीय. म्हणून मी निर्धास्त आहे. मी सुखरूप नक्कीच परतेन.

आता इथले दिवस छान जाऊ लागलेत. पण मुले, माणसे याशिवाय या घराला घरपण नाही हेच खरे. पत्नी या नात्यापेक्षा आई, मुलगी, बहीण, मामी, काकू, वहिनी, मावशी, आत्या, मैत्रीण, शेजारीण इत्यादी इतर नात्यातच स्त्री ठराविक व—यानतर जास्त गुरफटली जाते. म्हणूनच मला सारखी सर्वांची आठवण येते. कुठे मुंबईचा एवढासा ब्लॉक, कुठे इथले भले मोठे घर! माधुरी, श्याम, अविनाश इथे असते तर मात्र घर भरल्यासारखे वाटले असते. मला डायनिंग टेबल खूप आवडते. इथले फारच छान आहे. मुंबईच्या छोट्या जागेत ही हौस जमणारी नाही. पण दोघच, दोघानी भल्या मोठ्या टेबलावर बसून जेवायला नको वाटते. सिटिंगरूममध्ये सुरेख

सोफा आहे मुंबईचा दिवाण कम् बेड कम् स्टोअर कम् सब कुछ. काही वर्षांपूर्वी सकाळी तिघेहीजण आगेमागे बाहेर पडत शाळा, ऑफिस, डबे यातच श्याम माधुरीचे आधी आघोळ कोणाची यावरून वाद सगळेच घाई त्यात कधी गॅस नसे इथे तीन बाथरूम्स आहेत चार गॅस, चार हॉट प्लेटस् आहेत पण कसलीच घाई नाही सगळ आहे पण माझी पिल्लं जवळ नाहीत म्हणून असून नसून सारखेच त्यातून ह्याचा अबोल स्वभाव मग तुम्ही बळी पत्रवाचनाचे असे जात आहेत मिनातले दिवस गाभुळलेल्या चिंचेसारखे हवेसे आणि नकोसेही राहावे वाटतेय भारतात परतावेही वाटतेय ह्याच्य एकटेपणाने राहण्याचे कौतुक वाटतेय तुम्ही कितीही धीट म्हणा मला, पण ही हिंमत नाही– माझ्यात मला माझा सर्व गोतावळा हवा म्हणून तुमच्या आठवणी येतात आता तुम्ही काय करत असाल ? इथे मध्यरात्र झालीय सारं शांत आहे आवाज फक्त एअरकंडिशनरचा हे गाढ झोपलेत माझी झोप मात्र हल्ली हरवलेय सापडतेय फक्त जुनी याद, वेगवेगळी लहानपणीची, तरुणपणीची, आईपणाची, आणखी सर्वच शात तुम्ही सर्व कुठलातरी हिंदी सिनेमा होता यादों की बारात, आज अशाच आठवणींची मिरवणूक मनात जपतेय. बघाना, सुरुवात कुठून झाली कुठं आले कारण बोटाला धरून भरकटणाऱ्या आठवणी दिल्लीच्याही (न पाहिलेल्या) रोमच्याही विसरायच्या आहेत काही त्या विमान अपघाताच्या, लॅगॉस एअरपोर्टच्या ..जास्त काय लिहू ?

सर्व मजेत ना ? पुणेकर मंडळी परतली ? दिवाळी कशी झाली ? राणी, प्रिया, रश्मीला माझी आठवण येते ?

ती दादाना व ती आईना नमस्कार

तुमची,
ललिता

मिनात आठवड्यातून तीन दिवस पॉवर शेडिंग असं त्या दिवशी सकाळपासूनच मला रात्रीच्या अंधाराचे वेध लागायचे तीन वाजले की मी स्वयपाकाला लागायची सहा वाजता दिवे बंद आमचा जनरेटर धडधडू लागायचा दिवे लागायचे जेवायला बोलावलेले पाहुणे यायचे मिनात असे तो दिवे नसलेल्या दिवशी आम्ही आवर्जून अशा लोकाना जेवायला बोलवायचो, ज्याच्या घरी जनरेटर्स नाहीत या गोष्टीची सगळ्याना इतकी माहिती झाली की आमचे एक स्नेही लाईट नसलेल्या दिवशी येऊन टपकले म्हणाले, 'जेवायला आलोय कोणीतरी पाहुणे आलेले असणारच ! मी काही त्याच्यात जड नाही ' दुपारचा दोघापुरता स्वयंपाक शिल्लक असूनही मी स्वयपाकास लागले रात्री कधीतरी पॉवर यायची जनरेटर उठून बंद करायची याना कधीच आठवण नसायची वॉचमन मुसा हा आम्ही जणू काही झोपण्यासाठीच नेमलेला होता साहजिकच मुसाची बदली कामगार म्हणून जनरेटर मध्यरात्री बंद करणे हे माझच

काम झाल होतं

एका रविवारी ट्रिपला जायचं ठरवले

पिकनिक टू गुरारा फॉल्स ! सगळ्याच्याच गाड्या निघाल्या. समृद्धी भरपूर पेट्रोलची कमतरता नाही त्यामुळे अंतर तोडायला कोणाला काहीच वाटत नव्हते पिकनिकच्या मूडमध्ये सगळेच खूष होते भारतातले गिरसप्पा आणि गोकाकच्या धबधबा ही दोन पर्यटनस्थळे मी पाहिलली ' गुरारा फॉल्सविषयी माझ्या मनात तशाच कल्पना होत्या मुख्य रस्त्यावरून दीड दोन मैल आत कच्चा रस्ता कोणा-लाही आपली सुंदर गाडी त्या रस्त्यानं न न्यावी असे वाटणारा ! कोण इथे आकृष्ट होऊन येणार ? धक्के खात, गचके घेत आम्ही पोहोचलो

किर्रर्र जगल ! झाडी, झुडप, काटेरी वेली ! मध्ये एक सिमेंटच्या फरशीचा चौथरा होता तोच हा पिकनिक स्पॉट ' समोर गुरारा नदीने डोहात खोल उडी घेतली होती तोच हा गुरारा फॉल्स ना नदीवर झुलता पूल ना पाण्यात पायऱ्या त्यामुळे दूर काठावर उभं राहून पाण्याचे उडणारे तुषार आसुसलेल्या मनाने पाहिले सारख वाटत होत या कड्यावरून धडपडत खाली उतराव आणि या तुषाराना स्पर्श करावा दुरून वाहत पाणी पाहून माझ समाधानच होत नाही. काही पुरुष मात्र खाली गेल. साडीचा घोळ आवरून आम्हा बायकाना जाता येत नव्हत वाटतल्या शेवाळात घसरून पड-ण्याची बायकाना भीती जास्त ! आम्ही कोणीच खाली गेलो नाही सगळ्या उठलो आणि बरोबरचे फराळाचे डबे काढून जेवणाच्या तयारीला लागलो आमच्यासारखीच एक नायजेरियन फॅमिली सहलीला आली होती सात-आठ मुले आणि नवरा-बायको' बाई महाप्रचड जाडजूड ! येथे जाडजूडपणा हे सौंदर्याचे लक्षण मानले जाते सर्वजण नुसते स्प्राईट, फॅन्टा पीत होते पजाबी छोले भटोरेपासून तामिळनाडूच्या पुळी-भोगरे चित्रान्नापर्यंत सर्व काही '

मला मोठी मजा वाटत होती. एवढे जगल ' हिरवेगार, किती झाडझुडप, वेली ' खळखळत पाणी ! सर्व काही होत ' पण एकही पक्षी किलबिलत नव्हता की एकही कुत्रा, शेळी, प्राणी दृष्टीस पडत नव्हते ' जगली श्वापद तर नाहीच नाही ' आफ्रिका, तेथील जगली प्राणी, वाघसिंहाच्या डरकाळ्या, एप, चिम्पाझी यासारखी माकडे, शहा-मृगाचे कळप, हिप्पोपोटेमस यासारखे महाकाय प्राणी यातल काही म्हणजे काही दिसत नव्हते नायजेरियाच्या वास्तव्यात मला साध्या चिमणीचा चिवचिवाटही ऐकू आला नव्हता रस्त्यावर कधी कुत्री भुकत नसत एकुण आवाजाचं जगच कमी होत माणसाच्याही '

पण माणसाची भूक मात्र प्रचड ' काही म्हणजे काही खायचं वर्ज्यच नसे. रात्री दिव्यावर झेपावणाऱ्या पतगापासून चालत्याबोलत्या माणसापर्यंत सर्व काही खाले जात असे जिवाच्या भीतीने प्राण्याचे, पक्ष्याचे आवाज बद झाले होते माणसे मारून

खात की नाही हे मी प्रत्यक्ष पाहिलं नाही पण ऐकले मात्र होते क्रौर्य हे माणसाला प्रत्यक्ष मारण्यात थोडच असत? एखाद्याचा मानसिक मृत्यू करण्यातही क्रौर्य असतच.

मिनाला येऊन दोन-तीन दिवस झाले होते, तेव्हाची गोष्ट घराची साफसफाई करताना खराब झालेले तांदूळ वगैरे धान्य मिळाल कचऱ्याच्या डब्यात फेकण्यापेक्षा मी आजूबाजूला वावरणाऱ्या कोंबड्याना घातल कोंबड्या भोवती जमा झाल्या अजून मी इथल्या माणसात फारशी मिसळू शकत नव्हते या जमलेल्या कोंबड्या मला भारताची आठवण करून देत माणूस आपल्यापेक्षा लिंगाने वेगळया असलेल्या माणसाकडे वेगळ्या दृष्टीने पाहतो, पण पशुपक्ष्याच्या लेखी माणूसही माणूस जातच असते पकपकणाऱ्या कोंबड्या नि मी दोन दिवस आमची सकाळ मजेत गेली तिसऱ्या दिवशी कोंबड्या येईनात नायजेरिन भाषेत त्याना कस बोलवायचं? मीतीन रात्र जागल्यानंतर या कोंबड्याच्या बागेनच मला दिलासा दिला होता या कोंबड्याही मला इथे भेटणार नाहीत का? त्या कोंबड्या कुठे गेल्या? केवळ्याशा गोष्टीत माझा जीव गुतला होता? वर्षानुवर्षे लोक परदेशात राहतात हेही दीड वर्ष असेच एकाकी राहिल होते मग माझे हे वेड हळवेपण का? का मी एक स्त्री आहे म्हणून? मी कोंबड्याची वाट बघत राहिल माहेर मला नाहीच, पण माझिया माहेरा जा रे पाखरा या गाण्यातला अर्थभाव मला तिथ जाणवत होता त्या दोन कोंबड्या, त्याची पिल्ल, तो ऐटबाज कोंबडा मला या परक्या देशात आपला वाटत होता मला माझ्या मुलाची, माझ्या देशाची आठवण करून देत होता जोनला विचारले, कोंबड्या का येत नाहीत? आणि उत्तर ऐकून मी स्तमितच झाले मॅडम, अलाजी वाकोला वाटले तुम्ही या कोंबड्याना धान्य घालून बोलावत आहात ते कोंबड्या खाण्यासाठी, म्हणून त्यान आज कोंबड्या घरातच ठेवल्यात तुम्ही ऑफिसर लोक कोंबड्या मारून खाल्ल्या तर कोणाकडे तक्रार सागणार? सरकारी नोकराविषयी इतकी भीती? की आमच्या अधिकाराचा दरारा? मी जोनला समजावून सागितल मी कोंबडीच अडही खात नाही दोन-चार दिवस तोही पाहात होता आम्ही घासपालाच खात होतो भाज्या आणि धान्य खाऊन माणस कशी जगतात याच नायजेरियन लोकाना आश्चर्य वाटे माझ्या शाकाहारीपणाची खात्री पटल्यावर आलाजी वाकोच्या कोंबड्या तर आल्याच पण आजूबाजूच्या आणखी दोघानी आपल्या कोंबड्या पाहुण्या पाठवल्या

मिसेस सिंग एकदा म्हणाली, ' आपण मार्केटमध्ये जाऊ या भाजी आणायला ' आहाहा! पुण्याची मडई डोळयासमोर तरळली कडूनाहून आणलेली भाजी सपून गेली साहेबाना मेमसाबच्या रुबाबात म्हटल, ' तुम्ही ऑफिसात गेल्यावर मला गाडी पाठवून द्या आम्ही मार्केटिंगला जाणार आहोत दहाच्या ठोक्याला अब्दुल्ला हजर ' आम्ही निघालो माझ हे पहिल मार्केटिंग गलिच्छपणानी कमाल मर्यादा गाठलेली असावी, त्याच एक उदाहरण टॅ-टॅ ( पालेभाजी ), ओक्रो ( भेंडी ), पे पे

( लाल मिरची ), पोपो ( पोपया ) ज्या मिळतील त्या भाज्या मी खरेदी करत सुटले. भाज्यांचे भाव स्वस्त, महाग दोन्ही होते भेंडी सव्वीस रुपये किलो भारतात मी ही किंमत मोजली असती की नाही याची शकाच आहे माझ्या भाज्या खरेदीनंतर माझ्यामागे मुलांचा एक घोळका लागला भटुरे ! भटुरे ! We will carry your luggage ' माझ्या हातातल्या पिशव्या त्यांनी ओढायला सुरुवात केली वाघाच्या पिल्लानासुद्धा आपण घाबरतोच पण अब्दुल्ला मदतीला धावून आला नि मी वचावले भटुरे म्हणजे परदेशी लोक मग ते युरोपियन असोत अथवा आशियाई जो काळ्या कुरळ्या केसांचा, काळ्या कुळकुळीत वर्णाचा नाही तो ' भटुरे ' एकदा तर दुकानदार मला म्हणाला, ' Bature, you are a good person ! '..

छोले भटुरे काय टेस्टी आहेत नै ? असा त्याचा टोन मला वाटला.

भटुरे भटुरे म्हणून मागे लागण्याचा प्रसग आणखी एकदा आला सध्याकाळी घरी कोणी आल नाही की मी होमसिक व्हायची अगदी हे असूनसुद्धा एक दिवस सध्याकाळी अशीच मी घरात भिरभिरले भारतातून पत्रही आले नव्हते माधुरी कशी असेल ? श्याम कसा आहे ? बाबा कसे असतील ? डॉक्टरांना नवीन ट्रीटमेंटचा काही त्रास झाला असेल का ? इन्व्हेस्टमेंट–इन–मॅनचं काम कुठवर पुढं सरकल असेल ? टिळकमंदिरामध्ये नवीन काय कार्यक्रम चालू असतील ? मधुसूदन सोसायटीची खबरबात काय ? नात्याच्यागोत्याच्या, समाजाच्या सगळ्याच आठवणी मनात दाटून आल्या श्रावणातल्या मेघाप्रमाणे माझी मानसिक उलघाल यांना सागून यांचा ताण वाढवायचा नव्हता मी परतल्यावर ह्यांना इथे एकटेपणाने दिवस काढायचे होते त्यांच्याइतकी स्थितप्रज्ञता मला नाही मूलबाळ, शेजारीपाजारी, नातीगोती, मित्रमैत्रिणी या गोतावळ्यात रमणारी मी सामान्य बाई म्हणूनच मला ह्यांचं जरा जास्तच कौतुक वाटत ! स्वतःची ब्रिजची पुस्तकं, गाण्याच्या टेप्स यात ह्यांनी बायको मुलांची आठवण दडविली मी मिनात आल्यामुळे त्यांना मिळणारा आराम मला डोळ्याला दिसत होता वाटत होतं मी कायम इथेच राहावं

याच विचारात मी घराबाहेरच्या व्हराड्यात आले सध्याकाळ होत आली होती व्हराड्यातही चैन पडेना अगणातून बाहेर येऊन मी रस्त्यावर उभी राहिले रस्त्यावर घराकडे परतणाऱ्या लोकांची रहदारी होती संध्याकाळी प्रत्येकालाच घराची ओढ वाटते चार भिंती आणि त्यात असणारी माणसं बाजूलाच असणाऱ्या एका चौथऱ्यावर मी बसले एकजण समोर थाबला दुसरा एक छोटा मुलगा थाबला एक जाणारी बाई पण थाबली बघता बघता दहा माणसं जमली भटुरे भटुरे कुजबुजले आणि माझ्याकडे हसत पाहात उभे राहिले त्यांच्या भाषेत ती काय बडबडत होती मला कळत नव्हते पण माझ्यासबधीच काहीतरी बोलत होती घोळका कसला म्हणून एक भारतीय जाताना थाबले, ' भाभीजी, आप अदर घरमे जाईये। आप

*ऐसी बैठी है इस बात का ताज्जुब होता है इन लोगोंको खामखाह आपको इस* बातकी तकलीफ हो जाएगी । म्हणजे अस होत तर ! मी परदेशी एकोणीसशे चाळीस सालाआधी ब्रिटिश आमदानीत युरोपियन साहेबाची बायको अशी रस्त्यात बसली असती तर आपण असेच वागलो असतो ? मनुष्यस्वभाव ! आपण निर्माण केलेले आयव्हरी टॉवर मला काहीच समजले नाही मुकाट्याने उठून घरात आल हे वर्णभेदाचे अडसर दूर करण माझ्या हातात थोडच आहे आम्ही भारतीयानी यायचं, मोठ्या पगारावर राह्यच, ऐषाराम करायचा, मोटारीतून फिरायच, हेच इथल्या नेटिव्हाना माहिती. म्हणूनच इथल्या मेजरची मदत घेऊन मला खेड्यात जाव लागल ! शभर वर्षांपूर्वी भारतातले नेटिव्हही असच वागत असत ? मी माझ्यापुरत या भावनेला खिडार पाडायच ठरवल

दुसरे दिवशी नेहमीप्रमाणे पाहुणे जेवायला होतेच त्याच जेवण झाल्यावर मी मुसाला अवर इडियन डिशेस, इडियन फूड म्हणून साबुदाण्याची खिचडी दिली दुसऱ्याच्या मनात पोटातूनच शिरता येत मुसा महाराज खूप ! दोन दिवसानतर परत एक पाहुण्याची जेवायची पाळी आली बाहेरच्या व्हराड्यात मुसाचा एक साथी-दार हजर होता इडियन डिशेस खायला त्यानतर रस्त्यावरून मी एकटी भटकत असे आजूबाजूचे मगाडी मला सन्नू सन्नूदा म्हणत माझ्या गोळ्या, चॉकलेटच्या खैरातीमुळे पलीकडच्या क्वार्टर्समधली मुले खूष झाली होती एकदा नळाचे पाणी गेल्यावर रस्त्यापलीकडच्या बाईनं सागितलंन, 'आमच्याकडे पाणी आहे घेऊन जा उपमा करण्यासाठी हिरव्या मिरच्या दुसऱ्याच्या बागेतून मला विनासायास मिळू लागल्या कारण नायजेरियात हिरवी मिरची कधी विकत मिळत नसे शेर्डींच्या वरी मी पायी जाताना आता भट्टरे भट्टरे म्हणून हेटाळणी न होता मॅडम, गुड मॉर्निंग, गुड इव्हिनिंग म्हणून अभिवादन केल जाई माझ्या साड्याच बायकाकडून हात लावून कौतुक केल जाई रस्त्यातले पुरुष अदबीनं ग्रीट करीत मी आता मिनाची रहिवासी झाले होते मिनात येऊन आम्ही रुळलो होतो समोरच्या मेजरचे, त्या पलीकडल्या मध्याच्च बगल्याचे नावीन्य राहिले नव्हते नायजेरिया परिचित झाला होता गणवेषधारी मिलिटरीच्या लोकाची भीती वाटत नव्हती फक्त टी व्ही वर एक ऑक्टोबरच्या कार्यक्रमाचा थोडासा भाग पाहिला होता एक ऑक्टोबरला मन्तातर झाले रक्तविहीन क्राती मिलिटरीकडून लोकशाहीकडे सत्ता आली होती आज सहजच मी घराबाहेर पडले असताना हेच विचार मनात घोळत होते दमल्यामुळे हे घरातच आराम करीत होते शिवाय मिनात मला खूपच सुरक्षित वाट, म्हणून एकटी फिरत असे तशा दिवसा आम्ही सर्वजणी एकमेकींकडे एकएकट्या जात असू. तशीच मी संध्याकाळी फिरत फिरत कोपऱ्यापर्यंत गेले आणि माझी पावले एकदम थबकली समोरच्या मिलिटरीच्या बंगल्याच्या आवारात बिगुलाची प्रॅक्टिस चालू होती रिट्रीटच

सूर वातावरणात घुमत होते. पण मनातली उलघाल कुणालातरी सांगायलाच हवी होती रिट्रीटचे सूर मला कुठल्या कुठे घेऊन गेले मी पत्र लिहायला सुरुवात केली

प्रिय डॉक्टर

आता संध्याकाळ झालीय हवा सुरेख आहे. पाऊस नाही धूळ नाही उन्हाचा रखरखीतपणाही नाही वातावरण शांत आहे आणि उदासही मी अशीच फिरत होते कोपऱ्यावरल्या बंगल्याच्या आवारातून बिगुलाचे स्वर कानावर पडले कोणीतरी प्रॅक्टिस करत असावे अवघ्या वातावरणात रिट्रीटचे सूर भरून राहिलेत नेहमीच्या वेस्टर्न म्युझिकचा पॉप डिस्कोथ, जाझ यांचा गोंगाट आज कसा ऐकूच आला नाही आले ते हे बिगुलाचे सूर मला दूरदूर नेणारे रस्त्यावरची रहदारी आधीच कमी ती आणखीच कमी वाटते जवळचा हायवेही शांत वाटतोय मोटारींचा आवाज, माणसाचा आवाज, मगाडींचे गेंगण्या स्वरातले गाणे, ट्रान्झिस्टरच्या म्युझिकचा गोंगाट, काही काहीच मला ऐकू येत नाही या अतिशय शांत घरात मला ऐकू येताहेत मघाशी ऐकलेले रिट्रीटचे सूर आठवणींच्या प्रदेशात घेऊन जाणारे या सांजवेळी कातरवेळी मन हेलावणारे सूर बिगुलाचे सूर

पोलिस लाइनीजवळच आमचे घर होते. सांगलीचे वातावरणही तसे शांतच रात्री नऊलाच चिडीचूप व्हायचे आत्तासारखे घरोघर रेडिओ ठणाणत नसत हॉटेलही शांतच असत फक्त दर बुधवारी बिनाका गरजे कार्यकारणाने लाऊडस्पीकर मात्र कोकलत. अधूनमधून भजने होत कधी कधी गल्लीतली भांडणे रंगत तर कधी धनगर गल्लीतल्या गजानूल्याचा ढोल घुमे मंगळवार शुक्रवारी यल्लम्माच्या जोगतिणींचा झगही वाजे पण एकूण शांतताच असे

अशा वेळी मी माझ्या खोलीत मैत्रिणींबरोबर अभ्यास करीत असे रात्री दहा वाजता गणपतीच्या देवळातील ढोलही स्पष्टपणे ऐकू येत आणि मग येत हवेवर तरंगत तरंगत पोलिस लाईनीतल्या बिगुलाचे स्वर ! सांगलीला रात्री दहा वाजता हेच सूर असेच ऐकू येत जे आज आत्ता संध्याकाळी मी एका दुसऱ्याच खंडातल्या– आफ्रिकेतल्या छोट्याशा गावात ऐकले हातातले अभ्यासाचे पुस्तक ठेवून मी खिडकीशी उभी राही तेव्हापासून या करुण सुराची मला मोहिनी वाटत अजूनही वाटते.

कितीतरी वर्षे उलटली गावातली पोलिसलाईन दूर विश्रामबाग रस्त्याला गलीय गल्लोगल्ली हॉटेलातून आता विविध भारतीचे सिनेसंगीत वाजत असते घरोघरी हाच जल्लोष असतो ट्रान्झिस्टरमुळे संगीत रस्त्यातून वाहू लागलेय मग रात्रीचे टोल कसे ऐकू येणार ! लौकर निजे लौकर उठे म्हण जुनी झालीय गाव मोठं शहर झालेय आणि माझे हे सूर दूरदूर जात हरवलेत जसं माहेर, तसेच हे सूर संपलेत. आज हे सूर ऐकताना मग्न झाली माहीत नाही हेच सूर आणखी कोठे ऐकायला मिळतील

ते प्रत्येक गोष्टीचा मनावर एक खोल खोल ठसा उमटलेला असतो वयपरत्वे तो कमीअधिक ठळक असतो म्हणूनच हे सूर मला पचावन-छप्पन सालात घेऊन जातात आता आमचे नसलेले घर आठवते. माझी खोली आठवते जिवलग सखी-बरोबर केलेला अभ्यास आठवतो आणि वाटते थोड्या वेळात खालून माजघरातून आईची हाक येईल

ललिता, सुधा आता झोपा ह, अकरा वाजायला आलेत सकाळी लौकर उठा हवं तर ! पण मी व सुधा जाग्याच्च राहतो अकरा वाजताही हेच बिगुलाचे सूर तरगत येणार असतात ना ? आज तेच रिट्रीटचे बिगुलाचे सूर ऐकू आले इथे आफ्रिका खडातल्या नायजेरियातल्या छोटया गावात. पण संध्याकाळी आले रात्री नाही कारण रात्री हाक मारून झोपायला सागणारी आई आता नाही फक्त सूर आहेत स्वर हरवलेत बालपणीच्या सखीसारखेच

—ललिता

नायजेरियातल ग्रीटिंग मोठं गमतशीरच दोन्ही हाताच्या मुठी वळवून जसे काही मुष्टियुद्धाला निघालेत अशा आविर्भावात ' सन्नू सन्नूदा लाफिया लाफिया या ' अस तोंडातल्या तोंडात पुटपुटत तीनतीनदा गुडघ्यात वाकून, कमरेतन लवून अभिवादन केलं जायच याच्या या आविर्भावाच आमचे नायजेरियातले एक स्नेही मोठ मजेशीर वर्णन करायचे ते म्हणायचे ग्रीटिंग करायची याची पद्धत अशी मजेशीर का ?

मला सुरुवातीला इथल्या इग्लिशची मजा वाटायची एकदा बँकेत गेले हवा असलेला माणूस जागेवर नव्हता ' Where is he ? ' He is travelling. मी उडालेच. माझ काम ज्याच्याकडे तो जर प्रवासाला गेला असेल तर माझ काम कस होणार ? दहा मिनिटात माझ इतर काम झाल आणि ' जरा असेच चहा घ्यायला गेले ' हा नवीन वाकप्रचार शिकून मी बाहेर पडले, ( ' He is travelling ' ) ' I am busy ' म्हणजे चक्क टेबलावर डोक टेकून झोपण खरंच, झोपणं हे काम किती मोठ आहे सुरुवातीस गड्याबरोबर बोलताना, काम करताना माझे असख्य घोटाळे व्हायचे गड्याला स्वैपाक शिकवायचा मी ठरवल होत. भेंडीची भाजी फोडणीस टाकली होती परतत असता बेल वाजली म्हणून हॉलमध्ये गेले जोनला सागितलं, ' Fry it Don't put water ' आलेल्या माणसाशी गप्पा मारून पधरा मिनिटानी स्वैपाकघरात आले. चिक्कार तार येऊन भाजी रटरट शिजत होती जोन द ग्रेट थडपणाने बघत होते ' ओह ! जोन आय टोल्ड यू, डोंट पुट वॉटर, व्हाय यू पुट इट ?

मॅडम, यू टोल्ड पुट द वॉटर, आय पुट इट

' अरे शहाण्या भेंडीच्या भाजीत पाणी घालायच नसत. ' मी मराठीत करदावले

व्हॉट हॅपन्ड मॅडम, द ओक्रो-सूप नाईस. गुड फॉर हेल्थ अँड स्ट्रेंग्थ पळीमधला तार आलेला भेंडीचा रपटा जोनने कढईत सोडला

बट व्हाय यू पुट वॉटर ?

यू टोल्ड मॅडम ' अदबीच उत्तर

आमच्या या सुखसवादात ह्यानी खीळ घातली जोन यू आर राईट अँड युवर मॅडम ऑल्सो राईट ' डोन्टच्या ऐवजी जोनला वाटल डन हू च डन Done डन, पुट वॉटर— म्हजे पाणी घाल

' डन फिनिश म्हणजे काम झाल हे नवीन इंग्लिश व्याकरण विघडलेल्या भेंडीच्या भाजीबरोबर मी शिकले

मिना गावातील भारतीयाशी ओळखीपाळखी होऊ लागल्या तसे एकेकाने जेवायचे आमंत्रण द्यायला सुरुवात केली तसे इथले वास्तव्य थोडेच होते पुन्हा वीजकपातीचा प्रॉब्लेम काही सार्वजनिक पार्ट्या यात ही वैयक्तिक जेवणं ठरविली त्या रात्री श्रीनिवासन् याच्याकडे जेवायला गेलो मिना गावापासून दूर असलेल्या एका टेकडीवर श्रीनिवासन् राहात. रेल्वे ऑफिसर म्हणून ब्रिटिश पद्धतीनं बाधलेला डाकबंगला टाईप त्याचा प्रशस्त बगला अंगणातून खालच्या मिना गावातले दिवे लुकलुकताना दिसत. अर्थात खोपोलीचा झगझगाट नव्हताच तरीही त्याच्या अंगणात उभे राहून आजूबाजूला गाव न्याहाळायला मला आवडे. मग तो दिवस असो की रात्र

गप्पा रंगल्या होत्या बिअर, व्हिस्की, वाईन, मुलासाठी कोकाकोला, गोल्डस्पॉट, नेहमीचंच सर्व जेवण मात्र माझ्यासाठी शाकाहारी इडली-सांबार, दहीभात, लोणच, पापड याचे तसा माझ्यावर कुठल्याही मद्याचा फारसा परिणाम होत नाही ह्या परदेश-प्रवासात तऱ्हेतऱ्हेची मद्ये चाखून पाहण मला आवडलं होत पण बिअर आणि याना माझ्या लेखी सारखेच महत्त्व कारण मी मद्याला खास महत्त्व देत नाही

पण त्या दिवशी मात्र मी स्वीट वाईन न घेता, कोकाकोलाच घेतला होता दुपार-पासूनच मला जरा शोष पडल्यासारख वाटत होत म्हटल, असेल उन्हाळा. घुटक्या-घुटक्याने घेतल्या जाणाऱ्या वाईनपेक्षा घटाघटा पिता येणारा थडगार कोकाकोला त्या दिवशी बरा वाटला तरीही तहान भागेना म्हणून गोल्डस्पॉट आणि स्प्राईटही घेऊन पाहिले सर्वांच्या गप्पा रंगात आल्या होत्या माझ मन गप्पातही लागत नव्हत की नेहमीप्रमाणे छोट्या मुलाच्या धुपमध्येही रमत नव्हत मनात आल, आज असं का होतंय ? घरी जाऊ या ही सूचना माझ्याकडून होण योग्य नव्हतं कारण आम्ही गेस्ट होतो. तरीही माझा अस्वस्थ चेहरा मिसेस शेट्टींच्या लक्षात आलाच आम्ही भराभर जेवण उरकली इतर दोन फॅमिलीज थांबल्या. मिस्टर व मिसेस शेट्टी नि आम्ही दोघं निघालो. मला थडी भरली होती पायातून मुंग्या यायला लागल्या होत्या. हाताला



६८१
भू प्रवास २४०८३
३/१२/८३

जडपणा आला होता चक्कर आल्यासारखं वाटत होतं दहा मिनिटापूर्वीचे आठवत नव्हते डोके भरभरत होते, कारण डोक्याचा ठणका ठाणठाण घाव घालत होता ही सुरुवात ज्या मज्जातंतूच्या दुखण्याला मी घाबरत होते त्याची, ह्यांना केवढा प्रचंड त्रास होईल या भीतीची इथं मला वाचवणारा डॉक्टर कोण ?

शेट्टी मंडळींनी आम्हाला डॉ अरोराकडे नेलं दीड–दोन मैलाचा वीस मिनिटाचा प्रवास, उतरणीवरच्या गडगडणाऱ्या दगडाप्रमाणे माझी प्रकृती ढासळू लागली दमा –जोरदार दमा जीव गुदमरून टाकू लागला थंडी, क्रॅम्प्स यात ‘ जफारू इन ’ हे हॉटेल कधी आलं समजलंच नाही डॉक्टर अरोरा इथंच राहात. एकच जिना चढताना मुंबईचं देवनारचं हॉस्पिटल आठवत होतं नेहमीप्रमाणे कॅज्युअल्टी, मग डॉक्टरांची तपासणी व वॉर्ड हा क्रम नव्हता. थेट डॉक्टरांच्या खोलीत घुसलो M D मेडिसिनमध्ये गोल्ड मेडल मिळवलेले हे दिल्लीचे डॉक्टर डॉक्टर अरोरांनी प्रथम मला कॉटवर झोपायला सांगितलं नि परत तशाच मुंबईसारख्या तपासण्या सुरू झाल्या मी मनात विचार करत होते या डॉक्टरच्या हुषारीबद्दल ऐकलंय तर खूप हा काही नवीन उपचार करून मला बरं करेल काय ? आफ्रिकन ब्लॅक मॅजिकची मला आठवण झाली तपासणी झाल्यावर त्यांनी सांगितलं, बेडरेस्ट घ्यायला हवी भराभरा त्यांनी औषध लिहून दिली दोन-चार बाटल्या परत कोकाकोला पाजला पोट फुगलेले होते युरिन होत नव्हती अख्खा क्रेट पोटात रिचवल्याप्रमाणे मी कोकाकोला प्यायले होते. तरीही जर लघवी झाली नाही, तर कॅथेटर घालून काढावी लागणार परका देश, परकी माणसे अनोळखी डॉक्टर, आणि जुनाट–चिवट दुखणं या वेळेस पुन्हा माझी इच्छाशक्तीच माझ्या मदतीला धावली लघवी झाल्यावर हुडहुडी भरणारी थंडी कमी झाली श्वासोच्छ्वास करता येऊ लागला तास–दीड तासानंतर हातापायाला येणाऱ्या मुंग्या, बधिरपणा यासह आम्ही घरी परतलो मी थेट बेडरूम गाठली आता इथे किती दिवस पडून राहावं लागणार ?

सकाळी ह्यांनी सांगितलं, ‘ मी स्वैपाक करतो ’ पंचवीस वर्षांनंतर आज प्रथमच सकाळी शेजारीणबाई परिमला राजी पाहून गेली जेवणही पाठवणार होती पण मीच म्हटले, आज नवऱ्याच्या हातचे आज प्रथम खाऊ दे ’ दुपारी भेंडी चिरून दिली कुकर कसा लावायचा हेही दाखवलं सगळं निजून निजूनच, पण बाराच्या टाईमाला भात आणि तेलात तळलेली भेंडी मिळाली

मी नसताना हे स्वतः स्वैपाक करून जेवत याच्यावर विश्वास ठेवण्याइतपत चांगलं जेवण ह्यांनी बनविलं मला बरं वाटू लागल्यावर जेवायला बोलावण्याची एकच घाई उडाली त्या वेळेला परदेशात गेलं की आपोआप सुगरणपणा येतोच हे समजलं आणि रोज संध्याकाळी एकेका घरी गप्पा मारायला जाण्याचं गुपितही

एक दिवस गेला हे दुसरे दिवशी ऑफिसला गेल्यानंतर उलटी झाली, नि मी

अक्कत उठून टॉयलेटकडे धावले बेडरेस्ट बोंबलली झाल्ही काही नाही म्हणजे उठा-यला हरकत नाही पाच वाजता हे घरी आल्यावर चक्क उपमा केला सध्याकाळी डॉक्टर नि इतर शेजारी तब्येत बघायला आले त्याना तोच खाऊ घातला अर्थात पातेल उचलण, कादा चिरण, उपमा ढवळणे, प्लेटस् भरणे, सर्वांना देणे, प्लेटस् उचलून ठेवणे ही कामे ह्यानीच केली दुखण्याने झेप मोठी घेतलेली नव्हती म्हणजे मज्जातंतूंच्या रोगाने दमा जन्माचा साथीदार, त्याचे भय नव्हते थडीताप परदेशात घुसलेला पाहुणा त्याला काय भ्यायचे ? हाताचा नि पायाचा अधूपणा पूर्वीचाच तो काटाभर वाढला होता एवढच आणि दुखणारी कबर मरेपर्यंत दुखणार होती त्याविषयी तक्रार करायची नाही हे दोन वर्षांपूर्वीच समजले होते दुखण मला सरावलं होत, मी दुखण्याला तरीही सात–समुद्र ओलाडल्यानतर ते माझ्या भेटीला आल्या-वर मी घ हे तर हबकलोच पण डॉ अरोरानासुद्धा काळजीत टाकले इतर भारती-यातही माझ्या दुखण्याचा गाजावाजा झालाच अर्थात मिना गावातल हास्पिटलायझेशन मात्र चुकल मग ठरविल, निदान मिनातल जनरल हॉस्पिटल तरी पाहून याव कस असेल ?

गेल्या पाच वर्षांतून माझे हॉस्पिटलशी अतूट नाते जमलेले आहे विशेषतः नवीन लग्न झाल्यावर श्रावणात, भाद्रपदात माहेरी जातात त्याप्रमाणे दरवर्षी जुलै-ऑगस्टमध्ये हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होण्याचा माझा क्रम चुकला नाही म्हणून माझा श्याम मला म्हणतोही, ' आई, तू आपली पावसाळा ह्या माहेरीच काढ म्हणजे मुंबईच्या पावसाळ्याची जिगजिग नाही तुला ' माझ्या हॉस्पिटलमधील ॲडमिट होण्याला मुलानी माहेरपण असं गोंडस नाव दिलय आजारपणाची थट्टा करून दोघानीही त्याचे गाभीर्यच घालवले साहजिकच माझ्याही मनावरचे प्रेशर कमी होतेच नाही म्हटले तरी सुखा-सुखी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होणे कोणालाच नको असते कोर्ट, पोलिस चौकी, हॉस्पिटल यापासून चार पावले दूर राहावे म्हणतातच, पण माझ्या नशिबाने हॉस्पिटल हे माझे माहेर झालय माहेरची कल्पना खावे, प्यावे आराम करावा हॉस्पिटलमध्य याच्या जोडीला उपचार असतात शेवटी मनाने समाधान करून घ्यायचे तरीही आमच्या B A.R C च्या हॉस्पिटलइतका सुरक्षितपणा मला कुठेही वाटत नाही माझ्या आजारपणामुळे जे जे ते जसलोक फिरावे लागलेच. आता मी माझा देश सोडून परदेशी होते आजारपणाला खो देऊन पळून आल्यासारखी पण ते माझा पाठलाग थोडाच सोडणार ! माझे आजारपण म्हणजे माझ्या पाठीवर बसलेला सिंदबादचा म्हातारा

इथे या मिनातही आजारपणान पाठलाग सोडला नाहीच चार दिवस निजून राहिले तरी थोडक्यात निभावले नायजेरियातल्या हॉस्पिटलमध्ये जाण्याची मला हिंमतच नाही तरीही औत्सुक्य म्हणून मिनातले हॉस्पिटलही पाहावे असे सागने

वाटत होते शेवटी डॉ. अरोराना सांगितले. मिनातले माझे आजारपण डॉ अरोरानीच निभावले होते माझं थोडसं थोडंस लेखन, सोशलवर्क या गप्पातून समग्र आजारपणही डॉक्टर म्हणून त्याना सांगाव लागलच साहजिकच इथले हॉस्पिटल पाहण्याची माझी उत्सुकता त्याना समजू शकली आणि एका रविवारी संध्याकाळी आम्ही मिनाचे जनरल हॉस्पिटल पाहायला जायचे ठरवले बहुताशी भारतीय व पाकिस्तानी डॉक्टर असलेले हे हॉस्पिटल जागेची कमतरता नसल्यामुळे सर्व बैठ्या इमारती भले मोठे आवार त्या मानाने रहदारी मात्र कमी होती O P.D , इमर्जेन्सी, कॅज्युअल्टी इत्यादी विभाग आपल्यासारखेच व्यवस्थापनावरही भारतीय छापच पुढे लागले ऑपरेशन थिएटर. फक्त इथे ऑक्सिजन सिलेंडर आहे बाकी हॉस्पिटलात नाही मग नर्स मेट्रन इत्यादींच्या रूम्स नतर पाहिली पेशंटच्या नातेवाइकासाठी असलेली विश्रामगृहे. पेशट दूरदूरच्या खेड्यातून, वस्त्यातून, जंगलातून येतात बरोबरच्या नातेवाइकानी राहायचे कोठे ? म्हणून ही सोय मला जे जे , के ई एम् च्या परिसरात, बानलेसवाडी, घटप्रभा इथे पाहिलेल्या नातेवाइकासाठी असलेल्या विश्रामधामाची याद आली जागा, लोकसख्या इत्यादी माझे विषय नव्हेत पण कुठेतरी काहीतरी फरक जाणवला

विश्रामधामात याम वाळत पडले होते बायका रात्रीच्या स्वयपाकाच्या तयारीला लागल्या होत्या डॉक्टराबरोबर आम्ही फिरत असल्याने आमचाही रुबाब होता हॅलो होत होते मग पाहिले जनरल व स्पेशल वॉर्डस स्पेशलमध्ये सध्यातरी कोणी पेशट नव्हते फिमेल वॉर्डात फिमेल पेशटजवळ तिचे लहान मूलही होते, व अटेंडट असणाऱ्या बाईचेही. नर्सही पाठंगुळीला आपले बाळ बाधूनच काम करत होती हे बघून मात्र मी थक्क झाले नर्सेसना अशी सवलत दिली तरच त्या काम करू शकतात त्यामुळे इथली नर्स ड्यूटीवर येताना तान्ह्यास घेऊनच येते काम कसे आणि कितपत होते हा प्रश्न विचारण्याचे धैर्य मला झाले नाही फिमेल वॉर्डनतर डॉ अरोराच्या मेल वॉर्डात आलो संपूर्ण गलिच्छ हॉस्पिटलातला हा एकमेव स्वच्छ वॉर्ड दिसला

संध्याकाळ झाल्याने मुस्लिम पेशट नमाज पढत होते माझे बालपण सांगलीला खणभागात गेले. आजूबाजूला बरीच मुसलमान वस्ती बाग, नमाज याचे मला नावीन्य नव्हते आईचे एक स्नेही (लेखक) पैगंबरवासी अमिन याच्या घरच्या शिरखुरम्याची अजूनही याद आहे कोपऱ्यावरच पठाण याचे घर होते त्याची मुलगी पहिली-दुसरीत माझ्याबरोबर होती आज तिचे नाव आठवत नाही पण तिच्या शादीला मी होते मी एक ब्राह्मणाची मुलगी असूनही आमची गल्लीच अशी वडिलाचा पेशा डॉक्टरीचा त्यामुळे ख्रिश्चन, मुस्लिम, धनगर, सर्व पेशंट सारखेच साहजिकच डॉक्टराची मुलगी म्हणून माझाही मुक्त सचार चाले त्या वेळेस कितीदा मी विजय हजारेच्या घरी गेले होते त्याचे वडील बाबाचे पेशंट, पण आपण एका क्रिकेटपटूच्या घरी जातोय ही

कल्पनाच नाही आता माझा मुलगा म्हणतोय, आई, तू तेव्हा त्याची स्वाक्षरी घेऊन ठेवायची नाहीस का ? माझ्यासाठी-!' तर अशा या भागात मी वाढले थोडेफार इतर धर्मांचे रीतिरिवाज म्हणूनच समजले तिन्हीसाजेला घरासमोरच्या जैनाकडे 'वास असे, तर पोलिस चौकीपलीकडच्या मशिदीत नमाज त्यापुढील पंचमुखी मारुतीच्या देवळातली घंटा कोणी वाजवे त्यापलीकडच्या वाड्यात जोगतिणींचा जग होता सर्वत्र संमिश्र वातावरण होते नमाजाच्या वेळी सर्वजण एका रांगेत पश्चिमेकडे तोंड करून गुडघ्यावर बसत सर्वांचीच तोंडे पश्चिमेला का ? हा अगदी लहानपणी आजोळी विजापूरला गेले असताना विचारलेला प्रश्न अजूनही आठवतोय मक्का–मदिना (काबे-खाना ) पश्चिमेला म्हणून पश्चिमेकडे तोंड करून नमाज पढतात उत्तर मनावर बिंबलं होत बिहारपासून खूप जागी हिंडलो मुसलमान असायचेच, नमाजही. सर्वांची तोंडे पश्चिमेला त्यामुळे नमाज म्हटला की पश्चिमेकडे तोंड हे समीकरण

लेगॉसच्चे पहिले आठ दिवस बधिरपणातच गेले इकडे तिकडे चौकसपणे पाहणे नव्हतेच मग आलो भिनास दोन-चार दिवसात स्थिर-स्थावर होताच चौकस बुद्धीने डिवचायला सुरुवात केली घरासमोरच अलाहानी नको बाकुचे गेस्ट हाऊस होते व्हराड्यात त्याचे वॉचमन नोकर नमाज पढत एक दिवस सकाळी सकाळी लक्षात आले नमाज पढताना या लोकांची पाठ पश्चिमेकडे व तोंडे पूर्वेला मी चकीत ! असे कसे ? बायकोचे अज्ञान याच्याइतके कोणालाच ठाऊक नाही स्वभावही मी चौकसपणे विचारण्याआधीच ह्यांनी सांगून टाकले अगदी लहान मुलाला समजावतात तसे समजावून सांगितले आफ्रिकेत आपण पश्चिम किनाऱ्यावर आहोत म्हणून मक्का पूर्वेला येते म्हणून नमाज पढताना पूर्वेकडे तोंड समजल ? खानेकाबा (मक्का) ज्या दिशेला त्या दिशेला तोंड करून नमाज पढतात मला समजले तरी उमगले नाही जमिनीवर जगाचा नकाशा पसरला तर तो सपाट शेवटी कंटाळून ते म्हणाले, ' भारतात गेलीस की श्यामच्या शाळेत जा व पृथ्वीचा गोल पाहा म्हणजे तुझ्या डोक्यात प्रकाश पडेल मी लगेच मान डोलवली आता भारतात जाताच पृथ्वीचा गोल पाहणे हे पहिले काम. कारण इथले मुसलमान चक्क पूर्वेकडे तोंड करून नमाज पढत होते आजमितीस कोणीही ओळखीपाळखीत मुस्लिमधर्मीय नाही तेव्हा अज्ञान फारसे उघडे पडणार नाही पण शंकासमाधानही होणार नाही ही रुखरुख त्या नमाजाबरोबर राहिलीच

या इलाह इल्ल इल्लाचे सूर घुमत होते एरवी सर्वांची भाषा इंग्रजी किंवा टोळीची प्रमुख भाषा ' हसा ', योरबा, इबो इत्यादी या उत्तरेकडच्या भागात हसा ही प्रमुख बोलीभाषा आहे शिवाय 'नुपे' नावाची पोटभाषाही नॅशनल लँग्वेज मात्र इंग्रजी पण नमाज मात्र अरेबिकमधून पढला जात होता इतर अरेबिक शब्दाचा गधही नसलेला वॉचमन नमाज अरेबिकमधून पढत होता.

संस्कृत कधीही न शिकता ' ॐ भूः भुवः ... प्रचोदयात् ' म्हणत गायत्रीमंत्र जपणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणे अर्थ माहीत नाही आचार समजत नाही, विचार समजत नाही. रूढीनुसार कृती होत होती कारण धार्मिकतेचा प्रभाव

' अल्ला हो अक्बर सुव्हाना रब्बित अजिम " नमाजाच्या भारलेल्या स्वरातच दंग होऊन मी क्षणभर थबकले होते आठवण कुठे घेऊन गेली मला ' चलिये मिसेस गोखले ' डॉक्टर अरोरांनी वास्तवात आणले उरलेले हॉस्पिटल बघू लागलो तसे हॉस्पिटलचे आवार मोठे होते हॉस्पिटल बरेचसे सुसज्जही होते म्हणे पण ऑपरेशन थिएटरव्यतिरिक्त ऑक्सिजन नव्हता खास पेशंट येतच नसत गरीब तसेच मरतात श्रीमंत परदेशी जातात मध्यमवर्गच नाही औषधापेक्षा मंत्रतंत्र, झाडपाला यावरच जास्त विश्वास आणि भर त्यामुळे सुसज्जताही तितपतच भारतातल्या खेड्यातील वैद्यकीय मदत याहून फारशी वेगळी नसेल पण मुंबईची सुसज्ज हॉस्पिटले, अद्ययावत उपचार मी पाहात होते त्या पार्श्वभूमीवर हे मिनातले हॉस्पिटलही पाहिले परतताना लक्षात राहिल्या तीनच गोष्टी भारतीय डॉक्टरांबद्दल आदर व विश्वास सर्वांना आहे, नर्स पाठगुळीस बाळाला बांधून काम करते, आणि पेशंटच्या नातेवाइकांना आवारातच केलेली राहण्याची सोय

गुडबाय—मिनाच्या जनरल हॉस्पिटलला

इथल आयुष्य एक ठराबीक मोनोटोनस आयुष्य होत दिवसभर घरकाम, स्वयंपाक, बरोबर मुल असतील तर त्यांच करण ती भारतात असतील तर त्यांच्या आठवणीने झुरणं संध्याकाळी नवऱ्याबरोबर टी व्ही पाहण किंवा आल्यागेल्याबरोबर ड्रिंक घेण, पार्टी देण, पार्टी घेण भारतातून आणलेल्या हिंदी गाण्यांच्या कॅसेट्स ऐकण, पत्र लिहिण, पत्र वाचण, हे सर्व आयुष्य मी एक महिन्यातच उपभोगल लेगॉसला जायचा दिवस उजाडला रागिणी, चांदणी, पिंटू, नवीन यांचा लळा लागला होता मुलं विसरून जातील पण भारतात मला या पोरांची आठवण होईल त्याच काय ? कधी कुठल्या तलावाच्या काठी गेल्यावर ' तगवाई डॅम ' आठवेल का ? त्या दिवशी तगवाई डॅमवर सूर्यास्त बघायला मी थांबले होते पण सूर्य तळ्यात बुडालाच नाही वरच्यावर आकाशातच अदृश्य झाला भौगालिक ज्ञान माझं कमीच त्यामुळे विषुववृत्तावर चंद्राच किंवा सूर्याच आकारमान भारतापेक्षा मोठ का दिसतं ? क्षितिजरेषेची कड का दिसत नाही ? देश बदलतो, वेष बदलतो, संस्कृती बदलते, निसर्ग बदलतो हा सृष्टिनियम का ' तगवाई डॅमवर पुन्हा जायची इच्छा असून जमलं मात्र नाही नॅशनल पार्कला वन्य पशू पाहायला जाणंही जमल नाही निसर्गाच बदलत रूप मात्र बघितल हिवाळा सुरू झाला होता सहारा वाळवंटातून अतिशय सूक्ष्म धुळीचे वादळ आसमंतात पसरून पुढे पुढे सरकत होत. ' हिमॉर्टॉन हॅज स्टार्टेड नॉर्थ नायजेरियात ज्याच्या त्याच्या तोंडी येऊ लागले बाऽगीक अतिशय सूक्ष्म धुळीचे वादळ सूर्याच्या

तीव्र प्रकाशावर आच्छादन घालणार. सूर्याचं तेज झाकोळून टाकणार भर बारा वाजताही गॉगलशिवाय उघड्या डोळ्यानी सूर्य पाहू शकत होतो सर्दी, पडसं, खोकला सर्वांनाच होत होता मला जास्त प्रमाणात.

उद्या सकाळी मिना सोडायचं पुन्हा मी येईन की नाही माहीत नव्हतं. शक्यता कमीच होती एक महिन्याच्या सहवासात जिव्हाळ्याचे बंध बांधले गेले होते आत्ता-पर्यंत खूप ठिकाणी हिंडलो बदलीनिमित्त राहिलो, पण एवढी ॲटॅचमेंट कुठे निर्माण झाली नव्हती शेट्टी, राजी, सिंग, श्रीनिवासन् फॅमिली--सर्वांनाच वाटत होतं की मी पुन्हा परत यावं डॉक्टर म्हणून आणि मित्र म्हणूनही डॉक्टर अरोराशी माझी गट्टी जमली होती सकाळी सातला मिना सोडताना हे सगळेच्चजण आणि मेजर फाकुरोडे, युनाला मुसा सेंड ऑफ द्यायला जमले होते परत या, परत या म्हणत होते मला अकारणच भारत सोडण्याची आठवण झाली पालम एअरपोर्ट ! एकटीने पहिलाच परदेश प्रवास मुल, जावई महाराष्ट्रात, हे परदेशात पोचवायला एकुलते एक स्नेही बॉन व्हाएज म्हणाले, 'लौकर परत ये सेफ जर्नी', हॅव नाईस टाईम', 'पुन्हा मिनाला या या निरोपात मिना सोडले अब्दुल्ला एकाग्रतेने ड्रायव्हिंग करत होता हिरवंगार आफ्रिकेचं जंगल दोन्ही बाजूंनी पसरलेलं, मला निरोप देत होतं. सेफ जर्नी' मिनाला जाताना अनोळखी वाटणारा देश आता ओळखीचा वाटत होता मोठी शेकोटी पेटवली होती खरपूस अन्नपदार्थ भाजले काळे काळे आफ्रिकन्स ड्रमच्या तालावर फेर धरून नाचत होते 'हुवालाऽऽ हुऽऽबाला' आमच्या देशात तुम्ही पाहुणे आलात आमचं जंगली स्वागत तुम्हाला गोड वाटलं का ? पुन्हा परत या पुन्हा सुस्वागतम् 'ला फिया ला, ला फिया ला' 'हुऽऽवाला हुऽऽबाला मी जशी आले तशीच परत जात होते ? मनात कडूगोड आठवणी घेऊन भारतात जात होते मला पोचवून हे परत येणार होते पण मी आता भारतातही सुखात राहू शकले असते का ? इथे होणारे यांचे जेवणाचे हाल समजले होते ह्यांचे एकटेपण जाणवले होते क्षणोक्षणी धोकादायक वाटणारा, असणारा प्रवास ह्यानी किती वेळ करायचा ! मिलिटरीच्या नोकरीमुळे सर्व लोक यांच्याशी चांगले अदबीने वागत पण--पण डॉ दाहांचा तिनुबु चौकात भर गर्दीत झालेला खून मी विसरू शकेन ? श्रीकृष्णाची गाडी पळवताना तो सुदैवानं बचावला असे सुदैव सर्वांचेच असेल ? लॅगॉस एअरपोर्टवर मी बचावले असा प्रसंग आणखी कोणावर येत असेल ? माणसाच्या मनाचे क्रौर्य कधी कुठं उफा-ळेल सांगता येत नाही. या क्रौर्याला देश, जाती, धर्म यांचे अडसर नसतात ते कुठेही दिसतेच अगदी माझ्या भारतातही म्हणूनच धोका असूनही सुखानं भारतीय आफ्रिकेत मध्य पूर्वेत नोकरीला जातातच मिळणारा पगार व सुखसोयींपुढे हा कधी तरीच वाट्याला येणारा धोका काहीच नाही जगायचे--सुखात चांगले जगायचे चार पैसे हवेत. चार भिंती, छप्पर हवे १०रु किलो साखर दोन दोन कप चहासाठी

घेण्याची ऐपत हवी मुलाना उच्च शिक्षण देण्यासाठी पैसा हवा म्हातारपणी त्याच मुलावर अवलबून राहू नये म्हणूनही पैसा हवाच आणि मग असा धोकाही पत्करायला हवा एक छोटासा ब्लॉक मुंबईत खरीदण्यासाठी ढीगभर पैसे मिळवायला दोन वर्षांसाठी आम्ही हा वनवास पत्करला होता आता तक्रार नको काहीच नको ना खत ना खेद म्हणत मी भारतात राह्यचे पण भारतात राहूनही मी याच्यासाठी काळजीने तळमळत होते इकडे राहूनही मुलाच्या आठवणीने कासावीस होणार होते. दृष्टीआड सृष्टी या आभासाला दूर सारून मी सत्य पाहिल होत विचारामागून विचार गाडीच्या वेगाने धावत होते

मिना दूरदूर जात होते. माध्यान्हीचा सूर्य तळपत होता गाडी वेगात जात होती अब्दुल्ला एकाग्रतेने गाडी चालवत होता ह्याना शात झोप लागली होती मीही डोळे मिटून घेतले

' गुडबाय टू मिना —

तिन्हीसाजेला लेगॉसला येऊन पोचलो भारतात जायचं असूनही जीव हुरहुरत होता आठ दिवस मुलासाठी खरेदी, सामानाच पॅकिंग, लेगॉसमधील मराठी मडळीं-कडे जेवणे, पार्टी यात जायचा दिवस येऊन ठेपला सर्वांनाच माहीत होत मी आता पुन्हा येणार नाही मलाही माहीत होत लेगॉसमध्ये पाऊल ठेवताच मी नायजेरियन इंटरनॅशनल टेलिफोन सर्व्हिसद्वारे दिल्लीत माईशी, डॉक्टराशी बोलले होते आज दिवसभर प्रयत्न करूनही सर्किट बिघडल्यामुळे भारतात फोन लागत नव्हता दुपारी दीडची फ्लाईट होती श्री व सौ पाटील एअरपोर्टवर पोचवायला आले होते अब्दुल्लाही होताच आमची स्वतःची गाडी होती बरोबर हे होते

एअरपोर्ट आला मुरताला महमद एअरपोर्ट क्षणभरच मी शिरशिरून उभी राहिले. डिपार्चर लाऊजपाशी ह्या दुसऱ्या मजल्यावरून आम्ही देश सोडणार होतो ह्याच दुसऱ्या मजल्यावरून काही दिवसापूर्वी अब्रूरक्षणार्थ मी जीव देणार होते तेव्हाही वेळ दीडचीच होती. पण रात्रीची. मी एकटी होते आज एअरपोर्ट गजबज-लेला होता. फ्लाईट जायच्या होत्या यायच्या होत्या. मला पोचवायला मडळी आली होती सोबतीला हे होते सिक्युरिटी चेकिंगला जायला निघालो मनीषाने शेकहॅड केला पाटीलही म्हणाले, वहिनी, पुन्हा नायजेरियाम या बॉन व्हाएज ' सगळ्यात शेवटी पुन्हा एकदा अब्दुल्ला गुडघे टेकून कमरेत वाकून म्हणाला, ' मॅडम, कम बॅक टू नायजेरिया. सेफ जर्नी, सेफ अरायव्हल, वेलकम अगेन ' काळ्या सागरातील एक बिंदू मला त्याच्या देशात पुन्हा येण्याचे आमत्रण देत होता सिक्युरिटीच्या लोकानी फटाफट चेकिंग केले सर्वजण प्रेमाने, नम्रतेने, अदबीने वागत होते ह्याचे मिलिटरीचे आयडेंटिटी कार्ड ह्याच्या अधिकाराचा प्रभाव दाखवत होते त्याच्या मागोमाग असलेल्या मलाही अभिवादन केले जात होते

हात हलवत सिक्युरिटी ओलांडून आम्ही आत गेलो. आतल्या लाऊजमध्ये शुकशुकाट होता फक्त आम्ही दोघेच पॅसेंजर होतो आम्हाला दिलेल्या नंबराच्या डोअरकडे गेलो फक्त एक माणूस उभा होता आमच्यासारखाच आशियाई पाकिस्तानचा तोही सुट्टीला परत चालला होता गप्पा मारत आम्ही बसून होतो राजकारणाचा विषय टाळून नायजेरिया, तिथली गावे, काम वगैरे सटरफटर एक-दीड तास गेला फ्लाईट लेट होती घरून निघताना घाई झाली होती काउंटर चेकिंगलाही समजले नव्हते. आत आल्यावरच कळले बाहेर आता जाता येत नव्हते आणि बाहेरच थांबलो असतो तर पाटील, अब्दुल्ला सर्वांचाच खोळंबा! पुन्हा बोलायचे काय? अशा वेळी निरोप चटकन घ्यावा वाटते, बोलायला सुचत नसते निरर्थक किती आणि काय बोलणार? त्यापेक्षा आपल्याशीच विचार करत बसून राहणे बरे वाटत होते पुन्हा मला पालम विमानतळच आठवत होता मी आत निघाले डॉक्टरांनी हाक मारली, 'पुन्हा भेटू एवढंच म्हणाले मी काहीच बोलले नाही मागे वळून न पाहताच चालू लागले वळून पाहिले असते तरीही काही दिसले नसते डोळे भरून आले होते

आता मुंबई एअरपोर्टवर माधुरी, श्याम भेटतील डॉक्टरही नक्कीच येतील कसे असतील सर्वजण? माधुरी कशी दिसेल? लहानपणी श्याम-माधुरी शिक्षणासाठी आईजवळ राहात सांगलीला. आम्ही जादुगोड्याला मधून मधून मी येऊन राह्यची. मी यायच्या दिवशी श्याम दिवसभर घरच्या पायरीवर बसून राह्यचा. माझी वाट बघत. मी टांग्यातून उतरताच धावत येऊन मिठी मारायचा पण आता श्याम मोठा झालाय. तरुण झालाय

नैरोबी कैरो पाहून आम्ही भारतात जाणार होतो डिसेंबरच्या थंडीमुळे युरोपचा प्रवास जमणार नव्हता. परंतु माझ्या प्रवासाच्या मनस्वी हौसेपायी केनिया, इजिप्तला जाणार होतो कशी असेल नैरोबी? आफ्रिकेतीलच पूर्वेकडील एक शहर पश्चिमेकडून पूर्वेकडे नॅशनल पार्क, लायनसफारी-खरेखुरे जंगल जोपासलेला देश टारझनची आफ्रिका, त्याचे वन्य दोस्त दिसणार होते. मन हळूहळू पुढच्या प्रवासात गुंतू लागले खिन्नता कमी होऊ लागली एवढ्यात अनाऊन्समेंट झाली नायजेरिया एअरवेजचे केनियाला जाणारे विमान तयार होते आम्ही शूटकडे चालू लागलो सहा साडेसहा वाजून गेले होते सूर्य मावळतीला आला होता सध्याकाळच्या या हुरहुरत्या वेळी आम्ही नायजेरिया सोडल मूरताला महमद विमानतळावरून विमान आकाशात झेपावले सूर्याचा केशरी गोळा कुशीत घेऊन उंच उंच जाऊ लागलो परतीचा प्रवास सुरू झाला होता गुडबाय टू नायजेरिया परतीचा प्रवास पश्चिमेकडून पूर्वेकडे चालू झाला

पूर्व-पश्चिम या दिशांना काय अर्थ? माझा हा प्रवास असा दिशा आखून होता का?

प्रवास कोठून कुठे होता ? कुठे चालला होता ? दोन गावाची नावे निश्चित असतात तेव्हा त्या पूर्वपश्चिम दिशाना अर्थ असतो, पण एका अस्वस्थ मन:स्थितीतून दुसऱ्या अस्वस्थ मन:स्थितीकडे जातो तेव्हा दिशा नसतात तेव्हा फक्त प्रवास असतो फक्त प्रवास !

•

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६४१
प्रवास २४०९३
३।१२।८३
ग्रंथ - शाखा

REFBK-0024093